म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
स. नं. ३८०

२०६
ज्ञा.

म. ग्रं.
विषय इतिहास
संग्रहालय क्रमांक २०६
लेखक आर्चिबाल्ड् क्याकडानल्ड्
पुस्तकाचें नांव गुजराथ देशाचा इतिहास
सन १८५०

ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/ वाचनालय/ जिल्हा वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. | विभाग | क्रमांक
पुस्तकाचें नांव गुजराथ देशाचा इतिहास
लेखक
प्र० सन १८५०
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

THE

# HISTORY OF GUJARAT

OF

## 'ALI MUHAMMAD KHAN,

TRANSLATED INTO MARATHI,

ACCORDING TO THE ENGLISH VERSION OF

JAMES BIRD, Esq.,

BY


CAPTAIN A. MACDONALD,
18th Regt. B. N. I.


---


BOMBAY:
PUBLISHED BY THE DECCAN VERNACULAR SOCIETY.

---

M.DCCC.L.

# गुजराथ देशाचा इतिहास.

जेम्स् बर्ड् साहेबानीं अल्ली महंमदखान यांच्या ग्रंथाचें
इंग्रजी भाषांतर केलें आहे, त्यावरून मुंबई पायदळ
खात्याच्या एतद्देशीय लोकांचे अठराव्या पलटणीच्या
क्याप्तन् आर्चिबाल्ड् म्याकूडानल्ड् साहेब

याणीं

**मराठी भाषेंत केला;**

---

तो

दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीच्या आज्ञेवरून
आपा रामजी याचे कारखान्यांत छापिला.

मुकाम मुंबई. इसवी सन् १८५०.

# गुजराथ देशाचा इतिहास

## प्रकरण १

हिंदुस्थानांतील सर्व मुख्य देशांपैकीं गुजराथ देशांत हवा चांगला आहे, हें विचारवंत आणि शोधक पुरुषांस ठाऊक असेलच. तेथें बहुतकरून हवा समधात असत्ये परंतु समुद्र किनाऱ्यावरील जाग्यांत हवेचा फेर फार होतो.

तेथील जमीन वाळवंटी आहे, व तेथे पुष्कळ प्रकारचा गहूं उत्पन्न होतो, तथापि बहूतकरून त्या देशांत बाजरी पिकवितात, ती बाजरी कच्छ देशांत लोक नेहेमी खातात, व घोड्यांस ही तीच चंदी देतात. पूर्वी तेथील परगण्यात चांगले गहूं मिळत नव्हते, ते हालीं मिळतात. तेथील कित्येक परगण्यात पावसाळ्यांतील व वसंत ऋतूंतील नानातऱ्हेचे धान्याची लावणी पाऊस पडतो, तेव्हां अथवा शेतामध्यें पाट आणून एकदम करितात.

शेतें व खेडीं यां सभोंवतीं बहूतकरून निवडुंगाचीं कुंपणे असतात, तेणेकरून कित्येक दिवसानी गांवांचा व शेतांचा, बचाव होतो. पट्टणा पासून बडोद्या पर्यंत शंभर कोश अंतर आहे. त्या प्रदेशांत फळझाडें आंबे,

खिरन्या व दुसरींही फार आहेत. तेथे कांकड्या, नास पात व नानातऱ्हेचीं खर्बुजें सर्वोत्कृष्ट होतात, तीं नदीचा तिरीं वाफे करून लाविलीं असतां, उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत पुष्कळ होतात. या प्रमाणे सोराथ प्रांतात मिळत नाहींत तेथे नाना तऱ्हेचा सुवासीक वनस्पती फळें व भाजीपाला होतो, तो तेथील लोकांचे कामावर पडतो, त्याचा विस्तार लिहिला असतां ग्रंथ वाढेल.

तेथील सर्व घरें पक्या विटांचीं आहेत व पाळ्यावर सागवानी वांसे घालून त्याजवर कौलें घालितात, सोराथे मध्यें विटां ऐवजीं दगडांचीं घरें बांधितात.

कच्छ देशांतील घोड्यांत फार चपळाई असत्ये, व त्याचा बांधा केवळ आराबिया आणि इराकाएथील घोड्यां प्रमाणेच असतो. गुजराथेंतील बैल जे गाड्यांस जुंपितात, ते सफेत रंगाचे आणि सुंदर असतात. तेथे चित्या सारिखें शिकार करणारें जनावर दुसरें नाहीं तेथे ह्मशी व रेडे फार चांगल्या आकाराचे असतात. पूर्वीं मोठमोठाले हत्ती राजपिपळ परगण्यामध्यें सांपडत असत, परंतु त्या डोंगरांतील रस्ता बुजाल्यामुळें आतां ते सांपडत नाहींत.

लढाईतील हात्यारांविषयीं शिरोईची तरवार जिकडे तिकडे प्रसिद्ध आहेच, आणि गुजराथेंतील बोरु दुसरे देशांपेक्षां फार चांगला असतो ह्मणून तेथून हिंदुस्थानांत इराणांत व दुसरे देशांत तीर करण्याकारितां नेतात.

आराबियातील आंगठ्यांसारिख्या आंगठ्या, माळा, प्याले, चाकूंचा व कटारींचा मुठी अकीक ह्मणून धोंडा आहे, त्याचा नाना तऱ्हेचे रंगाचा खंबायत एथें होतात. हात्यारें व दुसरे नाना तऱ्हेचें हस्तिदंती सामान शेजारचे देशांत नेलें असतां त्या बद्दल जिन्नस मोबादला देतात. इराण, आराबिया, आबिसीनीया, तुर्कस्थान आणि यूरप, एथील कापडा प्रमाणे तेथे कापड व रंग ही होतो.

तेथे मीठ उत्पन्न होतें. समुद्र तीरावरील सर्व प्रदेशांमध्यें हद्दीकरून मिठाकरितां वाफे करितात, त्यास हिंदी भाषेंत कियारी असें ह्मणतात, त्यांत थंडीचे दिवशीं समुद्राचें खारट पाणी येऊन एके ठिकाणीं जमतें तेव्हां तें मीठ गोळाकरून नेतात, परंतु खंबायतेचे बंदरावर जें मीठ उत्पन्न होतें, तें मोठाले वाळूचे खडपा सारिखें असतें, आणि फार खारट असतें, त्यामध्यें मनुष्यास सामर्थ्य आणण्याची शक्ती आहे. काळें मीठ जास कृष्ण लोण अथवा पादे लोण व हिंदी भाषेंत संचल असें ह्मणतात, तें वर लिहिलेले बंदरांत मुरदाड शिंग जसें करितात, तसेंच मोरांड ह्मणून गवत आहें तें शिजवून करितात. तें मीठ शेजारचे देशांत समुद्रातून व खुष्की वरून नेतात.

बैराम गांवचे परगण्यात जंजवारा ह्मणून शहर आहे, तेथे खाणीतून दुसरे तऱ्हेचें मीठ उत्पन्न होतें. व याप्रमाणेच विहिरीतून दुसरे जातीचे मीठ उत्पन्न होते, तें

पांढरें सफेत खडे साखरेचे खड्या सारिखें असतें, वाणी लोक तें माळव्यांत आणि दुसरेठिकाणी घेऊन जातात. त्याचें जें उत्पन्न होतें, तें वर लिहिलेले परगण्याचे वसुलांत जमा होतें.

तेथें कागद होतात. दौलताबादी, काश्मिरी, कागद चांगले गुळगुळीत असतात, तथापि अहंमदाबादी कागदां सारिखे ते पांढरे व गुळगुळीत नसतात. दुसरेही नानातऱ्हेचे कागद होतात परंतु त्यांत इतका दोष असतो, कीं तो देश वाळवंटी आहे, त्या योगाने त्यास वाळूचे कणाने बारीक छिद्रें पडतात, व जी वाळू कागद तयार होत असतां त्यांस चिटकत्ये ती घोटत्ये वेळेस निघून जात्ये. यद्यपि त्यांत हा दोष आहे तरी त्याचे पांढरे पणावरून त्यास किमत फार पडत्ये. व दुसरा व्यापाराचा जिन्नस घेऊन हिंदुस्थानांतील सर्व परगण्यात व कान्‌स्तांटिनोपल्, आराबिया, एथें नेतात. गुजराथ प्रांतांत घरांचे वांसे खांब, कडीपाट, व जाहाजें, सागवानी लांकडाचीं करितात, आणि शिसवी लांकूड जें टेंभूचें लांकडा सारिखें असतें त्याचा बैलाचा गाड्या व दुसरे जिन्नस करितात.

इडूराकडे डोंगरी देशांत पांढरे धोंड्यांची एक खाण आहे, तसे धोंडे दुसरे देशांत मिळत नाहीत. त्यांचा चुना करितात, तो भिंतींचे आणि गच्चांचे व दुसरेही कित्तेक

इमारतीचे गिलाव्यास व सनल्यास व मोठाले वाडे, विलास मंदिरें, व थडीं यांस उपयोगीं पडतो. सनल्यास हा चुना लाविला तर त्यास घोटणी इतकी चांगली होत्ये कीं त्यांत आरशा प्रमाणें, प्रतिबिंब दिसतें. फरदास अशियनी शहाजहान याचे राज्यांत दिल्लीचे किल्यांतील वाड्याची डागडुजी केली, तेव्हां त्या धोंड्यांचा चुना गुजराथेंतून राजाचे हुकुमानें नेऊन कामास लाविला. मुसलमान लोकांचे फकीरांचा कबरी, व हिंदुलोकांचीं देवळें आणि दुसरीं प्रख्यात कामें जांविषयीं पुढें तपशीलवार हकीगत लिहिली आहे, तीं याच चुन्याने बांधिलीं आहेत. आणि नळ, तळीं, विहिरी, व दुसऱ्या ही कामास हाच चुना लावितात.

तेथील विहिरींचे पाणी खारट असतें तरी देशांतील सर्व पदार्थ सर्वोत्कृष्ट आणि इतके वाखाणण्याजोगे असतात कीं त्यांचे वर्णन केलें असतां ग्रंथ वाढेल, कारण हें ही लिहिलें पाहिजे कीं सर्व देशांतून वाटसरू लोक येत ते सर्व देशांपेक्षां हा देश चांगला असें ह्मणत तें ऐकण्यांत आहे.

सांप्रतकाळीं गुजराथदेश सांभाळ करण्या करितां नाझीमचे पांचहजार स्वार व या खेरीज फौजदार व कित्येक हुलरे कामगारांचे स्वार आहेत, त्यांस देशांचा बंदोबस्त करण्या खेरीज दुसरें काम करावें लागत नाहीं,

तेव्हां ते देशाचा बंदोबस्त करण्यास पुरेसे असतात.

गुजराथ देशाचा विस्तार व वसुल सुलतान मुझाफीर तिसरा जाणें गुजराथेचें राज्य शेवटीं केलें त्याचे राज्यांत व इतमीतखानाचे राज्यकारभारामध्यें हिजरी ९७९ व हिंदू विक्रमादित्य १६२७ व इसवी १५७१ या शकांत गुजराथेंतील जाहागीर दारांचे जाहागिरीचा, व सर्कारी जमीनीचा मिळून ५८४००५०००० पांच अर्व चवऱ्याय़शी कोटि पन्नासहजार गुजराथी ट्यांगचस् ह्मणून नाणे आहे त्याचा वसूल येत असे, आणि राज्यांत दोन लाख तीन हजार स्वांर ठेविले होते त्या वेळेस शंभर ट्यांगचस् ह्मणजे एक रुपया होत असे, आणि त्याचेच आतां चाळीस दाम होतात, ह्मणून आतांचे हिशेबानें सर्व वसूल पांचकोटि सत्तेताळीस लक्ष बरोबर होतो. पंचवीसलाख होन आणि एक कोटि इभ्राईम नाणे या दोन मोठ्यारकमा मिळून पांच कोटि बासष्ट लाख दक्षणेंचा राजांकडून आणि इंग्रेज लोकांनी व आरब लोकांनी जीं बंदरें घेतलीं होतीं तेथून व दुसरे देशांतूत पुढें लिहिल्या प्रमाणें प्रति वर्षीं वसूल येत असे.

सुलतान बाहादूर चितूरचा किल्ला हिजरी ९५५ व इसवी १५४८ या शकांत घेऊन नासरूदीनमहंमद हामायन पादशाहा याजपासून पळून गेला त्या वेळेस तो डायू बंदरामध्यें दडून राहिला (तेथें मोठा बळकट कोट

आहे, व सभोंवता समुद्र आहे ) आणि त्यास इंग्रेज लोकांनीं दग्याने ठार मारिलें ते समयीं इंग्रेजलोकानीं पुढें जो राजा लिहिण्यात येईल त्याचे राज्यांत वर लिहिलेलें बंदर घेतलें. थोडे दिवसानी गुजराथेचें राज्य मोडूं लागेलें तेव्हां त्या बंदरापासून खंडणी पावत नसे.

ज्यावेळीं गुजराथेंतील राज्याची बढती होऊं लागली तेव्हां पुष्कळ सरकारें ( ह्मणजेप्रांत ) व बंदरें जीं लढाई करून घेतलीं होतीं, तीं गुजराथ सरकारचे राज्यांत मेळविलीं. आणि अशा रीतिने पंचवीस संस्थानें घेतलीं तीं पुढें अनुक्रमानें लिहितों.

| | |
|---|---|
| १ जधपूर. | १ भडोच. |
| १ जालोर रजपूतनेतील. | १ वसई. |
| १ नागोररजपूतनेतील. | १ दमण. |
| १ रामनगर. | १ मुंबई. |
| १ दंगापूर. | १ न्याडोड. |
| १ बनखारा. | १ सुरत. |
| १ शिराई. | १ चांपनीर. |
| १ कछ. | १ पट्टण. |
| १ सोमनाथ. | १ सोराथ. |
| १ धांदराजपुरी. | १ नावानगर. |
| १ अहंमदाबाद. | १ गोद्रा. |

| | |
|---|---|
| १ वडोदें. | १ मुलहीर. |
| | १ नांदरबार. |
| १२ | १३ |

सुलतान मुझाफीर तिसरा याचे जातीचे व दुसऱ्या सरदारांचे मिळून तेवेळेस तीस हजार स्वांर तैनातीस होते त्यांस बत्तीस माहालांची जाहागिरी होती त्या माहालांचे वसुलाची रकम नव्वदलाख रुपये येत ह्मणजे गुजराथे तील नव्वदकोटि ट्यांगचस् नाणे होतें. तो वसूल पुढें लिहिल्याप्रमाणे विभागून दिला होता.

| स्वांरांवरील मुख्य | हाताखालचे स्वार | ट्यांग० |
|---|---|---|
| सुलतानमुझाफीर. | १०००० | ३३००००००० |
| इतमतखांवजीर. | ९००० | ३००००००००० |
| अलाघखांहपूशी. | ४००० | ११००००००० |
| जाहाजारखां. | २५०० | ६०००००००० |
| मालीकुशरक. | २५०० | ४००००००० |
| वाजलिमुल्क आणि दुसरे मिळून. | २००० | ६००००००० |
| | ३०००० | ९००००००००० |

अमदाबादेंतील जकात व दुसरे कर मिळून गुजराथी ट्यांगचस् नाणे तेराकोटि पन्नासलक्ष ह्मणजे पंधरा लाख पन्नास हजार रुपये येत, त्याची बेरीज पुढें लिहिली आहे.

| जकात व कर. | ट्यांगचस्. |
|---|---|
| शेजारचे प्रदेशांतील जमीनीचा वसूल. | ५०००००० |
| भाजीपाल्यावरील कर. | १०००००००० |
| नाण्यावरील कर. | ३००००००० |
| | १३५०००००० |

एकूण तेरा कोटि पन्नास लाख टयांगचस् जमा होत. पोलीस खात्यांतून जमा होत असे तें पुढें लिहिलें आहे.

| | रूपये |
|---|---|
| कोंतवालाचे दफ्तरांतून | १५००० |
| पान बाजारा वरील हक्क | ५०००० |
| बैल व घोडयांचे विक्रीचा हक्क | ३५००० |
| लाखेचे विक्रीचा हक्क | ५००० |
| तारेचे कारखान्या वरील हक्क | १०००० |
| अफूचे बाजारांतून हक्क | ५००० |
| रेशीम बाजारांतून | १८००० |
| हेलावरचा हक्क | ५००० |
| गुप्त डांकेवरील हक्क | १५०० |
| खोटे वजनां बद्दल दंड | ५००० |
| दुकानां बद्दल कर | १५००० |
| शहरांतील बारापुरे* मिळून कर देत तो | ३५०० |
| शहराचे वेशींतील जकात | १३००० |

* पुरा ह्मणजे गांवासारिखें असतें.

२

| | रुपये |
|---|---|
| दुसरे पुऱ्यांतील जकात | १४००० |
| मिठाई आणि दुसरे पदार्थांवरील हक्क | ५००० |
| | २०० ००० |

एकूण गुजराथेंतील व्यांगचस् नाणे दोनकोटि ह्मणजे वरचे बेरिजे प्रमाणें दोन लाख रुपये हक्का बद्दल जमत.

जे परगणे सुलतानाचे व दुसरे शिलेदार लोकांचे अन्नखर्चा बद्दल ठेविले असत त्याचे वसुलाची गोळा बेरीज रुपये ४०५०००० चाळीसलक्ष पन्नासहजार होती तिचा तपशील पुढें लिहिला आहे.

| परगणे | परगण्यांतीलगावें | वसूल रुपये |
|---|---|---|
| पेठलाद | २७६ | २०००००० |
| खंबायत | ६ | ४५०००० |
| जाहां जाहा रखां याचे जाहागिरिचा परगणा मनदाहा | ८४ | ५००००० |
| परगणा महंमदा बाद | ८५ | ७००००० |
| परगणा नारेयाद | ३६ | ४००००० |
| | ४८७ | ४०५०००० |

खंबायतेंतून वर लिहिल्या प्रमाणें वसूल येई.

पन्नासहजार व धोवान, महंमदपूर, येथील काळीचा वसूल येई तो, व बंदरावरील जकात, व शहरांत, जे पदार्थ येत त्यांजवरील हक्क मिळून चार लाख रुपये होत.

सर्व बंदरें मिळून तेवीस होतीं, त्या पैकीं खंबाय-तेचें बंदराचा वसुलाचा निराळा जमाखर्च होत असे व गुजराथेमध्यें पांच दुसरीं बंदरें मोठीं होतीं तीं येणे प्रमाणे.

| शहरें. | बंदरें. |
|---|---|
| भडोच. | १ |
| सुरत. | २ |
| घोगा. | ३ |
| खंदार. | ४ |
| राजीर. | ५ |
| | ५ |

वर लिहिलेले पांच बंदरांचा वसूल चवतीस लाख रुपये व या खेरीज बाकीचे सतरा बंदरांचें उत्पन्न, १४००००० चौदा लाख होत असे. व त्यांचीं नावें येणें प्रमाणें.

| नावें. | बंदरें. |
|---|---|
| सोराथ सरकारांतील. | |
| बंदरयुना. | २ |
| दायुबंदर. | १ |
| पुरबंदर. | १ |
| माहावा. | १ |
| पाथीनदायु. | १ |

| नावें | बंदरें |
|---|---|
| मंगलोर. | २ |
| बंदर तळाचा | ४ |
| नागीसार. | १ |
| गोरिया. | १ |
| दंगार. | १ |
| शिंगानर. | १ |
| चिकिली. | १ |
| एकूण चौदा लाख रुपये वसूल. | १७ |

बडेलोकांस जाहागिरी बद्दल देश वांटून दिले ते.

इक्त्या रुल्‌मुल्क् जो सरकार चाकरी दाहा हजार स्वारांसहित करीत होता, त्याचे जाहागिरीचे परगणे.

| परगणे. | गांवें. | रुपये. |
|---|---|---|
| परगणा आमदानगर. | ४४ | ४००००० |
| परगणा परांटी. | ८४ | ५००००० |
| जालोर. | १९ | २००००० |
| हरसूर. | ८४ | ३००००० |
| मरासा. | १६२ | ८००००० |
| महेकार परगण्यांत दोनशें पंचेचाळीस गांव आहेत त्यांपैकीं इंदूरचा राजास इनाम पन्नास, व पन्नास दंगारपूरचे राजास, व बाकी १४५, होतीं. | १४५ | २००००० |

| परगणे. | गांवें. | रुपये. |
| --- | --- | --- |
| पिपलड. | २६ | २०००० |
| खटनल, आणि मामुराबाद. | ४४ | ४००००० |
| बीरपूर. | १६५ | ४००००० |
| बिहाल. | १३८ | १०००००० |
| | ९२१ | ४५००००० |

एकूण एकंदर अकरा परगणे जाहागिरी बद्दल दिले होते त्यांचा वसूल गुजराथेंतील, नाणे पंचेचाळीस कोटि ट्यांगचस् ह्मणजे पंचेचाळीस लाख रुपये होत.

सय्यद मुबरकखान याचीं मुलें सय्यद मिरज आणि सय्यद हंमद हे चार हजार स्वारांसहित चाकरी करीत होते, त्यांचे जाहागिरीचे परगणे.

| परगणे. | गांवें. | ट्यांगचसूनाणे. |
| --- | --- | --- |
| परगणा धोळका. | ६१५. | १६००००००० |

या परगण्याचा वसूल सोळा कोटि गुजराथेंतील, ट्यांगचस् ह्मणजे सोळा लाख रुपये येत असे.

शीरखां फौलादि जो सरकारची चाकरी सातहजार स्वारां सहीत करीत होता, व हसन् जामल पांचहजार स्वारां सहीत चाकरी करीत होता, व शाहाजादा पांच हजार घोड्यांसहीत चाकरी करीत होता व रजपूत लोक, तीन हजार घोड्यां सहित चाकरी करीत होते, त्यांचा जाहागिरी येणे प्रमाणें.

| कसबे | गांवें. | ट्यांगचस्‌वसूल. |
|---|---|---|
| पट्टणशहराचे काळीचा वसूल, आंतील जिनसा वरचा कर, व पोलीस खात्याचा कर मिळून. | | १६०००० |
| पट्टण परगणा. | ४१९ | २६५०००० |
| परगणा बारनगर. | १३ | ८५००००० |
| परगणा बिसालनगर १. | ० | ४५००० |
| परगणा बिजापूर. | ९८ | ४१७००० |
| परगणा खरालु. | ११० | ५८०००० |
| परगणा पालनापूर. | १८० | ५२५००० |
| परगणा ढिसें. | २३ | २८५००० |
| परगणा जालोर. | ४०० | २६००००० |
| परगणा कान्ही. | २९९ | २८००००० |
| १ | १५४२ | १८३४२००० |

एकूण दाहा परगण्यांचा वसूल येणेप्रमाणें येई, तेव्हां पट्टण परगण्यांत ट्यांगचस्‌ नाणे गुजराथेंत नेहेमीं चालत होतें; त्यापेक्षां कमी दराने चालत असे, परंतु झालावार व कान्ही या परगण्यांत जसें अहंमदाबादेंत चालत असे, त्याच दराने चालत असे, तेव्हां सर्व वसूल मिळून एकअर्व सोळा कोटि ट्यांगचस्‌ ह्मणजे एककोटि सोळा लाख रुपये वसूल येत असे.

इमाडुल्‌मुल्क्‌ याचे मुलगे रस्तुमखां, जांगजीजखां,

जे पंचवीस हजार घोड्यां सहित सरकार चाकरी करीत होते, त्यांचे स्वाधीन पांच ठाणीं होतीं व प्रत्येक ठाण्यांत, पांच हजार स्वार असत. व प्रत्येकांत, सत्तावीस माहाल, अथवा परगणे असत' त्यांचा वसूल दोन कोटि पंचवीस हजार महंमदी नाणें आणि चांगजीज् नाणे येत असे. अहंमदाबादेंत, टयांगुचस नाणें चालत होतें, त्या दरानें तेवेळेस एक अर्ब, बासष्ट कोटि, पंन्नास हजार अथवा एक कोटि बासष्ट लाख पांचशें, रुपये येत असे.

| | माहाल | गांवें | च्यांगजीज् |
|---|---|---|---|
| याबेरिजे पैकीं सुरतबंदरचे सरकारांतून व बंदरावरील जकात व अन्न खर्चावरील जकात व शेजारचे प्रदेशांतील काळीची चावडी मिळून वसूल येत असे | १ | ९९३ | ५०००० |

बडोदे सरकारांतून येईतो चांगजीज्

शहरें

| | | | |
|---|---|---|---|
| बडोदें आणि शेजारचे देंशांतील जमीनीचा वसूल | १ | ० | ५०००० |
| परगणा बडोदें व शेजारचे देश मिळून | ० | २०८ | ३८००००० |
| परगणा डबाई | ० | ४४ | ८००००० |
| सिनूर परगणा | ० | ४६ | ५००००० |

| शहरें | माहाल | गांवें | च्यांगजीज् |
|---|---|---|---|
| परगणा बाहादूरपूर | ० | २७ | २०००० |
| सावान खिरा | ० | ८२ | २००००० |
| | १ | ६०७ | ६०००००० |

वर लिहिलेले सात माहाल, व परगणे, यांतील चारशेंसात गांवांचा एकंदर साठलाख चांगजीज् नाणें वसूल येत असे.

### भडोच सरकारचे परगणे

| परगणे | गावें | चांगजीज् |
|---|---|---|
| भडोच परगणा,व शेजारील देश, बंदर खेरीज करून | १६१ | ३०००००० |
| परगणा हान सुट | ३६ | ४००००० |
| परगणा देजबरा | १२ | १५०००० |
| परगणा गोरालबरा | १२ | २००००० |
| परगणा आरपार | १०६ | १२००००० |
| परगणा चारमांडवी | १ | ५०००० |
| परगणा कुला | ३६ | ४००००० |
| परगणा जंबूसर | ५६ | ८०००० |
| परगणा अकलसर | ५५ | ६००००० |
| परगणा आटलेसर | ३६ | २००००० |
| परगणा तारकीसर | १२ | १००००० |

| | | |
|---|---|---|
| परगणा आमादेव मा कबुलाबाद | ३६ | ४००००० |
| | ५५९ | ७५००००० |

एकूण बारा माहाल व परगणे यांतील, पांचशें एकुणसाठ गांवांचा वसूल, पंचाहात्तर लाख चांगजीज़ नाणें येत असे.

## चांपनीर सरकारचे परगणे.

| परगणे | गांवें. |
|---|---|
| चांपनीर परगणा व चांपनीर परगण्याचे सभोंवताला देश व चांपनीर सरकार | ८७ |
| साउली | ५४ |
| धावाड | १०० |
| हालोल | ३४ |
| ताइमोर आइवासना | १०६ |
| राजाड | २५ |
| झालोद | १७ |
| | ४२३ |

एकूण आठ माहाल व परगणे यांतील चारशें तेवीस गांवांचा वसूल पंधरालाख चांगजीज़ नाणे येत असे.

नासीरल्मुल्क् जो बारा हजार स्वारांसहित सरकारची चाकरी करीत होता, त्याचे जाहागिरीचीं गांवें पुढें लिहितों.

| परगणे | चांगजिज़् नाणें. |
| --- | --- |
| परगणा नांदरबार | २५०००० |
| परगणा सुलतानपूर | १५००००० |
| परगणा हिसोबें आणि निरांदा | १०००००० |
| | ५०००००० |

एकूण तीन, माहालांतून एकंदर वसूल पन्नास लाख चांगजीज़्, ह्मणजे पंचवीस कोटि ट्यांगचस् अथवा पंचवीस लाख रुपये येत होते.

याखेरीज बोहेरजी भागलाना येथील जमीनदार जो तीन हजार स्वारांसहित सरकारची चाकरी करीत होता,त्याचे मुलहीर आणि साहालर हे दोन किल्ले होते.

कामीलुल्मुल्क् याचे जाहागिरीचे गांव घोद्रा सरकारांतील बारामाहाल अथवा परगणे होते, त्यांपैकीं, दोन माहालांचा वसूल सुथचा जमीनदार चाटरेलकुली जे सरकारची चाकरी करीत होते, त्यांस देऊन बाकीचे दाहा माहाल राहिले त्यांचा पन्नास लाख चांगजीज़् नाणें वसूल येत असे, ह्मणजे वीस लाख रुपये येत असत.

| परगणे | गांवें | चांगजीज़् |
| --- | --- | --- |
| परगणा गोद्रा | १७१ | २०००००० |
| परगणा सीन्हा | २४ | १५००००० |
| परगणा मीरल | ४२ | ४००००० |

| | | |
|---|---|---|
| परगणा सामड जास नासी राबाद असें ह्मणतात. | ४२ | ८००००० |
| परगणा दोधा | ३६ | २००००० |
| परगणा आंबाबाद | ४२ | २००००० |
| परगणा झोलाद | ८४ | ७००००० |
| परगणा मोरेवा | २४ | १०००००० |
| परगणा काधना | २४ | २००००० |
| परगणा दाहामोदा | १२ | २००००० |
| | ५०१ | ७२००००० |

एकूण दाहा माहालांतील, पांचशें एक गांवांचा बाहात्तर लाख चांगजीज् नाणे वसूल येत असे.

मालीक खान जिजालोरी याचा मुलगा गजनवीखान जो सात हजार स्वारांसहित सरकारची चाकरी करीत होता त्याचे जाहागिरीचा पुढें लिहिल्या प्रमाणे निरनिराळा वसूल दाहाकोटि व्यांगचसू अथवा दाहा लाखरुपये येत असत.

| परगणे | गांवें | रुपये |
|---|---|---|
| जालोर परगण्यांत अकरा माहल होते त्यांची व जोतपूर तालुक्यांतील जकात येत असे ती. | ६०० | ३०००७० |
| सरकारी जमीनी पैकीं, चौथा भाग गजनवी खानाचे हाताखालीं जे जमीनदार लोक चाकरी करीत असत त्यांस. | ० | २००००५ |

| | | |
|---|---|---|
| नागोर तालुक्यांतील किल्ला पडला होता, तो मालीख खानजी याणे सुलतानास विनंती केल्यावरून नीट केला, त्यांतील अर्धी जमीन रजपूत लोक जे गजनवीखानाचे हाताखालीं चाकरी दोनहजार घोड्यांसहित करीत असत, त्यांस पोंहचे तो. | ० | २५५००० |
| नागोर सरकारांतील मिरधाचे तालुक्यापैकीं, अरधापरगणा जमीनदारांस दिला होता, आणि जमीनदारांस वसूलापैकीं चतुर्थांश पावत असे व त्याणी गजनवी खानाचे हाताखालीं राहून दोनहजार स्वांरां सहित अहंमदाबादेचे राजास मदत द्यावी व जेव्हां लढाईचा प्रसंग येईल तेव्हां साहाहजार स्वांरांसुद्धां मदत द्यावी असा ठराव होता त्यांसपोंचेतो. | ० | २००००० |
| | ६०० | ९५५०७५ |

एकूण नऊलाख, पंचावंन हजार, पंचाहात्तर रुपये पावत असत.

याखेरीज रायजयशिंग राजपिपळाचा जमीनदार तीन हजार स्वांर, व एकहजार पायदळासहित, सरकार

चाकरी करीत असे. ह्मणोन त्याज पासून खंडणी घेत नसत.

फानखान, व रस्तुमखान, व दुसरे बलोचि जातीचे लोक चौदाहजार घोड्यांसहित सरकारी चाकरी करीत होते. त्यांचे जाहागिरीचे परगणे.

| परगणे | महंमदी नाण्याचा वसूल |
|---|---|
| परगणा राधानपूर | १५०००००० |
| परगणा समी | ६००००० |
| परगणा मंजपूर | ८००००० |
| परगणा कांक्री | ७००००० |
| परगणा तीरवारा | ८००००० |
| परगणा मारेवारा | ४००००० |
| परगणा संथालपूर | ३००००० |
| परगणा धारतड | १५०००००० |
| परगणा मुरबी | १०००००० |
| | ७६०००००० |

एकंदर नऊ माहालांचा वसूल महंमदी नाणे शाहात्तर लाख, ह्मणजे तीस लाख रुपये येत असे. या खेरीज रजपूत जमीनदार लोक जे सरकार चाकरी करीत होते, त्यांचे चाकरी बद्दल मिराशी जमीनी अथवा, वतनदारीचा जमीनी दिल्या होत्या, व प्रत्येकानीं घोडे बाळगले ते.

| जाणीं घोडे बाळगले त्यांचीं नावें | घोडे |
| --- | --- |
| इडूरचा पंजाराहाटोर याणे बाळगलेते | २००० |
| दंगारपूरचा जमीनदार राणा सहा मुल याणे बाळगले ते | १००० |
| वागीला साहाला याणें झालावारची सर्व जाहागीर घेऊन बाळगले, ते | १००० |
| जामसाना यास चारशें लोकांसुद्धां सोराथ परगण्याची जाहागिरी दिली सबब त्याणे स्वांर बाळगले ते | ४००० |
| जाहारांखां नगरभुचा जमीनदार यास चवदाशे नऊ गावें जाहागिरी दिली होती सबब त्याणे बाळगलें ते. | ५००० |
| | १३००० |

अमीनखां, फातखां, आणि तातरखां घोरी, हे नऊ हजार स्वांरां सहित सरकार चाकरी करीत होते, त्यांचे जाहागिरींतील तालुके. रुपये

जुन्या गडामध्यें सत्यायशी माहाल होते त्यांपै कीं सतरा माहालांचा बंदरांसुद्धां वसूल निराळा पोंहचत असे. बाकी सत्तरमाहाल राहिलें त्यांतील दाहापरगणे आणि दाहा कसबेमिळून एक कोटि रुपयांचा वसूल येत असें, ह्मणजे एक कोटि इभ्राहिम नाणें आणि पंचवीस लाख होन.

जरी राज्याचा त्यावेळेस बरोबर बंदोबस्त नव्हता, तरी सुलतान बाहादुर राज्यकरीत होता, तेवेळेस याप्रमाणें वसूल येत असे.

या खेरीज सर्व बंदरें मिळून चवऱ्यायशी होतीं, त्यां पैकीं, गुजराथेंतील तेवीस बंदरें व सोराथ सरकारचें बंदर यांचा वसूल वजा करून बाकी एकसष्ट राहिलीं त्यांचा वसूल एक कोटि इभ्राहिम नाणें येत असे.

दायूचें बंदर व कसबे जेभाळी करीयान, व माली कतोघन, याचे वहिवाटींत, होतीं, तीं बंदरें व कसबे सोराथ देशांत घेतलीं होतीं तीं.

| नावें | नावें |
| --- | --- |
| बंदर दायु | बंदर माहादापूर |
| बंदर भीम | बंदर काजबीन |

एकूण चार बंदरांचा वसूल दोनलाख इभ्राहिम नाणें येत असें.

दमनबंदर सोराथ देशाचे ताब्यांतील माहाल त्यांत सातशें गावें होतीं, तेथील दरसाल वसूल त्रेचाळीस लाख रुपये ह्मणजे पंचेचाळीस लाख इभ्राहिम नाणें येत असे.

जा बंदरावर इंग्रेज लोकांचा अधिकार होता, तेपंचवीस माहाल होते, त्यांचा वसूल वीसलाख इभ्राहिम नाणें येत असे.

| बंदरांचीं नावें | बंदरांचीं नावें |
|---|---|
| १ बंदर चैवल | १ बंदर पनवेली |
| १ बंदर दाबुल | १ बंदर आगाशी |
| १ बंदर बेलावल | १ बंदर सोराब |
| १ बंदर वसई | १ बंदर कल्याण |
| १ बंदर धांदा | १ बंदर भिवडीमुंबई-जवळची |
| १ बंदर दंडाराजपुरी | १ बंदर कालशी |
| १ बंदर गोवा | १ बंदर माल्याबार |
| १ बंदर मुंबई | १ बंदर माल |
| १ बंदर कालिकोट | १ बंदर मालदेव |
| १ बंदर काहिलन | १ बंदर धावरा |
| १ बंदर कोखा | १ बंदर नांदर |
| १ बंदर डास | १ बंदर साष्टी |
| १ बंदर मितुरुत | १बंदर नावानगर |
| १२ | १३ |

आरब व दुसरे लोक यांचे बंदरांचे सव्वीस माहाल होते, त्यांचा वसूल पंचवीस लाख इभ्राहिम नाणें येत असें त्यांचीं नावें

| बंदरांचीं नावें | बंदरांचीं नावें |
|---|---|
| १ मसकत | १ येक्रान |
| १ बसोर | १ पन्हामा |

| | |
|---|---|
| १ लोची | १ बरधी रजीखान |
| १ दकारी शिंदेतील | १ बेंदर दक्षणेंतील-शहर |
| १ अरमुज परशियनेंतील | १ पूरबही |
| १ सावाह परशियांतील | १ बिंदासीन |
| १ नीकु | १ बिदारचीन |
| १ घेनाशिरी सेनांतील | १ मलाका |
| १ मिलगट | १ बेंदरासा |
| १ माकिना | १ कालियान |
| १ माळव्या | १ धार |
| १ सूळ | १ रांकूल |
| १ व्होदर वाह | १ जावा |
| १३ | १३ |

इंग्रेज लोकांचे बंदरांचें चार माहाल व डचलोकांचे दोन मिळून साहा माहालांची दाहा लाख इभ्राहिम नाणें खंडणी येत असें.

वर लिहिलेले खंडणी शिवाय निझनशाहा भिरस, व आदिलशाहा विजापुरी, ईमादशाहा बिरारी, कुतबशाहा गुलकंदवी, आणि राजअह्ली खांबऱ्हाणपुरी हे पंचवीस लाख होन प्रतिवर्षी खंडणी देत असत.

या पुस्तकामध्यें जें लिहिलें आहे; तें खोटें असा

कांस संशय आल्यास, त्याणी तारखी शिकंदरी, या पुस्तकांत बादशाहांचे अधिकार, व मोठेपणा, व त्याचे दौलती विषयीं, व पैक्याविषयीं, जे लिहिलें आहे,त्याशीं मेळ घालावा आणि समजूत करून घ्यावी, व मी जें वर्णन केलें, त्यापेक्षां जरी अधिक वर्णन केलें; तरी त्या चा मजकडे दोष नाहीं; कांकीं या गोष्टी विषयीं सुलतान महंमद बिगारा याचा बंदाचा कर मालीक आयझयाची सत्ता व डामडौल यांविषयीं वर्णन केलें आहे, त्या पुस्त कांत सर्व याप्रमाणें आहेत. उपनगरें, व मोठाल्या इमारती, व मशीदी, व तळीं, व विहिरी, किल्ले, इत्यादि, इमारतीचा, अद्यापि खुणा आहेत, त्यावरून या गोष्टीचें प्रमाण दिसूनयेतें. आणि अहंमदाबादे, शेजारी डोंगर नाहींत, तरी या मोठाल्या इमारती, चिरेबंदी दुसरे देशां-तून, धोंडे आणून बांधिल्या आहेत.

खंडणी व सरकारें यांविषयीं मूळचंद, हा त्याचे चार पिढ्या पासून सरकारी जमा खर्चाचा कारकून होता, त्याचे व हीचे प्रमाणा वरून, येथे लिहिलें आहे. दुसरीं प्रमाणें मिळालीं नाहींत यामुळें बंदरांचीं नावें व दुसरे जाग्यांचीं नावें चुकलीं असतील.

लोक असें ह्मणत आले आहेत, कीं दिल्लीचा राजा शिकंदर बेन बाहालाकुल बोलला, कीं दिल्लीचे राजाची धनदौलत, गहूं व जवांत, आहे. व गुजराथेंतील

राजाचीं चोऱ्यायशी बंदरें आहेत, त्याचीं मोत्यें व पोवळीं यांत, आहे.

जेव्हां अकबरानें गुजराथ सूभा घेतला, तेव्हां त्यातील सर्व हद्दी व देशांतील सर्व परगणे, व गांव यांची मोजणी केली, तेसमयीं असे समजलें कीं बनस्वारा आणि माळवा यांचे पूर्वेकडे जे देश आहेत त्यांपासून पश्चिमे पर्यंत द्वारका अथवा जिगाट पर्यंत हा सुभा दोनशे नव्वद कोश लांब आहे, व पुढें लिहिल्या प्रमाणें मोजणीं केली असतां, तीनशे कोश रुंद आहे असें दिसलें अह्मदाबाद, शहरांतून उत्तरेस अज्मीर चेसुभ्यांतील व जालोर सरकारांतील बैराागण देश पर्यंत एक शें दाहा कोश व शहरा पासून दक्षणेकडे सुरतेचे बंदरापर्यंत एकशें दाहा कोश आणि बागलाणाचें किनाऱ्यावर डोंगराचे रस्त्यापर्यंत ऐंशी कोश एकूण तीनशें कोश.

तेसमयीं गुजराथेचे राज्यांत वर लिहिल्या प्रमाणें पंचवीस सरकारें होतीं त्यांपैकीं, नऊ गुजराथेंतील राजानें दुसरे सरकारांपासून जिंकून घेऊन आपले देशांत मेळविलीं. शाहाबुदीन अमदखां जेव्हां सुभ्यावर आला, तेव्हां हिजरी ९८६ व इसवी १५७८ रांत बादशाहाचे हुकुमाने हा बंदोबस्त जाहाला. व जितकीं सरकारें होतीं त्यांचीं नावें.

| सरकारें | ज्यासुभ्यांत घेतलें ते |
| --- | --- |
| जोधपूर सरकार | |
| जालोर सरकार | |
| नागोर सरकार | अजमीर सुभ्यांत घेतलें |
| मुलहीर सरकार व नांद-रबार सरकार हीं दोन | खानदेशांत घेतलीं |
| सरकार वसई मुंबई आणि दमान सरकार हे देश | इंग्रेज लोकांस दिले |

धांदराजपूर, हें निजामशाहीचे ताब्यांत देऊन अमदानगरचा सुभा केला.

बाकीचे दिल्लीचे सोळा सरकारांपैकीं दाहांचा राज्यांचा खासगी दप्तरांत जमाखर्च होत असे, परंतु सुरत सरकारचा वसुलाची वसुली कारकुनास नेमणूक करून दिली होती, तेव्हां गुजराथेचें नऊ सुभ्यांचा मात्र वसूल येत असे तीं सरकारें.

| सरकारें | सरकारांतील माहाल |
| --- | --- |
| अहंमदाबाद सरकार | ३३ |
| भडोच सरकार | १४ |
| पट्टण सरकार | १७ |
| बडोदें सरकार | ४ |
| न्याडोड सरकार | १२ |
| चांपनीर सरकार | १३ |

| | |
|---|---|
| गोद्रासरकार | ११ |
| सोराथसरकार | ६३ |
| नावानगर ज्यास इस्लाम नगर असें ह्मणत होते त्यांतील | १७ |
| | १८४ |

**नावानगर** हें शाहा अलम पहिला याचे राज्यांत जाम ह्मणून त्यादेशांतील, जमीनदार याणे घेतलें, तें अद्यापि त्याचे ताब्यांत आहे.

वर लिहिल्या प्रमाणें सर्व सरकारांत माहाल, शहरें, व परगणें, मिळून एकंदर एकशें चौऱ्यायशी होतीं त्या माहालांत पंधरा बंदरें, व दाहा हजार चारशे पांसष्ट गावें, जमीनदारांस दिलेल्या शिवाय व वसूली कीर्दींत जमा जालेल्या शिवाय होतीं, त्यांतील शेतांची राजा तोडरमल जेव्हां राज्य करीत होता तेव्हां अकबराचे हुकुमावरून मोजणी केली, तों १२३६०५९४ बिघे, आणि नऊ विस्वे भरली, त्यांपैकीं त्र्यायशी लक्ष चौऱ्याहात्तर हजार चारशें अठ्याण्णव ८३७४४९८ बिघे आणि तीन विस्वे जमीन लागवडी जोगी होती. आणि बाकीची पड होती.

सोराथ, गोद्रा, आणि इस्लाम नगरचीं सरकारें जांची दुसरे सरकारची एकूणपन्नास माहालांसहीत मोजणी जाहाली, नव्हती, तीं सरकारें वसूली कीर्दीमध्यें, बारजा हालीं नाहींत, असें दिसतें.

जीं सरकारें जमीनदार लोकांस दिलीं होतीं, व आंज वर वसुली पट्टी नव्हती, त्यांजवर जेव्हां जबरी केली तेव्हां त्याणीं सुभ्यावरील सुभेदारांस खंडणी दिली.

| सरकारांचीं नावें | सरकारांचीं नावें |
| --- | --- |
| १ दुंगारपूर सरकार | १ शिरोई सरकार |
| १ बनस्वार सरकार | १ सोमनाथ सरकार |
| १ कछ सरकार | १ रामनगर सरकार |
| जास सुलेमन नगरी ह्मणत असत, तें | ३ |
| ३ | |

या सरकारांची खंडणी येत असे, ती सुरत बंदरा वरील कारकुनास देत असत. पूर्वीं वर लिहिलेलीं सरकारें सुभ्यावरील कामदाराचे ताब्यांत नसत; तरी सुरत सरकारासुद्धां सूटतूट वजाकरून त्यांचा वसूल ७९९६४५२१३ दाम महमदशाहा राजाचे राज्यापर्यंत येत असे.

वर लिहिलेले ऐवजा पैकीं, वीसकोटि ब्यायशीलाख सातशें बेचाळीस दाम, राजाचे खासगत खर्चास ठेवित. निजामती करितां व, जातीचें सरदारलोक व जाहागीर-दार लोकांस दोन कोटी वीसलक्ष ठेवित, तेव्हां जमीन दार लोकांचें खंडणी खेरीज बाकी नाझिमास चौवीस

लाख रुपये राहात व बाकीचे उमराव व मनसुबदार व चाकरलोक यांस देत,

पन्नास हजार बिघ्यांतून व एकशेंतीन गांवांतून एक कोटि वीस लाख दाम येत असत आणि एक लाख चाळीस हजार रुपये घालून सरकार हुकुमा प्रमाणे धर्म कृत्यास, बक्षिशी, पेनशने, इत्यादि नानातऱ्हेचे खर्चास लागत.

ते समयीं प्रतिवर्षींचा सर्ववसूल मिळून एक कोटि तेवीस लाख आणि पन्नास हजार रुपये जमा होत असत. व प्रतिवर्षींचा सर्व खर्च मिळून एक कोटि रुमये लागत तरी पूर्वीं सरकारास, व नाझिम ह्मणजे सुभ्यावरील सुभेदारास, जे खंडणी देत, त्याखेरीज बाकी साठ लाख रुपये राहात.

---

## प्रकरण २

पूर्वीं गुजराथदेश रजपूत, आणि कोळी, या लोकांचे ताब्यांत होता, तेव्हां तेथील सर्व मुख्य सरदार आपापले ताब्यांतील परगण्यांत मुखत्यार, व स्वतंत्र होते. त्या वेळेस कनोज देशांत देव या नामेकरून राजा ( फर अथवा पोरस ) हा राज्य करीत होता. आणि सर्व हिंदुस्थानांतील राजांपेक्षां माहान श्रेष्ट होता तेव्हां

हा राजा प्रतिवर्षीं खंडणी जमा करण्याकरितां फौज पाठवी, आणि ऐवज जमा जाहल्यानंतर ती फौज शहरांत परत येई. या राजाचे दासांपैकीं सावतशिंग या नामेंकरून कोणी एक दास होता. त्याणे काहीं अपराध केल्यामुळें त्यास राजाने ठार मारलें, व त्याचें घरही लुटलें, तेसमयीं त्याची स्त्री गरोदर होती, ती गुजराथ देशाकडे पळून गेली, आणि गुजराथे कडे येत असतां, प्रसूत होऊन तीस एक पुत्र जाहाला, हें लाहान बालक अरण्यांत पडलें होतें, तें राजा, शिलडेव, यास सांपडलें, तें त्याणे पालनपुरास नेलें आणि त्याचें पालण, पोषण करिता जाहाला, हा मुलगा मोठा जाहाल्यानंतर त्यास दुष्ट समागमाची इतकी हौस लागली, कीं थोडे दिवसानीं त्यास त्याचे सोबत्यांचे दुर्गूण लागून तो वाटमाऱ्या चोर जाहाला. शेवटीं गुजराथे हून कनोजदेशांत खजीना जात असतां त्याणे तो लुटला आणि त्या वेळे पासून मोठा द्रव्यवान होऊन त्याणे आपले सत्तेचें व स्वतंत्रतेचें स्थापन केलें. थोडे दिवसा नंतर त्याणे चांपा या नामेंकरून बाजारी मनुष्याचा समागम केला. त्या मनुष्याने त्याचा दुष्ट खोडी घालविल्या, आणि तेसमयीं वनसराज अशी किताबत धारण करून त्याणें पट्टण शहराची स्थापना करून तीच राजधानिची जागा केली, ही गोष्ट त्याणे मूळ प्रथम स्वतंत्र जाहाल्या नंतर पांच

वर्षानीं केली, आणि त्या वेळे पासून अहंमदाबाद या चांगले शहराची स्थापना होई तों पर्यंत पट्टण शहरांत राजाची गादी होती. व तेंच शहर गुजराथेची राजधानी होती.

जेव्हां त्या राजाने पट्टण शहराची स्थापना करण्या विषयीं निश्चय केला, तेव्हां तो करमणूक करण्या करितां योग्य अशा शिकारीचा जाग्याचा शोध करीत जात असतां शेवटीं त्यास एक धनगर भेटला, त्याणे त्यास सांगीतलें कीं अमूक ठिकाणी अशी चांगली जागा आहे या धनगराचें नाव अनहील होतें, यास्तव त्याणे त्या राजाकडून कबूल करून घेतलें कीं या जाग्यास अनहील असें नामाभिधान द्यावें. आणि त्या वेळेस हें ही सांगीतलें, कीं या जाग्यांत मीं असें पाहिलें आहे जे एके सशाने एके कुतऱ्यास चतुराईने आणि प्रयत्नाने जिंकिलें. ती जागा राजाने पसंत केली आणि जेव्हां त्या जाग्यांत पुष्कळ लोक राहूं लागले तेव्हां त्या जाग्यास अनहील वाडा असें नामाभिधान पडलें. आणि काहीं दिवसानी हें शहर नाहारवाला या नामें करून प्रसिद्ध जाहलें या शहरांत पहिले पेक्षां वस्ती फार जाहाली व प्रख्यात जाहालें, तेव्हां यास पट्टण असें नाव दिलें कारण हिंदी भाषेंत प्रीतिचे आणि राजधानीचे जाग्यास पट्टण असें ह्मणतात. स्थापनेचा शक हिंदु

विक्रमादित्य ८०२ व हिजरी १३० आणि इसवी ७४७ अथवा कित्तेक लोकांचे मत्तानें हिजरी शक २०२ व इसवी ८१७ होता.

चावरा सोलांकिन आणि बघिला या हिंदूराजाचे वंशानीं वंशपरंपरा अनुक्रमाने गुजराथेचें राज्य केलें ऐन अकबरी या पुस्तकांत लिहिल्या प्रमाणें या राजाचे वंशांतील तेवीस पुरुषांनीं गुजराथे चें राज्य मुसलमान लोकांचे ताब्यांत आल्या पूर्वीं पांचशें पंचाहात्तर वर्षें पर्यंत केलें चावरा राजाचे वंशांतील सात पुरुष होते त्यांतून वन राजाने राज्याची स्थापना केली व पुढें साठ वर्षें सुमारें राज्य केलें व बाकीचे पुरुषानीं केलें तें पुढें लिहिल्या प्रमाणें.

| राज्यकेलें त्याचीं नावें. | वर्षें |
|---|---|
| बनराज | ६० |
| जोगराज | ३५ |
| भीमराज | २५ |
| राजापिथु | २९ |
| राजाविजयशिंग | २५ |
| राजाराऊतशिंग | १५ |
| राजासांवतशिंग | ७ |
| | १९६ |

या प्रमाणें चावरा राजाचे वंशानें एकशें शाहाणव

वर्षें पर्यंत राज्य केलें नंतर सोलांकिन राजाचे वशांत राज्य येण्याचें कारण खालीं लिहिलें आहे.

सांवतशिंग चावरा याणे सोलांकीन याचे वंशांतील एक पुरुषास आपली कन्या एकुलती एक होती ती दिली, ती गरोदर जाहाली आणि बाळंत होत्ये वेळेस मूल आडवें येऊन ती मृत्यु पावली. गर्भस्थान कापून काढल्यावर मूल जगलें. ते वेळेस एकोणिसावें नक्षत्र होतें त्यास हिंदी भाषेंत मूळ ह्मणतात, ह्मणोन मूळराज असें नाव ठेविलें. सांवतशिंग राजाने या लाहान बाळाचा आपल्या पोटचे बाळा प्रमाणें प्रतिपाळ केला. एके दिवशीं, दारूचे धुंदींत असतां त्या मुलास आपले राज्याचा वारस केला असें ह्मणून नंतर नाकबूल केलें. पुढें सांवतशिंग राजा मृत्यु पावल्या नंतर मूळराजास राज्य घेण्याची संधी सांपडून तो गादीवर बसला व त्याचे वंशाचे दाहा पुरुषानीं राज्य आडीचशें वर्षें आणि साहा महिने पर्यंत केलें हें पुढें लिहिलें आहे.

| राजांचीं नावें | वर्षें | महिने |
|---|---|---|
| मूळराज | ५६ | ० |
| जामंडराज | १२ | ४ |
| बिल्वराज | ० | ७ |
| जामंडराजाचा भाऊ दुरला | ८ | ० |
| राजाभीमदेव | ४२ | ० |

| | | |
|---|---|---|
| राजाकर्ण | ३१ | ० |
| सिधराजजयाशिंग | ५० | ० |
| कनवारपाल | ३० | ६ |
| अजीपाल जाणे आपल्या धण्यास मारून राज्य घेतलें | ३ | १ |
| लखुमूळदेव जो भीमदेव याचे भावाचा वंशज | २० | ० |
| | २५३ | ६ |

जामंडराजा राज्यकरीत असतां, हिजरी ४१६ व इसवीशकें १०२५ अथवा २६ या शकांत सुलतान महंमद गजनवी हा मुलताना वरून सोमनाथ शहराकडे गेला नाहारवाला पटण यांतील काहीं परगण्यांवर हल्ला केला, तेव्हां जामंड राजा शहर सोडून पळाला. महंमद याणे नाहार वाला घेतल्या नंतर सोमनाथ घेण्या करितां आपले फौजेस जाजा गोष्टीचें अगत्य होतें, त्यांचा बंदोबस्त केला. आणि त्या वर्षीचे झूलकडा महिन्यांत तो देश घेतला. नंतर त्यास वर्तमान कळलें, कीं नाहार वाला या देशाचा राजा जामंड हा येथून अमुक किल्याचा आश्रय करून पस्तीस कोशांवर आहे, असें समजतांच तो किल्ला घेण्याचा निश्चय करून त्या प्रमाणें किल्याकडे जाऊन पाहातां त्या किल्या सभोंवता पाण्याचा खोल वेढा आहे, ह्मणोन दोन पाणबुड्ये आणून त्यांस

विचारिलें कीं पाणी किती खोल आहे? तेव्हां त्याणी उत्तर केलें कीं रस्ता होई असें एक ठिकाण आहे, परंतु त्यांतून गेलें असतां, अकस्मात पाण्याची भरती येऊन सर्व मनुष्यें मरताल, नंतर सुलतान महंमद याणे इश्वरा वर भरवसा ठेऊन प्रार्थना करून पाण्यांत घोडे ढकलले. आणि कोटाचा भिंतीखालीं येऊन सुखरूप उतरले. राजा जामंड सोलांखी यास समजतांच तो पळून गेला, तेव्हां सुलतान महंमद याचे फौजेने पुष्कळ लूट करून किल्यातील पाहाऱ्या वरील लोक ठार मारले राजा टुसाफा या ग्रंथाचा कर्त्ता याणें या विषयींचें चमत्कारिक वृत्त लिहिलें आहे.

---

## प्रकरण ३.

सर्व लोक असें बोलतात कीं सुलतान महंमद याणें सोमनाथ घेतल्यावर तेथें कित्तेक वर्षें पर्यंत राहावें असें मनांत आणिलें. हा देश विस्तीर्ण आणि खुला होता, ह्मणोन तो त्याचे मनांत भरला. या देशांत बावन्नकशी सोन्याचा खाणी होत्या, व हिंदुस्थानामध्यें हिरे रत्ने इत्यादि सर्व जातीचें जवाहीर सोमनाथ परगण्या खालीं ते वेळेस सिंहलद्वीप होतें तेथें उत्पन्न होत असे.

सरदार लोकांनीं राजास विनंती केली, कीं सोमनाथ हें राज गादीचें मुख्यस्थान केलें असतां खोरासन हा मुलुख फार लांब पडेल, ह्मणोन सुलतान राजा परत जाण्याची योजना करून त्यांस बोलिला, कीं देशाचा बंदोबस्त बेताबाताने करून देश ताब्यांत ठेवी असा कोणी कामगार योजणें प्राप्त आहे. राज प्रधान बोलिले कीं कोणी तरी या देशांतील नेमावा. हीच पसंत पडण्या जोगी योजना आहे. परंतु राजाने आपले सर्व इष्टमित्रांस या विषयीं मसलत विचारिली, तेव्हां त्यांतून कितेकानी सांगीतलें, कीं या देशांतील सर्व राजकुलांत ड्याबीशलम हें आई व बाप या दोहीं कुळां कडून उत्तम कूळ आहे; तसें चांगलें दुसरें कोणतें ही नाहीं. आणि त्या कुळांतील एक पुरुष अद्यापि आहे तो तत्वज्ञानाभ्यास व वैराग्याचरण करीत आहे; त्यास राज्य दिल्यास फार बरें आहे. दुसरे जे या मत्तास प्रतिकूळ होते, त्याणीं असें दर्शविलें कीं ड्याबीशलम गोसावीं हा फार दुष्ट स्वभावाचा आहे आणि याजवर ईश्वरी अवकृपा आहे, व याची विरक्त वृत्ती आणि भक्ती भाव हा याचे अंतःकरणापासूनच जाहाला असें नाहीं परंतु याचे भाऊ यास वारंवार कैद करीत, याजमुळें तो आपले देहसंरक्षणार्थ एकांत स्थानीं राहातो. आणि त्याणी हें ही सांगीतलें, कीं ड्याबीशलम या नावाचा दुसरा कोणी पुरुष

याचा समंधी आहे. तो फार शाहाणा आणि सुशिक्षित आहे, आणि सर्व ब्राह्मणांचा त्याजवर विश्वास आहे तो सांप्रत काळीं कोणे एके मुलुखांत राज्य करीत आहे, त्यास राज्यावर नेमिल्यास फार बरें होईल, त्याजवरून राजानें त्याचे नावानें आज्ञापत्र लिहून आज्ञाकेली, कीं तुह्मास सोमनाथ येथील अधिकार मिळेल. त्या प्रमाणें तुह्मी त्या देशाचें राज्य करावें. लोकांनीं राजास हें ही सांगीतलें, कीं हा राजा इतका न्यायी आणि सात्विक आहे कीं येकदां त्याणे खंडणी देण्याचा करार केला, ह्मणजे प्रतिवर्षीं गजनवी देश इतका लांब आहे तरी तो तेथें पोंचवून देईल, त्याजवर राजाने प्रत्युत्तर दिलें कीं हा देवशीळ येऊन जर राज्य द्या याप्रमाणें विनंती करील तर मी कदाचीत त्यास देईन. परंतु त्याणें अद्यापि काहीं काम केलें नाहीं आणि तो राजा होण्यास इछितो, तर त्याणें मजकडे मुजरा करावयास यावें तर तेंही नाहीं असें असून मी त्यास एवढें राज्य उगीच कां द्यावें ? नंतर देवशीळ राजास हुकूम पाठवून आणविलें आणि त्यास राज्य दिल्यावर तो अमुक खंडणी देईन, व सरकार हुकुम करीतील, त्या प्रमाणें मान्य करीन, व हिंदुस्थानातील सोनें हिरे आदिकरून रत्नें जीं उत्पन्न होतील; तीं ही गजनवी देशांत पाठवून देईन, असा करार करून राज्य कारभार करूंलागला. या राजानें

सुलतानास विनंती केली, कीं, दुसरा देवशीळ या नामें करून माझा भाऊबंद द्वेषी आहे त्याचा मजशीं कित्येक वेळा लढाया जाहाल्या आहेत. तो आपण येथून गेलां, असें समजतांच निःसंशय मजवर चढाव करून येईल व अद्यापि माझे राज्याचा बंदोबस्त पक्केपणीं जाहाला नाहीं. व माझा मला हीं विश्वास नाहीं, या करितां तो मला जिंकील, आणि माझें राज्य घेईल परंतु सुलतान साहेब ! जर मला याजपासून बचावण्याकरितां, त्याजवर स्वारी करितील, तर मी प्रतिवर्षी काबुल आणि खोरासन या देशांचे खंडणी इतकी खंडणी गजनवी देशांत पोंचती करून देईन. सुलतानाने हें मान्य केलें. जेव्हां आपली फौज घेऊन त्या देशावर हल्ला करावयास गेला, तेव्हां सोमनाथां तील लोक या नव्या राजाचे नाकांत काड्या घालूं लागले कीं तुह्मी सुलतान राजास असें धर्म युद्ध करावयास सांगीतलें, तरी ईश्वर जा भक्तांवर कृपा करितो त्यांची तो कीर्ती रक्षण करितो, आणि अशा मनुष्यास तुमचे सारख्याचे मनसोबे व चहाड्या चुगल्यानीं काहीं उपद्रव होणार नाहीं.

हा मजकूर त्याणे सुलतान राजास विदित करितांच त्यास फार राग आला आणि या देशांत तो येतांच लोकास क्षमा नकरितां जें बोलिले तें विसरला नाहीं. शेवटीं त्याणें त्या देवशीळ राजास धरून या नव्या देव-

शीळ गोसावी राजाचे स्वाधीन केलें तेव्हां त्याणे राजास विदित केलें, कीं इकडील राजे लोकांची अशी चाल आहे, कीं जर त्याचे राज्यांत त्यांजवर कोणी शत्रु आसला तर त्यास आपले राजसिंहासनाखालीं बंदिखाना करून त्यांत सिंव्हासन करून त्याजवर त्यास बसवून त्याची नीट चौकशी ठेवावी. आणि त्या तळघरास एक भोंक उघडें ठेवून त्यांतून त्यास नेहेमीं अन्न पाणी द्यावें, अशा रीतीनें जो राजा राज्य करीत असतो, तो आपले शत्रूंस ठेवितो. असें त्याणे त्यास सांगीतलें परंतु सांप्रत मी त्यास बंदींत ठेवीत नाहीं. यामुळें जर सुलतान साहेब यास आपले बरोबर गजनवी देशांत घेऊन जातील, आणि जेव्हां माझे राज्याचा पक्का बंदोबस्त होईल तेव्हां त्यास इकडे पाठवितील तर तें फार चांगलें होईल. वर लिहिलेल्या बेतानें मी त्यास कैदेंत ठेवीन. आणि मी जा गोष्टी सरकारास मागून घेतल्या त्या आश्चर्य कारक अथवा अपूर्व आहेत असेंही नाहीं. यानंतर सुलतान राजा आपले देशांत येण्याची योजना करून तेथून निघाला. आणि देवशीळ गोंसावी राजा सोमनाथचेगादी वर बसला, आणि गजनवीं तील चार मोठमोठे गृहस्थांस सढळ हातानें मोठमोठाल्या नजरा करून, त्यांजवर सर्व रीतीनें इतका उपकार केला कीं त्याणीं सुलतान राजास तो शत्रू या नव्या राजाकडे पाठविण्या विषयीं

विनंती केली. राजा अशा निरपराधी पुरुषास त्याचे शत्रूचे हातांत देण्यास अनमान करूं लागला, परंतु या राजानें गजनवीं तील दरबारी मंडळीस सढळ हातानें पुष्कळ नजरा पाठवून त्यांचा आश्रय संपादन केला होता, ह्मणोन त्याणीं राजास याचे तर्फेने सांगीतलें कीं, या साधारण मूर्तिपूजकाची गय करून काहीं उपयोग नाहीं. सुलतानास हें ही सांगीतलें कीं एकवेळ वचन देऊन मग वचन मोडूंनये आणि असें अडथळें केल्याने शत्रू याचें राज्य घेतील. सरते शेवटीं सुलतान राजानें ड्याबीशलम यास राजा ड्याबीशलम गोसावी याचें चाकरांचे स्वाधीन केलें आणि ते वेळेस लागलेंच हिंदुस्थानचे सर्व राजांस पत्र लिहिलें, कीं तुह्मी या राजाचे बरोबर जाऊन त्यास सोमनाथ पर्यंत पोंहोचवून यावें. हा बंदिवान ड्याबीशलम सोमनाथाकडे येतो असें ऐकून या गोसावी ड्याबीशलम राजानें सिंहासना खालीं तळघरांत बंदीखाना केला होता. तो तयार करावयास सांगीतला. तेथेंही ही चाल होती कीं जेव्हां शत्रू राजगादीकडे येतो तेव्हां राजानें एक मुकाम त्यास भेटावयास जावें, आणि राजाचें तस्त भांडें त्याचें डोकीवर देऊन त्यास घोड्यापुढें राज वाड्याचें हद्दी पर्यंत येइतों पळवावें. यास्तव नवा ड्याबीशलम राजा एक मुकाम पुढें गेला आणि त्याला काहीं येण्यास उशीर

लागला ह्मणोन त्या अरण्यांत शिकार करूं लागला आणि उन्हाची तप्तता होई पर्यंत त्याणें शिकारीचा इकडे तिकडे शोध केला, नंतर सर्व फौजेस मुकाम करावयास सांगून आपण एके झाडा खालीं तांबडा रुमाल तोंडावर घेऊन निजला त्या अरण्यांत पुष्कळ जंगली पक्षी होतें, त्यांतून एक उडतां उडतां राजाचे तोंडावरील कापड हें मासाचा तुकडा असें जाणून तो पक्षी खालीं येऊन झपाट्यानें तें आपलें नखांत घेऊन गेला, तोंत्याची चोंच राजाचें नेत्रास लागून एका डोळ्यानें आंधळा जाहाला. यावरून फौजेंत एकच हुल्लड जाहाली, इतक्यांत तो दुसरा ड्याबीशलम बंदिवानही येऊन पोंचला जेव्हां राजा बरोबरचे लोकांनीं पाहिलें कीं राजाचें डोळ्यास आयब जाहाला. आतां बंदिवान राजाखेरीज दुसरा राज्यावर बसवाया जोगा राजा नाहीं. तेव्हां सर्व लोकांनीं या बंदीवान राजास राज्यावर बसविण्याचें ठरावलें आणि त्या प्रमाणें त्याणीं त्यास मुजरे केले. आणि याचा शत्रू गोंसावी राजा याजकडून असें मान्य करून त्याचें तस्त भांडें त्याचेच डोकीवर देऊन उलटा या गोसावी राजास या नव्या ड्याबीशलम राजाचे घोड्यापुढें राजवाड्यापर्यंत पळवीत आणिलें. याज करितां त्याणें जो तळघरांत बंदीखाना तयार केला होता त्याच बंदिखान्यांत त्यास ठेविलें.

## प्रकरण ४

जेव्हां नाहार वाल्याचें राज्य भीमदेव वाघिला या देशांत आलें, तेव्हां सुलतान मोहिनुद्दीनशाम जो शहाबुद्दीन यानामें करून सर्वांस ठाऊक आहे. हा आपले भावाचे मुतालीक यापदवीचें काम चालवीत असतांत्याणे हिजरी शके ५७० व इसवी सन ११७४ यांत युचा* वर एक फौज घेऊन गेला. नंतर हिजरी ५७४ व इसवी सन् ११७८ यांत गजनवी देशचें राज्य घेऊन पुनः सोमनाथ या देशांत येऊन हा देश नास्तिक लोकां पासून घेतला.

मुलतानातील पापी लोक जिंकून राज्य स्थानांतून वालुका मैदाना वरून गुजराथ देशांत गेला परंतु भीमदेव वाघिला याणें त्यास अडथळा केला, आणि लढाई करून त्यास जिंकिलें मग सुलतानास गजनीस येण्यास मोठी मुष्कील पडली

यानंतर, कटबुदीन, ऐवक याणें हिंदुस्थानाचें मुख्य स्थान दिल्ली हें करून शके ५८९ हिजरी व इसवी सन ११९३ या सालीं नहरवाला पट्टण येथें फौज आणली आणि सुलतानास भीमदेवानें जिंकिलें ह्मणोन त्याचा सूड घेतला.

आणखी राजा सिद्ध व राजा जयशिंगसोलांकी याणी

---

* जाग्याचें नाव आहे.

नहरवाला याचें राज्य घेऊन माळवा बराणपूरपर्यंत देश घेतला व तेवेळेस भडोच व डभई येथील बंदरें वसविलीं व कित्येक नव्या इमारती बांधिल्या त्यांपैकीं सहस्त्र लिंग येथील जलाशयबैराम गांव येथे कांहीं बांधिलें अशीं त्याणे नवीन कामें पुष्कळ केलीं व सुरत येथे नवीन तळीं खणवून तीं चिरेबंदी बांधविलीं व त्याच राजानें सिद्ध पुरातन रुद्र माळा या देवाचें देवालय बांधविलें व तेथे वस्ती वसविली *त्यास लोक असें बोलतात कीं जेव्हां राजानें हें देऊळ बांधण्याचे निश्चयाविषयीं प्रार्थना करून ज्योतिष्यांस सांगून पाठविलें व चांगलीं वेळ सांगण्याकरितां विचारिलें, तेवेळेस ज्योतिष्यानीं भविष्य करून सांगीतलें कीं यावेळेवरून या देवळाचा आलादीन खिलजी ह्मणोन दिल्लीचा राजा कोणी होईल त्याजकडून नाश होईल, असें नक्षत्राचे चक्रगती वरून स्वछ दिसून येतें राजास हें खरें वाटून वर लिहिलेले राजाशी देऊळ नमोडण्याविषयीं पत्र पाठवून तहनामा करण्यास इछिलें, त्यास सुलतानानें हें उत्तर दिलें, कीं जर तहनामा धर्माविरुद्ध नसला तर मी करीन सारांश आलाउदीन खिलजी या मोठे माणसास दिल्लीचें राज्य प्राप्त होऊन नंतर त्याणें आपलें धर्माप्रमाणें फौज या देशांत पाठवून त्याचे धर्मांत लिहिल्याप्रमाणें तें देऊळ बाटवून त्याजवर मनोरे बांधून त्याची

* देवळाची सर्व पृथ्वीवर कीर्ती आहे.

मशीद केली, व या देवळा खेरीज दुसरीं कित्तेक देवळें त्याणे बांधलीं होतीं त्यांतील प्रत्येक देवळांत धोंड्यानें बांधिलेल्या विहिरी होत्या.

सोलांकीन राज वंशांतून बांधिला या राजकुळांत राज्य जाण्याचें कारण असें आहे कीं लखुमलदेव यास राज्य चालविण्या योग्य पुत्र नव्हता याजकरितां सर्व राज्य बाघिला वंशांत आलें आणि त्या वंशांतील साहा पुरुष होते त्याणीं एकशे सव्वीस वर्षे पर्यंत राज्य केलें तें यापुढें लिहिल्या प्रमाणें

| नावें | वर्षें | महिनें |
|---|---|---|
| अनहल मुलदेव | १२ | ५ |
| राजा बिसनदेव जाणे बिसाल नगर वसविलें | ३४ | ६ |
| राजा भीमदेव | ४२ | ० |
| राजा अर्जुनदेव | १० | ० |
| राजा सारंगदेव | २१ | ० |
| राजा कर्ण | ६ | २ |
| | १२६ | १ |

# प्रकरण ५

गुजराथ देशांत मुसलमानी धर्माची स्थापना जाली, त्याविषयीं

नास्तिक व अंधारी हिंदुधर्मावर सूर्यासारिखा जाचा प्रकाश असा जो मुसलमानी धर्म त्याचा उजेड पडावा, व सद्धर्मी योग्य नियमानें वागणारे जे मुसलमान लोक यांचा धर्म व कायदे प्रसिद्ध व्हावें, असें ईश्वरेछेस आल्यावरून वर लिहिलेले हिंदुराजांचे वंशांतून सत्ता व राज्य जाऊन मुसलमान लोकांचें हातांत आले त्या धर्मामध्यें ईश्वरी आज्ञा आहेत, त्याप्रमाणें वागून, त्याणी कुराणाचीं पुस्तकें छापिलीं, कीं, तेणेंकरून आपणास काहीं उपद्रव न होतां, कुमार्गानें आणि अशुद्धरीतिनें जे लोक वर्त्ततात त्यांस वळवून आणून मुक्ति होण्याजोगा असा जो सन्मार्ग तो दाखवावा.

सरते शेवटीं सुलतान आलादिन दिल्लीचा राजा हिजरी शके ६९६ व इसवी १२९६ या शकांत राज्य करीत होता, त्याचें नावानें खुनबा वाचवूं लागलें, तेवेळेस आलीफखां जास गुजराथेतील लोक अलफ़खां असें ह्मणत. हा व नुसराथखां जेलश्री या उभयतांचे हाता खालीं फौज देऊन गुजराथेंत पाठविलें, त्याणी नाहारवाल्या शेजारील देश लुटून राजा कर्ण भागिला जो हिंदुराजाचे वंशातील सरता राजा होता. त्याणें त्याज-

बरोबर लढाई केली, परंतु पुढें लढाइस उभे राहावयास शक्तिमान नहोऊन तो देवगाराकडे दक्षिण देशांत पळून गेला. आणि त्याचीं बायका, मुलें, खजीना व हत्ती सर्व या शत्रूचे हातांत पडलें या फौजेवरील दोघे कामगारांनीं खांबे देशांतील पैकेपूर सावकार लुटून गजनीतील राजा महंमद याचे राज्या नंतर सोमनाथांतील देवाची स्थापना जाहाली होती, तो देव पुनः फोडून टाकिला. व राजा कर्ण याचा बायका व सर्व सामान दिल्लीस पाठवून देऊन सुलतान राजास ह्या सर्वांची नजर केली. राजा कर्ण याची कन्या दिवालदी ही दिल्लीस येऊन पोंचल्यावर खिजरखां, अलादिन खिलजी याचा पुत्र तिचें स्वरूप महा लावण्य पाहून तिला मोहीत जाला. हें वर्त्तमान त्याचे बापास कळल्यावरून त्याणे त्यां उभयतांचें लग्न लाऊन दिलें. व आलादिन खिलजी याणें या सुंदर मुलीचे आईशीं कायद्या विरुद्ध लग्न लाविलें. दिलीचा अमीर खसराव याणें खजीर खां आणि दिवालदी या दोघांचे प्रीती विषयीं कविता केली आहे, तिचे एक पुस्तक सर्व पृथ्वीमध्यें प्रसिद्ध आहे, व त्यात तो असें लिहितो कीं अलीफ़खां याणें या दिवालदीचा लाहानपणापासून सांभाळ करून आपलें कुटुंबाबरोबर तीस लाहानाची मोठी केली नंतर सुलतानाचे हुकुमाप्रमाणे खिजर खां याशीं तिचे लग्न

लाविलें, आणि पुढें लिहिलेलें वर्णन सदरहू कवितेपैकींच आहे.

नाहारवाला याचें राज्य घेतल्यावर व राजा कर्ण याचा पराजय जाहाला यानंतर अलीफ़खां यास गुजराथ देशाचा राजकारभार चालविण्या विषयीं अखत्यारी दिलि व त्यावेळेपासून गुजराथ देशावर सुभेदार नेमणे जाल्यास, दिल्लीचे राजाकडून नेमले जात असत. अलिफखां याणें जुमा यानामें एक मशीद पांढरे पाषाणाची बांधिली ती अद्यापि काईम आहे. व सर्व लोकांस माहीत आहे. त्याप्रमाणें तिचें खांब इतके आहेत कीं, ते कोणी नचुकतां मोजूं शकत नाहीं. लोक असें ही ह्मणतात कीं, ही मशीद पूर्वीं हिंदूलोकांचें देवालय होतें, तें बाटवून त्याचीच मशीद केली. सारांश या मशीदीचें काम फार चमत्कारिक व फारच मोठें होतें. आणि पूर्वीं नगराचे मध्यभागी होतीं, परंतु आतां शहराची वस्ती लांबत गेल्यामुळें ती दूर राहिली,

पूर्वीं पट्टण शहरामध्यें विस्तीर्ण व मोठमोठाल्या इमारती होत्या त्याच्या खुणा अद्यापि दिसतात, त्या अशा कीं, आतां वस्ती जाहलेले जाग्यापासून तीन कोशांचे अंतरावर विटा, चिखल, अरण्यांत पडला आहे. तेणें करून यागोष्टीचें प्रमाण दिसून येतें व निरनिराळे जागीं मनोरे, व तट आहेत, त्यांजवरून असें समजुतींत येतें,

कीं, तेथे एकवेळ शहर वसलें होतें. व खरोखर युगयुगांचें ठायीं कित्तेक फेरफार जाले, आणि दिवसानुदिवस पूर्वींचा इमारती होत्या, त्यांचा मुद्दा बुडत चालिला या हिंदुराजानीं राज्य केलें, तेव्हां हिंदूलोकांचीं देवालये बांधण्याकरितां, अजमीर व दुसरे ठिकाणांतून संगमरवरी दगड इतका आणिला होता कीं आतां उगीच भूमी उकरायास गेलें असतां पुष्कळ दगड सांपडतात, व अहंमदाबादेंतील सर्व पांढरे दगडांचे इमारतीस ही तेथूनच दगड आणिले होते.

तात्पर्य गुजराथदेशांत अलीफखां याणे अलादिन खिलजी याचे तर्फेने वीस वर्षेंपर्यंत अमल केला. परंतु मालीक नाईब ह्मणून एक नपूंसक होता, हाच पुढें वजीर होऊन त्याणे अलीफ् खांनाशीं दावा करून त्याजवर आळ घेतला. ह्मणून राजाचे राज्याचे शेवटीं त्यास माघारें बोलावून ठार मारलें. खजीरखां हाही त्याजबरोबर आरोपी होऊन त्यास ग्वाल्हेरचे किल्यावर बंदींत टाकिलें यानंतर सुलतान एकवीस वर्षें राज्य करून, हिजरी ७१७ व इसवी १३१७ या वर्षीं उदर होऊन मृत्यु पावला. कित्तेक ह्मणतात, कीं मालीक नाईब याणे सुलतानास वीष घालून मारिलें, आणि खजीरखां हा राज्याचा वारस असतां, त्यास एकीकडे ठेवून शाहाबुदीन या नावाने लाहान मुलगा यास गादीवर बसविलें,

आणि त्याचे नावाने सर्व राज्य कारभार वहिवाटून त्याणे खजीरखां याचे डोळे फोडिले, आणि एक महिना पांच दिवसपर्यंत अशा रितीने काम काज चाललें असतां त्या राज्यांतील सरदार लोकानीं मालीक नाईब यास ठार मारिलें.

---

## प्रकरण ६

अलादीन खिलजी याचा पुत्र सुलतान कटबुदीन मुबरकशाहा याचे राज्याविषयीं.

सरदार, व मोठाले अमीर लोक, याणीं कटबुदीन मुबरकशाहा सुलतानाचा पुत्र यास बंदींतून सोडवून त्याचे अठरावे वर्षीं गादीवर बसविलें, तेसमयीं आलादीन याणे गुजराथचे सुभ्यावरून*अलीफखां यास परत बोलावून ठार मारिलें मग राज्य कारभारांत धांदल जाहली. दंगा व फितूर या मुलुखांत सुरू जाल्यावरून चहुंकडे बंडें उठलीं परंतु राजा कटबुदीन मुबरकशाहा राज्य करूं लागतांच त्याणे मालीक कामीलदीन यास दंग्याचें शांतवन करण्याकरितां पाठविलें. या मुख्य सरदाराने गुजराथेंत येतांच तेथील अधर्मी लोकांशीं लढाई करून आपले धर्माचें संर-

---

* पाचवे प्रकरणांत आलीफखान मेला ह्मणोन लिहीलें परंतु त्याचे नाम आल्पखान.

क्षण करण्यांत मोठी कीर्ती मेळविली. मग दंगे धोपे तर फारच होऊं लागले. शेवटीं ऐनलूमुल्क मुलतानी यास या मोठे कामावर नेमिलें. त्याणे फौज बरोबर घेऊन जा रीतीने चांगला बंदोबस्त होईल असें वाटलें त्या रितीने तसा बंदोबस्त केला.

दंगे धोपे जिकडे तिकडे बंद जाहाल्यावर राजाने आपला सासरा मालीक दिनर त्यास झाफीरखां अशी पदवी देऊन गुजराथेचे सुभ्यावर पाठविलें. त्याणे तीन चार महिन्यानी बंदोबस्त बरोबर करून राजाचे खजि-न्यात हजारों रुपये पाठविलें. परंतु याजवर कांहीं गुन्हा नसतां, व त्याणे त्या देशाचा बंदोबस्त बरोबर ठेविला असतां, त्यास राजाने गुजराथेंतून माघारें बोलावून ठार मारलें. त्याच वेळेस हिसामुदीन या नामेकरून खसरा-वखां याचा भाऊ होता त्याजवर राजाची कृपादृष्टि होती त्यास जाफीरखां याचा सरंजाम देऊन गुजराथेंत पाठ-विलें हा गुजराथेंत आल्यावर हिंदूची पवारजाती जमली व हे दोघे भाऊ त्याच जातीचे होते ह्मणून ती जाती त्यांस बंड करण्याविषयीं प्रेरणा करूं लागली याजबरोबर दुसरे कामगार आलेहोते, त्यांस त्यांचे बेढंग दिसूं लागले, ह्मणून त्याणी त्यास कैद केलें. आणि राजाकडे पाठवून दिलें, यानंतर मालीक वाजिउद्दीन खोरशी हा फार चपळ आणि धैर्यवान होता, त्यास गुजराथेंत हिसा

मुदीन याचे जाग्यावर पाठविलें. पहिले कामगाराने त्या देशांत पहिल्याने बिघाड केला होता तरी याणे बंदोबस्त केला. शेवटीं मालीकवाजिउद्दीन यास माघारें बोलावून ताजीयलूमुल्क् अशी पदवी दिली.

खसरावखां हा हिंदू पवार जातीचा होता हा मोठा राजाचे सलगींतला, व राजा त्याचे मुठींत होता ह्मणून त्यास गुजराथेंत पाठविलें. एवढे अधिकारानें त्याची तृप्ती न होतां राज्य घ्यावें असा दुष्ट संकल्प मनांत आणून आपली सर्व जाती जमा करून त्याणे राजाचा प्राण घेतला. नंतर राज्य बळकावून आपण नासरूदीन अशी पदवी घेतली.

तात्पर्य कटबुदीन मुबरकशाहा राजाचें राज्य चार वर्षे आणि चार महिनेपर्यंत चालिलें. यासमयीं घाजीमालीखा हा पहिले राज्यकुळांतील मोठा, व मोठे अबरूचा सरदार यास खसरावखां याचे द्वाड वर्तणूकेविषयीं समजतांच त्याचा नाश करावा असें मनांत येऊन त्याणे फौज जमा केली, आणि त्याशीं लढाई करून त्यास कैद केलें. नंतर ह्या दगेखोरांचे शरीरांचे तुकडे तुकडे करून शहरांत पाठविले.

अलादीन याचे वंशांतील कोणी वारस नव्हता ह्मणून सर्व मुख्यसरदारानीं घाजीमालीक यास हिजरी ७२० व इसवी १३२० या शकांत गादीवर बसविलें. नंतर त्याणे

ध्यासुदीन तोगलकशाहा अशी पदवी धारण करून ताजुल्मुल्क् याणे देश आपले ताब्यांत ठेवावा, ह्मणून त्यास गुजराथेचे सुभ्यावर नेमिलें, ही गोष्ट या राजाचे राज्याचे शेवटीं घडली. चारवर्षें व काहीं महिनें या राजाने राज्य केल्यानंतर जलमंदिराची बारद्वारी त्या सुद्धां साहा मनुष्यां वर पडून तो मृत्यु पावला.

---

## प्रकरण ७

### सुलतान महंमद तोघलकशाहा याचे राज्या विषयीं.

ध्यासुदीन तोगलक याचा पुत्र सुलतान महंमद तोघलक यास पुढें गादीवर बसविलें. हा राजा फारच बुद्धिमान होता, व सर्व विद्येंत, आणि कलाकौशल्यांत ही फारच निपूण होता. आणि नाना तऱ्हेचे इतिहासांत लिहिल्या प्रमाणे फार विचार करून तो फार लोभी जाला.

याचे राज्यांत गवयाचा पुत्र मालीक मुकबील याणे खान जाहान आणि नाईब मुख्त्यार अशी पदवी घेऊन गुजराथेंतील सुभा चालविला. आणि खजीना व सरकारी पागे करितां घोडे घेऊन बडोदें व डबोई यां वरून दिली स येत असतां मोंगल लोकांचे मुख्य सरदारानीं त्यास लुटिलें. त्या वेळेस मालीक मुकबीला हा

नाहारवाला एथें पळून गेला. आणि राजास हें वर्तमान कळतांच त्यास फार राग येऊन तो गुजराथेंत फौज घेऊन आला. आणि दोन वर्षें तेथें राहून गिरनर ह्मणजे जुन्या गडचा किल्ला घेण्याकरितां यत्न करीत असतां, त्या वेळेस कछ देशाचा राजा खंगर हा त्यास भेटला. राजाने तेथून जाऊन निजामुल्मुल्क यास गुजराथदेशावर नेमिलें त्या वेळेस सुलतान महंमद तोघलख हा वाटेवर आजारी पडून यमदूतानी त्याचा आत्मा मुक्तीस नेला.

## प्रकरण ८

महंमद तोघलक याचा चुलत भाऊ दिल्लीचा फिरोजशाहा तिसरा याचे राज्या विषयीं.

सुलतान फिरोजशाहा यास हिजरी ७५२ व इसवी १३५१ या शकांत मोहोरमचे चौविसावे तारिखेस राज्याभिषेक केला, आणि त्याचे मोठे योग्यते वरून मुसलमान लोकानीं एक मत्त करून त्यास सुलतान महंमद याचे राज्यावर बसविलें. नंतर तो राज्यकारभार पाहूं लागला, व त्याणे धर्माचें संरक्षण केलें. आणि त्यास पुष्कळ लढायात जय मिळाले. नागरकोट घेतल्या नंतर त्याणे गुजराथेंत येऊन निजामुल्मुल्क यास

सुभ्यावरून काढून जाफीरखां यास सुभ्यावर नेमिलें. तो मरण पावल्या नंतर त्याचा ज्येष्ठ पुत्रास हिजरी ७७३ व इसवी १३७१ या शकांत तीच पदवी देऊन त्याचे बापाचें काम त्यास सांगीतलें. नंतर शाम सुदीन दामघानी याणे सुलतानास कळविलें, कीं जर सरकार मला *यादेशावर नेमितील, तर मी सरकारास बारमाहीचे गुजराथेंतील वसूलापेक्षां, चाळीस लाख, ट्यांगचस्, व शंभर हत्ती, व बावीसशें आरबी घोडे, व चारशें बंदे चाकर असें जास्ती देईन. नंतर असें ठरलें, कीं शामसुदीन अनावरखां याचे खालचे पदवीचा जाफीरखां जर याप्रमाणें देण्यास कबूल करील, तर दुसऱ्यास कामावर ननेमिता देशावर तोचनेमिला जाईल. परंतु त्याणें ही गोष्ट नाकबूल केल्यावरून शामसुदीन दामघानीयास नेमिलें नंतर त्याचे कराराप्रमाणे त्याचानें देववेना सबब तो बंडांनाशिरला. सुलतानानें फौज पाठवून त्यास ठार मारलें. आणि गुजराथेचे मामल्यावर मालीक मुफारा यास नेमिलें. नंतर त्यास फराह तुलमुल्क् रास्तीखां अशी पदवी मिळाली. सुलतान फिरोजशाहा तिसरा हा अठतीस वर्षे आणि नऊ महिनें पर्यंत राज्य करून हिजरी ७९० व इसवी १३८७ या शकांत मृत्यु पावला.

---

* गुजराथ देश

## प्रकरण ९

फिरोज याचा नातू घ्यासुदीन तोघलक दुसरा जास फिरोज शाहा चौथा असें ह्मणत त्याचे राज्याविषयीं.

फिरोज शाहा तिसरा हा मेल्यानंतर त्याचे कारभारी लोकांनीं त्याचा नातू घ्यासुदीन यास चौथा फिरोजशाहा अशी पदवी देऊन राज्यावर बसविलें. हा फातखान राजाचा मुलगा फारच तरूण आणि आळशी होता, व ख्याल खुशालीचा, व विषय सुखाचा फार छंदांत पडला होता. तेणें करून लोकांवर फार जुलूम जाला.

ह्मणून मालीक रकनुदीन राज प्रतिनिधीनें त्या राजास हिजरी ७९१ व इसवी १३८७ या शकांत ठार मारिलें, आणि त्याचें शीर सरकार कचेरी समोर टांगून ठेविलें. त्याणें साहा महिनें पांच दिवस पर्यंत राज्य केलें.

---

## प्रकरण १०

फिरोजशाहा तिसरा याचा नातू सुलतान अबुबिकर शाहा याचे, व त्याचा चुलता महंमद तोघलक दुसरा याचे राज्या विषयीं.

फिरोजशाहा चवथा जास घ्यासुदीन तोघलक असें ह्मणत असत. हा मेल्या नंतर याचा चुलत भाऊ अ-

बुबिकर शाहा,( जो फिरोजशाहा तिसरा याचा तिसरा पुत्र जाफीरखां याचा पुत्र होता,) यास राज्यावर बसविलें. या राजास महंमद तोघलक दुसरा ह्मणून त्याचा चुलता होता त्याणे कैदकेलें. आणि एक वर्ष साहामहिने राज्य करून हा मेला.

नंतर महंमद शाहा तोघलक दुसरा यास राज्यमिळालें. आणि खांबायतेंतील लोकानीं फराहतुलमुल्करास्तीखां याजवर ( दाद लागावी ह्मणून ) फिरयाद केल्यामुळे, राजानें वाजियलमुल्कू याचा मुलगा महंमदशाहा झाफीरखां यास गुजराथेचे सुभ्यावर नेमिलें. याप्रमाणे हिजरी ७९३ व इसवी १३९१ या शकांत रबिलावलूचे, सत्रावे, ह्मणजे फेब्रेवारीचे एकविसावे तारिखेस जाफीरखां हा आपले सुभ्याचे अधिकारावर गेला. नंतर इकडे सुलतान दूखण्यांत पडून हिजरी ७९६ व इसवी १३९४ या शकांत साहावर्षें सातमाहिने पर्यंत राज्यकरून मृत्यु पावला.

# भाग २

## प्रकरण १

### गुजराथेंतील राजांची वंशावळी.

वाजी हलूमुल्क याचा पुत्र झाफीरखां याचा अमल व गुजराथ शहराची स्थापना करून तेथील राजे राज्य करूं लागले या विषयीं.

अकबराने हा देश घेतल्या नंतर कित्तेक सुभे दारांचे हाताखालीं राज्य कारभारामध्यें जा गोष्टी घडल्या त्यांचा व केवळ हा देश अमदानीत असतां, तो मातीस मिळावयास जा गोष्टी कारण जाल्या त्यांचा विस्तार पूर्वक वृत्तांत लिहावा, या योजनेने मागील सर्व पत्रें लिहिलीं आहेत. पूर्वीं जरी विद्वान पुरुषानी आपले मागें तारखी मुझाफीरशाई व त्या नंतर हालवासिराजी, असें कवितेचें पुस्तक केलें, त्यास अहंमदशाई असें ह्मणतात, तें व तारखी महंमदशाई असें अहंमद बिगारा याणें जा पुस्तकास नाव दिलें तें, व तारखी बाहादूर शाई असें इतिहासाचें पुस्तकांमध्यें ग्रंथ कर्त्यानी निरनिराळे राजांचा कारकिर्दी लिहिल्या आहेत परंतु त्यांत सर्व गुजराथेंतील राजांची वंशावळी, विस्तार पूर्वक लिहिली नाहीं. ही सर्व मिराठा शिकंदरी या नामे करून इतिहासाचें पुस्तक आहे त्यांतलिहिलीआहे. हें पुस्तक गुजराथेंतील

राज्य नाशाप्रत पावल्या नंतर चाळीस वर्षांनीं केलेलें. आहे. आणि हे राजे गुजराथेमध्यें राज्य करूं लागल्या पासून जाजागोष्ठी घडल्या त्यांतील व प्रत्येक राजाचे राज्यांत जें जें जाहालें त्यातील लोकांस प्रसिद्ध व्हावया जोगें अवश्यक होतें, तें. मिराठा शिकंदरी यापुस्तकातून घेतलेलें आहे. जास त्यांचा सर्व वृतांत माहीत व्हावा, अशी इच्छा असेल त्याणे हें पुस्तक वाचावें ह्मणजे त्यांत सर्व आहे.

गुजराथेंतील राजांचे वंशात मुख्य पुरूष वाजीयल् मुल्कू याणे मूळप्रथम मुसलमान लोकांचा धर्मग्रहण केला. वाजीयल्मुल्कूहा, सूर्यवंशी रामचंद्रदेव जास रजपूतलोक पूजितात वत्याजपासूनच क्षत्रियजातींतील रजपूतलोकाची जातीउत्पन्न जाली असेंह्मणतात त्याक्षत्रियजातींतील टयांक् जातीचा होता गुजराथेंतील राज्याविषयीं दुसऱ्या इतिहासाचे पुस्तकात टयांकू व गोहिलाज या जातीस अशीं नावें पडण्याचें, व बाढण्याचे जें वर्णन केलें आहे तें येथें लिहिण्याचें कारण नाहीं.

सुलतान महंमद तोघलकशाहा दुसरा यास दिल्लीचें राज्य हिजरी ७९२ व इसवी १३९० याशकांत मिळाल्यानंतर मालीक मुफाराऊर्फ फराह तुल्मुल्करास्तीखांन असें ह्मणत असत त्याणें गुजराथेंतील राज्य कारभारा मध्यें बेदाद, व बंड केलें. असें त्याचे ऐकण्यात आल्या

वर थोडे दिवसानीं सुलतान महंमद याणें वाजीयलू-मुल्क याचा मुलगा झाफीरखां यास आझीमहामायन अशी पदवी दिली. आणि राजासच जें चिन्ह विशेषें करून असतें. तें धारण करावयास हुकूम देऊन गुजराथेंत रास्तीखां यास शिक्षा करण्यास पाठविलें.

हिजरी ७९३ व इसवी १३९०-९१ याशकांत रबिलोवलूचे दुसरे तारीखेस आझी महामायन याणें दिल्लीतील हाऊजीखास* चे कांठावर आपले तंबु ठोकिलें. तेथें सुलतान राजाने त्याच महिन्याचे चवथें तारिखेस त्याचे निरोपास येऊन आझीमहामायन यांचा पुत्र तातरखां यास आपले पोटचे पुत्राप्रमाणें पालन पोषण करीन असा पत्कार घेतला. आझीमहामायन कित्तेक मुकाम पुढें गेल्यावर त्यास वर्त्तमान कळलें कीं तातरखां यास पुत्र जाला. त्याचें नाव अहंमद असें ठेविलें नागोर जवळचें मुकामास भर मजलीनें आला तेव्हां खंबायत देशचें लोकांनीं येऊन फिर्यादी केल्या कीं, रास्तीखां याणें आह्मावर फार जुलूम केला. आझीमाहामायन याणे त्यांस धीर दिला, आणि त्यांचें शांतवन करून तो पट्टण शहरा कडे गेला. तेथे तळ देऊन सुलतान राजाने रास्तीखां यास आज्ञापत्र दिलें होतें, तें त्यास पाठऊन दिलें त्यांत लिहिलें होतें कीं, रास्तीखां याणें

---

* हें तळ्याचें नाव आहे

आझीमाहामायन यास शरण जावें. परंतु रास्तीखां याणें उत्तर बरोबर दिलें नाहीं, ह्मणून आझीमाहामायन-हा लढाईस उभा राहिला खांबु ह्मणोन पट्टण सरका-रचे ताब्यांतील ठाणें आहे, तेथें उभयतांची लढाई होऊन झाफीरखां आझीमहामायन यास जय मिळाला आणि फाराहातुल्मुल्क् रास्तीखां ठार मारला गेला. यानंतर आझीमहामायन पट्टण शहरांत हिजरी ७९४ व इसवी १३९१-९२ याशकांत माघारा आला. आणि कुळंबी लोक व दुसरे अधिकारा खालचे लोक त्यांशी मिळून घेऊन त्याणें आपला अमल सुरू केला. आझी महामायन याणें जा जाग्यावर त्यास जय मिळाला त्या जाग्यावर एक शहर वसविलें. आणि त्यास जितपुर असें नाव दिलें नंतर सोमनाथांतील देऊळ लुटून खरे देवाची भक्ती आणि सेवा करूं लागला. त्याणें कित्तेक ठिकाणीं मुसलमान लोकांचे धर्माची स्थापना केली नंतर गुजराथेंतील सर्व शहरांवर अमल ठेऊन जा लोकांवर फाराह तुलूमुल्क् रास्तीखां याणें जुलूम केला होता. त्या लोकांचा त्याणें पुस्तपाना केला. तेणेकरून सर्व लाहान मोठे लोक त्याला अनुकूळ जाले.

सुलतान महंमद तोघलक दुसरा हिजरी ७९६ व इसवी १३९३-९४ याशकांत मेल्यानंतर दिल्लींतील राज-कारभाराची सर्व धांदल जाहाली. यावेळेस तातरखां

हा जाफीरखांआझीमहामायन याचा पुत्र आणि महंमद तोघलक दुसरा याचा नासरूदीन महंमद शाहा ह्मणून पुत्र होता त्याचा दिवाण यास मुल इकबलखां याणें जिंकल्यानंतर तों आपले बापाकडे गुजराथेंत पळून गेला. अमीरटैमर कुरखां याणें दिल्ली शेजारी येऊन तळ दिला आणि दिलींतील लोक गैर इलाजी होऊन कित्तेक दिल्ली सोडून गुजराथेंत पळून आले, असें वर्त्तमान येऊन पोंचल्यावर थोडे दिवसानीं नासरूदीन महंमदशाहा दिल्लीसोडून गुजराथेंत पळून गेला, परंतु तेथे साहाय करावयास कोणी नाहीं असें पाहून माळव्याकडे पळाला.

अमीर टैमर कुरखां पुनः समरखंड या देशात गेला आणि मुल इकब वळखां पुनः दिल्लीचे राज्यावर बसला. त्या वेळेस तातरखां याणे आपले बापास मुल इकबळखां याचा सूड घेण्यास व त्यास शहरातून हाकून द्यावा, असा सल्ला देऊन बोलिला कीं आपल्याजवळ पुष्कळ फौज तयार आहे, व ही राजगादी कोणाचीच नाहीं, परंतु कित्तेक कारणावरून जाफीरखां पुढील भविष्य समजल्यावरून आपले मुलाचे मत्तास अनुसरला नाहीं. काहीं दिवस खटला जाल्यानंतर आपण सर्व अधिकार सोडून गुजराथेतील राज्य, सेवक, छत्रें, चामरें, आपले मुलास देऊन एकांतवासी जाला. ही गोष्ट सर्वांहून खरी आहे कीं, तातरखां हा आपले बापास कैद करून

महंमद शाहा अशी पदवी घेऊन एसावल या शहरांत हिजरी ८०६ या शकांत जमादिलोवल महिन्यांत राज्य करूं लागला, नंतर त्याच आठवड्यांत न्याडोडचे नास्तिक लोकांशीं धर्म युद्ध करूं लागला. आणि तेथील कित्तेक लोक ठारमारून, त्याणे दिल्लीकडे कुचकरण्याचा बेतकेला इकबलखां यास हें समजतांच त्यास फार भयवाटलें, नंतर त्याचवर्षी अकस्मात साबान महिन्यांत सूलतान महंमदशाहा तातरखां आजारीपडला तेच वेळेस कित्तेक माहाचतुर वैद्य त्यास नीट करण्याकरीतां आणिले, परंतु कांहींगुणास आलें नाहीं, गुजराथेतलि लोकांस खरोखर वाटतें कीं याचें मृत्युचें कारण हेंच जें तो आपले बापाचा लौकीक आणि अबरूकडे न पाहातां वैभव्य व अधिकारा करितां लोभीजाहाला, ह्मणून जाफिरखां याचे सोबती मंडळीनीं त्यास वीष घालून मारलें, आणि कित्येक ह्मणतात, कीं झाफीरखां याणे आपले लेंकास मारायास त्यांस सांगितले- सरतेंशेवटी सुलतान महंमद याचें प्रेत पट्टण शहरांत आणून तेथे पुरलें आणि जसा कोणी धर्मासाठीं प्राण देतो त्याची जशी कीर्ती होत्ये तशी याची जाहाली. यानंतर झाफीरखां छावणीकडे गेला, तेथे सर्व बडे लोक व सरकारी च्याकर लोक त्यास शरण गेले, आणि वाडवडिलांपासून ही गोष्ट बोलत आले, कीं झाफीरखां आपले

मुलाकरितां मरे तोंपर्यंत डोळ्यांतून आसवें काढीत असें

सुलतान फिरोजशाहा तिसरा याचे वंशांतील सर्व पुरूष मरत तोंपर्यंत राज्यांत बचबच जास्ती होत चालिली आणि मुलइ कंबलखां हा सय्यद खिजरखां याजकडून लढाईंत मारला गेला, यामुळें बडे लोकानीं आणि सर्व सरदारानीं झाफीरखां यास निवेदन केलें, कीं गुजराथेचे राज्यांत एकोपा किंवा बरोबर शिस्त कांहींच नाहीं, आणि एवढें मोठें काम करण्यास दुसरा कोणी योग्य नाहीं यामुळें आपण गुजराथेंत राज्य स्थापना करावी आशी राजाविषयीं चांगलें चिंतन करणारानीं विनंती केल्यावरून ती मान्य केली, आणि सुलतान महंमद हा त्याचा लेंक मेल्यानंतर शिरपुरामध्यें साहा वर्षें आणि सात महिन्यानीं राज्य करूं लागला ही गोष्ट हिजरी ८१० व इसवी १४०७-८ या शकामध्यें जाहाली, आणि झाफीरखां याणे मुझाफीर शाहा अशी पदवी घेऊन आपले नावाचें नाणे केलें, आणि अहमदशाहा ह्मणून त्याचा नातू होता त्याणें आपले मागें राज्य कारभार चालवावा असें ठरविलें, नंतर अहमदशाहा याणे हिजरी ८१३ व इसवी १४१०-११ या शकांत त्यास वीष घालून मारी तोंपर्यंत तो बरोबर न्यायकरी आणि दुष्टांस शासनकरी व गरीबांचें पालन पोषण करीत होता.

हा राजा कशा रीतीनें मारला गेला याविषयीं वृत्तांत

नाना तऱ्हेचे लिहिले आहेत. मिराठा शिकंदरी या पुस्तकाचा कर्ता ह्मणतो, कीं कोळी लोक प्रथम एसावल शहर वसवून राजास मानीनासे जाले, आणि वाटा मारूं व लुटूं लागले, ते समयीं सुलतान अहंमदशाहा जाफीरखां याचा नातू यास फौज बरोबर देऊन त्या लोकांवर पाठविलें तेव्हां पट्टण शहरांतून जाणार ह्मणून त्याणे खानी सरोवराचे कांठावर तळ दिला आणि आपले गुरू लोकांस विचारिलें, कीं जर कोणी माझे बापास ठार मारिलें असलें तर त्याचा सुड घेणे हें धर्मास योग्य आहे किंवा नाहीं, तेव्हां सर्वांनी त्यास सांगीतलें, कीं त्यांस शिक्षा करणें हें धर्म युक्त आहे असा कागद गुरूलोकानी लिहून दिला, तो सुलतानाने जपून ठेविला. असें जाहाल्यानंतर त्याणे अवचित् शहरांत येऊन आपले आजास बंदींत घालून विषाचा प्याला त्यास प्यावयास दिला.

लोक ह्मणतात, कीं झाफीरखां आपले नातवास बोलिला, जे अरे मुला तूं फार उतावळा आहेस, परंतु जर तुं मला नमारितास तरी मजजवळ सर्व जें आहे, तें तुजकरितां ठेविलें होतें यावरून नातवानें उत्तर दिलें, तुझा मृत्युसमय जवळ आला, तेव्हां झाफीरखां ह्मणला कीं मी तुला कल्याणार्थ उपदेश सांगतों, तो ऐक तुला जाणे मला ठार मारण्या विषयीं सांगीतलें त्याशा

विश्वास धरूं नको आणि जो तुला असा उपदेश कर णारा त्या माणसास ठार मार, दुसरें दारू पिऊं नको, कारण राजे लोकांनीं दारू पिऊं नये, ही गोष्ट आवस्यक आहे, तिसरें शेखमालीक आणि शिरमालीक हे दंगेखोर आहेत त्यांस ठार मार.

याप्रमाणे पुष्कळ उपदेश करून पूर्वी लिहिलेले वर्षीं सफर महिन्याचे शेवटीं विषाचा प्याला घेऊन मेला. नंतर त्याला पट्टण शहराचे आंतले कोटाचे कबरींत पुरिला, या राजाने आठरावर्षें आठ महिने आणि चौदा दिवस पर्यंत राज्य केलें.

हिजरी ८१० व इसवी १४०७-८ या शकांत मुझा फीर शाहा याणे गुजराथेमध्य राज्य स्थापना केली तेव्हां पासून हिजरी शकें ९८० व इशवी १५७२-७३ तील सफर महिन्याचे शेवट पर्यंत कांहीं कमी नाहीं तरी एकशें सत्तर चांद्र वर्षें गुजराथेंत त्याचे वंशजांतील तेरा किंवा चौदा राजानी राज्य केलें.

---

## प्रकरण २

मुझाफीर याचा नातू अमदखां, जास अहमदशाहा असें ह्मणत त्याचे राज्या विषयीं.

गुजराथेंतील राजे लोकांची ही फार चाल असे

कीं आपले मुलास खान अशी पदवी देत, आणि राज्य कारभार करूं लागले ह्मणजे त्यास सुलतान ह्मणावें या वरून अहंमदखान हा मुझाफीर शाहा मेल्यानंतर हिजरी ८१३ व इसवी १४१० या शकांत रमजान महिन्यात आपले नावास सुलतान असें पद जोडून राज्यावर बसला.

यासमयीं सुलतानाचा चुलता फिरोजखां याचा मोदद या नामेकरून मुलगा जो तेसमयीं बडोद्याचे सुभ्यावर होता त्याणे त्या देशांतील सरदारांशीं मिळवून घेऊन मोठा दंगा मांडिला आणि राजाकडून फौज आली तीं जबरीवर लढाई करून भोच किल्याचे आश्रयास पळून गेला, ही गोष्ट जाहल्या नंतर सुलतान राजाची त्याणे एकांतीं भेट घेतली, तेव्हां सुलतान त्या देशांतून निघून एसावल या शहराचे जवळ येऊन पोंचला होता, तेथें आल्यानंतर आशाभिल हें शहर मोडून टाकून अहंमदाबाद शहराची स्थापना करण्याविषयीं शेख अहंमद खातुगांजवक्ष याणे सांगीतल्या प्रमाणे निश्चय केला.

हिजरी ८१४ व इसवी १४११-१२ या शकांत सुलतानाने इडूर या शहरावर फौज नेली, तेव्हां तेथील राजा पळून गेला होता, त्यास लज्या वाटून त्याणे सुलतानाशीं अमुक खंडणी देईन असा करार केला, नंतर सुलतानानें त्यास क्षमा केली. हें लोकांत प्रसिद्ध असेलच कीं

अलादिन राजाचे वेळेस या देशाचे पश्चिमेस नाहारवाला पट्टण या शहरापासून पुर्वेकडे ब्रोच पर्यंत मुसलमान लोकांचा धर्म चालू जाला होता, परंतु कित्येक ठिकाणीं नास्तिक धर्म चालत होता, तो तसाच काईम होता, पुढें दिवसानुदिवस त्या ठिकाणांतील लोक गुजराथेतील राजानें श्रम केल्यामुळें पवित्र झाले, आणि सुधरले गेले आणि अहंमदशाहा राजानें यत्न केल्या वरून कित्तेक या धर्मांत फारच सुधारले गेले, यानंतर गिरनर ह्मणून सोराथ प्रांतांत किल्ला आहे, तेथील नास्तिक लोकांशीं धर्मयुद्ध चालवावें असें मनांत येऊन हिजरी ८१७ व इसवी १४१४·१५ या शकांत अहंमदशाहा राजानें तेथें फौज पाठविली, तेव्हां मांडाळीक ह्मणून तेथील राजा हा लढाईत पराजय पावून जिंकला गेला मग संरक्षणार्थ बडोद्याचे किल्ल्याचा आश्रय धरून राहिला त्या वेळेपासून लोक ह्मणतात कीं गिरनरचा किल्या जवळचा किल्ला जुनागड हा सुलतान राजाचे ताब्यांत आला परंतु ते वेळेस मुसलमानी धर्म सर्व देशांत चालू जाला नव्हता तरी त्या देशांतील जमीदार लोक सुलतान राजाचे ताब्यांत राहून त्यास खंडणी देऊं लागले. यानंतर हिजरी ८१८ व इसवी १४१५·१६ या शकांत जमादिलोवल महिन्यांत सुलतानाने सिद्धपूर एथील हिंदूंचें देऊळ मोडिलें

आणि हिजरी ८१९ व इसवी १४१६-१७ या शकांत माळव्यांतील धार शहरावर फौज पाठविली.

हिजरी ८२१ व इसवी १४१८ या शकांत झुलकडा महिन्याचे पहिले तारखेस सोनगडचे शेजारील देश घेऊन तेथील किल्ल्यांत त्याणे एक मशीद बांधिली. हिजरी ८२२ व इसवी १४१९ त सफर महिन्याचे बाविसावे तारिखेस एककाजी व एक धर्मोपदेशी त्या मशीदींत ठेवून त्याणें तेथें मुसलमानी धर्माचें स्थापन केलें, आणि तेच वर्षी मागण ही सोनगडचे ताब्यांतील शहर होतें, तेथील कोठ पुनः बांधून त्या देशाचे संरक्षणार्थ तेथें कांहीं फौज ठेविली, परंतु त्याचा चुलता शामसखान दिनदाणी जो नागोरचे सुभ्यावर सुभेदार होता, त्याजकडून त्यास एक पत्र आल्यावरून, तो तेथून लवकर परत गेला. लोकांत हें ही ह्मणतात, कीं ते वेळेस शामसखानाचे पुढील चार दांत फार वाढले होते ह्मणून त्यास दीनदाणी ह्मणत असत.

हिजरी ८२३ या शकांत अहंमदशाहा आपले देशांतील हद्दी ठरविण्या करितां आला तेव्हां त्याणे दंगेखोर लोकांची दाणादाण करून देऊन हिंदुलोकांचीं देवळें मोडून त्या जाग्यावर मशीदी बांधिल्या.

असे बहुतेक जागीं किल्ले बांधून त्यांत पाहारे ठेविले त्या किल्यापैकीं बाराहा ह्मणून परगण्या मध्यें जिनर

या शहरांतील शिवपूर एथें किल्ला बांधिला, या नंतर दाहामोदचे डोंगरामध्यें एक बाजाराची पेंठ वसविली आणि तेथें कोट बांधिला. या उपरांत अलादीनाखिल-जीचे तर्फेने अलफ़खां ह्मणून देशाचा कारभार करीत होता त्याचे हुकुमाने हिजरी शकें ७०४ व इसवी १३०४ या शकांत कारी या नामे करून किल्ला बांधिला होता त्याची या समयीं उस्तवारी करून त्यास सुलतानाबाद असें नाव दिलें.

हिजरी शके ८३० या वर्षी सुलतानाने इडूरा वर पुनः फौज नेली तेव्हां तेथील राजा याचे पुढें पळून गेला सुलतान अहंमद त्याचे पाठीमागें डोंगरी देशातून पाठ-लाग करीत गेला, तेथें इडूरापासून दाहा कोशांवर अहं-मदानगर हें त्याणे साबरमती नदीचे कांठावर वसविलें आणि त्या सभोंवती दगडी कोट बांधून तेथें राहावें असें मनांत आणिलें.

हिजरी ८३१ व इसवी १४२७ या शकांत जेव्हां फौज अन्नाकरितां देश लुटूं लागली तेव्हां इडूर चा राजा पंजा नामेकरून घालाघालण्या करितां गुप्त स्थानी लपून बसला होता, तो तेथून येऊन लुटारांवर चढाव करून आला या लुटारू लोकांचा मुख्य सरदार होता तो पळून गेला त्याचा हत्ती पंजा राजाने हांकून लाविला नंतर दाणादाण जाहालेले लोक पुनः जमले, आणि पंजा

राजाचा शोध करीतकरीत जात असतां दोन्ही दळेंरस्त्याचे एकबाजूस उंच डोंगर व दुसरे बाजूस एक फार खोल दरा, व त्या रस्त्यावरून एक स्वार जाण्याची मुष्कल अशा कठीण अडचणीचे रस्त्यावर येऊन पोंचले तेव्हां माहातानें पंजा राजास मारण्या करितां हत्ती फिरविला, त्या वेळेस त्याचे मागें मुसलमान लोकांची फौज होती. पंजा राजाचा घोडा त्या सुद्धां खालचे दरींत पडला, आणि सुलतानाचे स्वारांनीं आपला हत्ती माघारा काढिला कांहीं दिवसा नंतर एके लांकूड तोड्याने त्या राजाचें डोकें तोडिलें होतें, तें सुलतानाचे कचेरीचे तंबूंत आणिलें.

पुढें राजास दोन वर्षांची सवड सांपडली तेव्हां त्याणे दुसरें कांहीं नकरितां आपले देशाचा बंदोबस्त व खबर दारी ठेविली, आपले प्रधान व फौजेवरील सरदार यांचे मत्तानें आपले राज्याचें व फौजेचें हितावह होई असा बंदोबस्त केला.

सुलतानाने बंदोबस्त या रितीने केलाकीं शिपाई लोकांस त्यांचे उपजीविके करितां अर्धे पगारा बदल वतनी जमीनी व अर्धे पगारा बदल रोख पैका द्यावा असें ठरविलें, त्याणें असा विचार केला कीं, सगळा पैका रोख दिल्हा तर पैका पुरेसा होणार नाहीं व शिपाई लोकांस सर्व पदार्थांची सोई असल्या खेरीज ते देशाचे बंदोबस्ताविषयीं काळजी वागविणार नाहींत, परंतु अर्धे पगा

राकरितां जमीनीचा नेमणुका करून दिल्या असतां शिपा-यांस त्या जमीनीतून लांकूड फांटा गवत, आणि दुसरे पदार्थ मिळतील, आणि घरें दारें व जमीनिच्या नेमणुकी करून दिल्याने शिपाईलोक देशाचा बंदोबस्त करण्यात काळजी घेतील अर्धा पगार तर त्यांस सुरळीत मिळेल, शिपाई लोकांस चालते किरकोळ खर्चाकरितां व पुढचे तरतुदीकारितां कर्ज घ्यावें लागणार नाहीं. सर्व आपापले इनामाचे वसुला पेक्षां जास्ती खर्च करणार नाहींत त्याणे सर्व सरंजाम तयार ठेविल्या शिवाय सरकारी खजीन्यांतून पगार त्यांस घेतां येणार नाहीं असा बंदोबस्त जाहाल्याने शिपाईलोक व्याजानें कर्ज घेणार नाहींत.

तेथील अशी चाल होती कीं सरकारी बंदे चाकरांतून कित्येकांस मोठमोठाले अधिकार देऊन त्यांजबरोबर चांगले कुळींचे हिशेबी कारकून देत असत, कारण कीं दोघे चांगले कुळींचे अथवा दोघेही वाईट कुळींचे असले ह्मणजे त्यांमध्यें विवाहादि समंध किंवा विशेष मैत्री होईल व असें जाहल्यानें फितूर आणि दंगा होईल.

याजकरितां वर लिहिल्या रितीनें परगण्यांवर कामगार नेमले जात असत आणि महंमद विगारा याचा पुत्र मुझाफीर राजा याचे राज्याचे शेवट पर्यंत या प्रमाणें

क्रम चालत होता परंतु जेव्हां सुलतान बाहादूर याचे राज्यांत फौज फार वाढली तेव्हां कारभाऱ्यांनी जमीनीचे वसुलाचा मक्ता ठरवून दिला, तेणें करून पूर्वी जा जमीनींत एक रुपया उत्पन्न होत असे त्या जमीनींत हाल्लीं दाहा रुपयांचें उत्पन्न होऊं लागलें बाकीचे जमीनींत निदान एक रुपया पासून सात आठ नऊ रुपयां पर्यंत उत्पन्न होऊं लागलें. याप्रमाणें सर्व जमीनींतून दाहांपासून वीस रुपये पर्यंत उत्पन्न वाढत गेलें या नंतर तेथें, फारफेर, बहूत जाहाले आणि कायेद निसक दफ्तरातून बरतर्फ जाहाल्या मुळें गुजराथेंत पुढें लिहिल्या प्रमाणें फार फितूर व दंगे होऊं लागले.

सुलतान मग प्रतिवर्षीं स्वारीं करीत असे. कधीं कधीं इडूरा शेजारील देश लुटी व कधीं कधीं नाशीर खान अशीरचा राजा यास अथवा सुलतान अहंमदबाहामणी यास शिक्षा करण्यास्तव जाई तो कारण परत्वें करून मेवार देशावर फौज पाठवी आणि गुजराथेंतील राज्याचे फौजेस बारमाही जय मिळत असे व जी फौज या राजाचे राज्यांत जिंकली गेली नाहीं त्या फौजेनें मांडू तील फौजेस व दक्षिण आशीर मेवार या देशचे नास्तीक लोक यांस जिंकिलें. सुलतान हिजरी ८४५ व इसवी १४४१ या शकांत अमदाबाद येथें मेला आणि जुमा मशीदीचे समोरील बाजार चौकास माणिक

चौक असें ह्मणतात, तेथील थड्यांत त्यास पुरलें.

सुलतान हा हिजरी ७९३ या शकांत झुलहिजा महिन्याचे १९ वे तारिखेस जन्मला. आणि गादीवर बसला तेव्हां त्याचें वीस वर्षांचें वय होतें व बत्तीस वर्षे साहा महिने बावीस दिवस पर्यंत राज्य केलें, यावरून बावन्न वर्षांचें वय जाहल्यावर मृत्यु पावला असावा असें दिसतें, सुलतान हा कटबुलमा षेखषेखर कामुदिन याचा चेला होता. आणि न्याय, मित व्यय, उदारत्व, यां विषयीं या सारिखा कोणी किर्तिमान नव्हता.

लोक असें सांगतात कीं सुलतानाचा जांवई याणे तारुण्य पणाचे धुंदी मध्यें नाहाक कोणाएकाचा खून केला. ह्मणोन राजाने त्यास कैद करून काजीकडे पाठविलें. काजीनें ठार मारलेल्या माणसाचे वारिस दारास याजकडून सोन्याचा बावीस मोहोरा देववून कज्या मिटविला, आणि सुलताना पुढें त्यांस नेलें. तेव्हां सुलतान बोलिला कीं, जरी तो वारीसदार आपसांत समजला, असें तुह्मी ह्मणता, तरी अशी गोष्ट होणार नाहीं. व संपत्तीवान लोक जे दुष्ट स्वभावाचे आहेत, त्यांस अशे दुष्ट अपरांधांची माफी केल्याने, ते पुढें जास्ती खून करितील, याजकरितां अशा गुन्ह्यास खुनास खून घेणे हें दंड घेण्यापेक्षां फार चांगलें असें बोलून त्याणें त्या खुनी माणसास आपले दारासमोर फांशीं देण्याविषयीं हुकूम

दिला नंतर तें प्रेत एक दिवस व एक रात्र लोंबत ठेऊन मग त्यास मूठ माती देण्यास हुकूम दिल्हा. अशी शिक्षा प्रत्यक्ष आपले जावयास दिल्यापासून सुलतानाचे राज्यांत सरदार अगर शिपाई लोक याणीं कधींही खून केले ही गोष्ट ऐकण्यांत आली नाहीं.

ही ही गोष्ट लोक सांगतात कीं एके दिवशीं सुलतान साबरमती नदीचे कांठावरील रम्य जाग्यावरून मौज पाहून सुखोपभोग करीत होता, त्याचे नजरेस पाणी गढूळलेलें पडलें आणि त्यांतून काहीं काळी वस्तु खालून लोटत जात होती ती पाहिली, तेव्हां हें काय आहे या विषयीं शोध करण्यास सांगीतलें, यावरून शोध केला तों मातीचे रांजणामध्यें एक प्रेत घालून पाण्यांत सोडिलें होतें. नंतर राजानें हुकूम दिला कीं शहरांतील सर्व कुंभार बोलावून कोणी हा रांजण विकला याचा शोध करावा. असा तपासकरितां अंतीं त्या कुंभारांतून एकानें कबूल केलें कीं अहमदाबादे शेजारील एका अमूक गावांतील मोकदमास विकला आहे, त्यावरून त्या मोकदमास राजा पुढें आणिलें त्याणे स्पष्ट सांगीतलें कीं मी एके सावकारास मारून त्याचें प्रेत रांजणांत घालून नदींत सोडून दिलें आहे, त्यावरून त्याचें डोकें उडविण्या विषयीं हुकूम दिला. या राजाचे कारकीर्दींत हेच दोन खून मात्र जाहाले.

# प्रकरण ३

## शाहा पहिला.

### सुलतान महंमद याचे राज्याविषयीं.

अहंमदशाहा राजा मेल्यानंतर त्याचा पुत्र महंमद हा हिजरी ८४५ व इसवी १४४१ या शकांत राज्यावर बसला, परंतु यास ऐष आमाराचा षोक फार लागल्या-मुळें याणे राज्य कारभारा विषयीं काहीं काळजी वाग-विलीं नाहीं, परंतु लोकांस देणगी देण्याविषयीं उदार होता, ह्मणून लोकानी या राजास झिरबाक्ष असें नाव दिलें, आणि त्याच वर्षीं राजाने इडूरचा राजावर फौज नेऊन चढाव केला. तो राजा पळून गेला. आणि कांहीं दिवस डोंगरांत दडून राहिला, परंतु त्याणे अपराध केले होते त्यांविषयीं क्षमा मागण्याकरितां, वकील पाठविले, सुलतानानें त्यास माफी केली, नंतर त्या राजानें सुल-तानास आपली मुलगी दिली तेथून बेगार अथवा वागा-राचे परगण्यामध्यें फौज नेली, आणि तो देश लुटून शहरांत परत आला. त्याच वर्षीं शेख अहंमदखां दुगा-जीबक्ष हा सत्पुरूष मेला राजानें त्याचे थड्या शेजारीं एक मशीद आणि एक कबर बांधण्यास हुकूम देऊन हिजरी ८५४ व इसवी १४५० या शकांत चांपनीर किल्यावर स्वांरी केली, आणि स्वांरीहून परत येतानां

सानवली परगण्यातील गोद्रा या शहरांत आल्यानंतर आजारी पडिला, नंतर हिजरी ८५५ व इसवी १४५१ या शकांत मोहोरमचे विसावे तारिखेस अहंमदाबादेमध्यें मृत्यु पावला, आणि त्याचे बापाचे कबरेचे तळघरामध्यें त्यास पुरिलें.

जरी लोक, ह्या राजाने सात वर्षें चार महिने पर्यंत राज्य केलें असें ह्मणतात, तरी याणे नऊ वर्षें आणि काहीं महिने राज्य केलें असावें, यास मरण कसे आलें याविषयीं नाना तऱ्हेचें वर्णन मिराठा शिकंदरी या इतिहासाचे पुस्तकामध्यें केलें आहे.

## प्रकरण ४

जलालखां जास कटबुदीन असें ह्मणत असत त्याचे राज्याविषयीं.

महंमदशाहा पहिला राजा मेला तेव्हां त्याचा लेंक सुलतान कटबुदीन हा नरीयद येथे राहात होता तो हिजरी ८५५ या शकांत मोहोरम महिन्यात सरदार आणि प्रधान लोक याणी विनंती केल्यावरून गादीवर बसला आणि त्याचे पूर्वजाचे चाली प्रमाणें सरदार व शिपाई लोकांस देणगी पोषाख दिले.

त्या वेळेस महंमद खिलजी माळव्याचा राजा हा

आपले राजधानीचें स्थान सोडून गुजराथ देश घ्यावा या हेतूने फौज घेऊन गुजराथेंत आला. सुलतान पुराचे शेजारीं काहीं दिवस राहून महंमद खिलजी याणे बडोद्या वरून जात असतां जवळचे काहीं देश लुटले. आणि कटबुदीन महेंद्री नदीचे किनाऱ्यावर खानापुरामध्यें उतरला आहे, असें ऐकून कापरवांज वरून अहंमदा बादेस गेला तो कापरवांज शेजारी त्यास काहीं फौज भेटली, त्याणीं माळव्याचे राजास जिंकिलें, नंतर तो पळून गेला. ही गोष्ट हिजरी ८५६ व इसवी १४५२ या शकांत सफर महिन्यांत शुक्रवारीं जुलई जा महिन्याचे पहिले तारिखेस घडली. आणि त्याचवर्षीं बराण ऊदीन कटबुदीन अलम हा सत्पुरूष मृत्यु पावला.

गुजराथ देशाचे हद्दीजवळ महंमद खिलजी आला, तेव्हां काळेखां त्याचे कारकून लोक भेटले, यांची सुलतान कटबुदिन याने उपेक्षा केली होती ह्मणोन ते माळव्याचे राजाकडे गेले राजानें त्यांस गुजराथेंतील काळीचा वसूल कसकसा विभागला आहे त्याचे कागद पत्रां विषयीं विचारिलें, तेव्हां त्यांचे सर्व वसुलापैकीं तृतीयांश फौजेकडे खर्च होत असे. आणि दुसरा भाग सरकारास व बाकीचें सर्व धर्मकृत्यांत इनामदारांस व दुसरे संस्थानांस जात असे. या समयीं महंमद खिलजी यास वाटलें कीं गुजराथमध्यें बारमाही देश बचावण्याकारितां

फौज तयार असल्ये, यामुळें गुजराथ देश ह्मातास येणें ही गोष्ट कठीण आहे.

कटबूदीन जय मिळवून व बढती होऊन अहंमदाबादेस पुनः माघारा आला आणि सुलतान महंमद त्याचा बाप याणें गांजबक्ष या सत्धर्मी पुरूषाचे मशीदीस पाया घातला होता, ती त्याणे पुरती तडीस नेली. व या खेरीज त्याणें चहूंकडे कित्तेक कामें अर्धवट होतीं, तीं शेवटास नेलीं, त्यांपैकीं कांक्रीय येथील जलाशय आणि नुगीना ह्मणोन बगीचा व घाट मंडळ या नामें करून एक इमारत त्याणे बांधिली.

मिराठा शिकंदरी या पुस्तकाचा ग्रंथ कर्त्ता लिहितो कीं, त्याणे इतिहास केल्याचे पूर्वीं काहीं वर्षें ही वर लिहिलेलीं कामें व इमारती पाहिल्या होत्या, परंतु हें पुस्तक केलें तेसमयीं कांक्रीया देशांतील जलाशय व वर लिहिलेली बाग हीं मात्र दोन्ही कायम होती.

सुलतान कटबुदीन याणें हिजरी ८६१ व इसवी १४५६-५७ या शकांत माळव्यांतील महंमद खिलजी याजबरोबर तहनामा करून राणा कुंभा जो नागोर परगणा घेण्याकरितां प्रयत्न करीत होता त्याजवर फौज नेऊन चढाव केला ते वेळेस सुलतान कटबुदीन याणे अबूचा किल्ला घेतला. आणि तेथून खंभालमीर घेण्याचे उद्देशानें गेला, परंतु शेजारील काहीं देश मात्र लुटले.

या वेळेस राणा चितूराकडे गेला होता हा सुलतान तिकडे गेल्यावर चितूराहून चाळीस हजार स्वार समागमे घेऊन आला, आणि पन्नास दिवस पर्यंत या दोघांची लढाई जाहाली, नंतर राणा कुंभा यास पळून जावें लागलें. तो चितूरचे किल्यामध्यें जाऊन दडला व त्याणें सुलतान राजापाशीं क्षमा मागण्याकरितां वकील पाठवून अमूक खंडणी ठरविली. नंतर नागोर परगणा पुनः लुटणार नाहीं, असें ठरवून घेतलें, व वकीलाचे अर्जाप्रमाणें सुलतानानें ऐकून सुलतान आपले राज्यांत आला. व महंमद खिलजी ही माळव्यास गेला.

थोडे दिवसांनंतर राणा तह मोडून पुनः नागोर लुटावें या उद्देशानें गेला. हें वर्तमान मालीकशाहा इमादुलमुल्क् जो त्येसमयीं वजीर होता त्यास कळतांच खांबलमीर येथें जरूर डांक पाठविली. हें वर्तमान त्यास कळतांच राणा आपले देशांत परत आला.

सुलतानानें पुनः फौज नेऊन शिरोईवर चढाव केला आणि राण्याचा सर्व देश लुटून तसाच गुजराथेंत गेला आणि हिजरी सन ८६३ व इसवी १४५८-५९ या शकांत रज्जबचे साहावे तारिखेस मेला. त्याला सुलतान अहंमद याचे मशीदींत त्याचे बापाचे शेजारीं पुरलें. या राजानें आठ वर्षें साहा महिनें सोळा दिवस पर्यंत राज्य केलें. व हा राजा कशा व कोणत्या रीतीनें मेला

या विषयीं वर्णन मिराठा शिकंदरी या इतिहासाचें पुस्तकामध्यें सर्व सांपडेल.

---

## प्रकरण ५

कटबुदीन याचा चुलता सुलतान दाऊद याचे राज्या विषयीं.

सुलतान कटबुदीन रज्जब महिन्यांत मेल्यावर तिसरे दिवशीं त्याचा चुलता दाऊद यास प्रधान व बडे लोक यांची त्याजवर कृपा, होती ह्मणोन गादीवर बसविलें, नंतर थोडेच दिवसानीं याणें दुष्ट कर्में केलीं. व इमादुल्मुल्क यास बडे लोकानीं हें सांगतांच त्याणें कटबुदिनाचा चुलत भाऊ फातखां जो तेवेळेस शाहा अलम याचे हाता खालीं विद्याभ्यास करीत होता, त्यास त्या राज्यावर बसविलें जेव्हां हा किल्यावर राजवाडा होता तेथें आला तेव्हां नौबती, नगारे यांचा पुनः गजर जाहला. सुलतान दाऊद याणें तो ऐकतांच त्यास जी गोष्ट घडली होती, ती समजून तो साबरमती नदीचे किनाऱ्यावरून घराचे खिडकींतून उडी टाकून पळून गेला. या राजानें एक महिना सात दिवस राज्य केलें.

सुलतान दाऊद हा पळून गेल्या नंतर शेख अधान रुमी याचे मशीदींत गेला नंतर त्याचे शिष्यामध्यें राहि-

ला, आणि आपले गुरूची सेवा करून सर्वांत प्रख्यात होऊन तेथेंच मृत्यु पावला.

---

## प्रकरण ६

सुलतान फातखां जास महंमद बिगारा असें ह्मणत असत त्याचे राज्या विषयीं.

सुलतान महंमद यास अहंमदाबाद येथें हिजरी ८६२ व इसवी १४५९ या शकांत साबान महिन्याचे बारावे तारिखेस रविवारीं राज्या भिषेक जाहाला. त्यास बिगारा हें आडनाव मिळण्याचें कारण गुजराथेंतील लोक असें ह्मणतात कीं त्याच्या मिशा फार मोठ्या व गाईचे शिंगांप्रमाणें पीळ घातलेल्या असत अशे शिंगांचे गाईस बिगारा असें ह्मणतात यावरून त्यास बिगारा असें ह्मणत. कित्तेक ह्मणतात कीं गुजराथी भाषेमध्यें दोन ह्मणजे बे व तेथील एका किल्याचें नाव गारा असें होतें त्यावरून जुना गड आणि चांपनीर हे दोन किल्ले त्यांचे ताब्यांत आल्यामुळें त्यास बिगारा असें ह्मणत.

मिराठा शिकंदरी या पुस्तकाचा ग्रंथ कर्त्ता असें लिहितो कीं सर्व गुजराथेंतील राज्यां पेक्षां सुलतान महंमद हा फारच चांगला राजा होता. कारण कीं तो न्यायी, उपकारी व मुसलमानी धर्माची फार प्रीति व

आचरणही तसेंच करी, व लहान मोठे गोष्टींत येकसा-रिखा न्याय करी, तो फार दिवस पर्यंत जगला, व बळ उदारत्व आणि शूरत्व यां विषयीं प्रख्यात होता व त्याचा आहार ही तसाच होता.

त्याचे वयास तेरावर्षें दाहा महिनें आणि तीन दिवस जाहल्या नंतर तो राज्य करूं लागला, आणि आपले वडिलांचे सांप्रदाया प्रमाणे शिपाई लोकांस देणगी व बक्षिसें दिलीं. त्या दिवसा पासून वडेलोकां पैकीं कित्तेक इमादुलमुल्क उर्फ शाबान यास प्रतिकूळ असून त्याणीं त्यास सत्ता व अधिकारा वरून काढावें या बेतानें सुलतानास चाहाड्या चुगल्या सांगून त्याचे पायांत बिडी घातली. रात्रीचे समयीं अबदुला ह्मणोन कोणी एक पिलखान्यावर होता त्याणें महंमद बिगारा यास समजून सांगीतलें कीं हा प्रधान सरकाराशीं वांकडा नाहीं, तेथील सर्व वडे लोकानी अवचित प्रधानास बंदींतून सोडल्या नंतर सुलताननें हुकूम केला कीं, सर्व दगेखोर वडेलोकांस धरावें व त्यांचीं घरें लुटावीं. वडे लोकांस राजाचा बेत कळल्यावरून आपलें संरक्षण करण्या करितां त्याणीं फौज घेऊन बाहादर येथें तळ दिला. ते वेळेस राजाचें पदरीं सुमारें पांचशें लोक होते, त्यांस हुकूम दिला कीं सरकारी हत्ती घेऊन जाऊन शत्रूस वेढावें, त्याजवरून

त्याणीं त्यांजवर हल्ला करून जितके सांपडले त्यांस सिक्षा केली.

ही गोष्ट जाहाल्या नंतर या राजाचे अखेरी पर्यंत कोणा एकास राज अवज्ञा करण्यास सवड सांपडली नाहीं. सर्व दंगेखोर मारले गेल्या नंतर पांचशें दोन लोकांस मोठाल्या पदव्या व कामें देऊन त्यांस त्यांचे चरितार्था करितां जमीनि दिल्या.

या नंतर थोडे दिवसांनी मोठी फौज जमा जाहल्या वरून सर्व देशांत जिकडे तिकडे शांतता जाहाली. सुलतानाने हा नियम केला कीं जे लढाईंत मेले असतील, त्यांचे मुलांस त्यांचा जमीनी द्याव्या आणि जांस मुलगे नसतील त्यांचे मुलीस त्यांची अर्धी जमीन द्यावी, जास पुत्र अथवा कन्या नसेल त्याचे सोहिरे धाईरे यांस व आश्रितांस काहीं पेनशन* द्यावें, कीं त्याणीं गाऱ्हाणें करूं नये. एके समयीं राजास कोणी सांगीतले कीं अमूक सरदाराचा मुलगा धनदौलतीचें संरक्षण करण्या जोगा नाहीं. तेव्हां राजाने त्यास उत्तर दिलें, कीं, पैका त्यास योग्यता आणील. असें जाहल्या नंतर कोणाचानें या विषयीं गोष्ट बोलवली नाहीं.

सुलतानानें मोठ्या मोठ्या धर्मशाळा व वाटसरू लोकांस उतरण्या करितां घरें, व मोठाल्या शाळा व

---

* पेनशन ह्मणजे बैठा पगार.

मशीदी बांधिल्या. राजानें आपले सैन्यांत हुकूम फिरविला कीं कोणी व्याजानें कर्ज काढूं नये आणि शिपाई लोकांस कर्ज देण्या करितां खजीना निराळा केला ह्मणजे शिपाई लोकांस आगाव पगार मिळावा. सुलतान बोलिला कीं, जर मुसलमान लोक कर्जभरू जाले तर लढाई करूं शकणार नाहींत.

सुलतानाचे राज्यांत ओसाड जाग्यामध्यें व शहरांत जिकडे तिकडे फळझाडें लाविलीं व त्या वेळेस सुलतानास जर कळलें कीं अमके दुकानांत अथवा घरांत वस्ती नाहीं तर तो त्याची चौकशी करून त्यांत वस्ती ठेवी.

हिजरी ८६६ व इसवी १४६१-६२ या शकांत निजामशाहा बाहामनी याणें माळव्याचा राजा फौज घेऊन त्याचे देशांत गेला ह्मणून सुलतानास विनंती केल्यावरून सुलतान दक्षिण देशांत आला व बऱ्हाणपुरावरून गुजराथेंतील राजा इकडे येतो, हें वर्तमान सुलतान महंमद खिलजी माळव्याचा राजा यास कळल्यावरून तो बिदारचा वेढा सोडून आपले देशांत गेला. नंतर निजाम शाहा बाहामनी याजकडील वकील सुलतानाकडे आले, आणि आपलीं सर्व कामें करून घेऊन राजाचा सर्व प्रकारें सत्कार केला, आणि राजाज्ञा घेऊन आपले

देशांत गेले, तसा गुजराथेचा राजाही आपले शहरांत आला.

यानंतर हिजरी ८७१ व इसवी १४६६-६७ या शकांत सुलतानाने गुजराथेंतील गिरनर आणि जुनागड घ्यावा अथवा गिरनरचा लाहानशा मांडलीक राजायास तेथून हाकून देऊन त्याचा नाश करावा, या उद्देशानें आपले स्वांरीची तयारी केली. आणि खजानजीस पांच कोटि मोहोरा सहित बरोबर यावें असा हुकूम दिल्हा, व फौजेवरील कोठीवाला यास अठराशें इजिप्त आराबिया, आफ्रिका, आणि खोरासन, या देशांचा कारखान्यांतील तरवारी सोनेरी मुठींचा बरोबर घेण्यास हुकूम दिल्हा (या तरवारीचे प्रत्येक मुठीस चार, अथवा पांच शेर गुजराथेंतील शेर सोनें असे,) या खेरीज तीन हजार आठशें तरवारी दुसऱ्या अहंमदाबादेचे कारखान्यांतील यांस रुप्याचा मुठी निरनिराळे वजनांचा होत्या व जंबिये कटारी मिळून सातशें सोन्याचे मुठीचा त्यांचे मुठींस अडीच तीन शेर सोनें असे. सुलतानानें यावेळेस स्वारी वरील कामगारांस दोन हजार आरबी व तुरकी घोडे घेऊन स्वांरी बरोबर यावें असा हुकूम दिला व वेढा घातला होता, ते समयीं त्यांतील सर्व सोनें, वगैरे हात्यारां सुद्धां फौजेत वांटून दिल्हें. ही गोष्ट जाहाल्यानंतर त्याणें आपली विजयी फौज सोसबदेश

लुटावयास पाठविली, तेथें शिपाई लोकांस पुष्कळ लूट मिळाली. मांडलीक राजा याणें शरण जाऊन, वकील पाठविले, आणि कांहीं दंगा नकरणें या विषयीं विनंती केली. नंतर सुलतानास त्या वर्षी किल्ला नघ्यावा, असें वाटून किल्याचा वेढा सोडून कांहीं नकरितां आपले शहरांत आला.

हिजरी ८७२ व इसवी १४६७-६८ या शकांत सुलतानास समजलें कीं, राव मांडलीक राजा सर्व छत्रें, चामरें, सुद्धां हिंदूलोकांचे देवळांत गेला, हें सुलतानास वाईट वाटून, चाळीस हजार घोडे व कांहीं हत्ती, वगैरे राजचिन्हें परत घेण्यास पाठविले, हें वर्तमान मांडळीक राजास कळतांच, छत्रें, चामरें, इत्यादि सर्व राजचिन्हें सुलतानाकडे पाठवून दिलीं. व त्यास सोनें, व माणकें, जीं या समयीं सांपडलीं, तीं सर्व राजाचे गवई लोकांस वांटून दिलीं.

हिजरी ८७४ व इसवी १४६९-७० या शकांत सुलतानास गिरनर, व जुनागड, हे किल्ले घेण्याची इछा जाहली, इतक्यांत राव मांडलीक राजा अवचित भेटावयास आला. यासमयीं मांडलीक राजानें विनंती केली कीं, जो आपण हुकूम कराल, तो ऐकेन, असा आज्ञाधारक जो मी, त्या माझा कांहीं गुन्ह्याखेरीज नाश करावा अशी इछा मनांत कां आणिली? यावरून त्यास सुलता

नानें उत्तर केलें, कीं, धर्मनिंदे पेक्षां दुसरा मोठा गुन्हा काय पाहिजे? आतां तूं जर सुखी व्हावयास इछितोस? तर एक ईश्वर आहे असें तूं कबूल केल्यास, आपले देशांत जाऊन, आपलें राज्यकर. नाहीं तर तुझें या गोष्टी बद्दल वाटोळें होईल.

मांडलिक राजानें आपली अशी व्यवस्था पाहून रात्रींतून आपले किल्याकडे पळून जाऊन लढाईस आरंभ केला. परंतु त्याचे किल्यांतील पाहारेकरी उपाशीं मरूं लागले, ह्मणून थोडेच दिवसानीं त्याणे येऊन जीवदान मागीतलें. मांडलिक राजाने मुसलमानी धर्म ग्रहण कारितों असें कबूल केलें ह्मणून सुलतानाने त्यास त्याचे जिवाचें अभय दिलें. नंतर मांडलिक राजानें किल्याचा किल्या सुलतानास देऊन आपले जिंकणाराचे ह्मणण्या प्रमाणे मुसलमानी धर्म ग्रहण केला. सुलतानास या किल्याचा हिजरी ८७७ व इसवी १४७२-७३ याशकांत जय मिळाला.

राजास मुसलमानी धर्मांत कसा बाटविला येविषयीं लोक ह्मणतात कीं तो अहंमदाबादेस, सुलताना बरोबर येऊन हजरतशाहा अलम जाचें वर्णन मिराठा शिकंदरी या पुस्तकांत केलें आहे, आणि जाची कबर आतां कोल्हापूर ह्मणोन दरवाजा आहे त्यांतून जावयास रस्ता

आहे त्या शेजारीं उजवे हानावर फार मोठी बांधिली आहे, त्याचा शिष्या जाहाला.

यानंतर महंमद बिगारा याणे सोराथेंत वसाहात करण्या करितां चहूंकडून विद्वान् लोक व सय्यद लोक यांस बोलाविलें, आणि तेथें वस्ती वाढवावी असें त्याचे मनांत येऊन, एक किल्ला पुनः बांधिला. आणि तेथेंच मोठा राजवाडाही बांधिला. सरकारी हुकुमा प्रमाणें बडे लोकांनीं ही मोठालीं घरें बांधिलीं आणि थोडके दिवसांत तें शहर अहंमदाबादे एवढें वसविलें, त्यास मस्तफाबाद असें नाव ठेविलें, त्याणे मांडलिक राजास खानजहान अशी पदवी देऊन त्यास जाहागीर दिली, आणि त्याचे देवळांतील सोन्याचा देवाचा मूर्ती होत्या त्या मोडून, त्यांचें सोने सर्व शिपाई लोकांस वांटावें, असा हुकूम दिला.

सुलतानानें हिजरी ८७८ व इसवी १४७३-७४ या शकांत सिंद मुलुखांत जाऊन तेथें पुष्कळ लोक कैद केले, आणि तेथून त्यांस जुन्यागडास आणिलें याच वर्षीं शंख धारा हें बेट जिग्याट या देशा खालीं होतें तें घेतलें कारण ते वेळेस सुलताना जवळ मुलामहंमद समरखंडी याणें फिर्याद केली, कीं या देशांतील नास्तिक लोकांनीं आमची नौका आमचे कुटुंबां सहित धरिली अशीं त्या लढाई मध्यें जीं संकटें आणि दुःखें

प्राप्त जाहालीं त्यां विषयीं मिराठा शिकंदरी या पुस्तकांत तपशीलवार वृत्तांत लिहिला आहे, त्यांत या विषयींचें ही वर्णन आहे.

जेव्हां जिग्याट एथील देवळांतील देव फोडिले, तेव्हां पुष्कळ माणकें, मोत्यें व रेशमी कापडें लूट सांपडलीं नंतर सुलतानानें तेथें एक मशीद बांधून मालीक तोगलख जास फराहातुलमुल्क असें ह्मणतात. त्याचे स्वाधीन शंखधार बेट केलें.

हिजरी शके ८०० व इसवी १४७५-७६ याशकांत हजरत शाहा अलम हा महासाधू मृत्यु पावला त्याची रसलाबादे मध्यें जी कबर आहे ती ताजखां नारियली ह्मणून सर्व कचेरींतील सरदारां मध्यें मुख्य पदवीचा होता, त्याणे सांगीतल्या वरून बांधिली होती.

त्याच वर्षीं जमादिलोवलचे तेरावे तारिखेस शुक्रवारीं मष्टफाबाद जास जुनागड असें ह्मणतात, तेथें सुलतान आला नंतर त्यास कळलें कीं मलबारचे लोकानी घोराब ह्मणून लाहानशा नौका घेऊन गुजराथेचे बंदरा वर येऊन नाकेबंदी केली होती नंतर त्यांस शिक्षा करण्याकरितां जावयास पुष्कळ नौका तयार करून गोव्याचे बंदराकडे आला आणि येथून खंबायते वरून जाऊन शिरकी येथें तळ दिला, आणि शेक अमद खातु याचे यात्रे करितां तेथें तीन दिवस राहिला. येथें शिपाई

लोक बडे लोक जे लढाई मध्यें मेले होते, त्यांचे मुलांस बोलावून त्यांस जाहागिरी दिल्या जांस पुत्र नव्हते त्यांचे मुलींस अर्धी जाहागिर दिली. आणि जांस मुली अगर मुलगे नव्हते, त्यांचे आश्रित लोकांस त्यांचे चरितार्था करितां, काहीं नेमणूका ठरवून दिल्या ही गोष्ट जाहाल्या नंतर लागलाच तो अमदाबादे कडे आला. तेथें बेसावध राहिला तरी वर्षांतून एकवेळ मस्तफाबाद येथें शिकारीस जाई, आणि नंतर रावळटपाईचे ताब्यांत चांपनीर किल्ला होता, तो घ्यावयास निश्चय केला, तों पर्यंत सुलतान कोठे गेला नाहीं, या समयीं तेथून इकडे येण्या करितां वाट चालत असतां वात्रूक नदी अहम० पासून बारा कोशांवर आग्नेयी दिशेस आहे, तिचे किनाऱ्यावर पारध करीत होता, तेथें महंमदाबाद हें शहर वसविलें. आणि या नदीचे किनाऱ्यावर एक किल्ला बांधून तेथें मोठाल्या हवेल्या बांधण्या विषयीं हुकूम दिला. हिजरी शकें ११७० व इसवी १७५६ या शकांत हा इतिहास लिही तों पर्यंत त्या शहराचा खुणा व इमारतीचें लांकूड फाटें पडलें होतें.

या नंतर त्याणें चांपनीर हा किल्ला घेण्याचा निश्चय केला. तो किल्ला हिजरी ८८९ व इसवी १४८४ याशकांत झुलकडा महिन्याचे दुसरे तारिखेस त्याचे हातीं आला, आणि तेथील हवा त्याचे तबियतीस मानल्या

मुळें त्याणें तें मुख्य शहर केलें, आणि तेथें एक किल्ला व एक मशीद बांधण्या करितां हुकूम दिला. आणि तेथे त्या शहराचा मोठा विस्तार वाढवून तें महंमदाबाद चांपनीर या नामें करून प्रसिद्ध जाहालें. प्रधानलोक, व बडे लोक, व सावसावकार वाणीलोक, याणीं पुष्कळ घरें व बागबगीचे वसाविले, आणि या जाग्याचा शेजार शोभिवंत केला. त्या पैकीं एकाबागेस हालोल असें नाव दिलें.

हिजरी शकें ८९१ व इसवी १४८६ या शकांत सुलतान मस्तफाबादे स गेला, आणि कित्तेक वेळ पुनः महमदाबादे स आला.

यानंतर हिजरी ८९२ व इसवी १४८७ या शकांत सोराथ आणि जुनागड हे दोन देश प्रिनस खाल्लेलखां याचे स्वाधीन केलें त्या वेळेस सौदागरानी खोरासन या देशांतून इराकी आणि तुर्की चारशें घोडे विकावयास आणिले होते, त्याणी सुलताना जवळ (दाद लागण्या करितां) फिर्याद केली कीं, आबु या डोंगरा शेजारीं रुदेशा मध्यें शिरोईचा राजानें आह्मास घोडे; व रेशमी कापडांसुद्धां लुटिलें. जुने आंगरखे सुद्धां ठेविले नाहींत. सुलतानानें त्या सौदागर लोकांस त्यांचे सर्व घोड्यांची व दुसरे सामानाची किंमत लिहून आणावयास सांगीतलें आणि खजीन्यातून ऐवज देवविला. कारण कीं सुलतानास शिरोईचा राजापासून पैसा घेण्याची शक्ती

होती. नंतर सुलतान शिरोईचे राजावर चढाव करून गेला या विषयीं त्या राजास भयप्रदर्शक हुकूम पाठविला कीं तूं सौदागर लोकांचे सर्व घोडे व दुसरें सामान दिलें नाहींस तर तुजवर सरकारी फौज पाठविली जाईल. हें राजास कळतांच त्याणे क्षमा मागीतली, आणि सौदागर लोकांचें सर्व सामान देण्यास कबूल जाल्यानंतर सुलतान महंमदाबादेस गेला, आणि तेथें कर्मणुके करितां चार वर्षें राहिला. उन्हाळ्याचे दिवसांत जेव्हां खर्बूजें पिकत तेव्हां अहंमदाबादेत येई आणि तेथें साहा महिने पर्यंत सुखाने भोग घेऊन अहंमदा बादेस परत येई.

हिजरी ९०४ व इसवी १४९८ या शकांत खानदेशचा आधिकारी अदीलखां फारुकी याणे दरसालप्रमाणें खंडणी पाठविली नाहीं ह्मणोन सुलतानाने त्या देशांत फौज पाठविली. परंतु सुलतान तापी नदीवर पोंचल्या नंतर अदील खानानें खंडणी पाठवून दिली, आणि क्षमा मागीतली, नंतर सुलतानानें नादरबारा वरून फौज माघारी पाठवून आपण तालनीराकडे तेथील किल्ला पाहावयास गेला. आणि तेथून नादरबार येथें परत आपले फौजेंत आला. आणि पुनः महंमदाबाद चांपनीर येथेंगेला.

हिजरी शकें ९१३ व इसवी १५०७ या शकांत सुलतानानें चेवलावर विलायतेंतील लोकांचा नाश करण्याकरितां फौज नेऊन वसई व मुंबई वर चढाव करून

हिजरी ९१४ व इसवी १५०८ या शकांत मोहोरमचे अकरावे तारिखेस आपले शहरांत आला.

ही गोष्ट जाहाल्या नंतर अलंमखां सुलतानाचे लेंकीचा लेंक व याचा बाप तेवेळेस असीर व बऱ्हाणपूरचा अधिकारी होता तेव्हां या मुलानें आपले आईस गुजराथेंतील राजास प्रार्थावया विषयीं सांगीतलें कीं मिरन मुबरक फारुकी याचा पुत्र आदिलखां पहिला याचे राज्यास वारीसदार नसतां त्यास मरून आठ वर्षें जाहलीं व बडे लोकानीं मालीक राजाचा कोणी समंधी होता, त्यास या राज्यास वारसदार असें ठरवून त्यास आदीलखां अशी पदवी दिल्ही. आणि त्याचें नाव प्रसिद्ध करून राज्य त्याचे नावानें चालविलें. या अर्जींत हा मजकूर लिहिला होता कीं सुलतानानें अलमखां याचे पूर्वजांचे राज्यावर त्यांस बसवावें आणि त्याचा प्रतिपाळ करावा. सुलतान हा मजकूर बरोबर लक्षांत आणून रजब महिन्यांत नांदरबारा कडे अलमखां यास राज्या वर बसविण्याकरितां, गेला. आणि तालनीर मध्यें येऊन इडच्यूझोहा ह्मणून मुसलमानी धर्म समंधी बळी देतात त्याची एक मेजवानी जाहाल्या वर हुशीखां याचा मुलगा अलमखां यास अदिलखां अशी पदवी दिली. आणि चार हत्ती व तीन लाख ट्यांगचसू, देऊन अशीर व बऱ्हाणपूर चे सुभ्यावर नेमला. त्याणे मालीक सरान खिलजी यास

खान जाहान अशी पदवी देऊन, जेथें त्याचा जन्म जाहला होता, तेथें नांदरबार आणि सुलतानपूर या प्रांता खालीं बनास हें शहर होतें तें त्यास बक्षिस दिलें या बक्षिसाचे सनदे मध्यें आदीलखांचें नाव घातलें होतें तेसमयीं कित्तेक कचेरींतील बडेलोकांस पदव्या दिल्या.

सरते शेवटीं आदीलखां खुष होऊन अशीर कडे गेला. आणि सुलतान आपले राज्यांत आला तेवेळेस सय्यद महंमद जुनपुरी अहंमदाबादेस आला आणि इमा मंमेधी याचे धर्म समंधीं बोलणे घालून त्याचा मी वारीस दार अथवा चेला ह्मणूं लागला हा ढोंगी माणूस ताजखां ह्मणून सालरखां याचा पुत्र होता, त्याची मशीद *जमा लपूरचे वेशीजवळ आहे, तेथें येऊन राहिला. आणि लोक जमा करूं लागला. याजवरून मुलां लोक व चार मोठमोठाले विद्वान् लोक, याणीं त्याजवर धर्मसमंधें बोलणें घातलें कीं त्यांस ठार मारावें, परंतु सय्यद पट्टणाकडे पळून गेला, आणि तेथें लोकांस धर्म शिकवूं लागला. आणि पालन पूरचे सर्व मुसलमान लोक त्याचे भजनी लागले. तेथें सांप्रत काळीं मेद हिवी जातीचे लोक कित्तेक आहेत.

ही गोष्ट जाहाल्या नंतर थोडे दिवसानी हिजरी ९१६ व इसवी १५१० या शकांत जुलहिजा महिन्यांत सुल-

* हे अहंमदाबाद शहरातील दरवाज्याचे नाव आहे.

तान पट्टणा कडे गेला आणि ही त्याची शेवटची स्वारी होती, ह्मणोन तेथील सर्व मोठाले लोक बोलावून, त्यां मध्यें येऊन बोलिला कीं माझे अंतकाळाचे दिवस जवळ आले. पट्टणाहून निघाल्या नंतर चार दिवसांत अहंमदा बादेस आला, आणि तेथून शेक अहंमद खातु याचे कब रीचे दर्शना करितां यात्रेस गेला तेथें गेल्या नंतर त्याणे जी शेखचे मशीदी जवळ आपले करितां कबर बांधिली होती, ती आपले डोळ्यांचे पाण्यानें नाहाणली. यानंतर अहंमदाबादेस आल्यावर आजारी पडला, आणि अशा दुखण्यांत तीन महिने राहून खालीलखां बडोद्याचा राजा यास बोलावणे पाठविलें. त्यास माझा मृत्यु काळ जवळ आला असें सांगून त्याची सरते शेवटची भेट घेतली. आणि हिजरी ९१७ व इसवी १५११ याशकांत रमजानचे तिसरे तारिखेस मृत्यु पावला. त्यास सरकेंज येथील कबरीमध्यें पुरलें.

महंमद बिगारा हा हिजरी ८४९ व इसवीसन १४४५ या शकांत रमजान महिन्यांत जन्मला. आणि चौपन्न वर्षें राज्य करून ६७ वर्षांचे वयाचा होऊन मृत्यु पावला.

## प्रकरण ७

खालीलखां यास मुझाफीर दुसरा अथवा दयानिधे असें ह्मणतात, त्याचे राज्या विषयीं.

जेव्हां खालीलखां हा मुझाफीर शाहा अशी पदवी घेऊन हिजरी ९१७ व इसवी १५११ या शकांत रमजानचे सत्रावे तारिखेस शुक्रवारीं अहमदाबाद येथें गादी वर बसला त्या वेळेस या राजाचें सत्तावीस वर्षांचें वय होतें. त्या राजानें मनुष्याची योग्यता पाहून आपले पूर्व जांचे चाली प्रमाणे सर्वांस बक्षिसें दिलीं. आणि राज्या वर बसावयाचे पूर्वीं जे त्याचे इष्ट मित्र होते, त्यांस त्याणे अधिकार दिले. कचेरींतील अमीर लोकांचे हुद्दे पदव्या वाढवून त्यांचें चारितार्थास काहीं नवेगांव नेमूनदिले.

परशिया देशाचा राजा शाहा इस्माल साफाबी याज कडून मीर हिभ्राईमखां या नामें करून वकील सव्वाल महिन्यांत येऊन पोंचला, ह्मणून गुजराथेंतील राजाचे हुकुमाने कित्तेक, बडेलोक त्यास भेटावयास गेले त्याणी त्याचा फार आदर, सत्कार, केला वकीलाने निळाचे दग डाचा अमोल्य पेला व हिरे माणकें याणीं भरून डबा व कांहीं रेशिमी वस्त्रें, इराकी तीस घोडे इतकें परशियाचे राजानें सुलतानास द्यावयास दिलें होतें, त्याची सुलता-नास नजर केली. मग उलट सुलतानाने वकीलांस उंच

उंच पोषाख व मोठमोठाल्या देणग्या देऊन आपण वडोद्यांस जावयास निघाला, आणि त्या शहराचे प्रांतास दवलताबाद असें नाव दिलें.

या प्रसंगीं वर्तमान येऊन पोंचलें कीं सुलतान महंमद व माळव्याचा राजा महंमद या दोघांची माडूचे मैदानांत लढाई जाली तेवेळेस सुलतान महंमद याणें सुलतान मुझाफीर याचा आश्रा करावयास महंमदाबाद चांपनीर येथें येऊन तळ दिला सुलतानानें हुकुम दिला कीं, यास जे लागेल, तें द्यावें. आणि आपण जातीने निरोप पाठविला कीं जर ईश्वर सत्ता आहे तर तूं, व मी पावसाळा संपल्यावर जाऊं माळव्याचा राजा आपले सर्व कुटुंबा सहित सुलतानाचा जावई आदीलखां याचे मोठे वाड्यांत राहावयास आला, आणि तेथे कित्तेक दिवस राहिल्या नंतर त्याचें व परशिया देशाचे राजा कडील वाकिलां बरोबरचे लोकांचे काहीं जालें होतें त्या विषयीं बोलणे ऐकिल्या वरून तो सुलतानास न विचारितां, अवचित पळून गेला, यावरून सुलतानास फार राग आला, आणि त्याचा निरोप घ्यावा ह्मणून त्याणे नजरा एकेवकीला बरोबर पाठविल्या. तेव्हां हिजरी ९१७ व इसवी १५११ मध्यें सवाल महिन्यांत सुलतानास विदित जालें कीं मांडूचा सुलतान महंमद याणे त्याचा भाऊ प्रीनस महंमद हा माळव्यांत आहे असें ऐकून रजपूत लोकांची

मोठी फौज जमा करून लढाईंत जिंकून त्यास पळविलें व हें ही कळविलें कीं सुलतान महंमद याचा मुख्य कार भारी मैदानी राव यास इतका अधिकार प्राप्त जाला आहे कीं राजाचे स्वाधीन काहींच राहिलें नाहीं, परंतु नावाचा राजा मात्र आहे, येणे करून माळव्याचे प्रांतांत जिकडे तिकडे पुन्हा अधर्म सुरू जाला आहे.

खरा धर्म प्रसिद्ध करण्या करितां सुलतानाचे मनांत फार येऊन तो सवाल महिन्यांत माळव्यावर चढाव करून जावयास निघाला, आणि जेव्हां फौजेचा तळ गोद्रा येथें पडला तेव्हां मागून फौज येऊन मिळण्या करितां राजा वाट पाहात होता. इतक्यांत सुलतानास कळलें कीं इडूरचा राजा हुकूम मानीनासा जाला ह्मणोन फौजेस हुकूम केला कीं, इडूरा कडे जाऊन घरें, व सर्व देऊळें मोडून नाश करावा, या प्रमाणे हिजरी ९१९ व इसवी १५१३ या शकांत जाहालें नंतर तेथील राजास त्याचे वर्तणुकीचा पश्चात्ताप होऊन ठरलेल्या खंडणी प्रमाणे तो देऊं लागला, नंतर सुलतान गोद्रा येथें माघारा आला आणि तेथें शिकंदरखां यास महंमदाबाद चांपनीर येथें जावयास निरोप देऊन आपण माळव्याकडे चालता जाला आणि दोहाद शहरांत आल्यावर तेथील किल्ला बांधा वयास हुकूम देऊन पुनः पुढें मार्ग चालता जाहाला. इतक्यांत वर्तमान आलें, कीं मिदानी राव याणे सुलतान

महंमद यास चांदिरी एथें नेलें या प्रसंगीं सुलतान बोलिला कीं, मी फौज माळव्याचे राजा पासून राज्य घ्यावें, ह्मणून आणिली नाहीं, परंतु मिदानी राव व दुसरे नास्तीक लोक यांस देशाचे हद्दीपार हांकून देऊन दोघां भावांची समजूत काढून एकोपा करावा या बुद्धीने आणिली होती.

सुलतान धारांतील शिकारीचे मैदानांत मोठ मोठ्या इमारती फार चांगल्या आहेत, असें ऐकून तेथें चार दिवस कंठावयास गेला, आणि शिकार करण्यांत तेथें आपलें शूरत्व लोकांस दाखवून पुनः अहंमदाबादेस आला.

हिजरी ९२० व इसवी १५१४ या शकांत सुलतानास कळलें, कीं इडूरचा भीमराव राजाचा भाऊ रहिमल याणे आपले भावाचा लेंक भारामल यास इडूरातून हाकून देऊन चितूरचा राजा राणा सांका याणे मदत दिल्यावरून त्यास अधिकार प्राप्त जाला, यावरून सुलतानास राग आला, कीं भीमराव याणें माझे हुकुमानें इडूरांत अमल केला, असतां राणा सांकासराईमल यास इडूरचें राज्य देण्यास काय समंध होता, याकरितां निजामुलमुल्क् अहंमदानगरचा जाहागीरदार यास हुकूम आला कीं रहिमल यास इडूरांतून हांकून द्यावें, आणि भारामल यास राज्य द्यावें. रहिमल याणें सुलतानाचे

फौजेशीं हिजरी ९२३ व इसवी १५१७ पर्यंत लढाई केली, आणि दोघांचे जय पराजय होऊन ते वेळेस माळव्यांतील बडे लोक हबीबखां इत्यादि मिदानी रावास भिवून तेथून पळून गेले आणि सुलतानास भेटून त्याणी माडू देशाचें सर्व वर्तमान निवेदन केलें कीं तेथें मुसलमानी धर्म अगदी बुडाला.; व मुसलमानी धर्माप्रमाणें वागत होते, त्यांस मिदानी राव याणे ठार मारलें, आणि माळव्याचा राजा महंमद यास कैद करणार अथवा ठार मारणार आहे, यावरून गुजराथेंतील राजा बोलिला कीं, पावसाळा संपल्यावर माळव्यांत मिदानीराव यास शिक्षा करण्यास जाऊं. या देशांतील सर्व कारभार मिदानी राव याचे हातांत आहे. आणि त्याणे आपली फार चौकशी ठेविली आहे असा विचार करून माळव्याचा सुलतान महंमद हा एके रात्रीस सवड सांपडतांच आपले बायकोस एके घोड्यावर बसविलें, आणि आपण एके घोड्यावर बसून गुजराथेंत पळून गेला. गुजराथेंत आल्या नंतर सुलतान मुझाफीर याणे त्यास एक तंबू, कांहीं हत्ती, घोडे, आणि जें जें राजास लायक आहे तें देऊन खुशी केलें आणि आपण हिजरी सन ९२३ व इसवी १५१७ या शकांत झुलकडा महिन्याचे चवथे तारिखेस ब्रहस्तवारीं माळव्याकडे गेला.

त्याच महिन्याचे पंधरावे तारिखेस मंगळवारीं सुल-

तान मुझाफीर याची व सुलतान महंमद माळव्याचा राजा याची देवला शहरावर गांठ पडली आणि नंतर भर मजला चालून त्याणे आपले फौजेसुद्धां त्याच महिन्याचे तेविसावे तारिखेस आदितवारीं मांडूचे शेजारीं येऊन तळ दिला. आणि मोर्चे बांधूं लागला. मिदानीराव हा धारचा किल्ला सोडून राणा सांका याजकडे सहाय मागण्याकारितां गेला आणि आपले लोक किल्यांत होते. त्यांस सांगून पाठविलें, कीं एक महिना सुलतान मुझाफीर याशीं तहकरा तेणेकरून एक महिन्याची सवड सांपडली ह्मणजे मी राणा सांका यास साहायास घेऊन येतों.

मिदानी राव याणें माळव्याचा सुलतान महंमद याज कडून जीं रत्नें व हत्ती घेतले होते ते त्यांचा बदल राणा यास मिदानी राव याणें दिल्यामुळें राणा यास सारंगपूर पर्यंत मोठी फौज पाठविणें प्राप्त जालें. सुलतानास हें वर्तमान माहीत होतांच किल्यांतील लोकांचें कापट्य सम जून आदिलखां आशीरी कावामुल्मुल्क्, आणि मालीक सारंग व आणखी कित्तेक दुसरे हुशार व धैर्यवान् कामगार होते, ते राणास अडथळा करावयास पाठविले. व जातीनें आपण फौजेस किल्यावर हल्ला करावयास हुकूम देऊन हिजरी ९२४ व इसवी १५१८ या शकांत सफर महिन्याचे दुसरे तारिखेस सोमवारीं किल्ला घेतला, या प्रसंगीं एकोणीस हजार रजपूत व सत्तावन हुद्देदार

सरदार मुझाफीर शाईसुद्धां मारले गेले त्यांचीं नावें मिराठा शिकंदरी मध्यें लिहिलीं आहेत. सुलतान तेथून गेला त्याविषयीं व माळव्याचे राजानें त्यास मेजवानी केल्या विषयीं व तो किल्ला पाहावयास गेला याविषयींचे सर्व मिराठा शिकंदरी या पुस्तकांत वर्णन आहे.

पुढें हिजरी ९२५ व इसवी १५१९ या शकांत सुलतानास कळलें कीं माळव्याचे राजाची आणि राणा सांका याची लढाई होवून माळव्याचा राजा फार जखमी होऊन शत्रूचे हातांत सांपडला या लढाईचें वर्तमान कळल्या वर सुलतानास फार आश्चीर्य वाटलें. आणि त्याणे मांडू देशाचा बचाव करावयास फौज पाठविली. नंतर राणा सांका याणे माळव्याचा सुलतान महंमद यास सर्व जखमा बऱ्या जाहाल्यावर त्याचा लेंक जामीन ठेऊन घेऊन मांडूस जावयास सांगीतलें.

राणा सांका याणे हिजरी ९२६ व इसवी १५२० या शकांत इडूर कडे जाऊन अहमदागनर आणि दुसरे ठिकाणांतील, जाहागिरीदार यांशीं लढाई केली, नंतर सुलतानाचे फौजेने त्यास अडथळा केला, परंतु जिंकले गेले, ह्मणोन राणा सांका बारनगर व विसालनगर पर्यंत लुटीत गेला. आणि जेव्हां सरकारी फौज पट्टण व महंमदाबाद सोडून त्याचा बंदोबस्त करावयास येत आहे, असें ऐकिलें तेव्हां तो चितूरास माघारा आला.

हिजरी ९२७ व इसवी १५२०-२१ या शकांत मोहोरम महिन्यात सुलतान मुझाफीर याणें एक लाख स्वांर व शंभर हत्ती मालीक आयझ सुलतानी ह्मणून त्याचा बंदा याचे हाताखालीं व कावामुलूमुल्क् याचे हाताखालीं वीस हजार स्वांर व वीस हत्ती देऊन राणा हा बनवा जाहाला होता, ह्मणून त्यास शिक्षा करावयास पाठविलें, ही फौज मूळ प्रथम वागाराकडे गेली आणि तो देश लुटल्यामुळें त्या देशांतील राजा या दंगेखोर लोकांस येऊन मिळाला. या स्वांरीमध्यें फौज पुष्कळ हिंदूलोक मारून राणा सांका याचे देशाकडे आली तो राणा सांका हा व सुलतान महंमद खिलजी दुसरा जो सुलतान मुझाफीर यांस सहाय देण्याकरितां आला होता. हे दोघे मेले असें वर्तमान आलें.

त्याच वर्षीं फौजेवरील जे कामगार अहंमदाबादेंत आले होते त्यांची बेढंगी वर्तणूक दिसल्यामुळें राणा सांका याशी तह केला व ते अहंमदाबादेस परत आले यास्तव सुलतान, मालीक आयझ याजवर रागावून त्यास बोलिला कीं पावसाळा संपल्या नंतर मी जातीनें जाईन आणि काम शेवटास लावीन. असें ह्मणोन मालीक आयझ यास सोराथेकडे जावयाचा हुकूम दिला.

हिजरी ९२८ व इसवी १५२१-२२ या शकांत राणा यास शिक्षा करावयास स्वांरीची तयारी करून अहमदा

बांदेस आला परंतु राणाचा लेंक बोलल्याप्रमाणें हत्ती व खंडणी घेऊन सुलतानास भेटावयास आल्यामुळें स्वारी राहिली.

हिजरी ९३१ व इसवी १५२४-२५ या शकांत प्रिनस बाहादूरखां यास आपणास जाहागीर थोडकी आहे ह्मणून राग येऊन दुंगारपूर, चितूर, मेवाट या मार्गानें दिल्लीस, सुलतान इभ्राइम शाहा लोधी दिल्लीचा राजा याची भेट व्हावी ह्मणून यासमयीं आला सुलतान इभ्राईम शाहा लोधी याणें ज्ञाहिरूदी बाबर पादशाहा यास पाणपतचे मैदानांत अडथळा केला होता, ह्मणून त्याणे बाहादूरखां यास बलावणे पाठविलें, आणि पुष्कळ आदर सत्कारानें त्याची भेट घेतली. सुलतान इभ्राईम लोदी याणे आणि दिल्लीतील दुसरे लोकानीं त्याचें शूरत्व आणि धैर्य पाहिलें, तेव्हां त्याचा तें द्वेष करूं लागले. बाहादूर खान या गोष्टी विषयीं सावध होऊन जुन पुराकडे गेला आणि तेथे गेल्यावर त्यास कळलें कीं, सुलतान मुझाफीर मेला, असें कळल्यानंतर तो गुजराथेकडे निघाला.

जेव्हां सुलतान मुझाफीर यास कळलें कीं, प्रिनस बाहादूरखां त्रासून गुजराथेंत गेला, तेव्हां त्यास फार राग आला, आणि त्याचे मनाची तृप्तता करून त्यास माघारा आणावा असा बेत केला. परंतु हा पूर्वीच देश सोडून गेला होता. सुलतान यासमयीं आजारी पडला

आणि हिजरी शकें ९३२ व इसवी १५२५-२६ या शकांत फार आजारी पडल्यामुळें महंमदाबाद चांपनीर येथून बडोद्यास गेला, आणि हळूहळू अहमदाबादेस येऊन तेथें घाटमंडळ ह्मणून राजवाडा आहे त्यांत राहिला. लोक ह्मणूं लागले कीं आतां राजा वांचत नाहीं आणि मीनस लाटीफखां याचा भाऊ शिकंदरखां राजाचा वारिसदार हा त्यास जिवंत ठेवणार नाहीं या भयानें लाटीफखां जुमादासनी महिन्याचे पहिले तारिखेस बडोद्यास गेला व त्याजबरोबर कित्तेक लोक ही गेले.

याच महिन्याचे दुसरे तारिखेस सुलतान मुझाफीर याणें शिकंदरखां यास बोलावून त्यास चार गोष्टी राज हिताचा शिकावयास सांगीतल्या आणि गरीब व मातवर लोकांचें कल्याण होई असा आशीर्वाद देऊन हिजरी ९३२ या शकांत जुमादासनी महिन्याचें बाविसावे तारिखेस शुक्रवारीं मरण पावला. या राजास सरकेंज एथील महंमद विगारा याचे मोठे कबरेंत पुरलें. याणे चौदा वर्षे नऊ महिने राज्य केलें.

सय्यद ताहीर जास बडोद्यांत पुरलें त्याचा चेला हा राजा होता. या सारिखा धर्मशील विद्वान, दयाळू, ज्ञानी उदार, आणि शूर असा कोणी दुसरा नव्हता. याराजास त्याचे दयाळू वर्तणुकेवरून दयाळू मुझाफीर असें ह्मणत मिराठा शिकंदरी या पुस्तकाचा ग्रंथ कर्त्ता ह्मणतो, कीं

याचे राज्यांत कोणी दारू पिणारा नव्हता, व हे सर्व कायदे त्यास योग्य होते. तो दयाळू होता यामुळें जास शिक्षा देण्याची जरूरी होती त्यास ही देतनसें तेणेकरून मोठा दंगा जाहाला परंतु ही गोष्ट जग प्रसिद्ध आहे कीं, सुलतानानें एकदां मात्र झालावरचे प्रांतांतील काहीं शेतें नपेरतां पडूं देण्यास सांगीतलें होतें, कांकीं, तेथील लोकानी गाऱ्हाणी केलीं कीं एथील सर्व शेतें पेरल्यामुळें गुरा ढोरांस खावयास गवत मिळत नाहीं.

---

## प्रकरण ८

सुलतान शिकंदर याचे राज्या विषयीं.

सुलतान शिकंदर याचा बाप मुझाफीर मेला, त्याच दिवशीं तो महंमदाबादेमध्यें गादी वर बसला हिजरी ९३२ या शकांत जुमादासनी महिन्याचे पंचवीसावे तारिखेस महंमदाबादेस गेला आणि तेथें आपले वडिलांचे चाली प्रमाणे देणग्या देऊन राज्य करूं लागला. हाराजा गादीवर बसला नव्हता ते वेळेस जा मनुष्यानीं त्याची चाकरी केली होती, त्यांस पदव्या दिल्या, व याखेरीज दुसरे आपले लोकांत सत्राशें घोडे बक्षिसा बदल वांटले.

ही गोष्ट पाहून त्याचे बापाचे वेळचे दरबारांतील बडे

लोकांस फार राग आला आणि इमादुल्मुल्क् उर्फ खषकदंम यास सुलतान शिकंदर याचे आईने आपले आंगावरचें दूध पाजून वाढविला होता. यास मुख्य प्रधान होण्याची आशा होती, परंतु जाहाला नाहीं, ह्मणोन त्यास फार त्रास आला. बंडखोर वडेलोकांस ही गोष्ट समजतांच, त्याणी त्याचे मनांत आणून दिलें कीं, राजा तुला मारणार आहे, इमादुल्मुल्क् याजवळ पुष्कळ फौज होती ह्मणून तो दंग्यांत शिरला आणि या बंडखोर वडे लोकांकडे काहीं फौज त्याणे वचन दिल्यामुळें लालुचली होती ती घेऊन त्यांस मिळाला या वेळेस राजाचा भाऊ लाटीपखां ह्मणून होता तो मी राजाचा वारिसदार असें सोंग घेऊन सुलतान पुरापासून नांदरबार या शेजारील डोंगरी देशाची वहिवाट करूं लागला याला भीम राजानें सहाय दिलें. व त्याणें कित्तेक वडे लोकांशीं कागद पत्राची वहिवाट ठेविली होती. या देशांतून त्यास काढण्याकरितां शिरझाखां यास पाठविलें परंतु तो लढाई मध्यें मेल्यामुळें त्याचे जाग्यावर नाशीरखां यास फौज देऊन पाठविलें.

हें बंड चोहींकडे पुरें जालें तेव्हां इमादुलमुल्क् हा आजारी पडल्याचें निमित्तकरून घरामध्यें राहिला. तो एके दिवशीं आजाऱ्या सारिखें डोचकें बांधून राजास भेटावयास गेला, तेव्हां आपले बरोबर पन्नास स्वार

घेऊन राजाजवळ हुजरे नाहींत असें पाहून तो राज माहालामध्यें गेला, मलीक पाहार बरोबर घेऊन जाऊन सुलतान निद्रिस्थ आहे अशी इमाडुलमुल्कू याणें त्यास खूण केल्यावरून त्या मनुष्यानीं राजास ठार मारलें. ही गोष्ट हिजरी ९३२ या शकांत साबानचे चौदावे तारिखेस जाली. आणि महंमदाबाद चांपनीर यापासून दोन कोशांवर हालोल येथे त्यास पुरलें.

इमाडुलमुल्कू याणे शिकंदर यास ठार मारिल्यानंतर मुझाफीरखां याचे जनानखान्यांत एक पुत्र त्या वेळेस पांच साहा वर्षांचे वयाचा होता त्यास सुलतान महंमद असें नाव देऊन आपले मांडीवर बसविलें परंतु फौजेमध्यें सर्वांस घोडे आणि मोठाले पोषाख देउन त्यांस पढव्या दिल्या. इमाडुलमुल्कू याचे मनेचा घोट घ्यावा ह्मणून सर्व बडे लोक आपापले जाहागिरीवर गेले. आणि याणे राजास ठार मारलें यास्तव सूड कोणत्या रीतीने घ्यावा ह्मणून बाहादूरखां यास निरोप पाठवून त्यास येण्याविषयीं प्रार्थना केली. या राजानें दोन महिने सोळा दिवस पर्यंत राज्य केलें.

# प्रकरण ९

## सुलतान बाहादूर याचे राज्याविषयीं.

सुलतान मुझाफीर दुसरा याचा पुत्र बाहादूरखां यास जातीचें वतन थोडें होतें आणि त्याचें शिकंदर या भावाशीं वांकडें होतें यामुळें त्याणे देश त्याग केला होता. हें पूर्वींच लिहिलें आहे. जेव्हां बाहादूरखां यास त्याचा बाप मेला, व भाऊ मारला गेला हें वर्तमान कळलें तेव्हां त्याणे चाली प्रमाणें चार दिवस दुःख केलें. नंतर थोडे दिवसानीं फार त्वरा करून जूनपुराहून मुख्य शहरास येण्याकरितां निघून मकरेज जास महंमदानगर असें ह्मणतात तेथें येऊन पोंचला, व तेथील बडे लोक इमाडुल्मुल्क् याचे भयानें रोजगार सोडून घरीं बसले होतें ते पुनः सर्व देशांतून फौज जमाकरून याजकडे येऊं लागले. आणि त्याच वर्षीं रमजान महिन्याचे सव्विसावे तारिखेस अहंमदा बादेस येऊन तेथील बाहादर ह्मणून जो प्रसिद्ध किल्ला होता, त्या किल्यांत शिरला. त्या महिन्यांत सणाचे दिवशीं तो जा मशीदींत खुराण होत असे, तेथे गेला आणि धर्म कथन आपले नावानें वाचविलें. नंतर थोडे दिवसानीं बत्तीस मनुष्यांस मोठाल्या पदव्या देऊन त्यांस मोठालीं कामें द्यावयास हुकूम दिला, आणि सवालचे दुसरे तारिखेस महंमदाबादेस

जाण्यास निघाला. इमादूलमुल्क् याणें सुलतान येतो, असें ऐकतांच घाबरून लाटिफखान यास सुचना पाठविली कीं नाशीरखां अद्यापि लाहान बाळक आहे, यामुळें जरकरितां लढाईचा प्रसंग आला तरी मी लढाई चालू करीन. सरते शेवटीं त्याणे जें केलें होतें. त्याचा परिणाम कसा काय होईल या भयानें आणि आश्चर्यानें लाटीपखां, नाशीरखां या दोघांस सोडून आपण राज्यावर बसला. या प्रसंगीं सुलतान बाहादूर महींद्रा नदी उतरला आणि फौज समागमे आहे, किंवा नाहीं, हें भान न राहातां तो थोडे लोक बरोबर घेऊन, पुढें मोठें त्वरेनें गेला. आणि शिकंदराची कबर हालोलमध्यें होती, तिची यात्रा केल्यानंतर ताजखां याजबरोबर शंभर स्वांर देऊन इमाडूलमुल्क् यास कैद करून आणावयास पाठविलें. या कामगारानें इमाडुलमुल्क् याचें घर लुटलें तेव्हां इमाडुलमुल्क् हा मुख्य दिवाणाचे वाड्याकडे पळाला. आणि तेथे लपून राहिला. या गडबडीमध्यें सुलतान बाहादूर छत्रें चामरें इत्यादि सर्व राज चिन्हें घेऊन महंमदाबादेंत शिरला. आणि राजवाड्यांत राहून इमाडुलमुल्क् यास धरून आणायास सांगीतलें आणि थोडा शोध केल्यावर तो सांपडला. नंतर त्यास राजापुढें आणल्यावर राजानें त्यास फांशीं देण्यास हुकूम दिला. आणि या खुनाचे खटल्यामध्यें जे जे होते त्यांस त्यांचे गुन्ह्या

प्रमाणे शिक्षा केली. या घालमेलींत लाटीफखां शहराजवळ आलेला होता तो माघारा गेला. आणि सुलतान बाहादूर हिजरी ९३२ व इसवी १५२५या शकांत झुलकडा महिन्याचे चवथे तारिखेस राज्यावर बसला. आणि प्रधान व वडे लोक यांस मोठ मोठाले पोषाख दिले. आणि शिपाई लोकांस एक वर्षाचा पगार बक्षीस देण्याचा हुकूम देऊन दीडशें लोकांस मोठाल्या पदव्या दिल्या. या समयीं एक वर्षाचा काळ पडला तेव्हां राजाचे हुकुमानें अन्न सत्र घातलें. आणि जेव्हां राजा घोड्यावर बसून वाहेर जाई तेव्हां गरीब लोकांस धर्म एके मोहोरेपेक्षां कमी देत नसे.

लाटीफखां याणे सुलतानपूर आणि नांदरबार या देशाचे प्रांतांतून जमीनदार लोक गोळाकरून तेथे दंगा मांडला यामुळें त्याजवर फौज पाठविली. तेव्हां लाटीफखां यास लढाईंत जखमा होऊन कैद करून मरघीदिना येथे सुलतानाकडे त्यास आणिलें आणि तेथे तो मृत्यु पावला.

सुलतान बाहादूर याणें नासीरखां यास हिजरी ९३३ व इसवी १५२६ या शकांत रबिलावलचे पंधरावें तारिखेस वीष घालून ठार मारलें. नंतर खांबायत देशांत पारध करीत गेला. आणि तेथून मालीक आयझ सुलतानी याचीं मुलें भांडत होती ह्मणून सोराथेंस गेला.

तेथून परत आल्यावर दायू जवळ आला, आणि तेथे एक महिनाभर राहून तें मुझाहिदखान याचे स्वाधीन केलें. आणि जेव्हां अहंमदाबादेस येऊन पोंचला तेव्हां विक्रमाजित ह्मणून राणा सांका याचा लेंक सुलतानास भेटावयास आला. तेथे तीन महिने राहून बाहादूर महंमदाबादेस गेला आणि न्याडोड चा राजास पारिपत्य करून सुरत चे किल्याकडे गेला. येथून बाहादूर येक रात्र व येक दिवसांत महंमदाबादेस येऊन तेथून निघते वेळेस राणा सांका याचे पुत्राचा त्याणे निरोप घेतला.

यानंतर हिजरी ९३४ या शकांत सुलतान पुनः दायूस येऊन कांहीं दिवस राहिला आणि तेथून खंबायत येथें जाऊन घोगाया शहराकडे जाण्याकरितां जाहाजांत बसला आणि पुनः दायू कडे येऊन खंबायत या देशावरून पुनः महंमदाबादेस परत आला या वेळेस सुलतानानें भडोच चे सभोंवता कोट बांधावयास हुकूम केला. आणि नंतर बगारा येथे फौज नेली तेवेळेस दंगारपूरचा राजा मकरेज येथे आला आणि राजास भेटला तेथून तो अहंमदाबादे वरून पट्टणा कडे जाण्यास निघाला आणि तेथून महंमदाबादेस फार त्वरेने आला. जर कोणी त्या दिवसांत त्वरेने आला तर सर्व लोक ह्मणत कीं हा बाहादुरा सारिखा जलद आला. अशा जा त्यांच्या

जाहाल्या त्यांविषयीं सविस्तर वर्णन करणें हें फार कठीण आहे यास्तव त्या स्वाऱ्यां विषयींचें मीं या पुस्तकांत संकलित लिहिलें आहे. या विषयीं सर्व माहीत व्हावें अशी कोणाची इछा असल्यास मिराठा शिकंदरी या पुस्तकामध्यें सर्व लिहिलें आहे.

हिजरी ९३५ व इसवी १५२८ या शकांत सुलतान आपला पुतण्या मुजाहीदखां ह्मणोन आदीलखां फारुकी याचा पुत्र होता त्यास साहाय करावयास दौलताबादेस गेला. जेव्हां सुलतान या स्वांरीस गेला तेव्हां नऊशें मोठाले उंच हत्ती बरोबर नेले आणि तेथील मोठाले राजप्रकरणांचा बंदोबस्त करून तेच वर्षीं साबान महिन्यांत आपले शहरांत आला.

सुलतान हिजरी ९३६ व इसवी १५२९ या शकांत मोहोरम महिन्यांत दक्षिण देश घ्यावयास आला तेव्हां दक्षिणेतील बोहरजी ह्मणून भागलाना देशचा राजा व सर्व दाक्षिणेंतील राजे याणी धार येथें सुलतानाची भेट घेतली. आणि राजाचे सर्व मीळून सेवा चाकरी करूं असें बोलले. सुलतान बाहादूर याची जमलेली फौज व त्याचा पुतण्या यास अहंमदानगर चऊलचा किला व दुसरे शहरावर जावयास हुकूम दिला. आणि हीं ठिकाणें दक्षिणेंतील दुसरे कांहीं शहरांसुद्धां लुटलीं गेलीं आणि तेथे गुजराथेचे राजाचे नावानें धर्म कथन वाच-

विलें त्याच वर्षी साबान महिन्याचे शेवटीं तेथून निघण्याचा निश्चय करून पुष्कळ लोक बरोबर घेऊन महंमदाबादेकडे फार त्वरा करून आला.

हिजरी ९३७ व इसवी १५३० या शकांत देश लुटण्याकरितां बागारावर फौज नेली, आणि तेथून मांडूकडे पूर्वी वृत्तांत लिहिल्याप्रमाणें स्वारी करून तो किल्ला सर केला. कांहीं दिवस वेढा घालण्याकडे गेल्यानंतर जा बाजूनें कोट फार उंच होता, त्याबाजूने शाबानचे एकोणतिसावे तारिखेस आपण आंत शिरावयास रस्ता करून आपले बरोबर कित्तेक बडे लोक ही नेले. महंमद खिलजी जाणें मांडूचा इतके दिवस बचाव केला होता. तो पळून गेला, आणि त्याचा वाडा सुलतान बाहादूर याणे घेतला. हिजरी ९३८ व इसवी १५३१ या शकांत मोहरमचे बारावे तारिखेस माळव्याचा राजा आपले मुलांसुद्धां गुजराथेचे राजास भेटावयास आला. तेव्हां राजाने त्यांस अलीफूखां इकबलूखां आणि असीफूखां याचे स्वाधीन केलें. या कामगारास सरकारी हुकूम असा होता, कीं त्यांस गुजराथेंत न्यावें परंतु पाळचा राजा व दाहादचें कोळी लोक यांस सोडविण्याकरितां आले होते त्या वेळेस लढाई होऊन माळव्याचा राजा व त्याचे लेक ठार मारले गेले. आणि मांडूचा सर्व देश

गुजराथेचे राजाचे हातीं आल्यावर त्यांवर एक सुभेदार व एक फौजदार नेमिला.

सुलतान बाहादूर त्यावर्षी पावसाळयामध्यें मांडू किल्यावर होता, आणि बऱ्हाणपूर व आशीर या शहरांत हिजरी ९३९ व इसवी १५३२ या शकांत सफर महिन्याचे नऊवे तारिखेस गेला आणि छत्रें चामरें अहंमदनगरचा राजा निजामुलूमुल्क यास देऊन त्यास निजामशाहा अशी पदवी दिली. आणि तेव्हां पासून तेथे जो राजा होई त्यास अशी पदवी मिळे. आशीरचा महंमदखान यास महंमदशाहा अशी पदवी देऊन गुजराथेचा राजा मांडूकडे जावयास निघाला. आणि तेथून फौज नेऊन उज्जनीचा राजा शिलहदी होता त्याजवर चढाव करून गेला. असें वर्णन लिहिलें आहे कीं शिलहदी राजास कैद केल्यानंतर सुलतान फार त्वराकरून उज्जनीस आला. आणि तेथून निघाला तेव्हां उज्जनीं दार्याखान मांडवी याचे स्वाधीन केली. सारंगपुरास जाऊन आपले पाठीमागें तें शहर मुलुखां याचे स्वाधीन केलें. आणि भिलसाहा ही घेतलें. ते वेळेस शिलहदीचा भाऊ लक्ष्मण शिंग याचे ताब्यांत रेशीन होतें. तेथे येऊन पोंचल्यानंतर नदीवर तळ दिला. आणि किल्ला घेण्याकरितां कामगारांस मोर्चे बांधावयास हुकूम दिला. व रुमीखां या कामांमध्यें फार चतूर होता व त्यावेळेस

त्याची या कामामध्यें स्पर्धा करणारा कोणी नव्हता. ह्मणोन डोळयांचें पातें लवलें नाहीं इतक्यांत एके तोफेनें किल्याचा एक बुरूज पाडिला. व सुलतानाचें पायदळ दक्षिण देशांतील बारा हजार होतें, त्याणी विवर खणून कोटापैकीं मोठा भाग पाडिला. शिलहदी सुलतानाबरोबर होता, याणें या गोष्टी पाहून सांगून पाठविलें कीं मी मुसलमान लोकांचा धर्म ग्रहण करितों, व किल्ला रिकामा करून स्वाधीन करून देतों, नंतर त्याणें आपला भाऊ लक्ष्मण शिंग यास बलावणें पाठविलें तो. आल्यानंतर त्याणें सुलतानाची भेट घेतली, आणि हे दोघे भाऊ या किल्याची मसलत करीत, असतां लक्ष्मण शिंग शिलहदीस बोलिला, कीं आपण किल्ला उगीच काय ह्मणून द्यावा. माझा पुत्र भोपाट यास मी चाळीस हजार स्वार व असंख्य सैन्य सहायास आणावयाकरितां राणाकडे पाठविला आहे, तो येईपर्यंत ही गोष्ट लांबणीवर टाकून कांहीं कापट्य करावें. नंतर शिलहदीने सुलतानास सांगीतलें कीं लक्ष्मण शिंगास पाठवून दुसरे रोजीं किल्ला रिकामा करून देतों.

बोलीप्रमाणें किल्ला रिकामा करून न देतां, किंत्तेक दिवस गेलें, तों सुलतानास कळलें कीं राणाचा मुलगा सैन्यासहीत यांस साहायार्थ येत आहे ह्मणोन महंमद शाहा आशीरी आणि इमादुलूमुल्कू यास राणाचे फौजेस

तेथेच अडथळा करण्याकरितां नेमिलें. परंतु राणाची फौज मोठी होती ह्मणून कांकुं करूं लागल्यामुळें इख़्त्य रलूखां यास स्वारांवर नेमिलें. आणि सुलतान जातीनें फौजेवर गेला. एकरात्र एक दिवस पर्यंत तीस स्वारांनुशीं सत्तर कोश मजलकरून आपले फौजेस मिळाला. राणाचे फौजेने सुलतान आलासें कळतांच आपले धण्यास खबर दिली. परंतु सुलतानास वाटलें कीं पुढें न जावें ह्मणून तो एक मुकाम मागेंच राहिला. तेवेळेस त्याणें आपले मनुष्यांपैकीं एक विश्वासुक मनुष्य फौजेमध्यें सुलतान आला किंवा नाहीं याचा शोध घेण्यास पाठविला ते वेळेस राणा यास खचित समजलें कीं, आभीगखां गुजराथेंतून छत्तीस हजार स्वार व काहीं तोफा, व हत्ती घेऊन आला आहे, ह्मणून राणानें परत जाण्याचा निश्चय केला. सुलतानाचे आज्ञेप्रमाणें तो राणा सांकाची चितूरापर्यंत पाठलाग करीत गेला, तों फौज येण्याचेपूर्वीं राणा किल्यांत जाऊन दडाला. नंतर असें ठरलें, कीं सुलतानाचे फौजेने रिझनचा किल्ला प्रथम घेऊन, नंतर चितूरास वेढा घालावा, त्याप्रमाणें सुलतान रिझन् किल्या कडे गेला, तेव्हां किल्यातील लोकानी आपणास सहायकारी कोणी नाहीं असें जाणून वर लिहिलेले इतिहासाचे पुस्तकांत लिहिल्या प्रमाणें किल्ला रिकामा करून दिला.

या समयीं सुलतान शिकंदर याचा भाऊ सुलतान

अलम लोधी यास जानंत, मकनी हामायन पादशाहाचे फौजेनें काल्पीतून हाकून दिलें. तो बारा हजार घोड्यां-सहित सुलतान बाहादुराकडे आला. सुलतानानें त्यास रेझीन भिलसा आणि चांदिरी ही तीन मिळोन एक सुभा जो पूर्वीं शिलहदी याजकडे होता तो दिला. महंमद शाहा आश्री यास सुलतानानें सांगीतलें कीं गांग्रोनी हें राणाने सुलतान महंमद खिलजी याजपासून जिंकून घेतलें आहे, हें त्याजपासून घ्यावें.

नंतर सुलतान बाहादूर याणे गोंडवण चे रानांत हत्ती धरावयास जाऊन पुष्कळ धरलें कानर चा किल्ला घेऊन तो अल्पखां याचे ताब्यांत दिला व इस्लामबाद हुशांगाबाद व माळव्या खालचे दुसरे देश घेऊन सारंगपूरास परत आला. आणि तेथून गाग्रोनी हें महंमद शाहा आश्री याणे घेतलें नव्हतें, तें घेण्याकारितां सुलतान तेथे आला मग तें त्याचे ताब्यांत आलें. तदनंतर इमादुलूमुल्क यास मांदासरचे शेजारील देश जिंकण्याकारितां नेमून आपण आपले शहरांत आला. सुलतान बाहादूर महंमदाबादेस आल्यानंतर त्यास दायूचे शहराकडून वर्तमान आले कीं तेथें इंग्रेज लोक पुष्कळ जाहाजें व लढाईचा सरंजामानशीं दायू घेण्याकारितां आले आहेत. सुलतान तत्क्षणी खंबायते कडे आला, आणि इंग्रेजलोक सुलतान येतो, असें कळतांच तेथून पळून गेले. दायू

येथे सुलतान आल्यानंतर दोन मोठ्या व शंभर लहान तोफा महंमदाबादेस चितूर घेण्याकरितां पाठविल्या. तेथून तो अहंमदाबादेस आला व तेथून महंमदाबादेस येक दिवसांत आला. नंतर महंमदशाहा आश्री यास आशीरगडाहून चितूरास वेढा दिला होता, तिकडे जाण्यास सांगीतलें खुदावंतखां, व वजीरखां हे मांडूकडे फौजेवर होते त्यांस महंमदखान आश्री याजकडे जाऊन मिळण्याकरितां सांगीतलें. सुलतान अहंमदाबादेहून डांकेतून तावडतोब मांडू येथे तीन दिवसांत आला, यासमयीं महंमदखां आश्री आणि खुदावंतखां या दोघांस चितूरास जावयाचा हुकूम जाला, आणि ते फौज घेऊन मांडासूर येथे आले तेव्हां राणाचे मुख्य कारभारी येऊन ह्मणू लागले, कीं जर चितूर घेण्याविषयींचा बेत राहील तर सुलतान जो हुकूम करितील, तो शक्तीनुसार मी शिरसावंद्य करीन. सुलतानानें हें न ऐकतां चितूरावर फौज पाठवून हल्ला केला, आणि आंत कोंडलेले लोकांस फार दुःख दिलें सरतेंशेवटीं विक्रमाजित ह्मणून राणाचा मुलगा याचे आईने सांगून पाठविलें कीं मी सुलतानाची प्राचीन चाकर आहें, आणि जर सुलतान साहेब चितूर घेणार नाहीं आणि ते येथून कूच करितील तर मी सुलतानास सोनेरी कंबर पट्टा व रत्न खचीत मुगूट जो राणाने महंमद खिलजी याजपासून घेतला आहे, तो

देईन, या अमोल्य रत्नांखेरीज पांच लाख रुपये शंभर घोडे व दाहा हत्ती हे शरण आलेल्या दाखल देईन.

मालीकबर हानलमुल्क् आणि मुजाहीदखां यांस राटंभोरचा किल्ला घेण्याकरितां पुष्कळ फौज बराबर देऊन पाठविले आणि मालीक शामसरुल्मुल्क् याजबरोबर बारा हजार स्वांर देऊन अजमीर घेण्याकरितां पाठविलें या वेळेस सुलतान मांडेसरावरून मांडूस गेला आणि तेथें पोचल्यानंतर थोडे दिवसानी दक्षिणेंतील निजामुल्मुल्क् याजवर जाण्याकरितां महंमदशाहा आश्री याजबरोबर गुजराथेतील कीर्तिमान वडे लोक देऊन तिकडे त्यास नेमिलें. महंमदशाहा आश्री हा निजामुल्मुल्क् दक्षणी यास बिर या शहराजवळ भेटल्यानंतर महंमद शाहाआश्री याणे सुलतानासहा मजकूर समजाविण्याकरितां जासूद पाठविल्यावरून बाराहजार शूर स्वांर त्याचे कुमकेस पाठविले. बाकीची फौज बिराकडे येण्याचेपूर्वीं दोन्ही दळें लढाई करूं लागलीं, आणि दक्षिणेतील फौज सुलतान आला असें समजतांच पळून गेली. थोडे दिवसानीं बराण निजामशाहा सुलतानास भेटावयास येऊन त्याणे सुलतानाचे ताब्यांत राहीन असें कबूल केलें, त्यावरून सुलतान त्याचा मुलूख त्यास परत देऊन मांडूकडे गेला या समयीं बऱ्हाण निजाम शाहा याणें कित्तेक मुकाम

पर्यंत गुजराथेचे राजा बरोबर जाऊन परत यावयास निरोप घेतला.

सुलतानाचे मनांत पुनः चितूरचा किल्ला घ्यावा असें आलें. परंतु खोरासनचा राजा सुलतान हुसेन याचा नातू महंमद झामन मिरझा हा तेवेळेस जानत आशीयनीहामायन दिल्लीचा पादशाहा याजपासून पळून आला आणि सुलतान बाहादुर यांजकडे येऊन मिळाला. हामायन यास फार राग येऊन त्याणे गुजराथेचे राजास लिहिलें कीं या गुनेगार मनुष्यास गुजराथेंतून मजकडे परत पाठवून द्यावा अगर आपले राज्यापार नरी करून द्यावा गुजराथेचे राजाची आणि याचीं या विषयीं पत्रें एकमेकांस हें खटले संपविण्याकरितां आलीं तीं मागे लिहिलेले पुस्तकांत बार जाहालीं आहेत आणि तेणेकरून परस्परांस द्वेष पडला या प्रसंगीं सुलतान बाहादुर याणें आपली फौज मांडूहून चितूरचें वेढ्याकडे पाठविली. आणि रुमीखां यास सांगीतलें कीं जर तूं चितूर सर करशील, तर तें तुझे ताब्यांत देईन, असें सांगून त्यास तिकडे पाठविलें.

या वेळेस वर्तमान येऊन पोंचलें कीं हामायन पादशाहा सुलतान बाहादुर याजबरोबर लढाई करावी या बुद्धीने ग्वालेरीस येऊन पोंचला, तेव्हां सुलतान बाहादुर चितूरावर वेढा घालून तेथील नास्तीक लोकांशीं लढाई

करून काय परिणाम होतो, तें पाहात होता. हामायन पादशाहा याचा मसलती समजून सुलतान हुशार जाला आणि तातरखां लोधी यास बेयनावरून जाऊन दिल्लीवर हल्ला करावयास सांगीतलें. राग रंग पाहून हामायन गुजराथेंत गेला तर तूं दिल्लीचा मालक होशील आणि जर तेथे काहीं हित होईल असे दिसलें नाहीं तर आपली फौज परत घेऊन ये असें सांगीतलें. तातरखां याचे दैव योगाने व त्याचे हातून काहीं गोष्ट गेल्यानें हें काम सिद्धीस गेसें नाहीं, तेणें करून गुजराथेंतील फौज हामायन याचा भाऊ हिंदल मिरझा याणें जिंकिली ही गोष्ट जाहाली तथापि चितुरचा वेढा काईम होताच व सरते शेवटीं चितूरांतील लोक माहा संकटांत पडल्यावरून त्याणी किल्ला खालीं करून दिला.

सुलतान बाहादुर याणे रूमी खानांस वचन दिलें होतें कीं चितूर तुझे ताब्यांत देईन, तरी कित्तेक कारणांवरून सुलतानानें तें त्यास दिलें नाहीं. रूमीखानास या विषयींचा फार राग येऊन त्याणे हामायन पादशाहास गुप्तपणें लिहिलें, आणि त्यासमयीं मिराठाशिकंदरींत लिहिल्या प्रमाणें एकादी गोष्ट गुजराथेचे राजाची घटीतार्थांत यावया जोगी असली ह्मणजे त्यास तो विघ्न करी, सुलतान बाहादुरास सरते शेवटी आस्रा करण्या करितां मांडूचे किल्यांत जावें लागलें. आणि हा किल्ला

हामायन पादशाहा याणें घेतला. तेव्हां तो चांपनीरा कडे पळून गेला. आणि सुलतान बाहादुर याणे मांडू- देश इखत्यरखां, आणि राजा नरशिंगदेव, यांचे स्वाधीन केला, व तेथून सोराथेंत जाऊन दायू बेटांत राहिला. पुढें लागलाच चांपनीर किल्ला हामायनचे हातांत आला. नंतर तो महंमदाबादेस गेला परंतु शिरखां आफगान उर्फ शिरशाहा याणें बंड केल्यामुळें, हामायन यास आग्रा शहरांत येणें प्राप्त जालें, नंतर त्याणे आपला भाऊ मीरझा अस्करी यास अहंमदाबादेंत, व काशीम बेग यास भडोच सरकारांत यादगर नासीर मिरजा यास पट्टण सरकारांत, व बाबाबेगजालेरी यास चांपनीर किल्यांत ठेविलें यासमयीं सुलतानबाहादुर याचे सरदार मालीक अमीन दारवीष, व मालीक बाराहनलमुल्क व शामसुरलमुल्क, या तिघांस प्रत्येकी रेटंभोर चितुर, व अजमीर या ठिकाणीं मुख्य नेमिलें होतें या सर्वांनीं एकोपा करून चाळीस हजार स्वांर घेऊन ते पट्टण शहरा जवळ आले, तेथून सुलतानास सांगून पाठविलें, कीं आपली मर्जी असली तर यादगरनासीर मिरझा याज- वर आमची फौज घाला घालील सुलतानानें सांगून पाठ विलें, कीं, मी तुह्माकडे लवकरच येतों, आणि मी येई पर्यंत तुह्मी मीरझाशीं लढाई करूं नये, नंतर लवकरच सुलतान बाहादुर फौजेवर आला, आणि यादगीर नासीर

मिरझा सुलतान, आला असें ऐकतांच काढतें घेऊन अहंमदाबादेस गेला सुलतान बाहादुर याणें चहूंकडून फौज मदतीस येल्ये, असें ऐकिल्या नंतर तो अहंमदाबादेवर चढाव करून गेला. आणि थोडे दिवसानीच मिरझा अस्केरी आणि दुसरे लोकांची लढाई महंमदाबादे जवळ जाली. दिल्ली चे फौजे वरील कामगार याणीं विचार केला, कीं, या लोकांचा आपले देशांत शिरकाव होउं देणें, ही गोष्ट बरोबर नाहीं ह्मणोन ते हामायन यास मदत द्यावयास गेले. मिरझा अस्करी आणि दुसरे शिलेदार गुजराथेचे राज्यांत नऊ महिने आणि काहीं दिवसपर्यंत होते.

सुलतान बाहादुर यावेळेस चांपनीर किल्यावर गेला आणि तेथे काहीं दिवस राहिला परंतु इंग्रेज लोकांचा त्यास फार राग येऊन दायू बेटामध्यें किल्ला बांधून इंग्रेजांस हाकून देण्या विषयीं तो बारमाही यत्न करीत असे. हा किल्ला बांधण्या विषयीं सर्व वर्णन मिराठाशिकंदरी या पुस्तकांमध्यें लिहिलें आहे.

सुलतान आपले बरोबर कांहीं ग्रहस्थ घेऊन दंगेखोर व नास्तीक असे जे इंग्रेज लोक त्यांस भेटावयास गेला, इंग्रेज लोकानीं त्यास ठार मारून समुद्रांत टाकून दिलें असें ह्मणतात. या गोष्टी हिजरी ९४३ या शकांत रमजानचे तिसरे तारिखेस जाहाल्या, आणि त्या वेळे

पासून दायू बंदर इंग्रेज लोकांचे ताब्यांत आलें इखतीयरलूखां राजप्रधान याणें पुढील लिहिलेले शब्दांत या विषयींची तारीख लिहिली आहे. सुलतानु लबार शाहीदुलबाहार गुजराथेंतील राजा आपलें मत्त स्थापन करण्यात समुद्र किनाऱ्या वर ठार मारिला गेला.

या राजानें अकरा वर्षें राज्य केलें आणि मृत्यु पावला, तेव्हां त्याचें वय एकतीस वर्षांचें होतें.

सुलतान बाहादुर यास ठार मारिल्या नंतर त्याचे प्रधान व बडे लोकांनीं त्याचा पुतण्या जो महंमद शाहा फारुकी खानदेशाचा राहाणार हा उज्जनी वर सात हजार घोड्यांनिशीं चाकरीवर होता, त्यास ही खबर जाहीर केली आणि त्यास विनंती लिहिली, कीं आपले चुलत्याचे मृत्यु पत्रा प्रमाणें आपण गुजराथेचे राज्यावर बसावया करितां यावें.

महंमद झामनमिरझा हा गुजराथेंत दंगा चालू जाला होता ह्मणून फार खुष होवून दायूचे बंदापासून आवान ह्मणून तीनकोश आहे तेथें येऊन राहिला. बडेलोकांस त्याचा बेत समजतांच त्याणी इमादुलूमुल्क् याजबरोबर पुष्कळ फौज देऊन त्याजवर पाठविलें, आणि तेथें जवळच लढाई होऊन मिरझाचा पराभव होवून तो पळून गेला. सुलतान महंमद शाहा फारुकी यास आपले चुलत्याचे वर्तमान कळतांच लोकांस कळू नदेतां त्याचे

वियोगानें दुःख फार करूं लागला आणि सत्रा दिवसा नंतर आपण मृत्यु पावला. जेव्हां गुजराथेंतील बडेलोकांस हें वर्तमान कळलें तेव्हां त्याणीं विचार केला, कीं लाटीपखानाचा पुत्र महंमदखां जो बाहादुर राजाचा पुतण्या आहे त्या खेरीज दुसरा राज्यावर बसविण्यास योग्यवारस कोणी नाहीं. बाहादुर याणे महंमदखां फारुकी यास सांगीतल्या वरून तो वारीसदार कैद केला, होता व शामसुदीन याचे ताब्यांत होता ह्मणून गुजराथेंतील बडे लोकांनीं त्यास गुजराथेंत पाठवून देण्या करितां शामसुदीनास पत्र लिहिलें, त्याणे त्याचे वडिलांचे चाली प्रमाणें राज्यावर बसविण्या करितां पाठवून दिलें.

सुलतान बाहादुर जिंकला गेल्यानंतर दंगा व फितूर गुजराथेचे राज्यांत माजला आणि ते वेळेपासून दक्षिणेतील राज्यांकडून व इंग्रेज लोकानीं बंदरें घेतलीं होतीं तिकडून पुढें खंडणी येइनाशी झाली.

---

## प्रकरण १०

लाटीफखानाचा पुत्र सुलतानमहंमद द्वितीय याचे राज्याविषयीं.

महंमदखां हिजरी ९४३ व इसवी १५३३ याशकांत राज्य

करूंलागला, ते समयीं त्याचेंवय अकरा वर्षाचें होतें. या समयीं इमादुलमुल्क यास मुख्य प्रधानाचें काम मिळालें, वदार्यांखां यास माजलीस गिरामी अशी पदवी मिळाली या दोघां कामगारानीं राज्य कारभार चालवावा असें ठरवून सुलतानाचीं इतकी बारीक चौकशी ठेविली कीं जसें कोणी ह्मणेल त्यास चिमट्यांतच ठेविलें या दोघां वडे लोकांखेरीज तिसऱ्यास सुलतानाची भेट होत नसे. आणि सुलतानास या गोष्टीचा फारच त्रास आला तथापि विचारानें आणि शाहाणपणानें आपल्यास राग आला असें त्याणे कधीं ही दर्शविलें नाहीं. त्याला कर्मणूकीचा आणि शिकारीचा इतका षोक असे कीं कोणी ह्मणेल त्याला त्याचे फौजेची अथवा राज्याची काळजी नसे. तो बारमाहा प्रख्यात व गुप्तपणे ह्मणत असे, कीं एकादे राजास इमादुलमुल्क आणि दार्यांखां यांसारिखे मंत्री मिळाल्यास त्याचे राज्याविषयीं त्यास काडी मात्र काळजी करणें नको. सुलतान वारंवार विचारी कीं मका हें पुण्यस्थान व मेदीना हीं स्थानें कशीं आहेत. राजा असें बोलतो हें ऐकून प्रधान लोक खुष होवून किंचित् श्रमांखेरीज राज्य कारभार करूं लागले, परंतु सुलतान फार शाहाण पणानें व काहीं कारणामुळें भोळेपणाचें सोंग घेई. आणि प्रख्यातपणें अथवा गुप्तपणें जा बऱ्यावाईट गोष्टी त्याचे कानावर येत असत त्या जशा असत तशा आपले पद-

रचें न लावतां त्यांस सांगत असे, त्याजवरून सुलतानाचे स्वभावाचें त्यांस फार आश्चीर्य वाटे.

सरते शेवटीं दार्याखां याणे इमाडुलूमुल्क् यास राज्य कारभारांतून काढावें असें मनांत आणिलें, हाबेत सिद्धीस नेण्याकारिवां दार्याखां याणे सुलतानास हवा खाण्याकरितां माहेंद्री नदीपासून तीस कोशांवर एक तळें आहे, तेथें नेऊन शेजारचे मुलुखांतून फौज जमा केली, व सरकारचे नावानें इमाडुलूमुल्क् यास हुकूम लिहिला कीं तुह्मी अहंमदाबाद सोडून आपले जाहागिरीवर जावें. इमाडुलूमुल्क् गैर इलाजी होऊन हुकुमाप्रमाणें झालावार येथे आपले जाहागिरीवर गेला. या समयीं दार्याखानानें सुलताना सहित इमाडुलूमुल्क् याचा बऱ्हाणपूरचें हद्दीपर्यंत पाठलाग करून तेथून मुबरक शाहा फारुकी यास निरोप पाठविला कीं या अपराधी मनुष्यास धरून इकडे पाठवून द्यावें. मुबरक शाहा हें अमान्य करितां दार्याखानाशीं लढाई करूं लागला. व जी लढाई वांकेरी येथें जाली तींत मुबरक शाहा जिंकला जाऊन आशीरकडे पळाला. त्याचे मोठ मोठाले हत्ती, व छत्रें चामरें इत्यादि राज चिन्हें गुजराथेंतील राजा महंमद शाहा हा दुसरा याचे हातांत आलीं. इमाडुलूमुल्क् तेथून पळून जाऊन कादर शाहा माडूचा जो तेवेळेस माळव्याचे सुभ्यावर होता त्याजकडे गेला, आणि सुलतान महंमद

याणें बऱ्हारणपुरा मध्यें काहीं दिवस राहून तहनामा केला त्यांत असें ठरावून घेतलें, कीं तेथील मशीदींमध्यें सुलतानाचे नावाने खुराण वाचवावें. व आशीरबऱ्हा॰ येथील टंकशाळां मध्यें नाण्यावर त्याचें नाव छापावें.

थोडे दिवसानीं दार्याखां व सुलतान मिळून अहंमदाबादेस परत आले, तेव्हां त्यांस संधी सांपडून सर्व गुजराथ देशावर त्याणें आपला अमल पूरा बसविला. महंमदशाहा राजाचे नावानें राज्य कारभार चालवितों असें बाह्यात्कारें दाखवून राजास त्याणें टिक्याचा धणी मात्र केलें दार्याखानास ऐष आरामीचा फार षौक लाग॰ ल्यामुळें त्याणें अलमखां लोधी ह्मणून विश्वासु मनुष्य होता त्याचे स्वाधीन सुलतानास करून त्यास असें सांगीतलें, कीं सुलतानास अटकेंत ठेवून तूं त्याचा बंदोबस्त नीट ठेव.

लोक असें ह्मणतात कीं गुजराथ देशांतील गरीब व श्रीमंत लोकांस दार्याखां याणें कृपा करून बक्षिसें देणग्या, व पेनशनें, दिल्या वरून, लोक फार सुखी, व अनंदी, जाहाले, बारमाही जमीनीचे बक्षीसाचे सनद पत्रा वर राजाची मोहोर सुद्धां तयार करून ठेवी. हा त्याचा नेहमीचा पाठ असे, कीं तेणे करून एकादे पुरूषास जमीन देणें जाल्यास त्यास वाट पाहावयास नको.

याप्रमाणें दार्या खानानें पांच वर्षें पर्यंत उपभोग

घेतला, आणि सुलतानास दार्याखां फार ऐष आरामींत आहे असें कळलें तथापि त्याणे त्या विषयीं मनांत कांहीं आणलें नाहीं. दार्याखान नेहेमी सुलतानाचे गुप्त संकेत कळावे या बुद्धीने फार यत्न करी परंतु त्यास समजत नसत ह्मणून तो ह्मणत असे कीं मला सुलतानाचे वर्तणूकीचें फार आश्चिर्य वाटतें. सुलतान हा कोणी महा ज्ञानी पुरुष, अथवा जास उपमा नाहीं असा मूर्ख तरी असेल.

मिराठाशिकंदरी या पुस्तकामध्यें जीं कारणें लिहिलीं आहेत. त्या विषयीं दार्याखानास त्याचे हितकर्त्यांचा फार राग येऊन त्याणे अमलखां लोधी यास आपले जाहागिरीवर जावयास सांगीतलें माळव्या मध्यें इमादुल्मुल्क्, आणि कादरशाहा, या उभयतांची अत्यंत मैत्री जमली असें कळलें. दार्याखां यास हें वर्तमान कळतांच फार राग येऊन त्याणे गुजराथेचे राजाचे नावें कादरशाहास हुकूम पाठविला, कीं इमादुलमुल्क् यास धरून गुजराथे कडे पाठवून द्यावें, अथवा त्यास देशापार करून द्यावें. माळव्याचे सुभेदाराने जबाब लिहिला, कीं मी याप्रमाणें करण्यास खुशी नाहीं, दार्याखानास या जबाबाचा फार राग आला आणि राजाचे तंबू, कनाथी बाहेर काढावयास हुकूम देऊन त्याणें कांक्री याचे तळ्या जवळ घाटमंडळचे राज वाड्यामध्यें कादरखां याजवर

हल्ला करण्याचे बेतानें येऊन मुकाम केला. चहूंकडून राज्यांत फौज जमा होण्याकरितां, तो हुकूम जाहीरकरून त्या वेळेस नित्य राजाकडे दोन, तीन तास बसावयास जात असे, व सुलताना पासून आल्या नंतर तो ऐष आरामामध्यें दिवस घालवी.

सुलतान राजा फार तरूण असे, तरी जें जें प्राप्त होई, तें सहन करण्याची त्याणें संवई केली, आणि त्यास दुःखें होत तरी एकादी गोष्ट करणें जाल्यास त्याचे हातांत नसे. दार्याखानानें एके दिवशीं सुलतानास सय्यद मुबरक बोरवारी याजबरोबर मेजवानीस बोलाविलें, तेथें नाच, गाणें चाललें होतें ह्मणून राजा तेथे सर्व रात्रभर राहिला, पांहाटेस प्रधान एक कलावंतीण बरोबर घेऊन सुलतानास एकटा ठेवून आपण उठून गेला ही अयोग्य गोष्ट पाहून सुलतानास फार राग आला. परंतु मनाचें शांतवन करून सय्यद यास बोलला कीं या गुलामाची उद्धट वर्तणूक पाहिलीसना. कीं राजास एकटें टाकून ताजीम न देतां उठून जातो. सय्यदानें राजास सांगीतलें, कीं ही गोष्ट सहन करून काय होतें हें पाहावें, हें योग्य आहे.

अलमखां लोधी हा धांदूका येथें आपले वतनावर राहात होता. त्याचा काहीं दार्याखानावर मुळचा द्वेष होता, ह्मणून त्याणें जाहालेली गोष्ट ऐकून सुलतानास

गुप्तपणें लिहिलें कीं सुलतानाचे मनांत कृपाकरावी असें असलें तर दार्याखानास हाकून देण्याचा हुकूम, द्यावा, ह्मणजे त्याप्रमाणें करीन, ही गोष्ठ करण्याविषयीं सुलतान व अलमखां लोधी यादोघांनीं चांजी ह्मणोन पारधी होता त्याचे मध्यस्थीने ठरवून सुलतान एक रात्रींतून अलमखां लोधी याजकडे पळून गेला. तेवेसेळ सुलतान वीस स्वांर सामानाचे गाड्या बरोबर होते ते घेऊन गेला. दुसरे दिवशीं दार्याखानास राजा पळून गेला असें समजतांच तो तेथून कसें जावें या संकटांत पडला. त्याचे स्वाधीन खजीना होता, यामुळें सुलतानाचा नातू जो सुलतान महंमद दुसरा यास त्याणें गादीवर बसवून सुलतान मुझाफीर अशी पदवी दिली, आणि नाणे त्याचे नावाचें करविलें व धर्म कथन मशीदींत त्याचे नावानें वाचवून पन्नास हजार स्वांर जमा करून अलमखांलोधी सुलतानास अडथळा करावयास आला. आणि पुढें मोठी लढाई होऊन सुलतान व अलमखां लोधी यांचा मोड केला.

दार्याखां यास जय मिळाला ह्मणून तो सुलतानास सोडून धोलका कडे गेला या दोघांचा मोड जाला, तरी त्याणीं सर्व देशांमध्यें जाऊन पुष्कळ फौज जमा केली व दार्याखां याचे फौजेंतून जे पळून गेले. ते लोकही जमविले. दार्याखां यास धोळका येथे राहाणें ही बचा-

वाची गोष्ट नाहीं असें समजून तो अहंमदाबादेस गेला तेथे येऊन पोंचल्यावर लोक त्यास शहरांत येऊं देइनात, परंतु जबरीनें आंत शिरून शिपाई लोकांशीं व तेथील राहाणारांशीं मिळवून घेऊं लागला, तरी त्याची फौज त्यास सोडून सुलतानाकडे येऊन मिळाली. दार्याखां यास संशय आला कीं शहरांतील लोक मला धरून ठेवून राजाचे स्वाधीन करितील ह्मणून त्याणें आपलें कुटुंब व सर्व खटलें चांपनीर किल्याकडे पाठवून तो स्वतां बऱ्हाणपुरास मुबरक शाहाकडे गेला. ही गोष्ट हिजरी ९५० व इसवी १५४३ या शकांत जाहाली.

महंमदशाहा दुसरा हा मूळप्रथम अहंमदाबादेस जाऊन नंतर चांपनीर किल्याकडे गेला, आणि तो किल्ला घेऊन दार्याखानाचीं मुलें माणसें व खजीनाही त्याणे घेतला. सुलतानाचे हातांत सर्व राज्य आल्या नंतर त्याणे बऱ्हानुल्मुल्क बाबी यास मुख्यप्रधान व अलमखां लोधी यास सेनापती केलें. याप्रमाणे त्याची साहा महिने पर्यंत भरभर जाली परंतु अलमखां लोधी याणें मध्यस्थी केल्यामुळें इमादुल्मुल्क यास कचेरीस बोलाविलें आणि चारुंजी याणे विनंती केल्यावरून त्यास मुहाफीजखां अशी पदवी दिली. हा मुझाफीरखां राजाचा मित्र जाला आणि स्वभावतः जरी गरीब भिकारी होता

तरी राजाचा उपदेशी जाला. आणि वारंवार ह्मणे कीं राजाचा मी शुभेच्छक मित्र आहें.

इमाडुल्‌मुल्क् हा तेवेळेस मांडू कडून आला होता, त्याणे सुलतानाची भेट घेतली तेव्हां त्यास भडोच सरकार आणि सुरतचे बंदरची जाहागिरी मिळाली व तेथे जावयास हुकूम मिळाला. यासमयीं एके दिवशीं सुलतान दारू पिऊन मस्त जाला तेवेळेस मुद्दा फिरखां याणे उपदेश केला कीं पुरातन बडे लोकांस फांटे देऊन कामें दुसऱ्यांवर सोंपून द्यावीं. परंतु ही गोष्ट सिद्धिस न्यावयास दिल्लिचा शिकंदर लोदी याचा भाऊ अलादिन लोदी जो बाहादूर शाहाचे वेळेस गुजराथेचे सुभ्यांत कामावर होता त्यास मूळ प्रथम कामावरून काढणें प्राप्त होतें व दुसऱ्यादा सुजातखां जो दार्याखानावर लढाईत गेला होता त्यास कामावरून काढणें प्राप्त होतें. सुलतानानें या गोष्टींत त्याचे प्रधानाची अथवा बडेलोकांची मसलत न घेतां हुकूम केला कीं या दोन बडे लोकांस फांशीं द्यावें त्या प्रमाणे त्यांस फाशीं दिलें.

नंतर राजाने आपले दिवाणखान्यांत जाऊन हुकूम केला कीं तीन दिवस पर्यंत कोणास माझे भेटीस येऊं देऊं नये तिसरे दिवशीं अलमखां लोधी याणे इमाडुल्‌मुल्क् यास सांगीतलें कीं अलादीनखां याचा जीव जाऊन तीन दिवस जाले. आतां त्यास पुरण्या करितां

सुलतानास जाऊन सांगीतलें पाहिजे यावरून इमादुल् मुल्क् दरबारांत गेला. तेव्हां मुहाफीजखां राजापासून येऊन बोलला तुला काय पाहिजे नंतर इमादुलमुल्क् यास त्याचे जाहागिरीवर जाण्यास हुकूम मिळाला. इमादुलूमुल्क् याणें मुहाफीजखां यास सांगीतलें कीं सुलतानास विचारा कीं सरकारची मर्जी असली, तर सुलतान अल्लादिन यास मूठमाती देऊं, मुहाफीजखां असा जे दुष्ट तो धिःकार करून हांसला, आणि मोठे सलगीने बोलिला, अरे मालीक हे दोघे कृतघ्न चाकर मृत्युपावले आणि या प्रमाणे अद्यापि किती मरण पावतील, इमादुल् मुल्क् यास हे शब्द ऐकून फार राग आला, आणि अलमखां लोदी याजकडे जाऊन त्याणे हा ऐकिलेला वृत्तांत सांगीतला. तेवेळेस अलमखां लोदी याणें त्यास सांगीतलें, कीं जर मुहाफीजखां फारदिवस जगावयास इछितो, तर त्यास ठार मारावें. आणि सुलतानाची फार बारीक चौकशी ठेवावी नंतर, इमादुल्मुल्क् आपले जाहागिरीवर गेला परंतु अलमखां वाजीहल्मुल्क् आणि दुसरे लोक जे मुहाफीजखां यास ठार मारण्या करितां फौज जमा करीत होते, त्याणीं निश्चय केला, कीं मुहाफीजखां यास ठार मारल्या खेरीज सुलतानास सलाम करूं नये.

अलादीन लोदी यास मूठमाती दिल्यानंतर सर्व एककूटांतील मंडळी राजसभे शेजारील मशीदींत जमून तेथे

बसली, आणि त्याणी सुलतानास महजीदींत तीन दिवस पर्यंत कोंडलें. सरते शेवटीं सुलतानाचाने बंदी सोसवेना ह्मणून त्याणे विचारावयास पाठविलें, कीं तुह्मी येथें जमलां याचें कारण काय तें सांगावें. तेव्हां त्याणी एक दिल करून उत्तर दिलें, आह्मी आपले चाकर आहों परंतु मोहाफीजखां आपले जवळ असावयास योग्य नाहीं त्यास आमचे स्वाधीन करून द्यावें, सुलतानानें ही गोष्ट कबूल केली नाहीं परंतु थोडे दिवसानीं या बडे-लोकांस दरबारांत मुजरा करावयास बोलाविलें या कूटा पैकीं एकाचा आणि मुहाफीजखां याचा काहीं समंध होता, ह्मणून त्याणे त्यास सांगून पाठविलें, कीं कचेरींत तूं येऊं नको, परंतु मुहाफीजखां, हा फार गर्विष्ट त्यास वाटलें कीं आपल्यावर राजाची कृपा फार आहे ह्मणून आपले मित्राचे सुचनेस न ऐकतां कचेरीस आला. आणि राजाचे पाठीमागें सिंहासनाशीं उभा राहिला अलमखां लोदी याणें त्यास तेथें उभें राहातानां पाहिलें तेव्हां त्याचानें तें पाहवेना मग त्याणे आपले कूटांतील मंड-ळींस खूण केली हें पाहून मुहाफीजखानास त्याचे जिवाचें संकट पडून तो सिंहासनाखालीं लपला, या कूटांतील मंडळीनीं त्याचे डोकीचे केश धरून वोढून काढिला आणि त्याचे तुकडे तुकडे केले. सुलतानाने त्यास माफ करण्या विषयीं सांगीतलें, तरी त्याणी त्याचें ऐकिलें नाहीं. सुल

तान हें पाहून फार घाबरा जाहाला. आणि आपला जीव द्यावा या बुद्धीनें त्याणे कटार उपसली या कूटांतील मंडळींनी ती त्याचे हातांतून घेतली तथापि कटारीचें टोक त्याचे पोटास लागलें राजाची जखम बांधून त्यास अलमखां लोदी वाजीहल्मुल्क् मुजाहिदखां, आणि मुजाहिदलमुल्क्, असें जाणी पूर्वी राजास कैदेंत ठेविलें होतें त्यांचेच स्वाधीन राजास केलें या बडे लोकानीं राजास अहंमदाबादेस नेलें,आणि पूर्ववत् प्रमाणे त्याची फार बारीक चौकशी ठेविली. परंतु त्यामध्यें काहीं कारस्थान उत्पन्न जाहालें याकारितां फारच बारीक चौकशी ठेवणें प्राप्त जाल्यामुळें त्यास फार त्रास आला. यास युक्ती काय करावी. ह्मणून विचार करून त्याणी ठरविलें कीं त्याचे डोळे लोखंडाचे तप्त जाहालेले सळईने फोडून एकेमुलास राज्यावर बसवावें. परंतु कित्तेकांचें मत्त असें पडलें कीं मुलगें बसाविण्याचें सुद्धां कारण नाहीं, तर आपण देशवांटून घेऊन आपापले ताब्यांतील परगण्यांवर आपण अंमल ठेवावे नंतर या प्रमाणें ठरलें कीं सर्वांनीं देश वांटून एकेकाचे ताब्यांत अमुक अमुक घ्यावा हा बेत सिद्धीस गेला नाहीं. कारण कीं त्यां पैकीं तातरखां ह्मणून होता त्याणें हळूच सुलतानास सांगीतल्या नंतर सुलतानानें बरोबर काहीं स्वार घेऊन जाऊन रात्रीस अलमखां लोदी आणि वाजीहल्मुल्क् यांचीं घरें लुटावयास हुकुम दिला.

त्या मुळें वडे लोकांतील प्रमुख पळून गेले, या विषयीं विस्तार पूर्वक कथन मिराठा शिकंदरी या पुस्तकामध्यें लिहिलें आहे. सुलतान पुनः गादीवर बसला आणि मुख्य प्रधानाचें काम असफूखां जो पूर्वीं सुलतान बाहादुराचे वेळचा मुख्य प्रधान होता त्यास दिलें. व खुदावंतखां आणि दुसरे कित्तेकांस मोठालीं कामें दिलीं.

अलमखां लोदी याणें पळून गेल्यावर दार्याखां दक्षिण देशामध्यें फार विपत्तींत होता. त्यास आपले कडे येण्यास लिहिलें त्यास तिकडे जाण्याविषयींचें पत्र येतांच तो भडोच कडे इमादुलमुल्क यास भेटावयास आला. या गोष्टीवरून सुलतानास फार वाईट वाटून चैन पडेना तेसमयीं एक पत्र इमादुलमुल्क याजकडून आलें त्यांत लिहिले होतें कीं, अलमखां आणि दार्याखां, हे सरकारचे पुरातन चाकर आहेत. आणि हे दिल्लीचा शिरशाहाकडे गेले तर ही गोष्ट फार वाईटशी दिसेल याकारितां देशाचे हद्दीवर त्यांस जाहागीर दिल्यास, ते फार उपयोगीं पडतील. ही गोष्ट करण्याचें सुलतानानें कबूल केलें. परंतु अलमखानाचा भाऊ कुटुंबा सुद्धां पळून गेला. ह्मणून वचना प्रमाणें व्हावयास कांहीं उशीर लागला. दार्याखां, अलमूखां आणि इमादुलमुल्क, मिळून देशांत दंगा, बखेडा करितील ह्मणून सुलतान नेहेमी सावध होता. त्याणे इमादुलमुल्क यास सांगून

पाठविलें, कीं जितकी त्वरा होईल तितकी करून आह्मा-कडे ये. कारण या गोष्टी विषयीं तुह्मास मसलत विचारावयाची आहे. सय्यद आरबशाहा यास इमाडुलूमुल्क् याजकडे पाठविलें, तेव्हां तो दाहा बारा हजार स्वांर घेऊन चांपनीर किल्यांत आला. व त्याजवर राजकृपा ही जाली.

थोडे दिवसानंतर रात्री कोणी वोरडलें कीं इमाडुलूमुल्क् यास लुटावें असा सुलतानाचा हुकूम आहे ही खोटी बातमी ऐकून चहुंकडून लोक धांवून आले आणि इमाडुलूमुल्क् यास त्याचे बरोबरचे लोकांसहित लुटलें, यावरून इमाडुलूमुल्क् यास फार वाईट वाटलें आणि फार दुःखी होऊन सय्यद मुबरक शाहा याजकडे आश्रय करावया करितां गेला. सुलतानास ही गोष्ट माहीत जाली तेव्हां जाणी त्यास लुटलें, त्यांस धरून फांशीं देण्याकरितां त्याणे हुकूम दिला, सुलतानानें इमाडुलूमुल्क् याशीं मिळवून घेण्या विषयीं फार यत्न केला, परंतु त्याणे सांगीतलें कीं मका, आणि मेदिना, हीं दोन्ही पुण्यक्षेत्रें पाहावयास जाणार आहें. तेव्हां सुलतानाने बरें ह्मणून त्यास सूरतचे बंदरापर्यंत पोंचविलें नंतर तो हिजरी ९५२ व इसवी १५४५ या शकांत रमजान महिन्याचे सत्रावे तारिखेस सूरत बंदरा जवळ मारला गेला.

ही गोष्ट जाहाल्या नंतर सुलतानानें दार्याखां आणि

अलमखां यांजवर हल्ला करण्या विषयीं फौज नेण्यास सय्यद मुबरक यास हुकूम दिला नंतर त्याणे त्याशीं लढाई करून, त्यास जिंकून गुजराथेंतून हाकून दिलें. नंतर ते दोघेजण दिल्लींत शिरशाहा कडे गेले.

या समयीं सुलतानानें विषय सुखाचा त्याग केला येणेकरून राज्यास वळकटी येऊन अमल कर्डा जाला. शिपाई व बडेलोक राज्याचा बंदोबस्त करण्या मध्यें इतके गुंतले, कीं त्यांस अवज्ञा करण्यास शक्ती नव्हती या समयीं सुलतानास माळवा घ्यावा अशी इछा जाली, परंतु सुलतानानें असफ़खां प्रधानास विचारलें, तेव्हां तो प्रधान बोलिला, कीं गुजराथेंतील जो चतुर्थांश देश रजपूत, ग्रासीयंस, आणि कोळी लोक, यांस वांटून दिला आहे तो, घेतल्यानें माळव्या इतका देश होईल. चतुर्थांश देश सरकारी वहिवाटी खालीं आला, तर जाहागिरी प्रमाणे पंचवीस हजार घोड्यांचे पोषणार्थ पुरेसा होईल असें प्रधान बोलल्या वरून तो देश परत घ्यावयास हुकूम जाला, ह्मणोन इडूर, शिरोई, दंगारपूर, बनस्वारा, लोणावारा, राजपिंपला, माहेंद्री नदीचे किनाऱ्यावरील व हालवाड या देशांतील सर्व ग्रासीयस[*] लोकानीं दंगा मांडला शिरोई, इडूर आणि दुसरे ठिकाणीं, शिपाई लोक यांचीं ठाणी होतीं, त्यांस हुकूम दिला कीं, त्या देशांत रजपूत लोक, अथवा कोळी

---

[*] ह्मणजे जे जुलुमाने जमीन घेनात ते.

लोक, असा नवास ठेवूंनये, परंतु जे लोक सरकारी शिपायांत आहेत, त्यांस अथवा जे व्यापारी आहेत त्यांस, अथवा जांचे उजव्ये दंडावर अमुक जातीची खूण असेल त्या खेरीज दुसरा त्या जातीचा सांपडल्यास फांशीं द्यावा.

असे हुकूम पाठविल्यामुळें त्या देशामध्यें या राजाचे शेवट पर्यंत मुसलमान लोकांचे धर्मास इतकें श्रेष्ठत्व आलें होतें, कीं हिंदूलोलांस शहरांतून घोड्यावर बसून जावयास बंदी असे. व जे पाईं चालत, त्यांस कफणी खेरीज दुसरें आंगावर वस्त्र घेऊन जाण्यास बंदी असे. व हिंद्वी सण होळी, दिपवाळी इत्यादि सर्व बंद जाले असत. लोक असें ह्मणतात कीं ब्राह्मणानें सुलतानास ठार मारल्या नंतर ग्राशनस, आणि कोळी लोक, यांणी सुलतानास जाणें ठार मारलें होतें, त्याची प्रतिमा करून तीस पुजीत असत. आणि प्रार्थना करीत कीं तूं आमचा संरक्षण करणार आहेस. आणि तूं आमचे सत्य नाशापासून संरक्षण करीता जालास.

मिराठा शिकंदरी या पुस्तकाचा ग्रंथ कर्त्यानें सुलतानाचे बरोबरीचे लोक आणि मित्र यांविषयीं पुस्तकांत लिहिलें आहे. तो ह्मणतो कीं सुलतान फकीरांवर फार दया ठेवी. व गरीब लोकांची त्यास फार दया येत असे, ह्मणून त्याणे अन्न सत्रें घालून तेथें चाकर

लोक ठेविले. कीं गरीब लोकानीं कांहीं मागीतलें, असतां त्याणीं त्यांस द्यावें. तो थंडीचे दिवसां मध्यें मशीदींत, व धर्मशाळांत, वारंवार जाई आणि भजनी लोकांस वस्त्रें व रजया देई. त्यांतून कित्येक दुर्व्यसनी लोक रजया विकीत, यास्तव त्याणे हुकूम केला जे एकच रजयी अशी मोठी करावी कीं ती बहुतांस पांघराव-यास पुरेल. व सर्वांचे मनांत विकावी असें येणार नाहीं, तेणेकरून ती विकली जाणार नाहीं.

जेव्हां बडेलोकांनीं राजाचा अमल चालविला, तेव्हां सुलतानास मोकळीक जाल्यामुळें तो हिजरी ९५३ व इसवी १५४६ या शकांत हवा खावयास महंमदाबादेस* गेला. तेथें त्याणें मोठाल्या इमारती बांधाव्या असा निश्चय केला. त्यास मृगया भूमी असें नावठेविलें. याची लांबी दोन कोश आणि रुंदी घोड्याचे धांवे इतकी असे. आणि प्रत्येक कोंपऱ्यावर एकेक मोठाला वाडा त्या वाड्याचे भिंतींस व पाख्यांस मुलामे होते, या प्रत्येक वाड्याचे उजवे हातचे दरवाजा शेजारीं एक चांगला बाजार वसविला आणि प्रत्येक दुकानामध्यें गिराइकाचे मर्जीस येईल तें घ्यावें, याकारितां एकेक लावण्य स्त्री ठेविली. सुलतान वारंवार शिकारीस जाई

---

* या शहराची स्थापना महंमद पहिला ज्यास बिगारा असें ह्मणत त्याणे हिजरी ८८० व इसवी १४७५ या शकांत केली.

तेव्हां तो या लावण्य स्त्रियांबरोबर सुख व कर्मणूक करीत असे. आणि वर्षातून एकवेळ रबिलावलचे पहिले तारिखेपासून बारावे तारिखे पर्यंत पैगंबर महंमद याचे जन्म दिवसाचा मोठा उत्साह होत असे तेव्हां फकीर शेख आणि विद्वान् लोक कचेरींत नित्य येत असत. पूर्वीं पासून चालत आलेले चाली प्रमाणें कांहीं वार्चात बारावे दिवशीं सुलतानानें मंडळीमध्यें मकेतील शारीफ याचा वेष धारण केला, आणि सर्व लोकांस खाना द्याव यास हुकूम दिला. असा क्रम मुझाफीर दुसरा याचे वेळे पासून पुढें चालत आला.

सुलतान महंमद दुसरा याणें हिजरी ९६१ व इसवी १५५३-५४ या शकांत उत्साह केला तेव्हां फार श्रम केले, आणि सर्व लोक जमले होते त्यांचा आशीर्वाद घेऊन निजावयास गेला. थोडे वेळ निद्रा करून लागलाच जागृत जाला. आणि सरबत व पाणी मागीतलें. तेव्हां ब्रऱ्हाण ह्मणून मुतबाख खान्यावर कामगार होता त्याणें सरबतांत कांहीं वीष मिसळून तें सुलतानास प्यावयास दिलें. थोडे वेळा नंतर सुलतानाचे शरीराची आगजाली आणि एक उलटी जाल्यावर त्याणे ब्रऱ्हाणास विचारिलें कीं तूं सरबत कसलें केलेंस त्याणे उत्तर दिलें कीं सरकार फार श्रम केल्यामुळें आजारी जाले. यास्तव कांहीं वेळ निजले ह्मणजे श्रम परिहार होतील. दुसऱ्या

दोन घटिका गेल्या नंतर सुलतान पुनः निजावयास गेला तेव्हां बऱ्हाणानें त्यास कटारीनें ठार मारलें. ही गोष्ट हिजरी ९६२ व इसवी १५५४ या शकांत पैगंबर उत्सा हाचे जन्म दिवशीं शुक्रवारीं जाली हा मूळ प्रथम राज्य करूं लागला. त्यास आठ वर्षें जालीं व जेव्हां राज्या- वर बसला तेव्हां सुमारे अकरा वर्षांचें वय होतें. या वरून तो आठ्ठावीस वर्षांचा होऊन मरण पावला असावा.

हा महादुष्ट बऱ्हाण याणे राजास ठार मारिलें हे मोठें अपकीर्ती होण्या जोगें दुष्ट कर्म केलें त्यांतत्याचे कूटांपैकीं मंडळी होती त्याणीं ही गोष्ट पुरती सिद्धीस नेण्याचा निश्चय केला आणि कांहीं शिपाई हत्यारबंद यांस राजाचे दिवाणखान्याचे शेजारील खोलींत लपवून हुकूम दिला कीं जो तुमच्याकडे येईल त्यास ठार मारावें हा बेत क- रून असफ् मुख्य प्रधान यास राजा तुह्मास मोठ्या जरूरीनें बोलावितो आहे या करितां क्षणभर उशीर न लावितां जरूरीनें यावें. असा निरोप पाठविला. या निरोपावरून प्रधान आला, तेव्हां बऱ्हाणानें उठून त्यास मोठ्या सत्कारानें ताजीम दिली, आणि सांगीतलें, कीं, सदर दिवाणखान्याचे पुढचे खोलींत जेथे हत्यारबंद शिपाई होते तेथे बसावें असा सुलतानाचा हुकूम आहे हा दुष्ट त्यास त्या खोलींत घालून आपण मागेंसरला आणि प्रधान आंत जातांच त्यास ठार मारलें आणि याप्रमाणें

खुदावंतखां यास बोलावून त्यास ठार मारलें इतमतखां यास ही बोलावणे पाठविलें होतें परंतु कांहीं दगा आहे असा त्याचे मनांत संशय येऊन तो शाहाणपणानें विचार करून गेला नाहीं त्याच वेळेस आफूजीलखां ह्मणोन दुसरा प्रधान यास ही बोलावणें पाठविलें होतें तो तेथे येतांच त्याची स्तुती करून बऱ्हाण हांसून ह्मणूं लागला कीं आपण मला कांहीं सहाय दिलें. तर मी आपणास जें पाहिजे तें देईन यावरून आफजीलखानानें उत्तर दिलें कीं दुष्टा तुझे काय बेत आहेत व तुं करितोस काय व बोलतोस काय. सरते शेवटीं बऱ्हाणास वाटलें कीं आफजीलखां आपल्या ह्मणण्या प्रमाणें करणार नाहीं ह्मणोन त्याणें त्यास ठार मारलें.

या दुष्टानें या खेरीज दुसरे कित्तेक खूनकरून आपले दुष्ट अंतःकरणाचें शांतवन केलें. आणि राजाचे खजीन्यास व सामान सुमानास हात घातला. आणि पोषाख चांगला करून सुलतान जो रत्नखचित पटा आपले गळ्यांत घालीत होता तो याणे आपले गळ्यांस बांधून जा रत्नखचित खुरचीवर सुलतान बसत होता तिजवर आपण कुत्र्यासारिखा बसला, आणि लोकांस बोलिला कीं, कुत्रा आचाऱ्याचे जाग्यावर बसतो.

या प्रमाणें राज्यकारभार पाहूं लागला आणि राजाचे फार चांगले घोडे होते, ते त्याणे आपले कूटांतील मंड-

ळीस सोन्या रुप्याचे अळंकार व खोगिरासुद्धां देऊन तुरंगांतील सर्व बंदिवान सोडून देण्यास हुकूम दिला, जाणीं सुलतानास मारावया करितां त्यास मदत दिली होती त्यांस त्याणें पैका व घोडे दिले. परंतु थोडे दिवसानीं त्यापैकीं कांहीं मंडळीस सोडून कांहीं जवळ ठेविले. ते वेळेस सर्व जगांत ही गोष्ट प्रख्यात जाली.

मयत सुलतान राजा याची मोठी विश्वासूक जीं मनुष्यें इमादुलमुल्क ह्मणून तुरकावरचा कामगार व आबीसन् लोकांवरील आलाघखां हे मोठ्यात्वरेनें राजाचे वाड्यांत गेले, आणि खजीन्यास कुलुपें घालून खजीन्यावर विश्वासु मनुष्यें ठेविली. नंतर ते बऱ्हाण यास हाकून देण्याकरितां गेले जेव्हां तो आपले, सर्व कूटांतील मंडळीसुद्धां बऱ्हाण वाड्याबाहेर आला तेव्हां बडे लोकांपैकीं शिरवाणखां ह्मणून होता तो पुढें सरसावला तेव्हां बऱ्हाण त्यास ह्मणतो. शिरवाणखां आपण योग्य समयावर आलां तेव्हां त्याणे उत्तर दिलें हो आलोंच आहें असें बोलून त्याणे घोड्यावर बसून बऱ्हाणास सडकून खांद्यावर घाव केला कीं तो त्याचे पांयाखालीं पडला, आणि त्याचे बरोबर होते त्यांस ही त्याणे ठार मारलें.

सय्यद मुबरक हा इतमतखां इत्यादि सर्व बडे लोक जमा करून राज्य कोणत्या रीतीनें चालवावें याचा विचार

करूं लागला मयत सुलतानास पाठीमागें कोणी वारस नव्हता ह्मणोन रिझायलूमुल्क यास त्याचा कोणी समंधी अहंमदखां होता त्यास अहंमदाबादेहून आणावयास पाठविलें रिझायलूमुल्क हा तेथून आला तों अहंमदखां वाण्याचे दुकानीं दाणे विकत घेत होता, नंतर त्याणे त्यास महंमदाबादेस आणलें.

---

## प्रकरण ११

लाटीफखां याचा पुत्र अहंमदखां दुसरा याचे राज्या विषयीं.

हिजरी ९६१ व इसवी १५५३ या शकांत रबीलाबलचे पंधावे तारिखेस सय्यद मुबरक यास राज्यांतील सरदार व बडेलोक याणीं मदत दिल्यामुळें त्याणें अहंमदखां याचा हात धरून त्यास गादीवर बसवून अहंमद सुलतान अशी पदवी दिली त्या दिवसा पासून राजाचा सय्यद मुबरक याजवर फार विश्वास जडला व त्याणे इतमतखां यास मुख्य प्रधान केलें.

सुलतान अहंमद हा ते वेळेस फारच लहान होता ह्मणून सर्व बडे लोकानी खजीना व देश हा राजा मोठा होई तों पर्यंत आपण वांटून घ्यावा असें ठरविलें. व सर्वांनी आपापले अधिकारा खालील प्रांतात दंगा बखेडा

न होऊ देतां देशांत शांतता व्हावी याविषयीं सावधगिरी ठेवून देशाचा बंदोबस्त करावा. खानदेशचा मुबरकशाहा यास गुजराथेंतील राज्य स्थितीची अवस्था अशी जाहाली, हें ठाऊक होतांच त्याणे गुजराथेंत यावयास स्वारी सिद्ध करून भडोच चे समोरचे बाजूस नर्मदेवर आपले फौजेसुद्धां येऊन तळ दिला. गुजराथेंतील सर्व बडे लोकानी तेथून निघून त्याचे समोरील बाजूस तळ दिला, आणि दोहीं कडून एकमेकांचीं बोलणीं चालणीं होऊन सरते शेवटीं सय्यद मुबरकशाहा याचे मध्यस्थीने तह जाहाला नंतर सर्व बडे लोक अहंमदाबादेस परत आले. परंतु थोडे दिवसानीं दोन टोळ्या होऊन त्यांपैकीं एक इतमतखानास जाऊन मिळाली. आणि दुसरी नासीरुल्मुल्क् याजकडे गेली. सय्यद मुबरक शूर, आणि कीर्तिमान्, मनुष्य याणे इतमतखानाचा पक्ष धरिला नंतर ते बडोद्यांशेजारी येऊन *त्यांची लढाई जाली. त्यांत सय्यद याचा मोड जाला. ही गोष्ट होई तोंपर्यंत या दोन टोळ्या एकमेकावर टपल्या होत्या. हा जिंकला गेला याचें कारण इतमतखां याणे सय्यद मुबरक यास सहाय्य दिलें नाहीं ह्मणून सय्यद मुबरक कापरवांज एथें आपले वतनावर पळून गेला. आणि इतमतखां हा लढाई नकरितां थोडे दिवसानीं सय्यद मुबरक याजकडे कापरवांज एथें आला.

---

* ह्मणजे सय्यद मुबरक आणि नाशीरल्मुल्क्.

नासीरल्मुल्क् सुलतान महंमद यास आपले बरोबर घेऊन महंमदाबादेमध्यें कुलअखत्यारीनें शिरला आणि तसाच कुलमुखत्यारीनें त्याणे राज्य कारभार दोन महिने पर्यंत चालविला. नंतर त्याणे कापरवांज एथें सय्यदमुबरक, आणि इतमतखां, यांस हाकून देण्याकरितां फौज नेली तेव्हां ते त्यास अडथळा करावयास आले. अलाघखां हपशी आणि इमादुलमुल्क् रुमी जांचे स्वाधीन सुलतान अहंमद होता, त्याणीं त्यासमयीं सय्यद मुबरक याजकडे सुलतानासुद्धां जाण्याचा निश्चय केला. आणि त्यांस भय वाटलें कीं जर नासीरल्मुल्क् याणे सय्यद आणि इतमतखां, यांस जिंकिलें तर तो मग आह्मावर येईल. एके दिवशीं उजाडतां त्याणीं शत्रूकडे सुलतानास नेलें ह्मणून नासीरल्मुल्क पळून गेला.

सय्यद मुबरक आणि इतमतखां, हे दोघे सुलतानास बरोबर घेऊन अहंमदा बादेस गेले, आणि तेथून नासीरल्मुल्क् जो पालदेशाकडे डोंगरी रानांत गेला होता, त्याचा पाठलाग करीत जात्येसमयीं इतमतखां याणे इखतीयरल्मुल्क् ह्मणोन त्याचे गुमास्त्यास अहंमदाबादेंत ठेविलें परंतु याणे सुलतान इतमतखाना बरोबर गेल्यानंतर दोन दिवसानीं शाहू ह्मणून सुलतानाचा चुलता यास साहाय देऊन नवा दंगा मांडिला.

सय्यद मुबरक आणि दुसरे लोक यांस ही गोष्ट

कळतांच ते भडोंचे हून अहंमदाबादेस येण्यास निघाले परंतु शाहू आणि त्याचे मदती हे सय्यद मुबरक महंमदाबादे पर्यंत येतांच त्यांजवर चढ करून आले. नंतर तेथें अहंमदाबादेपासून चारकोश, आफराशहर आहे तेथें उभयतांची लढाई जाली, तींत शाहू, आणि दुसरे बंडांतील लोक, जाणीं त्यास मदत दिली होती, त्यांस पळवून लावलें. सय्यद मुबरक हा सुलतानास आपले बरोबर घेऊन जयानें अहंमदाबादेस आला, थोडे दिवसांनंतर सर्व बडेलोकांनीं पूर्वीं ठरल्या प्रमाणें देश वांटून घेतला आणि सुलतान, इतमतखां, हे दोघे अहंमदाबादेंत स्वस्थ राहिले.

देशांत बंड नाहीं असें कधींच जालें होतें काय ? हे समयीं दार्याखां मेला, आणि देशापार केलेला त्याचा मित्र अलमखां लोदी जो दिल्लीचे शिरशाहा जवळ होता त्याणें पत्र पाठविलें कीं माझानें एथे राहावत नाहीं, थोडे दिवसानीं तो अहंमदाबादेस येऊन सय्यद मुबरक याचें मन मिळवून घेऊं लागला. इतमतखां, व इमादुलमुल्क याचें आणि सय्यद मुबरक याचें वांकडें पडून सरते शेवटीं अलमखां लोधी याचे मसलतीनें व उपदेशानें त्याणी लढाई केली. हे सरदार सुलतानास बरोबर घेऊन लढाईस पुढें आले, परंतु अलमखां लोधी याणें ही गोष्ट केली असें समजलें. तेव्हां ते एकामेकास भेटून सुल-

तानास सय्यद मुबरक याजकडे पुनः पाठविलें अलमखां लोधी यासमयीं डोंगरीं देशांत पाळकडे पळून गेला, आणि फौजेवरील दोघे सरदार काहीं कोशपर्यंत त्यांचा पाठलाग करीत जाऊन पुनः चांपनीर किल्याकडे आले.

खानदेशाचा मुबारक शाहा हा राज्याची अशी अवस्था समजल्यावरून पुनः फौज घेऊन गुजराथेंत आला. आणि लढाई न करितां गुजराथेंतून परत गेला. सुलतानानें मग खासगींत नवे चाकर लोक ठेविले तरी इतमदखान, व इमादुलूमुल्कू या दोघांचे हातांत सर्व राज्य कारभार होता तेव्हां दोघे एकमेकापेक्षां श्रेष्ठ व्हाव यास यत्न करूं लागले असतां या दोघाचे विश्वासु चाकर सुलतानाची पाळी पाळीनें चौकशीं ठेवीत, ईश्वर सत्तेने गुजराथेंतील बडे लोकांचा विनाश काळ आला, तेव्हां त्याणीं हें काम एकमेकाशीं लढाई करून शेवटास नेले खोटी शपथ वाहून पुनः तह केला तरी त्याणीं लाभ होईल, या बुद्धीनें आपल्या धर्मास व्यत्यय आणिला. सय्यद मुबारक यास वाटलें कीं दोघांमध्यें तह करावा आणि दंगा ही बंद करावा ह्मणोन तो मध्यस्थी करूं लागला.

कांहीं दिवस या रीतीनें गेले नंतर इमादुलूमुल्कू रुमी व इतमतखां यांमध्यें द्वेष पडला. हा द्वेष सुलतानानें इतमतखां याचे ताब्यापासून सुटून जाण्याकरितां इमादु-

लूमुल्क् याचा पक्ष धरला. तेव्हां उघड जाला. इतमतखां यास याविषयीं फार राग येऊन तो खानदेशाचे मुबरक शाहाकडे गेला, आणि त्यास आपले बरोबर आणून गुजराथेंत चढाव करून आला, तेव्हां सय्यद मुबरक याणें इतमतखां यास चांगला उपदेश दिल्यामुळें तो प्रधानकीवर आला. या समयीं सुलतानास समजलें कीं इमादुलमुल्क याजकडून आतां आपले हातांत राज्य येत नाहीं आणि आपणास पुनः इतमतखानाचे ताब्यांत राहावें लागेल. ह्मणोन तो कांहीं आपले मित्र बरोबर घेऊन महंमदाबादे शेजारीं सय्यद पूर येथे चोरून आला. सुलतान या रीतीनें आला ह्मणून ही गोष्ट बरोबर न वाटून, सय्यद मुबरक याणे त्याचे मित्रांस दोष ठेवून सांगीतले, कीं तुह्मी सुलतानास अशा रीतीनें आणिलें ही गोष्ट अयोग्य केलीत.

या समयीं हाजीखां ह्मणोन दिल्लीचे इस्लाम शाहा राजाचे फौजेवरील फार हुशार कामगार, हा हुमायन पादशाहाचे फौजेनें दिल्ली शहर घेतल्यामुळें पन्नास हजार घोडे, व शंभर हत्ती घेऊन गुजराथ घेण्याकरितां शहर सोडून निघाला. हाजीखां याणे इकडे येत असतां रस्त्यावर राणाशीं लढाई करून त्यास जिंकिलें, आणि विजयी होऊन गुजराथेकडे आला. इतमतखां, व इमादुलमुल्क् या दोघांस वाटलें कीं, सुलतान, आणि सय्यद मुबरक, याणी

हजीखां यास मदतीस बोलाविल्या वरून तो आला. ह्मणून त्याणे हाजी येण्याचे पूर्वीं सय्यद मुबरक यास ठार मारण्याचा निश्चय केला. इतमतखां, आणि इमा-दुलूमुल्क् ह्या दोघानी तीस हजार स्वांर व कांहीं तोफा बरोबर घेऊन महंमदाबादे शेजारीं येऊन तळ दिला, आणि एकमेकाकडून एकमेकांस जिरोप आल्यावर लढाई जाली, ते वेळेस सय्यद मुबरक हा मेला गेला. व सय्यदपूर ही लुटले गेलें. आणि गुजराथेंतील लोकांचा चाली अशा आहेत, कीं शत्रू धरले, किंवा मारले ह्मणजे, त्यांचे कुटुंबानें आपलें फार वाईट इछिलें अथवा शत्रुत्व केले तरी त्याणी त्या कुटुंबाचा आदर, सत्कार करावा, त्या प्रमाणें याणें ही केलें.

फौजेवरील कामगार एकमेकापासून निराळे होऊन दाहाबारा कोशांवर आपापले फौजेसुद्धां राहूं लागले, परंतु प्रत्येक छावणींतील, लोक, वारंवार शहरांत येत असत. कांहीं दिवसा नंतर मध्यस्थानी मध्यस्थी केल्या मुळें तह जाला. तात्पर्य सय्यद मुबरक याचा पुत्र सय्यद मिरान आपलें कुटुंब, व लोकांसहीत कापर-वांज एथें गेला, आणि इतमतखां, व इमादुलूमुल्क्, हे दोघे सुलतानास बरोबर घेऊन अहंमदाबादेस गेले, आणि तेथे दोघानीं एकमेकाशीं गुप्त पणे तह केला.

थोडे दिवसां नंतर इतमतखां व इमादुलूमुल्क् याणीं

विनंती केल्यामुळें सय्यद मिरान अहंमदाबादेस आला यावेळेंस दोघांमध्यें पुनः वांकडें आल्यामुळें सुलतानाने पुनः इमादुलूमुल्क् याशीं कारस्थान चालविलें, नंतर इमादुलूमुल्क् याणें आपला पुत्र जागीजखां यास भडोच येथें आणावयास पाठविलें. इतमतखां याणें जुन्यागढा हून नातरखां घाजी यास बोलाविलें नंतर अहंमदाबाद सोडून शेजारील देशांत फौज जमाकरून इमादुलूमुल्क् रुमी यास निरोप पाठविला कीं तूं शहर सोडून आपले जाहागिरीवर जाऊन राहा. इमादुलूमुल्क् याणे विचार केला कीं, आपणास येथें राहावत नाहीं ह्मणून तो आलाघखां हपशी यास बरोबर घेऊन भडोच कडे गेला तेव्हां अलाघखां याणे त्यास बडोदें दिलें.

इतमतखां याणे आपले विश्वासु चाकर सुलतानाचे पालतीवर ठेविले, आणि राज्य करावयास कोणाची हरकत नव्हती, व सर्व गोष्टीची त्यास अखत्यारी होती ह्मणून त्याणें हाजिखां यास कोरी चा अर्धा परगणा जाहागिरी बद्दल देऊन चाकरीस ठेविलें. त्याणें मुसाखां व दुसरे लोकयांस आपापले जाहागिरी वर जावयास सांगीतलें.

या वेळेस वर्तमान येऊन पोंचलें, कीं इमादुलूमुल्क् यास याचा मेहुणा इखतीयरलखां जो सुरतेंत होता त्याणें ठार मारिलें, आणि कांहीं महिन्यानंतर इमादुलू-

मुल्क् याचा मुलगा जांगजिखां याणें त्याचे बापास जाणें ठार मारिलें होतें, त्यास त्याणें ठार मारून सुड उगविला. या गडबडीमध्यें इतमतखानानें ब्रोचे वर फौज नेली, परंतु पट्टण, आणि राधानपूरचे जिल्ह्यांत बंड जाल्यामुळें तो लागलाच अहंमदाबादेस परत आला. इतमतखां गुजराथेंत सर्व देशांतून फार लोक जमले होते, ते सुलतानाचे पक्षाचे होते ह्मणून सुलतान फंद करील याकरितां त्याचे पालतीवर होता प्रधानांस वाटलें, कीं कांहीं संकट प्राप्त होईल, आणि ते वेळेस त्याचे निवारणार्थ माझी तयारी नसेल ह्मणोन तो फार काळजी करूं लागला सुलतान अहंमद फार दुष्ट आणि सुक्ष्म स्वभावाचा असे. तो वारंवार दारू पिऊन मस्त होई तेव्हां हातांत तलवार घेऊन केळीचें झाड तोडून ह्मणें कीं इतमतखां याचें डोचकें मीं उडविलें. आणि इमाडुल्मुल्क् याचे शरीराचे तुकडे तुकडे केले. या प्रमाणे कित्येक बडे लोक ठार मारले असें बोले. यावरून इतमतखानाचे हाताखालील कामगार वाजीहल्मुल्क् हा त्यास नेहेमी उपदेश करी, कीं सुलतानानें घात केल्याचे पूर्वीं तुह्मी त्यास ठार मारावें, सुलतान अहंमद ते वेळेस इतका बळकट होता, कीं त्यास घोड्यावर बसून तीन कोश कर्मणूकी करितां अथवा शिकारी करितां जाण्याची शक्ती असे, आणि सुलतान नेहेमी अवेळीं इतमतखानाचे घरीं जात असे. तेव्हां इत-

मतखां त्यास भीतभीत येऊन भेटे. वाजीहल्मुल्क् इतमतखां यास सुलतानास ठार मारण्या विषयीं सांगे तरी इतमतखां ही गोष्ट लांबणीवर टाकी, एके दिवशीं वाजीहल्मुल्क् याणे सुलतानास निरोप पाठविला, कीं मला मुख्य प्रधान करूं असें वचन दिलें तर मी इतमतखानास ठार मारितों, याणें हें कपट केलें, हें ठाऊक नसतां सुलतानानें त्यास सांगीतलें कीं तूं इतमतखानास मारिशील तर मी तुला मुख्य प्रधान करीन. परंतु वाजीहल्मुल्क् याणे ही गोष्ट इतमतखानास सांगीतली. तेव्हां तो बोलिला कीं मी आपले कानानें ऐकिल्या शिवाय मला खरें वाटणार नाहीं. वाज़ीहल्मुल्क् याणें यास्तव इतमतखानास बाहादूर खानाचे घराशेजारील घरामध्यें एके रात्री नेऊन दिवाण खान्याचे खोलींत लपविलें. आणि सुलतानास निरोप पाठविला, कीं माझाने प्रसिद्धपणे आपली गांठ इतमतखानांचे शिपायांचे भयामुळें घेववत नाहीं, या करितां सरकारानीं एवढे श्रम घेऊन बेताप्रमाणें गोष्ट सिद्धीस नेण्या करितां मला भेटलें पाहिजे. नंतर वाजीहल्मुल्क् याणें इतमतखानास लपविलें होतें, त्याखोलीचे दाराशीं राजाची बैठक घालून सुलतान बेताप्रमाणे येऊन तेथें बसला, तेव्हां वाजीहल्मुल्क् याणें पुनः तोच मजकूर उजरून सुलतानानें बोलावा ह्मणजे बेताप्रमाणें होईल, अशी विनंती केल्यावरून राजानें काळें गोरें

मनांत न आणितां सर्व मजकूराचा उच्चार पुनः केला इतमतखानानें सर्व बोलणे ऐकिलें तेव्हां त्या खोलींतून बाहेर येऊन सुलतानास विचारिलें, कीं मी तुझा गुन्हा काय केला जे तूं मला ठार मारितोस ? सुलतान भयभीत होऊन त्यास फार आश्चीर्य वाटलें. इतक्यांत इतमतखां याचे चाकरानीं त्यांस सांगीतल्या प्रमाणें सुलतानास दांडक्यानीं बडविलें आणि त्याचा प्राण घेतला. नंतर त्याचा मुडदा नेऊन बाहादूराचे घराजवळ साबरमतीचे वाळ्वेंत टाकून दिला. ही गोष्ट हिजरी९६८ व इसवी १५६०-६१ या शकांत साबानचे पांचवे तारिखेस सोमवारीं घडली.

जांस सुलतानाचा मुडदा सांपडला त्यांस वाटलें कीं सुलतानाचे अत्यंत मित्रांपैकीं कोणी त्यास ठार मारलें. नंतर त्याणी तो मुडदा तेथून,नेऊन सुलतान अहंमदपहिला याचे मशीदींत पुरला.

सुलतान ठार मारला गेल्याचे पूर्वीं बैरामखां हा मक्का येथें जात असतां तो वाटेवर पट्टण शहराजवळ ठार मारलागेला होता, यास अरस अशीयनी अकबर पादशाहा याणे त्या वर्षीं कित्तेक कारणा मुळें या पुण्य क्षेत्राची यात्रा करावयास सांगीतलें होतें. बैरामखां पट्टण शहरांत येऊन पोंचल्या नंतर तेथील मैदाना मध्यें कांहीं दिवस विसावा घ्यावा या बेतानें तळ देऊन राहिला

होता. त्या देशामध्यें मुसाखां फाउलादि हावेकैदीनें वागत होता ह्मणून आफघान लोक जाणी त्या देशांत बंडकेलें ते एकत्र जमले. यांमध्यें मुबरकखां लोहानी या नामें-करून एक ग्रहस्थ होता. त्याचा बाप गफलतीनें बैरा-मखां याचे हातून माचीवार येथें लढाई जाली तींत मारला गेला होता. ह्मणून मुबरकखां याणे सूड उगवावा असा निश्चय केला. आफ्घान लोकानीं मुबरक लोहानी याचा बाप मारला यामुळें, व काश्मीर देशांतील राहा-णारी बाइको इला, तिचा नवरा शिलीमखां याजकडून एक मुलगी जाली होती, ती बैरामखां याचे पुत्रास देऊं केली ह्मणून ती त्याजबरोबर मक्केस जात होती, यास्तव आफघान लोकानीं बंड केलें एके दिवशीं बैरामखान हा शहरा जवळ मोठें तळें होतें, त्यातळ्याचे माध्य भागीं पाण्यात बंगला होता तेथें गेला आणि जा होडींतून बसून गेला होता, तींतून उतरून माघारा येऊन घोड्या-वर बसत होता, इतक्यांत मुबरकखां लोहानी आफघान तीस चाळीस लोक बरोबर घेऊन तेथें येऊन पोंचला. या समयीं हा दुष्ट आफ्घान याची बैरामखान यागें प्रार्थना केली कीं मी तुह्मास बरोबर नेतों, तरी त्याणे त्याचे पाठींत जंबिया खुपसला, तो त्याचे पोटातून बाहेर निघाला, नंतर दुसऱ्यानीं आपल्या तरवारी काढून पुरतें काम काढलें. त्याचे बरोबरचे लोक घाबरून भयभीत

जाले आणि पळून गेले, व त्याचा मुडदा तेथेंच मातींत रक्त वाहात पडूंदिला, तो तेथेंच पडला होता, तेव्हां तेथील फकीर आणि राहाणारे लोक याणीं नेऊन शेक हिसाम याचे मशीदीं शेजारील थडग्यांत पुरला. ही गोष्ट हिजरी ९६८ व इसवी १५६०-६१ या शकांत जमा दिलोवलचे चौदावे तारिखेस शुक्रवारीं जाहाली.

बैरामखां याचा मुडदा नंतर हुसेन कुलीखां याणे श्रम केल्या मुळें माशाद या पवित्र शहरा मध्यें नेला आणि तेथें पुरला.

बैरामखां मेल्यानंतर पट्टण चे चोरानीं त्याचे बरोबरचे लोकांस लुटून त्यांजवळ काहीं ठेविलें नाहीं. खोवाजा हा मालीक आणि दुसरे कित्तेक लोकानीं बैरामखां याचा मुलगा अबदूल करीम (खरा वारस दार) यास त्याचे आईसुद्धां मोठे संकटापासून बचाविलें. आणि त्यास अहंमदा बादेंत पाठवून दिलें. ते तेथून दिल्लीस चारमहिन्यानीं अकबर पादशाहा याचे हुकुमानें त्यास भेटायास आले.

---

## प्रकरण १२

सुलतान मुझाफीर तिसरा जो नाथू या नामें प्रसिद्ध

होता, व गुजराथेंतील, राजवंशांतील शेवटचा पुरूष होता. त्याचे राज्या विषयीं

हिजरी ९६८ व इसवी १५६१ या शकांत सुलतान अहंमद मारला गेल्यानंतर इतमतखां याणें मुझाफीर यास राज्यावर बसविलें. कितीएक ग्रंथकर्त्यांचे इतिहासां प्रमाणें इतमतखां याचे हातांत सर्व राज्य कारभार होता. तेव्हां सुलतानाचा कोणी समंधी राज्यावर बसविण्यास योग्य नव्हता ह्मणून त्याणे एक नातू या नामें करून मुलगा आणून भर कचेरी मध्यें उघडपणें शपथ घेतली, कीं सुलतान महंमद सेकंड* याचा हा पुत्र आहे. याचा वृत्तांत असा आहे, कीं या मुलाची आई गरोदर होती, तेव्हां तिचे पोटचे पाडण्या करितां तिला माझे स्वाधीन केलें परंतु पांच महिनें जाल्यावर पोटचें पडेना. हा मुलगा उपजल्यावर मी या मुलास गुप्तपणें वाढविलें आणि राज्यास या खेरीज दुसरा वारसदार नाहीं. सर्वांनीं याप्रमाणें मत्त दिलें, आणि या मुलास मुझाफीर शाहा अशी पदवी देऊन इतमतखां याचे ह्मणण्या प्रमाणें गादीवर बसविलें.

कांहीं महिने लोटल्या नंतर इतमतखां याणें फातखां बलोची याचा सुड घेण्याकरितां मुझाखां आणि शीरखां फाउलादी यांजवर पट्टण येथें फौज नेली. सर्व बडेलो

---

* ह्मणजे दुसरा.

कांस ही गोष्ट पूर्वींच माहीत होती आणि सुलतान ठार मारला गेला असें कळल्यावर इतमतखानावर फार त्रासून तो त्याचे जीवाचा घात करील या भयानें मात्र ते त्याशीं उगीच लागून होते. प्रधान फौज घेऊन पट्टण शहरा कडे येऊन पोंचला तेव्हां त्याची आणि मुसाखां व शिरखां यांची लढाई जाली, त्या लढाईंत इतमतखां जिंकला गेला. आणि सर्व बडेलोक लढाई नकरितां अहंमदाबादेस परत आले. सर्व बडेलोक यास प्रतिकूळ होते व आपापले जाहागिरीवर गेले होते, तरी इतमतखां याणें पुनः फौज जमवावी असा निश्चय करून अतिशय यत्न केला इतमतखाना जवळ जितकी फौज होती, तितकी घेऊन मुसाखां, शिरखां, यांजवर पुनः चढाव करून गेला. आणि पुनः जिंकला जाउन अहंमदाबादेस परत आला. ही लढाई हिजरी ९६९ व इसवी १५६१-६२ या शकांत जाली.

सरते शेवटीं सर्व बडे लोकांमध्यें एकमेकाशीं चुरसा लागल्या, व श्रेष्टत्वा करितां कज्या लागल्यामुळें इतमतखानाने शहर सोडल्या वरून ते जागीजखां याचे ताब्यांत आलें, तेव्हां तोही आबीसीन लोकां कडून ठार मारला गेला. या गोष्टी विषयींचा आणि राज्यामध्यें बेकैदजाली येविषयींचा सर्व मजकूर मिराठा शिकंदरी मध्यें वर्णिला आहे.

अरस अशीयनी अकबर पादशाहा याचे फौजेस गुजराथेमध्यें पुष्कळवेळ सुलतान मुझाफीर याचे राज्याचा शेवट जाल्या नंतर जय मिळाले, या विषयीं व आझीम मिरझा आजीज कोका यास पुनः राज्य हिजरी १००० व इसवी १५९१ या शकांत मिळालें या विषयीं सर्व वर्णन अद्यापी ही लिहिण्यांत येईल, परंतु ईश्वरेछेने आह्मी अकबर याणें हा देश घेतला याविषयीं व तेवेळे पासून नाझीम लोक गुजराथेमध्यें नेमले गेले होते त्याणीं राज्य कारभार कसकसाकेला, याविषयींचें थोडेसें वर्णन लिहितों, यास्तव नाझीमाचे कामावर जे बारमाही नेमिले होते, त्यांचे व जे कांहीं दिवस काम चालविण्या करितां नाझीमाचे कामावर नेमिले होते, त्यांचे अमलात जाजा गोष्टी जाल्या त्यां विषयीं सर्व वर्णन लिहिणे प्राप्त आहे. मिराठा अहंमदी या पुस्तकांत बहुतकरून वसुली कायदे व मुख्य कमावीसदाराचे नावाने देशाचा बंदोबस्त करण्या विषयीं जे जे हुकूम जाले ते बार जाले आहेत. यास्तव निझाम अथवा प्रत्येक सुभेदारांचा दिवाणाचीं नावें लिहिलीं आहेत. फौजदार, अमलदार, यांची बरोबर माहिती नाहीं ह्मणोन त्यांचा सविस्तर वृत्तांत लिहिला नाहीं, तथापि जेथें कारण पडलें आहे तेथें त्यां पैकीं कित्तेकांचीं नावें लिहिलीं आहेत, आणि कमावीस दाराचें व सुभेदाराचें

काम एक सारिखेंच असतें, ह्मणून त्याचें वर्णन फारसें लिहिलें नाहीं.

---

# भाग ३.

गुजराथदेश अकबरानें घेऊन मोंगलाचे राज्यांत दिलीस मिळविला त्या विषयीं.

---

## प्रकरण १

साहेबी किरन अमीर टैमर कुरकान याचे वंशांतील पुरुषानी हिंदुस्थानामध्यें राज्य केलें त्या विषयींचा वृत्तांत.

या नामांकित राज कुळांतील पुरूष वंश परंपरा किती दिवस पर्यंत राज्य करीत आले या विषयीं विचार करून पाहिलें असतां आश्चीर्य वाटण्या जोगें आहे. पाहा कीं जा कुळांतील पूर्वज आदमपासून पुढील पुरूष कोणी बादशाहा, व कोणी राजे, होत आले. पदार्थ मात्र देणारा जो ईश्वर त्याणें याकुळांतील पुरुषांस उदारत्व, न्याय, नीति, आणि परोपकारीपणा, दिला होता, तो इतका असे कीं इतिहासांतील शोधक पुरूषानी शोधून पाहिलें असतां, त्यांस असें समजून येईल, कीं सर्व पृथ्वीवरील राजे लोकांस या कुळांतील पुरुषानीं राज्यें

दिली. दुसऱ्या देशांतील राजांप्रमाणे न करितां, या कुळांतील पुरूष जर कोणी फिरस्ता गरीब लोक इराण, तुराण, रुमीलिया, आसीरिया. आराबिया, आबिसीनीया, एथें आल्यास त्यांचा मनोरथ पूर्ण करीत. इतकें वैभव अधिकार व लक्ष्मी असे तथापि त्याचे चाकरा पैकीं अती नीच चाकराशीं ही त्याणे अभीमान, किंवा उन्मत्तपणा, काडीमात्र न करितां आमचे धर्मास उत्तेजन दिलें. लोक असें सांगतात कीं साहेबी किरन दुसरा उर्फ शाहाजहान पादशाहा हा राज्य करूं लागला, तेव्हां आपण मयूर पिछाचे एक कोटि रुपयांचे किमतीचें ह्मणजे इजिप्त देशांतील कित्तेक वर्षांचे वसुलाचे किमतीचे सिंहासनावर बसला नंतर दोनवेळ गुढगे टेकून बोलिला कीं इजिप्त देशातील राजा प्यारोह यास हस्तिदंती सिंहासन होतें, तरी तो बोलिला, कीं मी ईश्वर अथवा इश्वरेश्वर आहें. तेव्हां मी सर्व देशाचा धणी आहे, तथापि माझानें ईश्वरास असें बोलवणार नाहीं. व ईश्वरास असें न बोलणें हें किती चांगलें आहे अशी इश्वराची स्तुती केल्यानें आह्मास भरंवसा आहे, कीं ईश्वर या योग्य कुळांतील पुरुषांस सदां राज्यावर काईम राखील असें असतांही असें घडलें, कीं सर्व पृथ्वीवर इराणी, तुराणी तही उलटा पालट व, दंगे जाले, तथापि या कुळींचेच

राजे अद्यापि हिंदुस्थानांत राज्य करीत आहेत, हा ईश्वराचा आह्मावर मोठा उपकार आहे.

अमीर टैमीर साहेबी किरन याणें हिंदुस्थानांतील मुख्य शहर हिजरी ८०१ व इसवी १३९८-९९ याशकांचे आरंभीं घेतलें. हें सर्वांस माहीत असेलच आणि एका वर्षांमध्यें सर्व देश घेऊन वर्षाचे शेवटीं समरकह्यांड येथे आपले शहराकडे गेला. सुलतान महंमद तोघलख हा तेवेळेस दिल्लीचा राजा होता, यास टैमर याणे जिंकिल्यामुळें तो गुजराथेंत पळून गेला. तेथें मुझाफीरखां राजा अशी पदवी घेऊन राजाप्रमाणें वागत होता. आणि महंमद तोघलक यास गुजराथेंत कोणी मदती मिळाला नाहीं ह्मणून तो पूर्वी लिहिल्या प्रमाणें माळव्याकडे गेला.

टैमर याचा नातू अमरशेख मिरझा याचा पुत्र फिर दासमाक निजाहिरुदीन महंमद बाबर हा काबुल सोडून हिंदुस्थान घ्यावयास हिजरी ९३२ व इसवी १५२५-२६ या शकांत आला, आणि दिल्ली अग्रा, व पूर्वेकडील दुसरीं कित्येक शहरें घेतलीं. ही गोष्ट गुजराथेचा राजा सुलतान मुझाफीर दुसरा याचे राज्याचे शेवटीं जाली. हा मेल्या नंतर अनुक्रमानें सुलतान शिकंदर, व सुलतान बाहादुर, हे गादीवर बसले. आणि बाहादूर राजाचे पांचवे वर्षी बाबर राजा हिजरी९३७ व इसवी १५३० या शकांत जमादिलोवल महिन्याचे

साहावे तारिखेस आग्रा येथें मेला, आणि त्यास काबु-लाकडे नेऊन तेथे पुरलें. यावरून बाबर याणें साहावर्षें राज्य केलेसें वाटतें.

बाबर मेल्या नंतर त्याचा पुत्र नासरूद्दीन हामायनपादशाहा उर्फ जानंत अशीयनी हा त्याचे गादीवर बसला. आणि हिजरी ९३७ सांत जमादिलोवलचे नऊवे तारिखेस आग्रा येथें राज्य करूं लागला. हा राज्यावर बसल्याची तारीख पुडें लिहिलेले शब्दांत आहे (खैरु-लमुल्क्) हेवेळेस सुलतान बाहादूर गुजराथेंत राज्य करीत होता. हामायन यास महंमदझामन मिरझा याचे कारभारा विषयीं सुलतान बाहादुराचा फार राग आला, ह्मणून हिजरी ९४१ व इसवी १५३४-३५ या शकांत तो त्याजवर फौज घेऊन आला. तेवेळेस बाहादुरानें चितूराकडे वेढा घातला होता. नंतर सुलतानास जिंकून चांपनीर किल्ला हामायन याणे घेतला. या गोष्टी विषयीं मिराठा शिकंदरी या पुस्तकांत काहींसें लिहिलें आहे. व अकबर नामा पुस्तकांत सर्व लिहिलें आहे.

काहीं वर्षें लोटल्या नंतर हामायन इराण एथें गेला. आणि तेथुन झुलहिजा महिन्याचे पंधरावे तारिखेस माघारा येऊन हिजरी ९६२ व इसवी १५५५ याशकांत जा लोकानी याजवर बंड केलें होतें त्यां जवळून पुनः देश घेऊन त्यांजवर सर्व आपला अमल ठेविला. त्या

वेळेस गुजराथेंतील सुलतान बाहादूर यास राज्यावरून काढिलें आणि सुलतान महंमद दुसरा यास ठार मारलें. व सुलतान अहंमद दुसरा यास राज्यावर बसविलें. ते वेळेस हिजरी ९६३ या शकांत रबिलोवलचे तेरावे तारिखेस हुमायन दिल्लींत मेला, आणि जा मशिदीस हुमायनची मशीद असें ह्मणतात तींत त्यास पुरलें तो हिंदुस्थानांत राज्य करूं लागल्या पासून त्याणें पंचवीस वर्षें दोन महिने व दोन दिवस राज्य केलें.

हुमायन मरण पावल्या नंतर त्याचा लेंक आरष आशीयनी जाला लुदिन महंमद अकबर हा कालानर शहरामध्यें इतगाहा एथें रबी असनी महिन्याचे दुसरे तारिखेस शुक्रवारीं दोन प्रहरीं राज्यावर बसला. तेवेळेस सुलतान अहंमद दुसरा हा गुजराथेंत राज्य करीत होता. हिजरी ९८० या शकांत रज्जबचे चौदावे तारिखेस मुझाफीर तिसरा हा राज्य करूं लागल्या पासून जेव्हां तेरा वर्षें पूर्ण जालीं, तेव्हां गुजराथ देश सर्व अकबराचे ताब्यांत आला. हें हिंदुस्थानाचे प्रकरणा बरोबर मिराठा शिकंदरी या पुस्तकांत लिहिल्या प्रमाणें पुढें लिहिण्यांत येईल. अकबर हिजरी १०१४ या शकांत जमादासनी महिन्याचे बारावे तारिखेस बुधवारीं मयत जाला. आणि शिकंदरा एथें जी मशीद आहे तींत

त्यास पुरलें. याणें एकावनवर्षें दोन महिने आणि नऊ दिवस पर्यंत राज्य केलें. तेवेळेस वर्ष चांद्रमानानें असे. एकावन वर्षां मध्यें गुजराथे चे सुभ्यावर नऊ कामगार नेमिले.

याचा लेंक जानंत माकनी नरुदीन महंमद झाहांगीर हा आपले बापाचे गादीवर बसला. आणि अकबराबाद अथवा आग्रा येथें शुक्रवारीं याच वर्षीं जुमादासनी महिन्याचे चौदावे तारिखे पासून राज्य करूंलागला. आणि लाहोर एथें राजगादी होती, ह्मणून काश्मिराहून लाहोराकडे येत असतां जानक हाट्टि एथें हिजरी १०३७ या वर्षामध्यें सफर महिन्याचे अठ्ठाविसावे तारिखेस आदित्यवारीं दोन प्रहरीं मेला आणि त्यास लाहोराजवळचे मशीदींत पुरलें. या राजाने एकवीस वर्षें एकमहिना पर्यंत राज्य केलें. याचे राज्यांत एकवीस वर्षांत गुजराथेमध्यें आठ सुभेदार जाले.

शाहा जाहान पादशाहा जास फिरदास अशीयनी आणि साहेबी किरान दुसरा असें ह्मणत तो आपला बाप जांगीर याचे राज्यावर हिजरी १०३७ या शकांत जुमादासनी महिन्याचे बारावे तारिखेस शुक्रवारीं बसला. हा राजा हिजरी १०७६ व इसवी १६६५-६६ या शकांत रज्जबचे सविसावे तारिखेस सोमवारीं मरण पावला. आणि अकबराबाद अथवा आग्र्यामध्यें जी मशीद आहे,

तींत त्यास पुरलें. या राजानें बत्तीस वर्षें राज्य केलें. हा राजा आपले राज्याचे शेवटीं सात वर्षें आग्र्याचे किल्ल्यांत कैदेंत होता ते वेळेस गुजराथेंचे सुभ्यावर बारा कारभारी आले.

शाहाजहान मृत्यु पावल्या नंतर त्याचा पुत्र मोहिदिन महंमद औरंगजेब उर्फ खलदमाकनी हा राज्यावर बसला. मूळप्रथम हा ऐझखां याचे बागेमध्यें हिजरी १०६८ या शकांत झुलकडा महिन्याचे पहिले तारिखेस शुक्रवारापासून राज्य करूं लागला. आणि पुनः आपले नावाचें नाणें व मशीदीमध्यें धर्मकथन आपले नावानें हिजरी १०६९ या शकांत रमजान महिन्याचे चौविसावे तारिखेस आदितवारपर्यंत वाचविलें. हा राजा अहंमदानगर ह्मणोन दक्षिण देशात परगणाआहे तेथें हिजरी १११८ या शकांत झुलकडा महिन्याचे सत्ताविसावे तारिखेस रविवारीं मेला. त्याचें प्रेत खलदाबाद शहर जें दोझा या नांवेंकरून प्रसिद्ध आहे तेथे बऱ्हाणुदीन व अवलिया याचे बाजूस कब्र स्थानामध्यें पुरलें. आणि त्या कब्रेस त्याचें नाव दिलें. या राजानें पन्नास वर्षें दोन महिने व चार दिवस पर्यंत राज्य केलें. आणि याचे राज्यांत गुजराथेंत दाहा सुभेदार नेमले गेले.

औरंगजेब मेल्यानंतर त्याचा पुत्र शाहा अलम बाहादुर जास खलदमांझल ह्मणत, हा त्याचे राज्यावर

महंमद मोहजम अशी पदवी घेऊन बसला. आणि महंमद आझीम यास जिंकल्यानंतर तो हिजरी १११९ व इसवी १७०७ या शकांत रबीलावलचे एकोणिसावे तारिखेस आग्र्याजवळ धोराचे बागेमध्यें राज्यकारभार पाहूं लागला. हा राजा हिजरी ११२४ मध्यें मोहोरमचे एकोणिसावे तारिखेस मृत्यु पावला. आणि त्यास खोवा जाहा नासरुद्दीन ज्यास दिल्लीचा दिवा असें ह्मणत त्याची कबर शाहा जाहाना बादेंत आहे तीचे शेजारीं पुरलें या राजानें चारवर्षें नऊ महिनें पर्यंत राज्यकेलें. आणि याचे राज्यांत गुजराथेंत सुभेदार असा एकच आला होता.

माइझुद्दीन महंमद झांहादरशाहा या समयीं राज्यावर बसला, आणि हिजरी ११२४ सांत मोहोरम महिन्यांत लाहोराशेजारीं राज्य करूं लागला. आणि एकवर्ष दाहा महिनें वीस दिवस पर्यंत राज्य करून मेला. यास हामायन पादशाहा याचे मशीदींत पुरलें. याचे कारकीर्दींत गुजराथेंत एकच सुभेदार नेमला होता.

आबुलमुझाफीर माइझुद्दीन महंमद फारुख सर हा महंमद आझीमुद्दीन याचा लेंक आणि खलदमांझल बाहादूर पादशाहा याचा नातू हा आपला चुलता जाहांदर शाहा त्यास जिंकून जय मिळाल्या नंतर हिजरी ११२४ सांत झुहिझा महिन्याचे तेरावे तारिखेस आग्रा

देशाचे शेजारीं राज्यावर बसला. तेवेळेस त्याणे हुकूम दिला कीं धर्म कथन त्याचे नावाने मशीदींत वाचवावें व नाणे त्याचे नावानें छापवावें.

या राजास काहीं दिवस पर्यंत कैदेंत ठेवून हिजरी ११३१ सांत रबिलावलचे अठरावे तारिखेस ठार मारलें. आणि हामायन याचे मशीदींत त्यास पुरलें. या राजानें जाहांदर शाहाचे राज्यासुद्धां साहा वर्षे पंचवीस दिवस पर्यंत राज्य केलें. त्याचे राज्यांत गुजराथेंत कोणी सुभेदार आला नव्हता.

त्याच वर्षीं रबिलावलचे आठरावे तारिखेस जानंत अरमगाहा मदंमद राफीयदद्दर जात पादशाहा ह्मणोन रफिय:शान याचा पुत्र व खलदमांझल बाहादुर पादशाहा याचा नातू हा शाहा जाहानाबाद एथे गादीवर बसला आणि दुसरे वर्षीं फार बळकट ताप येऊन रज्जबचे तिसरे तारिखेस मृत्यु पावला. हा मेल्यानंतर त्याणें आपले वडील भावास राज्य ठेविलें व यास हामायनचें मशीदींत पुरलें या राजानें चार महिने पंधरा दिवस पर्यंत राज्य केलें तेव्हां त्याचे राज्यांत गुजराथेंत कोणी सुभेदार नेमला नव्हता.

त्याचा भाऊ राफियददवला यास शाहाजाहान दुसरा असें ह्मणत हा बाहारशाहा याचा दुसरा नातू वर लिहिलेले राजाचे मृत्यु पत्रा प्रमाणे यास राज्यावर बस-

विले. आणि तो त्याच वर्षी रज्जब महिन्याचे विसावे तारिखेस आदित्यवारीं राज्य करूं लागला महंमदने कासीर याणें बंड केलें होतें. तें मोडण्याकरितां तो आग्र्याकडे गेला आणि पुढले झुलकडा महिन्यांत मेला. याणें चार महिने राज्य केलें तेव्हां गुजराथेंत कोणी सुभेदार आला नव्हता.

नासरूद्दीन महंमद शाहा जास फिरदास अमरघा असें ह्मणत हा बाहादूर शाहाचा लेंक जानशाहा याचा पुत्र नंतर गादीवर बसला. शाहाजहान दुसरा मेला, तेव्हां त्याचा प्रधान सय्यद अबदुलाखां व सर्व बडे लोकांचा मुख्य हुसेन. अलीखां व त्याचा भाऊ नाझामुदीन अलीखां जो ते वेळेस दिल्लीचे मामल्यावर होता, याणे महंमद रोसहन अखतार यास पत्र लिहिलें कीं जितकी त्वरा होईल, तितकी करून राज पुत्रांपैकीं एक एथील त्याचे पूर्वजांचे राज्यावर बसविण्यास पाठवून द्यावा. त्या प्रमाणें जाहानशाहा याचा पुत्र निवडून काढून त्यास त्याच वर्षी झुलकडा महिन्याचे पंधरावे तारिखेस महंमद शाहा अशी पदवी देऊन राज्यावर बसविलें. तो हिजरीं ११६१ या शकांत रबिआसनी महिन्यांत मेला, आणि नीझामुदीन अवलिया याची दिल्ली एथे मशीद आहे तींत त्यास पुरलें. या राजानें रुफीया दरजांत. याचें वेळेसुद्धां तीस वर्षें व सव्वीस दिवस पर्यंत राज्य

केलें. त्या वेळेपासून गुजराथेंत साहा सुभेदार जालें.

याचा पुत्र मुझाहिदीन अहंमदशाहा अहंमदआबदाली याजवर जय मिळवून आल्यानंतर वर लिहिलेले वर्षीं जमादिलोवलचे पहिले तारिखेस आदित्यवारीं गोद्रा येथें राज्य करूं लागला. प्रधान लोकांमध्यें चुरसा लागल्यामुळें त्याणी हिजरी ११६७ व इसवी *१७५४ नांत साबान महिन्यामध्यें त्यास कैदेंत टाकिलें याराजानें राज्यावर बसून साहावर्षें तीन महिनें नऊ दिवस पर्यंत राज्य केलें, ते वेळेस राजा भक्तशिंग हा गुजराथेच्या सुभ्यावर नेमला होता.

अहंमदशाहा यास गादीवरून हांकून दिला तेचदिवशीं अरशमांझल महंमद अलमगीर दुसरा यास शाहाजाहाना बाद एथें राज्यावर बसविलें. आणि त्याचे प्रधानाचे सांगण्या वरून तो हिजरी ११७३ रांत रबिअासनी महिन्याचे अठरावे तारिखेस ब्रहस्पतवार पर्यंत पांच वर्षें साहा महिने आणि सत्तावीस दिवस जाहाल्यावर मारला गेला. या राजाचे राज्यांत बाळाजीराव मराठ्यानें गुजराथेंचे राज्य घेतल्यामुळें कोणी सुभेदार आला नाहीं.

हा मारला गेला त्या दिवशीं शाहाजहान पादशाहा

---

* मिल साहेब याणी इतीहास केला त्यात येरू वर्ष शके १७५४ न्नावे वर्षाप्रमाणे ह्मटलें ह्मणजे चुकतें.

तिसरा यास राज्यावर बसविलें आणि टैमर वंशाविषयीं चे वर्णनाचा शेवट जाला.

---

## प्रकरण २

गुजराथेंत बंडें होऊं लागलीं. मिरझा लोक या देशांत आले व गुजराथेंतील राज्याचा शेवट होऊन जालालुदीन महंमद अकबर याणे गुजराथ देश हिंदुस्थानाशीं मेळविला या विषयीं.

ज्ञानी व माहा योग्य पुरुषांस बरोबर माहीत आहे, कीं जीं राज्यें पृथ्वीचे प्रारंभा पासून सुरू जालीं त्यांचा नाशाची कारणें हींच कीं राज्यांतील सर्व बडे लोकांचा एकमेकांशीं चुरसा लागून त्यांस बंड करणारे प्रजेनें सहाय दिलें. ह्मणजे त्याचा दंगा व प्रयत्न जे ते करितात, ते ईश्वराचे मर्जीमुळें त्यांचे त्यांजवरच उलटतात, व कोणी तिसरा दैववान् शत्रू मध्येंच शिरकाव करून आपलें कल्याण करून घेतो.

पुढें लिहिण्यांत येईल त्या प्रमाणेंच गुजराथेंतील राज्यांचा व बडेलोकांचा शेवट जाहाला दैव योगाने राज्याचा नाश होऊन सरकारी सर्व चाकर लोकानीं धर्म सोडून बंड केलें व एकमेकांशीं लढाई करूं लागले या सर्वांस ऐकीकडे ठेऊन टाईमर जालालुदीन महंमद

अकबर या महा योग्य कुळांतील पुरुषाचे हातांत राज्य मोहोर अधिकार, व राज्य आलें, तोंपर्यंत ते स्नेहाचे निमित्तानें प्रत्यक्ष वैरभाव करूं लागले.

तात्पर्य महंमद हुसेन मिरझा, मासुदहुसेन मिरझा व अलीघ हुसेन मिरझा, टाइमीर याचे वंशांतील, महंमद सुलतान मिरझा, याचें पुत्र हिंदुस्थानांत बंडें करूं लागले त्यांचा बाप ह्मातारपण जाल्या मुळें पंजाब देशामध्यें साबंल एथें आपले जाहागिरीवर राहिला. व या दंगेखोरांस सरकारी फौज आल्यामुळें हिंदुस्थानांतून जाणें प्राप्त जालें. या नंतर त्याणी कित्येक गांव लुटले, आणि कित्तेक जाहागिरदार लोकांस ठार मारून दिल्लीस वेढा घातला. हा दंगा जाल्यामुळें देशांत जिकडे तिकडे बंड जालें व कित्येक लोकांवर फार जुलूम जाला. अकबराचेकानांवर ही गोष्ट जातांच तो दिल्लीचा वेढा सोडविण्यास गेला, तेव्हां मिरझा लोक यत्न नकरितां दिल्लीचा वेढा सोडून माळव्याकडे गेले. व तो देश महंमद कुलीबिरलस ह्मणून त्या देशाचा सुभेदार होता, त्याजपासून हिंदियापर्यंत घेतला. अकबर पादशाहानें आपली विजयी फौज दिल्लीहून मिरझास हांकून देण्या करितां पाठविली, तेव्हां गुजराथेंतील दंगेखोर बडेलोकांनीं महंमद दुसरा मारला गेल्यानंतर एके मुलास सुलतान अहंमद पहिला याचा नातू असें ह्मणून त्यास त्या देशाचें राज्य

दिलें होतें, परंतु या मुलास राज्याचा अगदीं वारसा नव्हता. जा बडेलोकानीं या मुलास अहंमद दुसरा अशी पदवी दिली, त्याणीं सर्व अधिकार आपले हातांत ठेविला, परंतु हा मुलगा या समयीं प्रौढ जाला, ह्मणून त्याणी त्यास ठार मारून एका मुलास महंमद दुसरा याचा मुलगा ह्मणत होते, त्यास मुझाफीर तिसरा अशी पदवी दिली. लोकांस त्याचे जन्माची लबाडी माहीत होती, तरी बडे लोकांचे हातांत सर्व अखत्यारी होती, ह्मणून काहीं नकरितां त्याविषयीं उगीच बकत. या समयीं सर्व बडे लोकानीं आपापले मध्यें देश विभागून घेतला. इतमतखां याणें अहंमदाबाद, खंबायतचें बंदर व बहुतकरून देश घेतला. मुझाखां आणि शिरखां फाउलादी यांणी पट्टण सरकार घेतलें. सुरतेतील परगणे भडोच, चांपनीर, बडोदें, हीं जांगजीज खानानें घेतलीं धांदुका, धोलका, व दुसरे देश सय्यद हमीद ह्मणून सय्यद मुबरक याचा नातू याणे घेतलें. अमीरखां घोरी याणें सोराथदेश, व जुनागड, हे घेतले.

या अयोग्य अमल करणारांचे हातांत अधिकार आल्यावर त्याणीं काहीं दिवस अमल करून देशांमध्यें फार जुलूम व अंदाधुंदी केली, व एकमेकांशी कलह करून घाले घालूं लागले. मिरझा लोकांनीं विचार केला कीं माळव्यांत राजाचे फौजेशीं आपणाचानें लढाई कर-

वत नाहीं. ह्मणोन ते या दंग्यामध्यें गुजराथेंत आले, आणि जांगीजखां याजबरोबर भडोच एथें आश्रय करून राहिले तेसमयीं जांगजीजूखां इतमतखां याशीं अहंमदाबादे शेजारीं लढाई करीत होता, तो मिरझालोक त्यास लुटतील, या भयानें त्याणे मिरझा लोकांस भडोच परगणा जाहागिरी बद्दल दिला.

या नंतर शुजारखां याणे जांगीजखां यास अहंमदाबाद येथें कैद करून ठार मारलें. तेणे करून गुजराथेंत दंगा फारच वाढला. मिरझा लोकांस ही योग्य संधी वाटल्या वरून त्यांणीं चांपनीर, सुरत, व भडोच हे किल्ले घेऊन याप्रमाणे अधिकार मेळविला. इतमतखां याणे या समयीं राज्यकारभार सर्व आपले डोईवर घेतला होता. तेव्हां सुलतान मुझाफीर तिसरा यास सुलतान फाउलादीन याणे सुचना केल्यावरून मुझाफीर तिसरा हा अहंमदाबादेंतून पळून जाऊन शिरखां यास पट्टण एथें मिळाला. हे दोघे एकत्र जाल्यावर सुलतान मुझाफीर फौज घेऊन अहंमदाबादेवर चढून गेला. व इतमीतखां यास कोंडलें होतें ह्मणून त्याणें मिरझा लोकांशीं एकोपा केला, परंतु त्याणे लागलाच अकबर यास निरोप पाठविला, कीं राज्य कारभाराची अशी अवस्था आहे याजकरितां आपण गुजराथेंत येऊन राज्य घ्यावें.

अकबर याणें हिजरी ९८० व इसवी १५७२ या

शकांत सफर महिन्याचे विसावे तारिखेस मंगळवारीं हीं बंडें बंद करावीं असा निश्चय करून गुजराथेंत येण्याकरितां स्वारींची तयारी केली. आणि खान खिलन सय्यद महंमद बान्हा कोलीखां सादीकखां व शाहाफा-करूद्दीन व दुसरे कितेक मुख्य सरदार यांस पुढें फौज पाठविली होती तिजवर नेमिलें. पादशाहा जातीने रबी आसनी महिन्याचे बाविसावे तारिखेस सोमवारीं अज-मीर सोडून गुजराथेंत येण्याकरितां निघाला. व नागो-रचे ठाण्याजवळ फौज येऊन पोंचल्यानंतर खानखिलान व दुसरे कित्तेक फौजेवरील सरदार वकीलां प्रमाणें शिरोईस गेले, तेथील गयाळी राजा मानशिंग यार्णे फितूर करावयास उत्सुक होऊन खानखिलान यास स्नेहाचे नात्यानें निरोप पाठविला. रजपूत लोक जे तिक-डून निरोप घेऊन आले होते, त्यांस त्याणे सन्मान दिला आणि ते निरोप घेणार इतक्यांत हिंदुस्थानांतील चाली प्रमाणे एकेकास बोलाऊन पान सुपारी दिली. याप्रसंगीं एक रजपूताने खांनखिलन याजवळ येऊन कटार खांद्याचे बाजूस व खालीं इतकी जोराने मारिली, कीं तेणेंकरून तीन बोटें हात्यार खांद्याखालीं दिसलें. खान खिलनचे हुजऱ्यांपैकीं बाहादूरखां ह्मणून होता, त्याणे रजपूतांस धरून जमीनदोस्त केलें, तेव्हां सादीकखां व महंमद

कालीजखां याणीं त्यास, व त्याजबरोबर होते, त्यांस तरवारीने ठार मारलें.

बादशाहाची फौज लवकरच पुढचा फौजेस येऊन मिळाली आणि शिरोईतील लोकानीं अशी वर्तणूक केली ह्मणून कित्तेक शूर लोकांस आज्ञा दिली कीं शिरोई-तील लोकांस हांकून द्यावें. या हुकुमावरून शिरोईतील कित्तेकाचा नाश जाला. व कित्तेकानीं पळून जाऊन डोंगरांत आश्रय केला. आणि जास गुजराथेंत म्या चाटर* असें ह्मणतात त्या रजपूत लोकांस हिंदूचे देव-ळांत ठार मारलें.

सरते शेवटीं पट्टण शहराचे शेजारीं फौजेचा तळ पडला. तेव्हां इतमीतखां याणे सरकारी फौजेंत येण्या-करितां हुकूम होण्याविषयीं विनंती केली होती, त्यावरून शाहा फाकरूदीन यास हुकूम दिला कीं इतमीत खानास वचन द्यावें. त्यावरून त्यास ढिसा येथें फौज येऊन पोंचल्यानंतर असें कळलें कीं शिरखां फाउलादी जाणे अहंमदाबादेस वेढा घातला होता त्याणे सरकारी फौज जवळ आली असें ऐकतांच दिल्लीचा वेढा सोडला. व सुरत देशामध्यें येऊन महंमदखां आणि बाहादरखां ह्मणोन त्याचे पुत्र होते त्यांस आपलें कुटुंब व माणसें

---

* ह्या जातीचे लोक रजपूतांमध्यें शिपाई असतात व ते आफू खाता त आणि एखादे आसुरी काम करण्यास फार उद्युक्त असतात.

संरक्षण होईल अशा ठिकाणीं ठेवावयास पाठविलें. ते वेळेस त्याचे मुलगे कुटुंब व मुलें माणसें पुढें पाठवून इडुराकडे गेले. आणि इभ्राईम हुसेन मिरझा जो इतमतखानाचे फौजेबरोबर होता, त्यास तो शरण गेल्यामुळें जो देश त्यास सामील होता त्या देशांत गेला. नंतर पादशाहानें मानशिंग राजाबरोबर काहीं फौज देऊन शिरखां फाउलादी याचें कुटुंब धरावयास जावें असें सांगीतलें. परंतु राजाने सामानासुद्धां येऊन देश लुटला तरी शिरखां फाउलादी याचे मुलगे जांस पूर्वींच या गोष्टीचें वर्तमान कळलें होतें. त्याणीं डोंगराचे पन्हाळीमध्यें शिरून आपला बचाव केला.

याच वर्षीं रजब महिन्याचे पहिले तारिखेस आदित्यवारीं पट्टणामध्यें फौजेचा तळ होता तेव्हां हाकीम ऐनुल्मुल्क् आणि मिरआबुतुराब यास इतमतखानास फौजेंत नेण्याकरितां पाठविलें. त्याणी चोताना येथे येऊन बादषाहास विनंती पत्रें पाठविली कीं गुजराथेंतील मुझाफीरशाहा तिसरा हा शिरखां फाउलादी याजपासून वेगळा होऊन आसपास हिंडत आहे ह्मणोन स्वांरावरील मिरखां पाहाऱ्यावरील फारीदमीर अंबू काशीम तुमकीन आणि कारम अली यांस त्याला कैद करण्याकरितां पाठविले ते थोडेसे लांब गेले तेव्हां त्याणी त्याचें छत्र चामर व चांदवा घेतला. व काहीं शोध करून तो धान्य पेरलेले शेतात

दडून बसला होता तों सांपडला. लागलेंच त्यास धरून पादशाहाकडे आणिलें तेव्हां पादशाहाने मोठे कृपाळूपणानें त्यास जीव दान देऊन कारम अली याचे स्वाधीन केलें, परंतु या गोष्टी विषयीं मिराठा शिकंदरी या पुस्तकाचा ग्रंथ कर्त्ता ह्मणतो, कीं गुजराथेंतील बडे लोकानीं यास धरण्याचे पूर्वींच तो आला, आणि शरण गेला.

या वेळेस सय्यद महंमद बोखारी आणि अलाघखां हपशीं हे राजाशीं मिळून आहेत असें दाखविण्याकारितां आपले लोकांसुद्धां आले. या नंतर शाहा फाकरूद्दीन अइनल्मुल्क वमीर अबुतुराब हे विदीत करावयास आले कीं इतमतखां शरण आहे. असें पत्र पाठवून भेटावयास येण्याकारितां निघाला आहे. आणि त्याणे आह्मास वाजीहल्मुल्क आणि मुजाहीदखां यासुद्धां पादशाहाशीं मिळवून घेण्याकारितां पाठविलें आहे.

यानंतर शाहा फाकरूद्दीन बरोबर पुष्कळ चाकर लोक घेऊन इतमतखांकडे गेला आणि हाकीम ऐनल्मुल्क हा ही त्याज बरोबर गेला गुजराथेंतील बडे लोकानीं काहीं वेळ विचार करून निश्चय केला कीं नाण्यावर अकबराचे नाव घालून धर्म कथन मशीदींत त्याचे नावानें वाचवावें.

इतमतखां अहंमदाबादे पासून वीस कोशांवर कारी ह्मणून आहे, तेथे येऊन पोंचल्यानंतर त्याणे शाहा

फाकरूद्दीन याजबरोबर सांगून पाठविलें कीं अकबराचे ताब्यांत मी राहावयास खुशीं आहे. आणि दुसरे दिवशीं पादशाहा चोताना एथें गेला, तेव्हां खोवाजाहाखां आणि मीर अबुतुराब यांस इतमतखानास भेटीकरितां आणावयास हुकूम दिला. त्या प्रमाणें इतमतखां आला ते वेळेस पादशाहा मोठे हत्तीवर बसला होता, व पुढें पाय दळ होतें. नंतर इखत्यरल्मुल्क् मालीकुशार्क सुजा- रखां हपशी वाजीहलमुल्क् आणि मुजाहीदखां हे पाद- शाहास भेटावयास आले आणि प्रत्येकाचे योग्यतेप्र- माणें त्यांजवर राज्य प्रीती जाली. इतमतखां, आणि दुसरे लोक यांस पादशाहा शेजारीं बसावयास सांगी- तलें. आणि कारी येथे सरकारी निशाणे येऊन पोंचलीं तेव्हां सादीकखां आणि दुसरे जे राजाचे चाकरीवर राहिले होते त्यांस महंमदाबादेस सैफूल्मुल्क् हपशी आणि दुसरे लोकांस मुजरा करावयास आणावें या उद्ध शानें पाठविलें.

अकबरानें देशांत स्वस्थता व बंदोबस्त करण्याक- रितां फार उत्सुक होऊन गुजराथेंतील सर्व बडे लोक मेळविले, आणि त्यांस सांगीतलें, कीं इतमतखांचे रद- बदलीमुळें मी तुह्मास देश दिला होता यास्तव जें पाहिजे तें त्याचें मध्यस्थीनें तुह्मास देईन, परंतु देशामध्यें स्व- स्थता ठेऊं असा योग्य जामीनदार पाहिजे, मीर अबुतु-

राव इतमतखां यास जामीन जाला. व इतमतखां आबी-सीनियन् लोक खेरीजकरून दुसरे यांस जामीन जाला. आबीसीनीयनू लोक सुलतान महंमद याचे गुलाम होते, ह्मणून पादशाहानें आपले गुलामा बरोबर त्यांस ठेवावें, व त्याजपासून जामीन घेण्याचें कारण नाहीं,असें सांगीतलें थोडे दिवसांनंतर राजाचे मोठाले कामगारांचे हाताखालीं सरकारी काम करण्याकरिता हे सर्व गुलाम वांटून द्यावे, असा हुकूम जाला.

दुसरे दिवशीं फौजेचा तळ हाजीपूर एथें पडला, तेव्हां दंगेखोर लोकांचे जमावाने आरोळी केली कीं गुजरा-थेंतील छावणी लुटावी असा हुकूम जाला आहे, याव-रून चोरांचे कूटांतील मंडळीनें गुजराथेंतील छावणींत शीरून छावणी लुटली. तेव्हां मोठा दंगा जाहाला. हें अयोग्यकर्म पादशाहास माहीत जालें, तेव्हां बीनीवाले व त्याचे हाताखालील कामगारांस हुकूम दिला कीं आपले देखत चोरांचें शासन करवून त्यांपैकीं एकही जीवंत राहू देऊंनये. असें जाहाल्या वरून गुजराथेंतील. लोकांचें सर्व सामान परत येऊन ज्यांचे त्यांस मिळाले.

यासमयीं पादशाहा गादीवर बसला आणि त्याणें सर्व लोकांस कचेरीस बोलावून हुकूम दिला, कीं बंडांतील जे लोक असतील त्यांस मस्तहत्तीचे पांयांखालीं द्यावे, पुनःजि कडे तिकडे विश्वास, आणि शांतता होऊन अहंमदाबादे शे

जारीं हिंजरी ९८०व इसवी १५७२ या शकांत रज्जबमहिन्या चे चवदावे तारीखेस राज्याचा झेंडा लाविला, तेव्हां सर्व लाहान मोठे लोक, राजास निरनिराळे मुजरा करावयास गेले.

हिंदुस्थानामध्यें सर्व गोष्टीं विषयीं चांगला असा जो गुजराथ देश हा एक लढाई नकरितां जिंकला गेला. एकदां गुजराथे मध्यें इतकी दाट वस्ती जाली होती, कीं तेथे ३८० पुरे वसविलीं, आणि एकेक पुऱ्यामध्यें मोठाला भाग, व त्यांत मोठाल्या इमारती, व बाजार त्याबाजारांत अमौल्य व किमतदार पदार्थ होते. हा एकेक पुरा एकेके शहरा एवढा होता.

कांहीं दिवसांनंतर अमीनखांघोरी याणें सरकारास एक पत्र व खंडणी पाठवून दिली. व इभ्राईम हुसेन मिरझा याणे ही खंडणी पाठवून दिली, परंतु पादशाहास वाटलें कीं इभ्राइमानें निःकपटाने पाठविली नाहीं ह्मणून ती त्याणें घेतली नाहीं, खानमिरझा अजिज कोका यास देशाचा बंदोबस्त करण्या करितां अहंमदाबादेचे सुभ्यावर नेमिलें, आणि त्यास माहेंद्री नदीचें शेजारील परगणा जाहागीरी बदल दिला. दुसरे परगणें बडोदे, चांपनीर, सुरत आणि बाकीचे जे ते समयीं मिरझाचे ताब्यांत होते, ते गुजराथेंतील वडेलोक जाणी राजाशीं पुनः स्नेह केला व मिरझा लोकांस जाणी हाकून देण्याचा निश्चय केला त्यास दिले.

कांहीं दिवस लोटल्यानंतर समुद्र किनाऱ्या वर कांहीं दिवस कर्मणूक करावी, असें पादशाहाचे मनांत येऊन, तो साबान महिन्याचे दुसरे तारिखेस खंबायते कडे जावयास निघाला. प्रवासास जाण्याचे तयारी करितां अहंमदाबादेस मागें राहाण्यास पादशाहाचा हुकूम घेऊन कांहीं दिवस गुजराथेतील बडेलोक अहंमदाबादेंत राहिले. हकीम ऐनलमुल्क् हा सर्व बडे लोकांचा फार मित्र होता. ह्मणून पादशाहानें त्यास मागें राहवून सर्व बडे लोकांची सावधागिरी करून त्यास घेऊन येण्याकरितां सांगीतलें. पादशाहास वाटेवर समजलें कीं इख्यत्यरल्मुल्क् लुनावरा एथें पळून गेला, व इतमतखां, आणि दुसरे गुजराथेतील बडे लोक यांचीं मने चंचळ होऊन आपल्यास जे फायदे जाले ते मनांत न आणितां त्याणीं कृत्रीम करण्याचा बेत केला. या लोकांस फंद फितूर करावयास सवड न सांपडूं देतां जितकी त्वरा होईल तितकी करून शाबाजखां यास अहंमदाबादेस जाण्यास हुकूम देऊन त्यांस जमाकरून बरोबर आणण्या करितां सांगीतलें.

पादशाहा खंबायत एथें येऊन पोंचला तेव्हां तेथील लोकानीं व सावकारानीं त्याचा फार आदर सत्कार केला, नंतर थोडे दिवसानीं जाहाजांत बसून कर्मणूकी करितां आपण समुद्रांत जाहाज ढकललें इतमतखां व

दुसरे बडे लोकांस शाबाजखां घेऊन आल्यानंतर देशांत स्वस्थता व्हावी, व तंटे बखेडे नव्हावे ह्मणून अकबर पादशाहानें गुजराथेंतील प्रत्येक बडे लोकां बरोबर आपला एकेक विश्वासू मनुष्य नेमून दिला.

या समयीं पादशाहास फुरसद सांपडल्यामुळें दंगे- खोर मिरझा लोक यांस हाकून देण्याविषयीं तो मस- लत करूं लागला आणि फौजेचे खजीन्यावरील हुसे- नखां यास त्याणे खंबायतेचे सुभ्यावर नेमिलें ही जागा सोडून सरकारी फौज बडोद्यांस गेली. तेव्हां मिरझा अजीज कोका अहंमदाबादेचे सुभ्यावर याव- यास तेथून निघाला. आणि शाबाजखां, काशीमखां, बाजबाहादूरखां, यांसुद्धां मोठी धैर्यवान् फौज चांपनीर- किल्ला घेण्यास पाठवून दिली. मिरझा लोक सुरतेचे किल्यास बळकटी देऊन चांपनीर कडे आपले फौजेंत आले. असें पादशाहास बडोद्यांत कळतांच त्याणे पुष्कळ बडेलोक व फौज तिकडे पाठवून दिली.

इभ्राइम हुसेन मिरझा हा अद्यापि भ्रोचचे किल्यांत आहे. व पुष्कळ मनुष्यांसुद्धां शेजारील देशांत दंगा करण्या करितां तेथून जाण्याचे बेतांत आहे. असें या समयीं वर्तमान आल्यावरून जा वाटेनें तो जाणार ती वाट सरकारी फौजचे तळापासून आठकोश दूर होती आणि बहुतकरून फौजेवरील कामगार फौजेसुद्धां खान

अजीम कोका याचे हाताखालीं मिरझा लोकांस हाकून देण्याकरितां नेमिले होते, तरी पादशाहानें आपले जवळ जितके निवडक लोक ठेविले होते, तितक्यां सुद्धां फार त्वरेनें जातीनें जाऊन इभ्राईम हुसेन मिरझाचें पारिपत्य करावें, असा निश्चय केला- मिरझा लोकांस हाकून देण्या करितां फौजेवरील कामगार जेपूर्वीं नेमले होते. त्यांस य समयीं माघारें आणावयास शाबाजखां मीरबक्षी यास हुकूम दिला. मिर महंमदखां खोवाजाहां अहानशुजारखां, आणि, सादीकखां यांस मागें तळावर ठेवून मिरझावर सरकारी फौज निघाली. पादशाहाने हाही हुकूम दिला कीं फौजें बरोबर मागील ठेवलेले लोकानी येऊं नये कारण शत्रू फार फौज पाहून पळून जातील, आणि थोडी पाहिली ह्मणजे ते लढाईस ऊभे राहून आपले हातून आपली शिक्षा करून घेतील.

प्रहर साहाघटिका रात्र जाल्यावर पादशाहानें ईश्वरा-वर सर्व हवाला ठेवून रिकबीत पाय घातला. आणि मालीकुशर्क गुजराथी यास रस्ता दाखविण्यास बरोबर घेऊन तो फार त्वरेनें गेला. याप्रमाणे दुसरे दिवशीं दिवस मावळे पर्यंत मार्ग क्रमीत गेला, परंतु शत्रूचा कांहीं ठाव ठिकाण लागला नाहीं, तों इतक्यांत एक ब्राह्मण येऊन बोलिला कीं इभ्राईम हुसेन मिरझा याणे बिकापूरचे घाट उताराने माहेंद्री नदी उतरून एथून चार कोशांवर

सारटाल एथें आपले फौजे सुद्धां तळ दिला आहे. तेव्हां पादशहानें आपले बरोबरचे लोक आपले बरोबर जीव देण्यास तयार होते, त्यांस विचारिलें कीं आतां काय करावें, जाललखां बोलिला कीं सरकारी फौज येऊन पोंचल्या खेरीज दिवसा उजेडीं त्यांजवर हल्ला करणे, हें ठीक नाहीं, व शत्रू कंबरा बांधून तयार आहेत, यास्तव रात्रीस हल्ला करावा हें बरें दिसतें, ही युक्ती पादशाहाचे पसंतीस पडली नाहीं, आणि तो खरोखर बोलिला, कीं रात्रीस जाऊन मारणे हा सत्धर्मी राजाचा धर्म नव्हे. या करितां आतां जाऊन हल्ला करावा हें बरें दिसतें.

सारटल शहर हें टेकडीवर आहे ह्मणून तें दुरून दिसतें. फौज माहेंद्री नदी जवळ आली तेव्हां लोकांस चिलखतें घालण्यास हुकूम दिला. ते वेळेस अकबरा बरोबर चाळीस माणसें मात्र होतीं, यानंतर थोडे वेळानें वर्तमान आलें. कीं बाकीची फौज जवळ येऊन पोंचली परंतु त्यांस येण्यास ऊशीर लागल्यामुळें पादशाहास फार राग येऊन त्यांस हुकूम दिला, कीं लढाईंत येण्याचें तुमचें काम नाहीं त्यास पक्कें समजलें कीं वाट चुकल्या मुळें उशीर लागला, तेव्हां त्याणें त्यांस क्षमा केली, ही सर्व फौज मिळून सुमारें दोनशें जाली, तेव्हां मानाशिं-गाचा लेंक यास कांहीं माणसें बरोबर देऊन पुढें जाऊन नदी उतरावयास सांगीतलें.

ही पादशाहाची फौज आहे असें इभ्राईम हुसेन मिरझा यास समजतांच त्याणे लढाईस उभें राहाण्याचा निश्चय करून जा जाग्यावर त्याणे तोफ ठेविली होती त्या उंच जाग्यावर आपली फौज लढाईस उभी केली. सरकारी फौजेस कडा तुटलेल्या अडचणीचे जाग्यांतून नदी उतरावयास हुकूम दिला ( असे कडे तुटलेले जाग्यास गुजराथी भाषेमध्यें गोटार असें ह्मणतात, ) आणि जाण्याचे घाईमध्यें सर्व निरनिराळे वाटेने गेले. यास्तव पादशाहा थोडे लोकांसुद्धां सारटूलशहराचे नदी कडील वेशीनें आंत गेला.

त्या जाग्यांतील शत्रूनी यास हाकून देण्या करितां पुष्कळ यत्न केला. परंतु मुकबीलखां कालमक् आणि दुसरे याणीं त्यांजवर सरसाऊन जाऊन कित्तेकांस ठार मारलें. पादशाहा बरोबर जितके लोक होते त्यांसुद्धां शहराचे रस्त्यांत शिरला. तों रस्त्यांत ओझांचे बैल व गुरें उभीं राहिलीं होतीं त्यांतून मोठे संकटाने रस्ता करून आंत गेल्यावर शत्रू भेटून लढाई जाहाली.

या प्रसंगीं बाबाखां काकशल आणि दुसरे कित्तेक जणांस शत्रूनी धरून नेलें, परंतु बाकीचानीं धैर्य धरून मोठे शूरत्वानें आपलें संरक्षण करून कित्तेक शत्रूची खबर घेतली. जी फौज नदी उतरतानां कडा तुटलेले जाग्यांत सांपडली होती, ती ही या समयीं येऊन पोंचली

तेव्हां लढाइ जाली पादशाहा शत्रूस हाकून देण्याकरितां चालला तो एके निवडुंगाचे कुपणा जवळ आला, तेथें त्याचे तीन शत्रू त्यास भेटले त्यां पैकीं एकाने आपला भाला भगवान दास राजावर टाकिला, परंतु राजानें आंग चुकवून घेऊन त्यास ठार मारिलें, हे दुसरे दोघे पादशाहाकडे सरसाऊन आले, परंतु दैव योगानें पादशाहास काहीं लागलें नाहीं. खान अलम, व शाहाकुलीखां, आणि दुसरे, साहाय देण्यास जवळच होते. अकबरानें आपला कुमाईत घोडा निवडुंगावरून उडवून या दोघां स्वारांवर हल्ला करावयास हुकूम दिला. या दोघां शत्रूचें काहीं चालेना तेव्हां ते दोघे पळून गेले इभ्राईम हुसेन मिरझा राजाचे फौजेचा जय जाला, असें पाहून पळून गेला आणि बाकीचे त्याजबरोबर होते तेही पळून गेले. तोंराजाचे फौजेने त्यांचे पाठीमागें लागून त्यांस गवताप्रमाणें कापिलें. या प्रमाणें पादशाहास जय मिळाले.

त्या रात्री फौजेचा सारटल एथें तळ पडला तेव्हां तेथून शाहारुख बदाक्षी यास जय झाला हें विदित करण्यास पुढें पाठविलें दुसरे दिवशीं राजाची फौज आपले छावणीत परत आली. तेव्हां शाहाकुलीखां, आणि सादीकखां, यांस सुरतेचा किल्ला घेण्या करितां फौजेवर नेमिलें. सुरतेजवळ फौज येऊन पोंचली तेव्हां मिरझा कारन याची कन्या, गुलरूख बिगम, ही इभ्राईम हुसेन

मिरझाची बायको, मुझाफीर हुसेन मिरझा आपलापुत्र बरोबर घेऊन दक्षिण देशांत पळून गेली. वडे लोकांपैकीं कित्तेक लोक तिचे पाठीस लागले तरी ती त्यांस सांपडली नाहीं.

यासमयीं कोणी पादशाहास विदित केलें, कीं मिरझा लोकानी सुरतेचे किल्यास बळकटी देऊन तो किल्ला हामजाबान ह्मणून राजाचे चिलखत सांभाळणारा वंडांत शिरला आहे त्याचे स्वाधीन केला. या करितां अकबराने भगीरथ प्रयत्न करून किल्ला घ्यावा असा निश्चय करून राजा तोदरमल्ल यास त्याचे फौजेचा बंदोबस्त करण्यास हुकूम दिला. शामखां जालेर चांपनीरचे किल्यावर होता, त्यास तेथे जावयास मोकळीक होऊन आरमारावरील मुख्य कामगार काशीमखां हा विवर खोदण्याचे कामात फार हुशार होता, त्यास पादशाहाकडे पाठवून देण्यास हुकूम दिला. खान अजीज कोकायासही हुकूम पाठविला कीं अहंमदाबाद आणि दुसरीं शहरें रक्षण करण्याविषयीं फार यत्नकरून मिरझा लोक तिकडे पळून आले तर त्यांस शिक्षा करा. कटबुदीन याणे त्या देशांतील जमीनदारां सुद्धां खानआजीज कोका यास मदत द्यावी, ह्मणून शिरबेग यास माळव्यांत वसूलकरावयास पाठविलें.

सुरत देश घेतल्या विषयीं.

पादशाहाचे फौजेचा वर लिहिलेले शकांत रमजान

महिन्याचे सत्रावे तारिखेस सोमवारीं सुरते पुढें नळ पडला. आणि आंतील कोंडलेले लोकांनीं आपले जवळ अन्न बेगमी पुष्कळ आहे असा व्यर्थ भरवसा ठेवून देशाचें संरक्षण करण्या करितां परिश्रम केले. याप्रसंगीं जें जें घडलें, त्यांत मिरझाचे हत्ती व सामानसुमान पुढें लिहिल्या प्रमाणें लुटलें. या विषयीं थोडासा इतिहास लिहितों या दुर्दैवी लोकानीं त्यांची गडबड व दाणादाण होतांच कित्तेक हत्ती व सामान त्या देशांतील जमीन-दार राणाराम देव ह्मणून होता त्याजकडे संरक्षणार्थ पाठविलें. ते सर्व पादशाहाचे लोक जे लुटण्या करितां गेले होते, त्यांचे हातास लागले. जा माणसानीं सर्व सामान बादशाहाकडे आणिलें त्यांस बक्षीस मिळालें.

यासमयीं बडे लोकांस आग्रा देशांत पाठविलें आणि त्याज विषयीं जा गोष्टी जाहाल्या त्या पुढें लिहिल्या प्रमाणे आहेत. इभ्राईम हुसेन मिरझा हा लढाईंत जिंकला गेल्यानंतर महंमद हुसेन मिरझा व शाहामिरझा याज-कडे पट्टणांत गेला परंतु तेथे भावां भावांमध्यें कलह उत्पन्न होऊन इभ्राईम हुसेन मिरझा यास फार राग आला त्यावरून आग्र्यावर स्वारी करण्याचा बेत केला. तो बेत बादशाहास समजतांच त्याणें सय्यद महंमदखां बऱ्हा शाहाकुलीखां मोहरम आणि राजा भगवानदास

यास त्याचा पाठलाग करून धरून आणण्यास पाठविलें परंतु मिरझा मुलताना शेजारीं मृत्यु पावला.

दुसरे दोघे मिरझा फाउलादी याचा बळकट आश्रय करून पट्टणाकडे आले तेथे सय्यद अहंमदखां याणें सरकारी आमल बचावण्या करितां यत्न केला खांन अजीज कोकास अशी व्यवस्था समजल्या वरून तो फौज जमा करूं लागला. तेव्हां मोठे दैवयोगाचे बळानें कटबुदीन महंमदखां माळव्याचा सुभेदार हा त्या देशांतील जमीदारां सुद्धां खांन अजीज कोका याजकडे आला शेखमहंमद बोखारी जो धोलका येथून बादशाहा कडे येत होता, तो ही तिकडून येऊन त्यास मिळाला.

यासमयीं खान अजीज कोका पट्टणा कडे गेला तेथे दोन्ही फौजांची लढाई होऊन शत्रूचे उजवे बाजूचे फौजेने मोठी चपळाई करून बादशाहाचे डावे बाजूचे फौजेंतून कटबुदीन महंमदखां याचीं माणसें पळविलीं. खान याणे थोडीशीं निवडक माणसें बरोबर घेऊन मोठे शूरत्वानें लढाई करून मिरझा लोकांचा हल्ला परतविला. तेव्हां मिरझा लोक दक्षिण देशांत पळून आले. आणि शिरखां फाउलादी जुने गडाकडे पळाला. खान अजीज कोका आणि दुसरे बडे लोकानीं त्याचा पाठलाग करण्यास निश्चय केला. परंतु पादशाहास लढाईत जय मिळाल्याचें वर्तमान कळलें तेव्हां अजीज कोका यास

हुजूर येण्यास हुकुम दिला. व कटबुदीन महंमदखान शाहाबुद्दागखान, मुरादखां आणि दुसरे बडेलोक यांस मिरझाचा पाठलाग करावयास हुकूम दिला राजाज्ञे प्रमाणें अजीज कोका याणें आज्ञा मान्य करून सवालचे विसावे तारिखेस राजाची भेट घेतली. तेव्हां राजकृपा त्याजवर होऊन त्याचा फार सत्कार केला.

यासमयीं सुरतेचे किल्यांत कोंडलेले लोकांनीं आपले जीवाचे संरक्षणार्थ गोव्यांत पोर्टुगीज लोकांशीं मिळवून घेण्या करितां यत्न करून त्यांस लिहिलें, कीं तुह्मी या वेळेस सहाय जालां तर तुह्मास हा किल्ला देऊं. पोर्टुगीज लोकानीं त्या देशांतील मोठे चमत्कारीक आणि अपूर्व पदार्थ बरोबर घेऊन वकीलाचे निमित्तानें लोक सुरते कडे पाठवून देऊन त्यांस सांगीतलें कीं, आपलें कापटय समजूं नदेतां किल्ला घेववला तर घ्यावा. किल्ला हातास न येतो असें दिसल्यास, वकिलाती करितां पादशाहाकडे आलों होतों, असें निमित्त करावें. ते आल्या नंतर पादशाहा बरोबर मोठी फौज दिसल्यावरून त्याणीं किल्ला घेण्याचे सर्व बेत सोडून कारभाऱ्याचें सोंग घेतलें, आणि पादशाहास मुजरा करून पेशक्याची नजर केली त्यांचा सत्कार होऊन निरोप दिला.

एक महिना सतरा दिवस सुरतेस वेढा घालावयास लागले, तेव्हां त्याणीं तेथील वेशीचे दारा पर्यंत

बांध घालून विवरें तयार केलीं आंत कोंडलेले लोकांची कोणत्याही देशचें आपणास सहाय मिळत नाहीं अशी निराशा जाली तेव्हां हमजावान याणें आपला सासरा मुला निझामुदीन लारी याजकडून पादशाहास निरोप पाठविला कीं माझे जिवाचें अभय दिलें तर मी किल्ला खालीं करून देईन, यावरून काशीम अल्लीखां आणि खावाजाहादौलत यांस हुकूम केला कीं हमझावान आणि दुसऱ्यांस त्यांचे जिवाचें अभय देऊन त्यास पादशाहाकडे घेऊन यावें, वर लिहिलेले वर्षीं सव्वालचे तेविसावे तारिखेस बृहस्पत वारीं ते पादशाहा पुढें आले, तेव्हां त्यास त्यांचे कर्तृत्वाची लज्जा वाटून जीव व सर्व सामान त्यास परतदिलें परंतु हमजावान मूर्ख व तोंडाळ फार ह्मणून त्याणे पादशास असंख्य शिव्यागाळी केल्या. त्या शिक्षे बद्दल त्याची जिव्हा कापिली. दुसरे दिवशीं सरकारी फौज अकबरा बरोबर किल्यांत शिरली तेव्हां त्यांचे दृष्टीस मोठी तोफ पडली, तिचें नाव सुली ऐमानी तिचा नमुना फार मोठा होता तो आग्राचे मुख्य शहरांत न्यावयास हुकुम दिला. ही तोफ रुमी एथील पादशाहा शेलीम याची होती त्याची फौज पुष्कळ मोठाल्या तोफां सुद्धां इंग्रेज लोकां पासून हिंदुस्थानांतील समुद्र कांठचीं बंदरें घ्यावयास पाठविली होती. परंतु गुजराथेंतील सुभेदाराने त्यास मदत न दिल्यामुळें त्याचा फौज

जिंकली जाऊन माघारी गेली. पादशाहा ती तोफ नेण्यास असमर्थ जाल्यामुळें ती अद्यापि तेथेंच पडली आहे.

यासमयीं एक चमत्कारीक गोष्ट होऊन पादशाहानें आपले हातास जखम करून घेतली. या विषयीं पुढें लिहितों एके रात्री आपले मित्रांचे मंडळींत बसला असतां त्यास दारूचा कैफ आला तेव्हां बोलणे रजपूत लोक जीवाची कांहीं काळजी वागवीत नाहींत, या विषयीं निघालें होतें. कोणी बोलिला कीं दोघे द्वंद्व युद्ध करीत असतां तिसऱ्यानें दोन टोंकांचा भाला धरलेला त्याजवर आपला ऊर ठेऊन भाला आरपार जाई तों पर्यंत एकमेकांशीं युद्ध करितात. याप्रमाणें ते जीवाची काळजी ठेवीत नाहींत. यावरून अकबर मोठा धैर्यवान् आणि साहसी होता त्याणे तरवारीची मूठ भितींत अडकविली. आणि आपलेकडे टोंक करून बोलिला कीं, रजपूतांसारिखी जशी मी तरवार पोटांत खुपसून घेईन तसें कोणी ही दुसरा करणार नाहीं जे जवळ होते त्याणी हा मोठा चमत्कार पाहून त्यांस फार आश्चीर्य वाटलें, तरी पादशाहास काहीं राग येईल ह्मणून ते अगदीं बोलिले नाहींत, परंतु राणा मानशिंग राजाचे मित्रत्वाचे कळवळ्यानें उठून पुढें जाला, आणि पादशाहाचे हातांतून तरवार इतकी जोरानें उडविली कीं त्याचे हाताचीं बोटें आंगठ्यापासून चारी कापलीं, पादशाहास फार राग

येऊन त्याणे मानशिंग यास भुईवर आपटलें. तेव्हां सय्यद अबदुलाखां याचा भाऊ सय्यद मुझाफीर सुलतान याणे मानशिंगास पादशाहाचे मिठीपासून मुर्खपणानें सोडविलें या झोंबीमध्यें राजाचा हात जास्ती चिरला, परंतु जखम थोडे दिवसानीं बरी जाल्यावर राजा पुनः मंडळींत बसूं लागला.

अकबरानें सुरत घेतल्यानंतर कालीजखां याचे स्वाधीन केली, आणि झुलकडा महिन्याचे चवथे तारिखेस सोमवारीं अह्मदाबादेस परत यावयास निघाला तो भडोच एथें येऊन पोंचल्यानंतर जांगजीजखां याची आई सुजारखां हपशी याणे तिचा पुत्र स्नेहाचे निमित्ताने ठार मारला ह्मणून पादशाहास सहाय मागावयास आली. राजाची पक्की खात्री जाली कीं सुजारखां याणे नाहाक खून केला, तेव्हां त्यास हत्तीचे पायांखालीं दिलें. फौज झुलकडा महिन्याचे एकोणतीसावे तारिखेस अह्मदाबादेंत येऊन पोंचली तेव्हां पादशाहा देशाचा बंदोबस्त करूं लागला.

---

## प्रकरण २

सरकारी फौज आग्रा या मुख्य शहरांतपरत आलीव गुजराथेचे सुभ्यावर खानअजीज कोका यास वाजीहलमु

ल्कू गुजराथी दिवाणाप्रमाणें बरोबरदेऊन नेमिलें त्याविषयीं

पादशाहाने गुजराथ घेतल्यानंतर देशांत बंदोबस्त करून खान अजीज कोका यास त्या सुभ्यावर नेमिलें. आणि त्याचे हाताखालीं पांच हजार फौज देऊन गुजराथेंत टैमर वंशाचे हाताखालीं मुख्य सुभेदार केला, अहंमदाबाद शहर, व परगणा, व त्यांतील नगरें. पिटीलादचा परगणा, आणि दुसरे प्रांतांची मिळून यांस जाहागीर दिली. नवरांगखानास बडोदें दिलें व मिरमहंमद खिलन ह्मणून मिरझा अजीज कोका याचे चुलत्यास पट्टण सरकार दिलें. कटबुदीन महंमदखां यास भडोच आणि शेजारील देश देऊन धांदुका आणि धोलका हे हामीदखां बोरवारी यास दिले. या प्रमाणें मोठाले वडे लोकांस सर्व देश वाटून दिला.

जुलहिजा महिन्याचे दाहावे तारिखेस सोमवारीं पादशाहा पट्टण आणि जालोर यांवरून आग्रा मुख्य शहरास जाण्यास निघाला. खान अजीज कोका आणि दुसरे वडे लोक जास गुजराथेवर नेमिलें होतें त्यांस शिदपूरचे शेजारीं येऊन तेथे बहुमान देऊन परत जाण्यास निरोप दिला.

इखत्यरलमुल्कू इंडूरचा जमीदार राईनारायण याचे साहायाने शेजारील देशांत दंगा करीत आहे हें व शिरखां फाउलादी याचे मुलगे त्याजबरोबर आहेत तेहीं

फार दंगा करीत आहेत, असे खान अजीज कोका परत येतानां त्यास कळलें. खान अजीज कोकानें अहंमदाबादेस न जातां या देशांत येऊन शत्रूस हांकून द्यावें, असा निश्चय केला. शत्रूनें इतकी फौज जमा केली कीं मिरझा मोकीम यास त्या देशांत जाहागीर होती त्यास तेथून पळून जाऊन अजीज कोका याजकडे इंदुरापासून अहंमद नगर दाहा कोश आहे तेथे जाणे प्राप्त जालें. महंमद हुसेन मिरझा जो ते वेळेस दौलताबादे शेजारी होता, त्यास अकबर पुनः आग्रास माघारा येतो असें समजतांच खालजीखां यास त्याणें सुरतेचे किल्यात कोंडलें होतें, तेथें गेला. खालजीखां याणे किल्याचा बंदोबस्त होण्याकरितां जितकें अवश्य होतें तितकें केलें, तेव्हां मिरझानें आपले हातांत किल्ला येत नाहीं असें पाहून किल्याचा वेढा सोडिला. तेथून तो भडोच कडे गेला, आणि कटबुदीनखा महंमदखान जो तेवेळेस बडोद्यात होता त्याचे बरोबरचे अयोग्य माणसांपासून भडोच घेतलें नंतर खंबायतेस जाऊन हुसेनखां याणे त्यास मूर्खत्वानें अडथळा न केल्यामुळें खंबायत घेतली.

हुसेन हा ते वेळेस खंबायतेत मुख्य होता तो अहंमदाबादेस गेला. आणि तेथून खान अजीज कोकानें त्याजबरोबर सय्यदहमीद बोखारी, सय्यदबाहायुदीन

आणि शेख महंमदमुंगिरी, यांस महंमदहुसेन मिरझा तेवेळेस खंबायत देशांत साहाशें स्वारांसुद्धां दंगा करीत होता त्यास हाकून देण्याकारितां कटबुदीन महंमदखां यास मदतीस पाठविलें. वर लिहिलेले कामगार कटबुदीन महंमद याजकडे सावली ह्मणून धोलका पासून पांच कोशांवरआहे तेथे येऊन मिळाले. या समयीं इखत्यरल् मुल्क् डोंगरी किल्यावरून फौज घेऊन निघाला. तेव्हां खान अजीज कोका हा जेथे बंडखोर लोकांचा कांहीं ऊद्योग न चाले अशे ठिकाणीं राहिला. शत्रूनीं दुसरी कांहीं तजवीज नाहीं ह्मणून अहंमदाबादेस जाण्याचा निश्चय केला. अहंमदाबाद तरी आपले ताब्यांत घ्यावी, अथवा अजीज कोका यास त्याचे स्थानापासून लढाईस आणावें. या उद्देशानें त्याणीं कुच केलें. परंतु खानअजीज कोका यास त्याचा मसलती माहीत होत्या तो उशीर करून दिवसास अहंमदाबादेस जाण्यास निघाला. तेव्हां शत्रूचानें घाला घालवेना. आणि तो सर्व रात्र चालून दुसरे दिवशीं सकाळीं शहरांत शिरला. त्याच रात्री त्याणे महंमद हुसेन मिरझा यास जिंकून खंबायतेंतून हाकून दिला. तो अजीज कोकाचे फौजे जवळून जात असतां, त्याचे सामानापैकीं कांहीं अजीज कोकाचे फौजेचे हातास लागलें. मिरझाचा या समयीं

सर्वस्वें नाश झाला ह्मणून तो फार दूर राहून शिरखां फाउलादी याचे मुलाकडे गेला.

पुढील वृत्तांत महंमद हुसेन मिरझा जिंकला गेला याविषयीचा आहे. कटबुदीन महंमदखां सय्यद हामीदखां बोखारी याजबरोबर खंबायत येथे गेला. तेव्हां मिरझा आपले बरोबरचे थोडें लोकांसहीत राजाचे फौजेशीं लढाई करूं लागला. तो जिंकला गेला व त्याचा फार नाश जाला. विजयी लोकांस वाटलें कीं आपले शत्रूंस जिंकण्यामध्यें त्याची खातरी जाली. ह्मणोन आतां त्याचा पाठलाग करण्यांत जास्ती श्रम नकोत. व त्याचा पाठलाग केला असतां तर त्याणीं त्यास कैद केलें असतें. महंमद हुसेन मिरझा याणें दुसरे दंगेखोर लोकांशीं मिळवून घेऊन अहंमदाबादेस जाण्याकरितां फार यत्न केला परंतु गुजराथेंतील लोक पुढें काय करावें याविषयीं तीन दिवसपर्यंत विचार करीत असतां खान अजीज कोका याणें मोठे प्रयत्न करून अहंमदाबादेस बळकटी दिली. सरते शेवटीं शत्रूची आणि राजाचे फौजेची, पूर्वीं लढाई होत होती तों गुजराथेंतील सर्व बडे लोक येऊन पोंचले. अजीज कोका यास त्यांजबरोबरचे लोकांचा व कटबुदीन महंमद याचे लोकांचा विश्वास नव्हता, ह्मणून मोठी लढाई जाली नाहीं कारण कीं पादशाहाने अजीज कोका यास शत्रूंशीं लढाई न करण्यास

सांगितलें होतें, व दंग्या बखेड्याचे खटल्यांत पडून जिंकला न जातां त्याविषयीं तत्क्षणीं मला लिहून पाठीव असें लिहिलें होतें.

---

## प्रकरण ४

पादशाहा फातपूर एथें राज गादी होती तेथून नऊ दिवसांत गुजराथेंत आला त्याविषयीं पादशाहानें गुजराथेंत दंगें बखेडे जाले असें ऐकून जितकी त्वरा होईल तितकें करून गुजराथेंत जाण्याचा निश्चय केला. आणि स्वांरीची तयारी करण्यास फार वेळ नव्हता ह्मणून त्याणे आपले बरोबरचे लोकांस खजीना उघडून बक्षिसीसारिखा पुष्कळ पैका दिला. त्याणे माळव्याचे सर्व बडे लोकांस हुकूम पाठविला, कीं फार त्वरा करून गुजराथेंत यावें. नंतर आपण जातीनें हिजरी ९८१ व इशवी १५७३ या शकांत रबिलावलचे; चौविसावे तारिखेस आदित्यवारीं गुजराथेकडे जाण्यास निघाला. आणि बरोबर विश्वासुक माणसें, व, सांडणीस्वांर, व कांहीं पळक्या घोड्यावरील स्वांर घेतले.

पादशाहा पंचविसावे तारिखेस सोमवारीं हनस येथें येऊन पोंचला, नंतर तो माइझाबादेवरून सायानुदीन खिस्ती याचे कबरेचे दर्शनास गेला तेव्हां आदले दिवशीं

आजमीर येथें तंबु ठोकले होते. व बुधवारीं तो मिरथा एथें होता, तेथून त्याच रात्री पुढें चालता जाला. आणि सोजात एथें थोडावेळ, निजण्या करितां मुकाम करून दुसरे दिवशीं सकाळीं जालोरचे तालुक्यांतील बानहारिया ह्मणून आहे तेथें येउन पोंचला. शुक्रवारीं मोठे पांहटेस तो जालोर एथें पोंचला. आणि तेथें दुसरे दिवसाचे मध्यरात्रीपर्यंत राहून पुढें सोमवारीं ढिशांजवळ आपली निशाणे दिसूं लागत तों पर्यंत फार त्वरेनें गेला. शाहा आली लिगां जो पट्टणावर खानखिलान याजकडून कामावर होता. तो पादशाहास भेटावयास आला. पादशाहाने पट्टणाकडे नजाण्याचा निश्चय करून खोवाजाहा ध्यासुदिन यास आपले फौजे सुद्धां येऊन मिळण्यास हुकूम दिला आणि तेथून तळ उठवून दुपारचे सुमारें बालिसाना जवळ येऊन पोंचला. तेथें फौजेचा तळ पडला, एथें खानखिलान वजीरखां, आणि शाहा फाकरूदिन हे पूर्वीं फौजेसहित जीं बंडें ते तेळेस प्रख्यातपणें उठलीं होतीं तीं बंद करावयास पाठविलें होतें. ते राजास भेटावयास येऊन वाटेवरचे भयामुळें त्याणीं पट्टण एथें मुकाम केला.

फौजेस जेंजें अवश्य होतें तें या समयीं देऊन पादशाहा आपले बरोबर शंभर स्वारांचा पाहरा घेऊन त्याच दिवशीं संध्याकाळीं तेथून निघाला नंतर अहंमदाबादेंत

जे लोक कोंडले होते, त्यांस एके जासुदा बरोबर सांगून पाठविलें, कीं, मी जवळ आलों, लढाईची तुह्मी तयारी करून मी आल्यावर मला येऊन मिळा. पादशाहा घोड्यावर बसून फार त्वरेने निघाला, आणि मंगळवारीं दिवस उगवल्यावर कारींचे परगण्याखालीं चोताना ह्मणून शहर आहे तेथें येऊन पोंचला. शत्रूचे काहीं लोक तेथें शिरखां फाउलादीचे बरोबरचा अवलियाखां याचे हाताखालीं होते त्यांस समजलें कीं ही सरकारी फौज खानखिलान याची पट्टणाहुन आली, ह्मणून ते लढाईस तयार होऊन आले. परंतु पादशाहाचे फौजेस हुकूम जाल्यावरून त्यांणी कित्तेकांस ठार मारलें. आणि बाकीचे जीवाचे संरक्षणार्थ किल्याकडे पळून गेले. फौज तो किल्ला घ्यावयास फार उत्सुक होती परंतु पादशाहाने येऊन सांगीतलें, कीं मी इतका उद्योग आणि श्रम केले. हे एवढासा किल्ला घेण्यास्तव केले नाहींत, परंतु मी गुजराथेंतील बंड करणारे लोकांस शिक्षा देण्यास आलों. आणि त्यास नसियद दिल्यानंतर हा किल्ला सहज घेतां येईल. या करितां फौजेस ती जागा सोडून पुढें जावयास हुकूम दिला.

बुधवारीं पादशाहा अहंमदाबादे आलीकडे तीन कोशांवर आला, तेव्हां त्याणे अजीज कोका यास पादशाहा आला, ही आनंदाची बातमी सांगावयास असी-

फखां यास पुढें पाठवून अजीज कोका यास तयारी करावयास सांगीतलें. जेव्हां फौज शत्रूजवळ आली तेव्हां पादशाहा जातीनें चिलखत आपले अंगांतघालून पांढऱ्या घोड्यावर बसला, ते वेळेस राजा भगवानदास येऊन राजास बोलिला कीं गुजराथेंतील राज्य आपणास मिळेल, कारण कीं राजास जय मिळावें अशीं मी तीन लक्षणें पाहिलीं आहेत, पहिले अशा प्रसंगीं पादशाहा घोड्यावर बसला असावा. हेंएक. व दुसरें फौजेचे मागलें बाजूकडून वारा सुटून शत्रूचे तोंडाकडे आपले फौजेचा कल असावा तोही आहे. व तिसरें कावळ्यांचा समुदाय व घारी बरोबर याव्या त्याही आहेत.

हें ऐकून पादशाहाचा दिल फार खुष जाला, आणि या प्रमाणें नऊ दिवसांत मजल आटोपून जुमादासनी महिन्याचे पांचवे तारिखेस बुधवारीं लढाईस तयार जाला. तो शत्रू जवळ आला, तेव्हां गुजराथेंतील फौज खान अजीज कोका बरोबर नाहीं असें पाहून त्याणे लढाईतील तंबूर वाजवावयास हुकूम दिला, शत्रूस आपली फौज वीस हजारांपेक्षां जास्ती आहे, असा अभिमान होऊन त्याणीं त्या जाग्यास वेढा घातला. आणि शिरखां फाउलादी येईल ह्मणून वाट पाहात होते, तंव पादशाहाचे फौजेस तेवेळेस अमुक रांगेची टोलीकरून नदी उतरावयास हुकूम जाला होता. ती येऊन पोंचल्यामुळें

शत्रूस फार विपत्ती जाली. सरदार गुजराथेंतील शत्रूंची पुष्कळ फौज जमलीशी पाहून पुढें जाण्यास भिऊं लागले यासमयीं शत्रूकडील साहाशें स्वांर शिरकजेकडून येऊन पादशाहाचे फौजेतील मनुष्यें सालबाहान कादम कुळी आणि रांजित याचे समोर आले, तेव्हां पादशाहाने त्यास गोळा टाकावयास हुकूम दिला. शत्रूचानें उभें राह-वेना तेव्हां आपले मोर्चामागें पळालें. गुजराथेंतील फौजेस रणवाद्यांचा नाद ऐकूंआल्यावरून, वाटलें कीं शिरखां फाउलादी हा तरी आला असावा, एक किंवा खानखि-लान याची फौज पट्टणाकडून खान अजीज कोका यास मदतीस आली असावी. महंमद हुसेन मिरझा हा रणवाद्यांचा नाद ऐकून वेड्या सारिखा जाला, आणि सर्वां पुढें येऊन मोठ्याने आरडून सुभान कोळी तुरक जो ते वेळेस नदीचे किनाऱ्यावर होता, त्यास विचारूं लागला कीं ही फौज कोणाची तेव्हां तुरक याणे शत्रूची हिंमत खचली असें पाहून उत्तर दिलें कीं पाहा हे फौजेवर पादशाहा प्रत्यक्ष हुकूम देत आहे, आणि तूं प्रश्न कां विचारितोस. तेव्हां शत्रू बोलिला हा पाद-शाहा आहे असें सांगून मला भय दाखवितोस कीं काय. आणि जरी पादशाहा आहे तरी त्याचें सैन्य आणि मोठे हत्ती कोठे आहेत, व या खेरीज माझे शिपाई फात-पूरचे मुख्य शहरापासून त्यास सोडून आले त्यास चौदा

दिवस जाले. तुरक बोलिला कीं पादशाहा हा थोडीशी विश्वासुक व शेलकीं मनुष्यें बरोबर घेऊन नऊदिवसांत एथें आला. हें बोलणें त्या शत्रूंस खरें वाटून तो आपले तळावर फौज लढाईस तयार व्हावी ह्मणून आला.

पादशाहास आतां समजलें कीं शत्रूस मी कधीं आलों हें ठाऊक नाहीं ह्मणून त्याणें फौजेस उशीर न लावतां नदी उतरावयास हुकूम दिला, पादशाहा खानखिलान याची फौज पट्टणाहून येऊन मिळेल ह्मणून फार उत्सुकतेनें पाहात होता. तों कोणी बोलिला, कीं गुजराथेंतील फौज फार मोठी आहे, या करितां अहंमदाबादेंतून फौज येई, तोंपर्यंत नदीचे किनाऱ्यावर राहावें हें बरें दिसतें, यास बादशाहानें उत्तर केलें, कीं शत्रूस आमची अवस्था ठाऊक आहे, आणि थांबावयास वेळ कोठे आहे? व उत्कंठेनें वाट पाहण्याची गरज काय आहे? जर आह्मी बाहेरून मोठी फौज दिसल्यावरून जय मिळेल असा विश्वास ठेविला असतां, तर इतकी त्वरा करून येण्याचे कारण काय होतें? पादशाहाचे शिपाईलोक फार हुशार होते, त्याणी पुढील परिणाम पाहून नदीपलीकडे जावयास कांकुं करून पादशाहाशीं बोलण्यांत आणि विनोदांत वेळ घालविला. पादशाहाने त्यांचे मनांत भय आलें, असें पाहून आपले बरोबर

निवडक मित्र घेऊन नदींत घोडा घातला, आणि यास-
मयीं आपले अंगातील चिलखत काढून राजा देवचंद
यास आपले बरोबर येण्यास हुकूम देऊन तें त्याचे
स्वाधीन केलें. आणि तो जलदीनें घोडें चालवीत असतां
दैवयोगें करून चिलखत वाटेवर पडलें, पादशाहानें पुढें
रस्ता मोकळा आहे असें पाहिलें, तेव्हां त्यास वाटलें,
कीं हा एक मोठा शकून जाला. हा चांगला शकून
वास्तवीक जाला, यास जडत्व आणण्याकरितां कोणी
शत्रूचें डोकें कापून आणिलें, त्यावरून सर्व बडे लोक
आपले विचार एकीकडे ठेवून नदी उतरले.

यानंतर महंमदहुसेन मिरझा यांस उतरावयास अड-
थळा करण्याकरितां पुढें आला आणि आपले उजवे
हाताकडील फौज दुलेखां जाचे हाताखालीं आबिसीनि-
यन् व गुजराथी लोक होते, त्यांचे स्वाधीन केली, व
महंमदखां फाउलादी जाचे हाताखालीं आफ्घान् लोकांची
मोठी फौज होती, त्याचे हाताखालीं डावेहाताकडील फौज
दिली. मध्यभागीं शाहामिरझा जाचे हाताखालीं आबिसी
नियन् व मावारुलनाहार लोक होतें त्यांस ठेविलें

पादशाहा नदी उतरून एके टेकडीवर जाऊन बसला,
आणि फौजेची वाट पाहात होता. इतक्यांत आसीपखां
सांगावयास आला, कीं मिरझा अजीज कोका यास
आपले पादशाहाची फौज जवळ आली असें समजलें

नाहीं तरी तो येऊन मिळण्यास तयार आहे. ही फौज येऊन पोंचली नव्हती, इतक्यांत शत्रूची कांहीं फौज झाडींतून दिसूं लागली यासमयीं महंमद कुलीखां तिरखां आणि दुसरे तिरकंदाज लोक लाहानशी लढाई करून आले होतें तों पादशाहा राजा भगवानदास यास बोलिला कीं, शत्रूची फौज पुष्कळ आहे, तरी ईश्वरी कृपा मजवर आहे, हुसेन मिरझा याणे आपला राजास वारसा कायम करण्याकरितां लाल छत्र धारण केलें आहे, अशी पादशाहाची खात्री जाल्यावरून शत्रूचें लाल छत्र पाहून जो परिणाम होईल त्याविषयीं भय न बाळगता, त्याजवर निश्चयित आणि धैर्यानें घाला घालावा, असें पादशाहा बरोबर सर्व होते त्यांचे मनांत आलें.

महंमद हुसेन मिरझा त्वरेनें सर्व फौजेचे आधी फार दूर गेला, शाहा कुलीखां मोहरम, आणि हुसेनखां बोलिला कीं या वेळेस घाला घालण्याची वेळ आहे. पादशाहा बोलिला कीं अद्यापि आपणामध्यें आणि शत्रूमध्यें फार अंतर आहे, नंतर पादशाहानें हुकूम दिला, कीं शत्रूचें अगदीं जवळ गेल्यावर तुह्मी हल्ला करावा. शत्रूवर चढाव करून पुढें जात असतां शत्रू जवळ आले, व पादशाहा घाला घालणार इतक्यांत उजवे हाताकडील फौज मागें हटली परंतु हा पाचारुन याणे अल्ला अकबर याचें नाव घेतल्यावरून सर्वांनीं एकदम घाला घातला,

परंतु हा पाचारून मोठयानें ओरडला, कीं अहो अकबर घाला हो घाला. शत्रूचे हत्तींपैकीं एक हत्ती बाणांस बुजून त्याचेच फौजेंत शिरला आणि सर्वांचा गोंधळ करून दिला तेवेळेस पादशाहा मैदानावर ताराचंद आणि बालाघखां यादोघांसहीत उभा राहिला होता.

महंमदहुसेन मिरझा याणे पुष्कळ फौज घेऊन काहीं बादशाहाचे फौजेवर घाला घातला, तेव्हां एके स्वारानें घोडयावरून पादशाहा जवळ येऊन पादशाहाचे घोड्याचे शिडावर तरवारीचा घाव मारून घोड्यास उपाई आणिलें पादशाहानें डावे हातानें अवलंबन करून घोड्यावरून आसन हालूं न देतां शत्रूस भाला मारला दुसऱ्याने ही त्याजवर भाला टाकिला परंतु तो चुकवून घेऊन पळून गेला, आणि तिसऱ्याने घाला घातला त्यास एके गुजराने भाला मारला, पादशाहाची बाकीची फौज येऊन पादशाहाकडे मिळाली, तेव्हांत्याणे जातीनें मध्यभागीं उभें राहून एकदम सर्वांस घाला घालावयास सांगीतलें त्याप्रमाणे सर्वांनीं मान्य करून एकदम घाला घालून महंमद हुसेन मिरझा यास कैद केले. आणि याप्रमाणें पादशाहास जय मिळाले.

नंतर फौज अहंमदाबादेस गेली, आणि महंमद हुसेन मिरझा यास पादशाहा समोर आणिलें तेव्हां त्याणे त्यास राजा मानशिंग दरबारी याचे स्वाधीन केलें.

मिरझाचा दूध भाऊ शेख माडु यासही तेसमयीं पादशाहा पुढें आणिलें, आणि त्याणे बंड करावयास साहाय दिलें होतें, ह्मणून पादशाहानें त्यास भाल्यानें त्याच जाग्यावर ठार मारलें.

बहूत करून दिवस गेला तरी अजीज कोका येऊन पोंचला नाहीं, व शत्रूची दुसरी फौज मोठी दिसूं लागली पादशाहाची बहुत करून फौज चहुंकडे फांकून बादशाहा बरोबर शंभर लोक मात्र राहिले. तरी शत्रू लढाईस उभा न राहातां महंमदाबादे कडे पळून गेला. तेव्हां हे लोक इखत्यरलूमुल्क् याचे आहेतसें समजलें, हें सैन्य पाहून पादशाहाची फौज भयभीत झाली. त्याजवरून पादशाहानें नगारें आणि रणवाद्यें वाजवावयास हुकूम केला, आणि आपण जातीनें फौजेचें मध्यभागीं उभा राहून आपले फौजेस धैर्य दिलें तंबूर वाजीवणारा भयानें इतका घाबरला कीं पादशाहा त्यास भाला मारी तों पर्यंत त्यास पादशाहाचा हुकूमही ऐकूं आला नाहीं व पडघम ही त्याचानें वाजवलें नाहीं या गडबडीमध्यें राजा भगवानदासानें रायशिंगास खूण केल्यावरून त्याणें महंमद हुसेन मिरझा यास ठार मारलें.

या फौजेने अहंमदाबादेस वेढा घालून अजीज कोका आणि कटबुदीन अहंमद खान हे दोघे पादशाहाकडे येत होते त्यांस अडथळा केला होता, त्या लढाईमध्यें पाद-

शाहाचे फौजेपैकीं शंभर, व शत्रूचे फौजेपैकीं बाराशें लोक मारले गेले.

सरते शेवटीं खांन अजीज कोका आपले फौजेसहीत येऊन पोंचला तेव्हां पादशाहास फार उल्हास होऊन तो त्यास कडकडून भेटला. नंतर गुजराथेंतील बडे लोक पादशाहास मुजरा करावयास आले, आणि सोहरा तुरक याणे इखत्यरलूमुल्क् याचे शीर आणिल्यामुळें पादशाहानें त्याचे कर्तृत्वाची स्तुती केली. बंडांतील लोकांची जितकीं डोकीं मारलीं असतील त्यांची लोकानी बंड केल्यास त्याचें असेंच होईल हें दर्शविण्याकरितां व बडेलोकांस पुढें मागें कित्ता दाखविण्या करितां एकावर एक डोकीं रचून ठेवावयास हुकूम जाला.

पादशाहानें अहंमदाबादेंत आल्यानंतर शेजारील देशांत आपणास जय मिळाला असें दाखविण्या करितां जाहीरनामा केला, या समयीं जा लोकांनीं त्यास नजरा केल्या, त्यांस निरोप दिल्यानंतर त्यास कळलें कीं गुजराथेंतील कवीपैकीं एकानें राजा आल्याची तारीख काहारी गुजराथ, अमदाहा या शब्दांत लिहिली, ह्मणजे गुजराथ देशाचा कोरडा आला असें लिहिलें. असें समजतांच राजानें त्यां कवीस बोलावून आणून विचारिलें, कीं आपण अशी अयोग्य गोष्ट कां केली ? तेव्हां तो नाकबूल करून बोलिला, कीं शाई गुजराथ आम-

दाहा या शब्दांत गुजराथदेशाचा राजा आला असें मी दर्शविलें, परंतु ते शब्द मी लिहिले नाहीं नंतर पादशाहानें त्यास बक्षीस देऊन निरोप दिला.

पादशाहाचे फौजेची छावणी इतमतखां पूर्वी राहात होता, तेथें ठेविली व देशाचा बंदोबस्त करावा, याविषयीं कानू, कायदे, ठरविले. शाहा मिरझा भडोच कडे पळून गेला ह्मणून कटबुदिन महंमदखां, नवरांखां, आणि दुसरे लोकांस तिकडे पाठवून राजा भगवानदास व शाहाकुलीखां, यांजबरोबर पुष्कळ फौज देऊन इडूरचा राणा यास शिक्षा करावयास पाठविलें. पट्टण सुभा खान खिलान याचे स्वाधीन करून धोलका, आणि धांदुका, याची वजीरखां यास जाहागिरी दिली. सोराथ देश ते वेळेस अमीनखांघोरी याचे ताब्यांत होता, तो त्याजकडे राहूं देण्यास हुकूम दिला, परंतु सरकारी फौज गेली. व वजीरखां ही सोराथेत गेल्यावरून तो घोरी याजपासून देश घेण्यास यत्न करूं लागला, त्याणें किती लढाया केल्या परंतु त्यांत सिद्धी नजाल्यामुळे तो हुजूर परत आला.

## प्रकरण ५

पादशाहा गुजराथेचे सुभ्यावर खान अजीज कोका यास नेमून पुनः आपले शहरांत परत आल्या विषयीं.

अकबर अकरा दिवसांमध्यें गुजराथेंतील राज्य कारभाराचा बंदोबस्त करून जमादिलोवल महिन्याचे बारावे तारिखेस शनवारीं आपले शहरांत जाण्याकरितां निघाला. आणि आपले बरोबर सय्यद हमीद यास त्याचे कुटुंबासहीत घेऊन गेला. पहिले दिवशीं महंमदाबादेस गेला, व दुसरे दिवशीं धोलका एथे मुकामकरून तेथे एक दिवस राहिला, आणि अजीज कोका यास परत जाण्यास हुकूम दिला, खोवा जाहा घ्यासुदीन यास अशीफखां अशी पदवी देऊन गुजराथेंतील पोतदारीचें मोठें काम दिलें, तें काम सुभ्यावरील सुभेदाराचे हाता खालचें होतें. सरते शेवटीं या प्रांतांतील कामाचा बंदोबस्त करून पादशाहा तेथून कारकीस मुकामास गेला. तेथून दोन मुकामांत शिधपूर एथे जाऊन राजा भगवानदास याचे फौजेनें अवलियांस धरिला. व बारनागड घेतला. हें वर्तमान समजे तों पर्यंत तेथें राहिला. नंतर पुढें वाट चालती करून राजा तोदर मल्ल यास गुजराथेंत वसुलाचा ठरावकरून खटलें तुटक करण्याकरितां पाठविला. पादशाहास वाटलें कीं राजा तोदरमल्ल याणे फार दिवस वसुली काम केलें आहे, ह्मणून

तो जुलूम न करितां सर्व वसुल घेऊन बंदोबस्त होईल, तेव्हां आपले स्वार्थ अथवा, लोभ न दाखवितां पुढें शिपाई लोक, व कुळंबी लोक यांचा वसुल घेण्याकरितां झाडा पाठवून देईल त्या प्रमाणें राजा तोदरमल्ल याणें वसुलाचा बंदोबस्त थोडे वेळांत करून राजा पुढें येऊन दफ्तरामध्यें सर्व हिशेबाचा झाडा दिला.

पादशाहानें हिजरी ९८३व इसवी १५७५.या शकांत गुजराथेंतील बडे लोक फार उपयोगीं पडले होते त्यांचे कल्याण करावें ह्मणून इतमतखानास एक हजार स्वांरांची सरदारी दिली. इतमतखां हा त्याचे शाहाणपण व डाम डौलाविषयीं फार प्रख्यात होता, ह्मणून त्यास दरबाराची रचना करून शोभा आणावी, व काम काजाचा बंदोबस्त करावा, असा हुकूम दिला, आणि तेथें नाना प्रकारचे रत्नांचा, आणि जवाहिराचा, कारखाना होता, ह्मणून तें त्याचेच स्वाधीन केलें. त्याचा मुलगा शिरखां यास चारशें घोड्यांवर नेमून अलाघखां हपशी यास सारिखीच जाहागीर व पदवी दिली. आणि मालीक कुशार्क यास धानेश्वर याजवर नेमिलें.

गुजराथ प्रांतांत जे बडे लोक कामावर होते त्यांस गुजराथेंतील कांहीं परगणे पूर्वींच नेमणुकी बदल निराळे ठेविले होते, परंतु त्यापरगण्यांपैकी कित्येक सरकारीं जमाबंदी कचेरीस नेमून देऊन वाजीहलूमुल्कू गुजराथी

यास या प्रांतावर दिवाण नेमून पाठविले व यासच दिल्लीहून मुळ प्रथम मुख्य कमावीसदार नेमिलें. पादशाहाचे बायकांपैकीं कांहीं बायका ते वर्षीं गुजराथेंतून मकाकडे गेल्यावर खान अजीज कोका हुकुमावरून हुजुर माघारा आला.

सरकार चाकरीवर जे स्वारांचें निरनिराळे रिसाले असतील, त्यांस खुणा द्याव्या, असा कायदा खान येण्याचे पूर्वीं जाला होता. खान अजीज कोका हुजरे आल्यावर तो सर्व बडे लोकांमध्यें मुख्य होता, ह्मणून हुकुमाप्रमाणे काम करून दुसऱ्यास काम ठेवणार नाहीं असे बाकीचे बडे लोकांस वाटलें. अजीज कोका आपली राजाशीं फार सलगी आहे असें मनांत आणून ही गोष्ट सिद्धीस न नेतां आग्राशेजारील बागेमध्यें जाऊन येकांत वाशी राहिला. आणि फकीर जाला. पादशाहानें अजीज कोका याचे आईचा जाण जाणून, व त्याचे चाकरीवर लक्ष देऊन त्यास त्याचे अयोग्य वर्तणुकीचा पश्चात्ताप जाल्यास त्यास गुजराथेंत माघारें पाठवावें असें मनांत आणिलें, परंतु अजीज कोका बोलिला, कीं मी राजाचा ताबेदार नाहीं, असें मनांत आणून मी शिपाइगिरी सोडली, यास्तव मी राजाचें कल्याण इछिणारा पैकींच एक शुभेछु आहें असें गणावें.

गुजराथेचे सुभ्यावर कोणी नेमिल्याखेरीज परिणा-

मच नाहीं, असें प्राप्त जाल्यामुळे अकबरानें बैरामखां याचा पुत्र मिरझाखां जो पूर्वी चार हजार स्वांरावर होता, त्यास गुजराथेचे सुभ्यावर नेमिल्यावर त्यास खानखानन अथवा सर्व बडे लोकांचा मुख्य अशी पदवी दिली. वजीरखां, मीर अलादिन काजिविनी सय्यद मुझाफीर आणि प्रयागदास हे या सुभेदाराबरोबर सहायास पाठविले, परंतु मिरझाखां तेव्हां फार तरूण होता, आणि या खेरीज दुसरे काम केलें नव्हतें ह्मणून या बरोबरचे लोकांचें सर्व गोष्टीमध्यें मत घ्यावें असा हुकूम जाला ते वेळेस मीर आलादिन यास त्या प्रांताचा आमीन केला.

प्रयाग दास हा सरकारी कारकुनांपैकीं काम वहिवाटलेला होता ह्मणून त्यास वाजीहलूमुल्क याचे जाग्यावर दिवाण नेमिलें, त्याच वर्षी रबिआसनी महिन्यांत पादशाहाचीं निशाणें अजमीर एथें आलीं, तों वजीरखां गुजराथ सोडून पादशाहास भेटावयास आला तेसमयीं त्यास त्या प्रांताचे सुभेदाराचे हाताखालीं नेमिलें सय्यद हासीम आणि रायशिंग या दोघांस यासमयीं न्याडोड शहरांत राहून तेथील दांडगे लोकांस आपले ताब्यांत आणावयास हुकूम दिला, इडूर घेण्याकारितां मोठी फौज पाठवून तारसुखा जो तेसमयीं पट्टणावर मुख्य होता त्याणें शिरोईचा किल्ला घेतला.

हिजरी ९८४ व इसवी १५७६ या शकांत कालीजखां या नामें करून सुरतेंतील सरकारी कारकून यास हिजाज येथें यात्रे बरोबर जावयास हुकूम दिला. इडुरचा राजा सरकारी मोठी फौज पाहून फार भयभीत होऊन डोंगरामध्यें पळून गेला. परंतु फौजेशीं लढाई करितां आला तेव्हां त्यास जिंकिलें व इडूर ही घेतलें.

वजीरखानाचे अविचारी राज्य कारभारांत देश साफल्य जाला नाहीं असें अकबराचे कानावर आल्यावरून मठा माडुदवला राजा तोदरमल्लु यास गुजराथेंत देशाचा नीट बंदोबस्त करण्याकरितां पाठविलें हा जालोरचे शेजारी येऊन पोंचला. तेव्हां पाहारखां जालोरी याणे सांगीतल्यावरून शिरोईचे जमीदारास त्यास भेटावयास येणे प्राप्त जालें. शिरोइतील जमीदार याणे पांचशें रुपये व शंभर सोन्याचा मोहरा खंडणी बदल दिल्यावरून राजा तोदरमल्लु याणे दिल्लींतील पादशाहाचे तर्फेने त्या जमीदाराकडून असे ठरवून घेतलें कीं, गुजराथेंतील सुभेदाराची दोन हजार स्वारांसहीत चाकरी करीन नंतर त्यास एक सत्काराचा पोषाग. रत्नखचीत शीरपेंच व एक हत्ती दिला. राजा तोदरमल्लु सुरतेकडे जात असतां रस्त्यावर रामनगरचे जमीदाराची भडोच एथें गांठ पडली तेव्हां त्याणे बारा हजार रुपये आणि चार घोडे खंडणीबदल दिल्यावरून याणें ही त्यास चांगलीच उलट

नजर दिली या जमीदाराकडून पंन्नाशें घोड्यांवर राहून एक हजार स्वारांसहीत गुजराथेंतील सुभेदाराची चाकरी करावी असें ठरवून घेतले.

गुलरख बेगम या नामें करून कारमन मिरझा याची लेंक पूर्वीं लिहिल्या प्रमाणें पळून दक्षिण देशांत गेली होती ती यासमयीं परत आली. आणि आपला लेंक मुझाफीर हुसेन मिरझा व बंडांतील पुष्कळ लोक बरोबर घेऊन येऊन तिणे देशांमध्यें बंड माजविलें, वजीरखां याजबरोबर पुष्कळ दंगेखोर लोक होते ह्मणून त्यास सावधगिरीनें वागणें प्राप्त होऊन तो अहंमदाबादेंत दडून राहिल्या वर राजा तोदरमल्ल याजकडे जासूद पाठवून त्यास जाहीर केलें, कीं, मी या प्रमाणें बंदोबस्त केला शत्रूची फौज खानदेशांत सुलतानपूर एथें होती तेव्हां सरकारी चाकरां पैकीं कित्तेक बेइमानी होऊन बंडांत शिरले तेथून ते बडोद्यावर चढाव करून गेले तों सरकारी फौजदार शत्रूस अडथळा न करितां पळून गेला. वजीरखां याणें तेसमयीं बाज बाहादूर व प्रयागदास दिवाण याज बरोबर फौज देऊन शत्रूस हाकून देण्या करितां पाठविलें, परंतु सारटलचे परगण्यांत शत्रू भेटला तेव्हां हे जिंकले गेले. या लढाईवरून दंगेखोर लोक फार चढून गेले व राजा तोदरमल्ल हा देशांतील वसुलाची जमाबंदी करून पट्टण सोडून शहरांत येणार तों वजी-

रखां याचें पत्र आल्यावरून तसाच अहंमदाबादेस आला त्याणें अहंमदाबादेस आल्यानंतर वजीर खानास किल्ला सोडून लढाईची तयारी करावयास सांगीतलें. सरकारी फौज बडोद्यापासून चार कोशांवर होती तेव्हां शत्रू खंबायते कडे पळून गेला. तेथें सय्यद हाशीम ह्मणून सरकारी जमाबंदी कचेरींतील मुख्य कामगार याचे हाताखालचे फौजेने त्यास अडथळा केला. सय्यद हासीम यास मोठी जखम जाली, तेव्हां या प्रसंगीं तो किल्यांत दडून राहिला. आणि बंडांतील लोक जे खंबायतेकडे पाठलाग करून पळवून लाविले होते त्याणीं त्याकिल्यास वेढा घातला. सरकारी फौज जवळ येऊन पोंचली तेव्हां शत्रू किल्याचा वेढा सोडून जुने गडावर गेले परंतु सरकारी फौजेने पाठलाग करीत जाऊन त्यास धोलका एथें गांठलें तेथें लढाई जाली त्या लढाईंत कित्तेक बायका पुरुषांचा वेष धारण करून हातांत धनुष्य घेऊन बाण मारीत होत्या, ही लढाई दोन्ही दळांकडून फारच मोठी जाली. परंतु दंगेखोर लोक सरते शेवटीं हटून पळून गेले यासमयीं कित्तेक बंडांतील लोक ठार मारले गेले, व कित्तेकांस कैद केलें, यामध्यें बायकानीं तिरंदाजाचा वेष घेतला होता त्याही होत्या.

राजा तोदरमल्ल याणें सर्व लूट व कैदी मिळून आपला लेक शिधारी याजबरोबर देऊन पादशाहाकडे पाठवून

दिलें. व आपण गुजराथेंतून अहंमदाबादेस जाण्यास निघाला. तिकडे जात असतां वाटेवर दुंगारपूरचा जमीदार राणा साहासमल्ल हा भेटावयास आला तेव्हां त्यास राजा तोदरमल्ल याणें मोठा सत्काराचा पोषाख देऊन, त्यास पंचवीसशें स्वारांवर नेमिलें तो गुजराथेचे प्रांतांत सरकारी चाकरी करावयास कबूल जाल्यावर त्यास परत जाण्यास मिरथा एथें निरोप दिला.

तोदरमाल शहराकडे गेल्यानंतर मुझाफीर हुसेन मिरझा याणें चोरांचा जमाव जमविला होता त्याणीं खंबायत शहर लुटिलें, आणि तेथें मोठे लक्षाधीश सावकार होते, त्यांचें पुष्कळ द्रव्य, अमोल्यपदार्थ, त्यास सांपडले, वजीरखां याणें त्याचा पाठलाग करावा ह्मणून अहंमदाबाद शहर सोडिलें, परंतु शत्रूचें सैन्य फार मोठें आहे, असें त्यास मार्गीं कळल्या वरून तो आपले फौजेचे संशयानें अहंमदाबादेंत परत येऊन किल्यांत राहिला. त्याचे बरोबरील लोक होते त्यांतून कित्तेक त्यास मुकामावर सोडून शत्रूकडे जाऊन मिळाले. आणि सरते शेवटीं शत्रूनीं आपली फार मोठी फौज दाखवून अहंमदावाद वेढली.

यासमयीं वजीरखां यास त्याचे बरोबरील लोकांचा संशय आल्यावरून त्याणें त्याचे पायांत बिडया घालून आपले पुरातन आणि विश्वासुक चाकरांस धैर्य देऊन

जितका यत्न करणें प्राप्त होतें, तितका अहंमदाबाद बचावण्या करितां केला. कोठांतील मनुष्यें फार भ्याल्या मुळें त्यांचा मोर्चावरून रोज बदल्या करून खान जातीनें कंबरबंद राहून चहूंकडे फिरे, कीं कोठांत कोंडलेले लोकां पैकीं कित्तेक शत्रूस सामील होते. ह्मणून ते कोटास शिड्या लावून सर्व कोटावर एकदम हल्ला करणार होते इतक्यांत दैवयोगानें बंडावरील जो मुख्य मिहर अह्लीं हा गोळी लागून मृत्यू पावला. नंतर सर्व पळून गेले तरी बंडातील लोक कित्येक शिड्यांवर चढले होते व कोटांतील लोक गुटमळले होते ते पळून गेले नाहींत, वजीरखां, व दुसरे लोक जाची सुटका जाली त्याणीं अकस्मात सिद्धी होतांच ईश्वराची स्तुती केली, मुझाफीर हुसेन मिरझा हा नंतर खानदेशाकडे पळून गेला, तेथें आलीखां फारुकी याणे त्यास धरून अकबर पादशाहाकडे पाठवून देतांच मिरझाचे बंडाचा नाश झाला.

---

## प्रकरण ६

शाहाबुदीन अहंमदखां याचा अमल व प्रयागदास ह्मणून दिवाण, व मुझाफीर सुलतान, पळून जाऊन गुजराथेंत आला त्या विषयीं.

वजीरखां याजकडून गुजराथेंतील बरोबर बंदोबस्त नजाल्यामुळें शाहाबुद्दीन अहंमदखां माळव्याचा सुभेदार जो पांचहजार स्वारांवर होता, त्यास हिजरी ९८५ व इसवी १५७७ या वर्षाचे शेवटास गुजराथेचे सुभ्यावर जावयास हुकूम जाला. पुढें लिहिलेले वडेलोकांस त्याज बरोबर जाऊन देशाचा बंदोबस्त करण्यास सहाय द्यावें असा हुकूम जाला. त्यांचीं नावें. काशीमखां, सैफलमुल्क्, मिरघ्यासुदीन, अलीनाकीब, कांमरखां, घाजीखां, नाकीबखानाचा पुतण्या हा फिरोजखानकाबुली, शेखमोझीम, आणि शेखजालीद, वजीरखां यास इडूरा शेजारील देश जिकण्याकरितां हुकूम दिला. हिजरी ९८६ व इसवी १५७८ या शकांत पादशाहाचे कुटुंबांतील बायका मकाचे यात्रेस गेल्या होत्या, त्या सुरक्षित येऊन पोंचल्या, आणि त्या शहराकडे येत होत्या तेव्हां शाबुदीन अहंमदखां याला त्यांस साहाय देण्या करितां हुकूम जाला.

या दिवसांमध्यें पादशाहा धर्मकृत्य करीत असेतो प्रत्येक वर्षीं जी यात्रा मकास जात असे, त्या बरोबर वडेलोकां पैकीं एक नेमून त्यास पुष्कळ पैका व नाना तऱ्हेचें चमत्कारीक पदार्थ या पुण्यक्षेत्राचे यात्रेकरी यांस देण्याकरितां बरोबर देऊन पाठवी, यासमयीं मीर अबुतुराब यास ही जाज येथें यात्रेस जाण्यास

हुकूम करून त्यास यात्रेवर नेमिलें, आणि इतमतखां गुजराथी यास ही त्याजबरोबर जाण्यास हुकूम जाला.

मीर अबुतुराब यात्रा करून परत आला तेव्हां त्याणे मकाचे देवळांत मुसलमानांचा पादुका होत्या, त्या बरोबर आणल्या, आणि सुरतेचे बंदरावर या पादुका ठेवून अकबर ते वेळेस फात्पुर एथें होता, तेथें पाठविण्याची तयारी केली त्याणी हीजाज एथील सातआठशें मनुष्यें या पादुकांबरोबर जाण्यास नेमून त्या पादुका मकांचे देवळांस बारीक पडदे होते, त्यांत गुंडाळून त्या एका पालखींत घालून पुढें पाठविल्या. पादशाहानें या आपल्यास अमोल्य पादुका मिळाल्या असें पाहून यात्रेवरील मुख्य सरदारांस बहुमान देऊन पत्र लिहिलें. पादशाहा राहतो तेथून एका मजलेवर पादुका येऊन पोंचल्यावर त्यास सुचना द्यावी, ह्मणजे पादूकांचें मोठे आदरसत्कारानें येऊन मीं दर्शन घेईन, असा पादशाहाचा हुकुम जाला.

हुकुमा प्रमाणें पादशाहास खबर दिल्यावरून पादशाहाचे कुटुंबातील बायका सर्व बडेलोकांसुद्धां त्यांचें दर्शन घ्यावयास गेल्या, आणि अशी यात्रा केल्यामुळें त्यांस आशीर्वाद मिळाला, सर्व बडेलोक यापादुकांचें दर्शन घ्यावयास निघाले, आणि पादशाहाने त्या पादुका चांगले वस्त्रांमध्यें गुंडाळून शहराकडे शंभरहातांचे अंतरावर नेल्या, नंतर त्या पादुका मीर अबुतुराब जो यात्रे

बरोबर होता, त्याचेच स्वाधीन करून त्यां राजगादीकडे नेतानां मुख्यप्रधान, न्यायाधीश, व मुख्य वडेलोक, याणीं पाळीपाळीप्रमाणें नेल्या. पादुका एकवर्ष पर्यंत राजवाड्या शेजारीं ठेविल्या होत्या, तेथे सर्व लोक यात्रेस येईत, परंतु मीर अबुतुराव यास हिजरी ९८८ व इसवी १५८० या शकांत गुजराथेंत जाण्यास हुकूम जाल्यावरून त्याणें विनंती केली, कीं या पादुका मी आपले बरोबर घेऊन जाऊन त्या देशांमध्यें एक मशीद बांधीन असें बोलिला. ती मशीद आतां पुण्यक्षेत्र मका येथील मशीदीसारिखीच आहे. त्याणें ही प्रार्थना केली, कीं, यापादुकांची स्थापना करण्याकरितां एक मशीद बांधल्यानंतर त्याजवर माझी देखरेख ठेवावयास हुकूम द्यावा. काहीं दिवसा नंतर त्याची इछा परिपूर्ण होऊन मीर अबुतुराव याणे अहंमदाबादेशेजारीं आसावल एथें पादुका नेल्या, तेथें त्याणे त्यापादुकांकरितां साह्या वर्षांत एक मशीद बांधली. हा ठिकाणा प्रसिद्ध जाल्यावर सर्व लोक त्यास प्रदक्षिणा घालीत असत, हें सर्वांस माहीत असेलच त्याप्रमाणें कित्तेकवर्षेंपर्यंत असा क्रम चालिला होता, परंतु गुजराथेचे राज्यांत अंदाधुंदी जाल्यामुळें आसावल आणि दुसरीं शहरें ओसाड पडलीं होतीं तेव्हां मीर अबुतुराव याचे

वंशजानीं त्या पादुका शहरांत आणिल्या त्या अद्यापि त्याचे कुळांत आहेत.

नंतर शाहाफाकरूदीन यास उज्जनीचें सुभ्यावर जाऊन तासरूखां यास हुजूर पाठवून देण्याचा हुकूम जाला. हाजी इभ्राईम सरहिंदी यास वाढवून गुजराथें तील सरन्यायाधीशीचे कामावर नेमिलें, आणि अशी-फखां यास बक्षीची जागा मिळाल्या नंतर कायद्या प्रमाणे माळव्यांतील सरकारी स्वारांचे रिसाल्यास खुणादेण्या: विषयीं मूळप्रथम हुकूम जाला व गुजराथेंत आल्या नंतर शाहाबुदीन अहंमदखां, आणि कालीजखां याणीं मत्त दिल्यास तेथील रिसाल्यासही द्याव्या असा हुकुम जाला.

या गोष्टी घडल्यानंतर थोडेदिवसानीं सुलतान मुझाफीर जास पादशाहाचे खडेचाकरींत ठेविलें होतें. तो गुजराथेंत पळुन गेला. आणि ही गोष्ट कट-बुदीन मदंमदखां जो तेवेळेस भडोच एथे होता त्यास न कळुदेतां राजपिंपलाचे जमीदारा बरोबर ना-खारी एथें कांहींदिवस राहिला. एथून निघाल्या-नंतर सोराथचे ताब्यांतील परगण्यांपैकीं सोरधार या परगण्यांत कारीयनचें काटीलोकांशीं फार गुप्तपणें लपून राहिला. व शाहाबुदीन अहंमदखां याचेच अमलांत

मात्र दंगेखोर लोक दंगा करीत नव्हते, व प्रजाही स्वस्थ होती.

फातखां शिरवानी जो अमीनखां घोरी याचे फौजेवर होता, त्यास त्याचे धण्यानें त्रास फार दिल्यामुळें त्याणे शाहाबुदीन अहंमदखां यास सुचना केली, कीं मला फौजेची कुमक दिल्यास मी अमीनखां घोरी याजपासून जुनागड व सोराथ, प्रांत घेऊन पादशाहाचे वहिवाटीखालीं आणून देईन. त्याप्राणें शाहाबुदीन अहंमदखां याणें आपला सख्खाभाऊ मिरझाखां याचे तैनातीस चार हजार स्वार देऊन फातखानाबरोबर स्वारीवर जावयास नेमिलें. सोराथ देशाजवळ फौज येऊन पोंचली तेव्हां अमीनखां घोरी याणे जासुदाबरोबर सांगून पाठविलें, कीं स्वारांस पुरेशी जाहागीर दिल्यास खंडणी देऊन सरकारी हुकुमाप्रमाणें आपल्या स्वारांचे रिसाल्यास खुणा देतों, त्याणे हें बोलणें घातलें, कीं जुनागड अधिकाराबद्दल माझे ताब्यांत ठेवून बाकीचा सर्व देश आपण घ्यावा, त्याजवर मिरझाखां याणें उत्तर दिलें, कीं जुनागड मिळणार नाहीं. जुन्यागडास मस्तफांबाद ह्मणतात तेथें जाऊन फातखानानें फार श्रम केल्यामुळें जुनागड त्याचे हातांत आला. अमीनखां घोरी किल्यास बळकटी देऊन वर राहिला व फातखान याचे सांगण्यावरून ही स्वारीजाली तो यासमयीं

आजारी पडून मृत्यू पावला. तेव्हां मिरझाखां वेढा सोडून तेथून मांगलोर ह्मणून वीसकोशांवर आहे, तेथें जाऊन राहिला. हें शहर शत्रूचे आणि, याचें मध्यें होतें. अमीनखां घोरी यास जाम याणें चारहजार स्वांरासहीत मदत दिल्यामुळें आपली बचावाची जागा सोडून मांगलोरावर चढाव करून आला, तों तेथें येऊन पोंचल्यावर मिरझाखां डाईनर किल्यावर परत येऊन तेथें लढाई जाली. तींत तो जिंकला गेला. व शत्रूनी त्याचें सर्व सामान घेतलें आणि, जातीनें त्यास मोठी जखम जाल्यावर तो अहंमदाबादेस आला.

शाहाबुदीन अहंमदखां याणें मोरासा आणि दुसरे शहरास जेथें लोक फार दुःखी जाले होते, तेथे कोट बांधून स्वांराचीं ठाणीं ठेविलीं, आणि देशाचा पक्का बंदोबस्त केला. अहंमदाबादेंतील आणि दुसरे कित्तेक परगण्यांतील कुळंबीलोकांनीं गाऱ्हाणीं सांगीतल्या वरून पुनः सर्व जिराइतीजमीनीची मोजणीं करून त्याची लागवड केली.

इतमतखां

---

## प्रकरण ७

गुजराथी याचा अमल, अबुल काशीम

याची दिवाणगिरी, व सुलतान मुझफीर याणे अहंमदाबाद घेतल्या विषयीं.

मागील पत्रांत लिहिल्या प्रमाणे इतमतखानास मका क्षेत्राची यात्रा करावयास हुकूम होऊन तेथून आल्या नंतर तो पादशाहाकडे आला. त्याणे देश घेतला तेव्हां इतमतखानास गुजराथेचे सुभ्यावर नेमीन, असे पादशाहाने वचन दिलें होतें. त्यावरून इतमतखान याणें शाहाबुदीन अहंमदखां यास या सुभ्यावर नेमिलें तेव्हां या गोष्टीविषयीं बोलून दाखविलें, सुभ्याविषयीं पादशाहास त्याणें विनंती केली. तेव्हां त्याणें दर्शविलें, कीं मी पादशाहाचें कल्याण इछितों, आणि मला सुभ्यावर नेमिल्यास तो प्रांत सुफळतेस आणून वसूल ही जास्ती देईन, ह्मणून पादशाहाने यास गुजराथेचे सुभ्यावर हिजरी ९९१ व इसवी १५८३ या वर्षाचे शेवटीं नेमिलें. पादशाहास कित्तेकानी सांगीतलें, कीं यास देशाचा बंदोबस्त करण्याचें ज्ञान नाहीं तरी तोंडांतून वचन जाऊन याप्रमाणें ठरल्यामुळें पादशाहानें त्यांचे बोलण्यास कान न देतां त्यास गुजराथेचे सुभ्यावर जावयास हुकूम दिला. यासमयीं मीर अबुतुराब यास अमीन करून खोवा जहानि झामुदीन अहंमद यास बक्षीचे कामावर नेमिलें पादशाहानें खोवाजाहां अबदुल काशीम यास मुख्य कमावीसदार करून त्याजबरोबर सहायाकारितां,

महंमद हुसेन, शेखमीर, मुझाफीरबेग, महंमदबेग, मिरमाहाबुला, मिरशारफुद्दीन, मिरसाला, शाहाबेग, मिरहासीम, मिरमासुमभाक्री, झाइनुद्दीनकांमबोहो, सय्यदजलालभाक्री, सय्यदआबुइसहाक, फाइजुलाबेग, आणि पेलवानअलीशिस्तनी इतके दिले.

मेहेतर रमजान याचा मुलगा जो गंधीखान्यावर चौकसनिशीचे कामावर होता व जास कारम अली ह्मणत, यास इतमतखां अहंमदाबादेंत आल्यानंतर शाहाबुद्दीन अहंमदखां यास हुजूर आणण्याकरितां पाठविलें. या समयीं परगण्यावरील मुख्य न्यायाधीश हाजी इभ्राईम सरहिंदी याजवर हजारों लोकांनीं फिर्यादी केल्यावरून पादशाहानें त्यास त्याकामावरून काढून हुजूर बोलाविलें, त्याजवर गुन्ह्याची कलमें शाबूद जाल्यावरून त्यास रेटंभोरचे किल्यांत कैद ठेविलें.

इतमतखां आपले सुभ्यावर येणार इतकीयांत जे लोक पूर्वी मिरझाबरोबर बंडांत होते ते अहंमदाबादेंत पुनः आले. परंतु त्यांस शिक्षा जाल्यानंतर त्यापरगण्यांत जो सुभेदार येई, त्याचे हाताखालीं ते चाकरी करीत असत. हे बंडखोर लोक बंड करण्यास संधी पाहात असत, व वजीरखां याचे अमलांत त्याणीं बंड केलें होतें. तें शाहाबुद्दीन अहंमदखां याणें प्रसंग पाहून मोडून त्या पैकीं कित्तेकांस आपले जवळ चाकरीस

ठेविलें, बंडखोर लोकांस चाकरीस ठेविलें, असें पादशाहाचे कानावर आल्यावरून त्यांस त्याणे चाकरीवरून काढावें, व देशपार हाकून देऊन जे दुसरे फार विश्वासू असतील, त्यांस त्यांचे जाग्यावर नेमावें असा हुकूम दिला. पादशाहा तेवेळेस काबुलावर गेला, तेव्हां शाहाबुदीन अहंमदखानास बंडखोर लोकांस हाकून द्यावें, हें बरोबर दिसलें नाही, ह्मणून त्याणे त्यांची मनसोबदारी व जाहागिरी वाढवून दुसऱ्या पुष्कळ तजवीजीनें त्यांचें शांतवन करावयास यत्न केला. इतमतखां गुजराथेंत गेल्यावर सर्व दंगेखोर लोकांस देशांतून हाकून देण्याचा हुकूम आला, यालोकांचे कानावर हें आलें तेव्हां पुढें काय करावें, याचा विचार करूं लागले. याबंडांतील लोकांवरील मुख्य सरदार मीर अबीद याणे महंमद इसाफबलखी व खालील बेग बडाक्षी याची मसलत घेऊन ठरविलें, कीं इतमतखां गुजराथेंत आल्याचे पूर्वीं अहंमद खानास ठार मारावें व मुझाफीर यास बंडाचा मुख्य अधिकारी करून अहंमदाबाद घ्यावी. याबंडातील लोकापैकीं झांगीरखां या नामेंकरून कोणी होता त्याणें अहंमद खानास याबेताची बातमी सांगीतली परंतु तो सुभ्यावरून जाणार ह्मणून या गोष्टीची चौकशी नकरितां खालीलबेग आणि महंमदइसाफ यांस त्याणे निरोप मात्र पाठविला, कीं तुह्मी शहर सोडून जावें, त्याणीं विचार केला

कीं आपण असें केल्याने या गोष्टीस बळकटी येईल ह्मणून ते माटूर एथे जाहागिरीवर जाऊन तयारी करूं लागले. तेवेळेस त्यांणी सुलतान मुझाफिरास शरणतेनें पत्र पाठवून त्यांस येऊन मिळण्या करितां लिहिलें मीर अबीदयाणें वरकरणी कबूल केलें कीं शाहाबुदीन अहंमदखां याजबरोबर येण्यास सिद्ध आहें, परंतु आंतून कापट्य करून मोघल बेग वाफादार आणि ताईमर हुसेन शाहाबुदीन अहंमदखां याचें मुख्य कारभारी यांस आपले बरोबर बंडांत जाण्याकरितां आणविलें.

यासमयीं इतमतखां खोवाजाहा अबदुल काशीम दिवाण आणि खोवाजा निझामुदिन अहंमदबक्षी हे पट्टणांत येऊन पोंचले, आणि कारम अली जास शाहाबुदीनअहंमदखां याचे कामावर पाठविलें होतें, तो इतमतखानाचे कारभाऱ्यांबरोबर अहंमदाबादेस आला. शाहाबुदीन अहंमदखां जो घोडा आणि सन्मानाचा पोषाख पादशाहाचे हुकुमावरून आला होता, तो घ्यावयास आला, आणि कारमअली यास शहरांत नेऊन पादशाहाचा हुकूम समजतांच त्याणे शहराचा किल्या इतमतखानाचा कारभारी याचे स्वाधीन केल्या. त्याणे आईशी ठाण्यातून स्वार जमा करविले, परंतु फोजेनें ठाणीं सोडतांच कोळी व ग्रासियन लोकांनीं कित्तेक तट पाडून दंगा मांडिला. ते समयीं शाहाबुदीनअहंमदखां याणे अहंमदाबाद सोडून

साबरमती नदीवर असमानपूर एथें तळ दिला व इतम-तखां दुसरे लोक बरोबर घेऊन शहरांत शिरला. मीर अबीद, आणि बंडांतील सर्वलोक मिळून पांचशें होते. त्याणीं वाटवा एथील तळयाचे शेजारी येऊन तळ दिला, मीर अबीद याणे इतमतखानास निरोप पाठविला कीं मी दुःखांत आहें यामुळें शाहाबुदीन अहंमदखां याजबरो-बर हुजूर येऊंशकत नाहीं. परंतु पूर्वीची माझी जाहागिर मला दिली तर जी चाकरी सांगाल ती करीन नाहीं पेक्षां बंडांत शिरणें प्राप्त आहे. इतमतखां याणें उत्तर पाठविलें, कीं पादशाहाचे हुकुमाविरुद्ध मी तुला जाहा-गीर देऊं शकत नाहीं परंतु मी जातीनें जितकें होईल तितकें तुजकरितां करीन हे दुर्दैवी लोक जिवावर उदार होऊन, खालील बेग व महंमद युसाफल यांजकडे माटर एथें जाऊन बंडांत शिरले.

इतमतखानास सहाय देण्याकरितां सैन्य नेमिलें होतें तें अद्यापि शहरांतून येऊन पोंचलें नाहीं, ह्मणून याका-मगारास शाहाबुदीन अहंमदखां यास काहीं दिवस थांबून धरून त्याचे साहायानें दंगेखोरलोकांबरोबर लढाई करावी, हें योग्य वाटलें यावरून शाहा अबुतुराब, आणि खोवाजाहा निझामुदीन अहंमदबक्षी हे शाहाबुदीन अहंम-दखां यास याविषयींची मसलत विचारावयास गेले, तेव्हां त्याणें त्यास सांगीतलें कीं बंडांतील लोकांस देशा

मध्यें स्वस्थता होण्याकरितां पाहिल्याप्रमाणें जाहागिरी द्याव्या. परंतु नादिल्यास फौजेंत मनुष्यें येऊन पोंचल्याचे पूर्वीं अथवा पुढें काय करणें हें ठरविल्याचे पूर्वीं तुह्मीं सैन्य घेऊन जाऊन दंगेखोरामध्यें कलह उत्पन्न करावा. यासमयीं इतमतखानानें उत्तर दिलें कीं शाहाबुदीन अहंमदखां शहरांत परत येईल, तर मला जें योग्य दिसेल तें मी करीन. शाहाबुदीन अहंमदखां याणें पूर्वीं वाटखर्चा करितां पुष्कळ पैका खर्च केला होता, व त्याचीं मनुष्यें शहर सोडून आपले कुटुंबासाहित फार दुःख पावलीं होतीं. व त्रासलीं होतीं यास्तव इतमतखानाने त्यास सरकारीखजीन्यांतून पैका देऊन साहाय द्यावयाचें कबूल केलें. परंतु खजीन्यामध्यें रोकड नव्हती ह्मणून पैका कसा जमा होतो, या विषयीं कागदपत्र आले गेले त्यांत कित्तेक दिवस मोडले.

इतमतखानानें शहरांतून साहायाकरितां फौज येउन पोंचे तोंपर्यंत त्यास चाळवण्याविषयीं कागदपत्र पाठवून दिवसगत लावावी, आणि फौज आल्यावर त्यांस तोंडघशीं द्यावें असा बेत केला, याकरितां तो अहंमदाबादेहून कारकीस गेला, तेव्हां लुटारू लोक माटूरपरगण्यामध्यें जमले होते तेही लुटण्या करितां योग्यसंधी पाहून काठेवाड एथें सुलतान मुझाफीर यास येऊन मिळा ल्यानंतर त्याणीं त्यास सांगीतलें कीं या देशांत फार

पैका आहे, तेव्हां तो लोभानें व लुटावे या इछेने कारकीतील मुख्य लोक बरोबर घेऊन अहंमदाबादे कडे गेला. बंडखोर लोकानीं कारकी एथील पंध्राशें स्वार जमा करून धोलका एथे फार त्वरेने येऊन तळ दिला. सर्वांचा बचाव व्हावा याकरितां शाहाबुदीन अहंमदखां याचे छावणीवर रात्री छापा घालावा असा त्याणीं बेत केला. सुलतान मुझाफीर याणे खंबायतेंत जाऊन पैकेपूर शहर लुटावें, असें मनांत आणिलें, परंतु इतमतखानास समजलें, कीं शत्रू धोलका एथें आले तेव्हां तो बेफाम होऊन काय करावें, हें नसमजतां शाहाबुदीन अहंमदखां यास अहंमदाबाद एथें परत न्यावें ह्मणून कारकी एथें आला. इतमतखां याचे हातांतून ही गोष्ट गेली, कीं त्याणे घोटाळून शत्रू वेशीपासून दाहा कोशांवर असतां आपण आठरा कोश साहायतेस्तव गेला. शहराचा सांभाळ करण्या जोगता कोणी विश्वासू मनुष्य नव्हता ह्मणून ही गोष्ट अविचारानें घडली, आणि जे शाहाणें व विचारवंत होते. त्याणीं त्यास ही गोष्ट नकरावी असें सांगीतलें. परंतु त्याणें त्याचा सल्ला न घेतां, आपला मुलगा शिरखां याचे स्वाधीन शहर करून आपले बरोबर निझामुदिन अहंमद बक्षी घेऊन तो अहंमदाबादेहून कारकीस जाण्यासनिघाला. या समयीं शहराचे वेशीवर मिर मासुम भाक्री फाइझुलाबेगआका,

आणि झाइनुद्दीन कामबोहो यास नेमुन मुझाहीदखां गुजराथी यास रामखीरचे वेशीवर ठेविलें.

गुजराथेंतील अतृप्तलोकांपैकीं कित्तेक लोक बंडांतील लोकांशीं लागून होते त्याणीं इतमतखां पळून गेल्याप्रमाणे येथून गेला, हें विदीत करण्याकारितां जासूद पाठविले, आणि असें उल्हासाचें वर्तमान बंडांतील लोक काय करावें, हें नसमजतां माघारें जाण्याचे बेतांत होते इतक्यांत येऊन पोंचले. ते फार त्वरा करून अहंमदाबादेस आलें. आणि प्रतिक्षणीं त्याचें सैन्य वृद्धिंगत होत चालिले. तेथें येऊन पोंचल्यानंतर त्याणीं रामखीरचे वेशीवर हल्ला केला, आणि वेशीवर धडका देऊन आंत शिरले, याजवरून दंगा माजला. आणि शिरखां मीरमासुम व दुसरे यासंकटापासून बचावण्याकरितां काढतें घेतल्यामुळें लुटारू याणीं सर्व शहर लुटलें. मुझाफीर याणें ईश्वराची या कामांत सिद्धी होण्या करितां स्तुती केली होती, तों गुजराथेंतील राजाचे वाडयांत शिरला. आणि सिंव्हासनावर बसावें, अशी त्याची इछा होती ती त्याणे परिपूर्ण केली. हें शहर सोन्यानें, जवाहिरानें, आणि ऊंच कापडानें भरलें होतें ते एके क्षणांत लुटारू लोकांचे दाढेत पडलें.

इतमतखानानें शाहाबुदीन अहंमदखांयास पूर्वींचे गोष्टीं विषयीं काहीं ठराव करून परत यावयास उत्तेजन दिलें.

परंतु त्याचे बरोबरील लोकांचा त्यास अविश्वास वाटून आह्मी लबाडी करणार नाहीं, अशा त्यांजपासून कुराणाचा शपथा वाहून घेतल्या. या कृतघ्नलोकांचा सरदार मुळप्रथम शत्रूकडे जाऊन मिळणार होता.

सरकारीलोक अहंमदाबादे जवळ आठकोशांवर आले, तेव्हां शिरखांन मीरमांसूम भाक्री व दुसरेलोक भेटले त्यांतून प्रत्येकानीं शहर घेतल्याची वाईट बातमी निरनिराळी सांगीतली. शाहाबुदीन अहंमदखां हें समजल्यावर पुढें कसें करावें, याघोटाळ्यांत पडून दुसऱ्याची मसलत घेऊं लागला. प्रत्येकानीं त्यांचे अकलेप्रमाणे मसलत दिली. सरतेशेवटीं असेंठरलें कीं अहंमदाबादेस जावे, आणि शत्रू भेटल्यास त्याशीं लढाई करावी. नाहींतर शहराभोंवता वेढा घालून आपली फौज शहरांतून येई तोपर्यंत वेढा कायम ठेवावा, हा बेत केला, तेवेळेस ही मोठी मूर्खत्वाची गोष्ट केली, कीं बरोबरील लोकाचीं बायकामूलें बचावाचे जाग्यात न ठेवितां बरोबर घेऊन गेले. पादशाहाची फौज असमानपुर एथे अहंमदाबादे जवळ सकाळीं येऊन पोंचली आणि तळ दिला इतक्यांत शत्रू आले असें समजून कंबरा बांधून तयारी करून लढाईस सिद्ध जाले. शाहाबुदीन अहंमदखां याचे लोकांपैकीं कित्तेक तंबू ठोकीत होते, व कित्तेक आपले कुंटुबांची, व सामानाची खबर-

दारी ठेवीत होते, परंतु त्यांजबरोबर आले होते, ते लोक कंबरबंद होते, तरी शत्रूचे स्वारांपैकीं दोनहजार स्वार शहरसोडून नदीचे किनाऱ्यावर आले. सुलतान मुझाफीर जातीनें त्यांचे मध्यभागीं उतरून कांठींचे बडेलोक आपले सभोंवते ठेवून महंमद युसाफ बदाक्षी, व खाली-लबेग यास पाहण्याकरितां पुढे पाठविले. शाहाबुदीन अहंमदखांयाणें हें पाहून मुकाट्याने आपले घोड्यावर बसून आपले फौजेस लढाईकरितां तयार केलें. इकडे इतम-तखां असमानपूरचे उतारावर राहून शत्रूंस नदी नउतरूं द्यावी, यानिमित्तानें मीर अबुतुराब यास बरोबर घेऊन गुजराथेंतील फौजेसुद्धां दूर राहून पळून जावयास संधी पाहात होता.

शाहाबुदीन अहंमदखां हा एके टेंकडीवर सात आठशें स्वारांसुद्धां होता, त्याणे दंगेखोरलोकांशीं लढाई करावयास उभा राहाण्याचा निश्चय करून मध्यभागापासून त्याणें स्वारांपैकीं, दोनशें स्वार नदी उतरून घाला घालावयास पाठविले. फौजेवरील कामगार आणि शत्रू यांचें एक मत होतें, तरी त्यांचे हाताखालील फौजेने शत्रूस दोनवेळा माघारें हांकून दिलें. फौजेवरील कामगारापैकीं शाईबक या नामेंकरून होता. त्याणे आपले फौजेस शत्रूशीं लढाई नकरूं देतां वारंवार शत्रूस पुढें येण्याकारितां निरोप पाठवी बादरबेग तुर्की मनुष्य जो

मोठे धैर्यानें पादशाहाचे फौजेचे बचावाकरितां यत्न करीत होता तो ठार मारला गेला. त्यासमयीं शाईबक व दुसरे मिळून पांचशें होते ते शत्रूस जाऊन मिळाले तेव्हां शत्रू नदी उतरून गेला.

शाहाबुदीन अहंमदखां याजबरोबर दोनशें स्वार होते तो आपले जाग्यावर राहून आपले बरोबरचे माणसांस शत्रूचा घाला परतविण्याकरितां धैर्य देऊंलागला. त्याचे घोड्यास बाणानें जखम जाली होती. व त्याचे आप्त सबंधी भाऊ त्याचे भोंवताले पडले होते, आणि मोठे जमावानें त्याजवर घाला घालून त्याचा याप्रमाणें शेवट केला. त्याचे मित्रांपैकी कित्तेकानीं त्याचा घोड्यांचा अनीनी धरून त्यास रणसंग्रामाचे जाग्यावरून नेण्याकरितां बलात्कार केला, तेव्हां पळूनगेल्यांपैकीं एकानें त्याचे पाठीवर घाय केला, परंतु त्यास न लागतां चु कला.

काटीवशहरांतील लोक जे लुटावयाकरितां आले होते त्याणी पादशाहाचें फौजेचे मालाचा नाशकरून त्याचीं मुलें माणसें कैद केलीं, पैका, अमोल्य पदार्थ, हत्ती, घोडे, इत्यादिक त्यादंग्यामध्यें नेलें. सुलतान मुझाफीरही याप्रमाणें लूट नेऊन अहंमदाबादेस जाऊन तेथे आंतले कोटांत राहिला, तेथें एक मोठे माणसाचे विश्वासानें राज्यकारभार करूं लागला. आणि साइबक जो शाहा-

बुद्दीन अहंमदखां याची चाकरी सोडून याजकडे आला होता, त्याला पदवीस चढवून जाहागीर दिली, दुसरे-दिवशीं बंडावरील मुख्य बरोबर घेऊन तो तेथील मुख्य मशीदींत गेला आणि तेथे आपले नावानें धर्मकृत्य वाचून शिरखां फाउलादी हा जुनेगडांत मोठे विपत्तींत राहात होता, त्यास बोलावणें पाठविलें. थोडे दिवसांनंतर हा सरदार सुलतान मुझाफिराकडे दोनशें गयाळीस्वांर बरो-बर घेऊन आला. परंतु सुलतान मुझाफीर, कटबु-द्दीन महंमदखां तेसमयीं सुलतानपूर, आणि नांदूरबार,या शहरांचे शेजारीं आला होता, यास्तव तो अहंमदाबाद-मिर अबीद याचे स्वाधीनकरून त्या देशांचे शेजाराकडे गेला. तेचवेळेस शाहाबुद्दीन अहंमदखानास पट्टण एथे अडथळा करण्याकरितां शिरखांफाउलादी यास पाठ-विलें, त्याणें यादेशांत सरकारी सर्व शिपाईलोक चाक-रीस ठेऊन, चौदा पंधरा हजार फौज एके पंधरा दिव-सांत जमा केली.

थोडेदिवसांनंतर इतमतखानास साहायाकरितां दोन हजार सैन्य पाठविलें होतें तें शाहाबुद्दीन अहंमदखां याजकडे पट्टण एथे गेलें, आणि सरकारी फौजेनें तेथे ठाणें बळकट करून राज्यकारभाराविषयीं हुजूर विदीत केलें कटबूद्दीन महंमदखां ही गोष्ट कळतांच भरमजलेने बडोद्यांस गेला. या गडबडींत खंबायतेंतील कल्याणराव

याचा चाकर सयदुद्द दौलत याणे फौज जमाकरून खंबायत घेतल्यावरून त्यास पुष्कळ पैका मिळाला, आणि आपलें सैन्य चारहजारपर्यंत वाढवून जालेला मजकूर सुलतानास कळविला. त्यावरून सुलतान मुझाफीर याणें त्यास रस्तुमखां अशी पदवी देऊन त्यास मोठे सन्मानाचे पोषाखांची नजरकरून उत्तर लिहिलें कीं बोलावणें येई तोंपर्यंत तुह्मी आहा तेथे राहावें. शिरखां फाउलादी याचा चाकर अवलियाखां याणेही चोताना एथें बंड केलें. आणि महंमदबेग जवळच होता त्याणे त्यास जिंकल्यावरून शिरखां फाउलादी याणे आपला जावई हुसेनखां यास त्याचे साहायास पाठविलें. महंमदहुसेन व खोवाजाहां निझामुदीन अहंमदबक्षी याचे हाताखालची सरकारी फौज महंमदबेग याजकडे येऊन मिळाली त्याणे शत्रू पाठीमागें येऊन त्यांस जिंकलें. शिरखां फाउलादी यास ही गोष्ट कळल्यावरून तो पुन्हा चढावकरून आला, तेव्हां इतमतखां आणि शाहाबुदीन अहंमद याणीं पट्टण एथे राहाण्याचा निश्चयकरून इतमतखानाचा मुलगा व सरकारी फौज त्यास अडथळा करावयास पाठविली. ही दोन्हीदळें पट्टणापासून नऊकोशांवर मिळून तेथे बंडखोर जिंकले गेले. व शिरखां फाउलादी याचा जांवई ठार मारला गेला.

सुलतान मुझाफीर पूर्वीं लिहिल्याप्रमाणें अहंमदाबा-

देहून कटबुदीन महंमदखां याजवर चालून गेला. सयदुद्दौलत यावेळेस नारियटचे शेजारीं खंबायत एथून चारहजार मनुष्यें घेऊन येऊन त्यास मिळाला, व कटबुदीन महंमदखां याणें महंमद अवझाल आणि महंमद मिराख यास खानपूर आणि वांकनीर एथील घाटांवर पाठवून त्यास हुकूम दिला, कीं शत्रूस तापीनदी नउतरूं द्यावी, हे कामगार बंडखोर लोकांशीं आंतून मिळून होते, ते शत्रूशीं लाहानशी लढाई करून पळून गेले. तेव्हां सुलतान मुझाफीर खानपूरचे पायउतारापाशीं आला.

कटबुदीन महंमदखां यासमयीं बडोदेंशहराचे कोटांत कांहीं विश्वासुक मनुष्यें घेऊन राहिला. तेव्हां शत्रूनीं येऊन बडोद्यांस वेढा घातला. वीस हजारस्वार कोळी रजपूतलोक यांचे पायदळ मुझाफिराजवळ जमलें होतें, तरी कटबुदीन महंमदखां याणे पायउतारावर बावीस दिवसपर्यंत अडथळा केला, आणि त्याचे जातीचे मनुष्यांचा त्यास विश्वास नव्हता, ह्मणून त्याणे जितका यत्न करावयाचा तितका केला. यासमयीं महंमद मिरांक आणि चिरकाशखां रुमी याणीं मोर्चावरून मुझाफीर यास सांगून पाठविलें कीं पादशाहाचे शिपाई तेथे पालतीवर आहेत, याकरितां तहकरण्याचे निमित्तानें आह्मास झाईनुदीन कामबेहो सय्यद जलालभाक्री आणि नवरांखां याचा कारभारी खोवाजाहायाहा यासुद्धां बोलावून आणून

खोवा जाहायाहाया, यास कैदकरून दोघांस ठार मारल्यास तुह्मास कटबुदीन महंमदखां याचे फौजेपासून काहीं अडथळा न होतां पायउतारावर घाला घालावयास येईल, सुलतान मुझाफीर याणे या मीसखोरलोकांची मसलत घेऊन त्याप्रमाणें केलें, आणि कटबुदीन महंमदखां याणे वर लिहिलेले पांच मोठे मनुष्य गुमस्ते पाठवितांच त्याणे त्यांस तत्क्षणींच कैदकरून झाइनुदीन काम बेहो यास हत्तीचे पायांखालीं तुडवून ठार मारिलें. व सय्यद अहंमदबोखारी याणे सय्यद जलालखां याजकरितां रदबदली केल्यामुळें त्यास सुटका होऊन त्याणे त्यास आपले घरी नेलें.

यानंतर सुलतान मुझाफीर याणे घोड्यावर बसून किल्यास वेढा घालावयास हुकूम दिला. वेढ्यावरील लोकानीं अहंमदाबादेंतून तोफा आणल्या होत्या त्यासुद्धां वेढा घातला. तेव्हां कटबुदीन महंमदखां यास वाटलें, कीं आपले लोक आपल्यास सोडून गेले, ह्मणून किल्यांत दडून राहिला. दुसरेदिवशीं सुलतान मुझाफिरानें शपथ घेतली कीं मी कटबुदीन महंमदखां याचे शरीरास अगदी इजा देणार नाहीं, आणि यागोष्टीविषयीं असे वचन देऊन त्याणे त्यास बलावणें पाठविलें. कटबुदीन महंमदखां मोठे विपत्तींत असतां सुलतान मुझाफीर यास भेटावयास गेला, तेव्हां त्याणे तत्क्षणींच त्यास कैदकरून थोडे-

दिवसानीं त्यास त्याचे बहिणीचा लेंक जालालुदीन यासुद्धां ठार मारलें.

सुलतान मुझाफीर बडोद्यामध्यें दोन दिवस राहून ब्रोचशेजारीं गेला, तेथे कटबुदीन महंमदखां याची आई, व कित्तेक गुलामलोक राहात होते, ब्रोचपुढें येऊन सुलतान मुझाफिरानें तळ दिल्यानंतर तिसरेदिवशीं गुलामलोकानीं फितून किल्ला सोडला, आणि सुलतानास भेटावयास जाऊन किल्याचा किल्या स्वाधीन केल्या, येणेकरून कटबुदीन महंमदखां याचा खजीना,व सर्व सामान सुलतानाचे हातीं पडलें. सुलतान मुझाफीर ब्रोच एथे पंधरादिवस राहिला, परंतु तेवेळेस बैरामखानाचा मुलगा मिरझाखां हा अहंमदाबादेवर चढावकरून येतो असें त्याचे कानावर आल्यावरून हा तत्क्षणींच कुचकरून त्या देशाकडे गेला.

---

## प्रकरण ८

मिरझाखां याचा अमल, मुझाफीर याचा पराजय, व अहंमदाबाद घेतली व मिरझाखां यास पांच हजार घोड्यांवर नेमून खान खानन् अशी पदवी मिळाली, व जाशहराजवळ लढाई जाली, तेथे फत्याबाग वसविली, व खोवाजाहा आबुलकाशीम याची दिवाणगिरी, व हिंदु-

स्थानांत इलाही शक चालविण्याचा हुकूम आला त्या-विषयीं.

गुजराथेमध्यें बंड जाल्याचें वर्तमान पादशाहास हिजरी ९९१ व इसवी १५८३ या वर्षांचे शेवटीं कळलें तेव्हां सरकारीनिशाणें पूर्वेकडे निघालीं आणि गुजराथेचा सुभा बैरामखां याचा पुत्र मिरझाखां जो तेवेळेस लाहान होता, व अकबराचे कृपेनें वाढला होता, त्यास दिला. राईदुर्गा मेदिनीराय, शेखकाबीर उर्फ सुभ्यातखां हा, व नासीबखां असे कित्येक शूर, आणि साहसी पुढारी यांस मिरझाखां याचे साहायास पाठवून त्यास थेट गुजराथेंत जावयास हुकूम दिला. कालीजखां, आणि नवरांगखां, यासही माळव्याकडून जावयास हुकूम जाला, तेव्हां ते त्या देशांतील सर्व फौजेंवरील कामगार बरोबर नेण्याकरितां त्यारस्त्यानें गुजराथेंत आले. सुलतान मुझाफीर यास मिरझाखानाचे येण्याचा बेत समजतांच तो अहमदाबादेस माघारा आला.

शाहाबुदीन अहंमदखां, आणि सरकारी बडेलोक ते वेळेस पट्टण एथे होते, त्यांस मिरझाखां येतो असें समजतांच त्याणीं त्याजकडे जासूद पाठवून ते थोडे दिवसानी त्याजकडे मरथा एथे जाऊन मिळाले. मिरझाखां याणे शाहाणपणानें विचार करून कटबुदीन महंमदखां हा मेल्याचे वर्तमान प्रख्यात केलेंनाहीं, परंतु सर्व पुढारी-

लोकांस निराळे बोलावून त्यांचा सल्ला विचारला तेव्हां सर्वांनीं आपले अकलेप्रमाणें सल्ला दिला. सरतेशेवटीं असें ठरलें कीं, पादशाहाचे कामास जय आहे, याकरितां जलदीनें लढाईस उभें राहावें, आणि जागोष्टीची अवश्यकता होती त्याचां बंदोबस्तकरून त्याणीं त्याप्रमाणें करावयास यत्न केला. सुलतान मुझाफीर हिजरी ९९२ व इसवी १५८४ याशकांत मोहोरमचे नव्वेतारिखेस मोठें सैन्य व तोफा घेऊन निघाला, आणि असमानपूराशेजारी महंमदानगर एथे साबरमतीनदीचे किनाऱ्यावर येऊन तेथें त्याचे छाप्याची वाट पाहात होता. मिरझाखां याणे नंतर उघड सांगीतलें, कीं शत्रूशीं लढाई त्वरेनें करावी परंतु माळव्यांतून फौज येईल ह्मणून त्याणे काहीं दिवसपर्यंत घाला घालावयास लांबण लाऊन त्याच महिन्याचे अकरावे तारिखेस शिरकेज शहराजवळ गेला. तो सांबरमतीनदीचे किनाऱ्यावर उतरला. तेथें एकबाजूस शहर व दुसरेबाजूस झाडी होती.

पहिल्याने शत्रूचे फौजेनें येऊन रात्रीस छापा घातला परंतु इछेप्रमाणे न होता ते माघारे गेले. माळव्यांतील फौजेकरितां वाट पाहात होते, तों फौज आल्याचें वर्तमान आलें, तेव्हां सुलतान मुझाफीर महंमदानगरांतून पुढें जाण्याकरितां योग्यसमय पाहून नदी उतरला. आणि त्याणे लढाई सुरू केली. सरकारी फौज जे सामान हावें

होतें तें त्याचा बंदोबस्त करून शत्रूस अडथळा करावयास आली. परंतु पुढील व उजवे हाताकडील शिपाई जा नदीचे किनाऱ्यावर कांटेकुंटे होते ती नदी उतरत असतां घोटाळ्यांत पडले असें जालें तरी लागलीच शत्रूशीं लढाई करून मोठे धैर्यानें वर्तणूक केली. मिरझाखां जो पांचशें स्वांर, व शंभरहत्तींसहीत, तळ देऊन पादशाहाचे फौजेस लवकर जय येईल अशी वाट पाहात होता. त्याणे सुलतान मुझाफीर याजबरोबर पांचसाहा हजार स्वांर पाहिलें तेव्हां विश्वासानें मैदानांत आला, आणि पाहतो तों शत्रूस जय मिळावे, अशीं चिन्हें दिसलीं.

मिरझाखानाचे मित्रांपैकीं कित्तेकानीं लढाई नकरण्यास सांगीतलें परंतु ही गोष्ट नामर्दीची दिसेल असें त्यास वाटून तो रणभूमींत उभा राहिला, आणि आपले मनुष्यांस पुढें जाण्यास नेट देउं लागला, यासमयीं हत्तीनीं शत्रूचे फौजेची दाणादाण करून सुलतान मूझाफीर सर्वस्व गेल्याप्रमाणें सोडून देउन पळून गेला त्याचे बरोबरचे लोक त्यासुद्धां माहेंद्रीनदीचे किनाऱ्यावरून महंमदाबादेस पळून गेले, त्याचे फौजेची दाणादाण जाली व कित्तेक लोक पळून गेले व कित्तेक मारले गेले तरी दिवस गेल्यामुळें सरकारी फौज त्याचे पाठीमागें जाऊं शकली नाहीं ही लढाई वर लिहिलेले वर्षीं मोहोरममहिन्याचे तेरावे तारखेस जाली. सुलतान मुझाफीर जिंकला गेला त्याचदिवशीं

कालीजखां, शारीफखां आणि नवरांगखां, माळव्याहून बडोद्याकडे आले, आणि जयाची बातमी कळल्यावरून तेथें त्याणीं मुकाम केला. नवरांखां याणें मिरझा झाहिद यास ब्रोच घेण्याकारितां पाठविलें. परंतु हाजीबेग चिरकाश आणि नाशीरखां जाचे हातांत तेथील खजीना होता त्याणी वेशी बंद करून पादशाहाचे फौजेवर घाला घातला. सुलतान मुझाफीर पळून गेल्यानंतर खंबायतेकडे गेला, तेथें त्याणे सावकारापासून, व तेथील राहाणारे लोकांपासून वरगणीप्रमाणे साहायाकारितां पैका घेऊन दंगेखोर लोकांस आपले जवळचें सोने वांटून त्याणे दाहाबाराहजार बंडखोर लोक जमा केले. हा राज्यास योग्य वारसदार आहे, असें सर्व कुळंबी लोकांस वाटून चहूंकडून त्याजकडे येउन मिळाले. मिरझाखां यास या गोष्टीचें वर्तमान कळतांच सय्यद काशीम जो जखमी जालाहोता, त्याचे स्वाधीन अहंमदाबाद करून बंड मोडावें या बेताने तो सफरमाहिन्याचे दुसरे तारिखेस सुलतान मुझाफीर याजवर निघाला, आणि माळव्यांतील सर्व फौज ते वेळेस भडोच एथें वेढा घालीत होती तीस आपलेकडे येण्यास हुकूम केला.

शत्रूने सयदुददौलत याजबरोबर फौज देऊन त्यास धोलका एथें पाठविलें आणि इखत्यरल्मुल्क याचे मुलगे मस्तफाखां शिखानी याजबरोबर महंमदाबादेस पाठविलें.

माळव्यांतील फौजेवरील कामगार आपले फौजेसुद्धां बारा या शहराजवळ मिरझाखां यास येऊन मिळाले आणि सुलतान मुझाफीर यास हें कळतांच तो खंबायत सोडून बडोद्यांकडे गेला. मिरझाखां बडोद्यांकडे त्याचा पाठलाग करीत गेला. तेथून नवरांखां यास सयदुददौलत याजवर पाठवून आपण जातीने सुलतान मुझाफिराचा पाठलाग करीत चालिला. सरतेशेवटीं लढाईंत जय जाला नाहीं तरी लढाई करावी, असा शत्रूनीं निश्चय केला. आणि दोन्ही दळांची अघोर लढाई जाल्यानंतर पादशाहाचे फौजेचा जय जाला. नवराखानासही जय मिळाल्यानंतर तो बाकीचे फौजेवर आला. आणि सुलतान मुझाफीर नर्मदा उतरून ईहादियाचे डोंगरांत आश्रय करावयास गेला. पादशाहाचे फौजेवरील कामगार याणीं बंडांतील लोकांस नाहीसें करावयाचा बेत करून यासमयीं न्याडोड एथें आपली फौज पुढें चालावयास हुकूम दिला, आणि त्यांतील कित्तेक निराळे होऊन मिरझाखां याजकडे आले. व दुसरे दक्षिणदेशांत गेले, यालढाईमध्यें सुमारें दोनहजार मनुष्यें मेलीं, व पांचशें लोकांस कैद करून ठार मारलें.

पादशाहास आनंदाची बातमी येऊन पोंचली तेव्हां त्याणें मिरझाखानास खानखानन अशी पदवी देऊन त्यास पांचहजार घोड्यांवर नेमिलें. आणि दुसरेलोकांस

त्यांचे योग्यतेप्रमाणे त्यांचा इतमाम चालण्याजोग्या जाहागिरी दिल्या.

खानखानन् हा न्याडोड सोडून अहंमदाबादेस आला. आणि तेथें देश सुफळतेस आणावा. व गांजलेले रयतलोकांची सुटका करावी ह्मणून त्याणे फार श्रमकेले, त्याणे केशापूर शिरकेज या शहराजवळ जा जाग्यावर सुलतान मुझाफीरास जिंकलें तेथे एक बगीचा करून तिला फत्याबाग असें नाव दिलें त्या बागेंतील मोठाले वाडे, आणि जळमंदिराचे इमल्याचें लांकुडफांटें, अद्यापि तेथे आहे, आणि तेथील पेरलेले जमीनींतून जें उत्पन्न होते तें त्या शहराचे जमीनीपासून निराळे पोंचतें.

सारांश सुलतान मुझाफीर याचा सर्वस्वीं नाश होऊन तो राजपिंपलाचा डोंगर सोडून पट्टणाकडे गेला, आणि अबिदामिराक, युसाफ्, अबदुला, आणि दुसरे शत्रूकडील लोकानीं त्यासमयीं मंडाशहराजवळ त्याचे तर्फेने मोठें बंड मातविलें. शादमानबेग याचे हाताखालीं फौज देऊस त्यास त्यांजवर पाठविलें, तेव्हां सुलतान मुझाफीर लढाईस उभा नराहातां इडुराकडे पळून गेला. आणि मेथून काठेवाड, व लोणाकातीस लोकांकडे खारी एथें पळून गेला. मिरझाखानखानन याणें दुसरी फौज तयार करून बंड मोडण्याकरितां ती खोवाजाहां निजामुदीन अहंमदबक्षी आणि मिरअबुल मुझाफीर याचे

हाताखालीं देऊन बंडाकडे पाठविली. परंतु फौज धोलका एथें आलीं, तों सर्व बंड जिकडेतिकडे दबले, आणि शत्रूपैकीं कित्तेकांचें हाल आपेष्टा होऊन भणक्या मारीत होते, यावरून शिरखांफाउलादी बागलाणाचे जमीदाराकडे आश्रयास गेला.

कालीजखां, नवरांगखां, यास माळव्यांतील फौज बरोबर देऊन भडोच वर पाठविले होते, ते सर्व भडोचास वेढा घालीत होते, तो नाशीरखां किल्यांत होता त्याणे सरकारी फौजेस मिळावें ह्मणून हाजीबेग यास दग्यानें ठार मारिलें. शाहाबुदीन अहंमदखान यास खानखानन याणे बरोबर फौज देऊन तिकडे पाठविलें, आणि त्यास भडोच जाहागिरी दिली. किल्यांतून गोलंदाजा पैकीं एक शाहाबुदीन अहंमदखानास सांगावयास आला कीं आंतील मनुष्यें वेढ्यामुळें फार त्रासलीं आहेत, आणि मी, व माझे सोबती, मिळून सरकारी फौजेनें साहाय दिलें, तर तेथील दारें उघडतों, तो मनुष्य खरें-बोलतो, असें वाटल्यावरून तेथे वेशीजवळ लागलेच काहीं लोक पाठविलें, नंतर ती जागा सहजच हातांत आली. नाशीरखां, आणि चारकीशखां, हे मोठे संकटानें पळाले आणि चारकीशखां सरकारी फौजेचे हातांत पडल्यावर कैद करून त्यास ठार मारलें.

त्यासमयीं सुलतान मुझाफीरास फार दुःख होऊन

तो यावर्षाचे शेवटीं जुनागड एथें गेला. सरकारी फौज अहंमदाबादेस परत आली, आणि गुजराथें-तील कुमकेकारितां दुसऱ्याची फौज आणली होती, त्यावरील, मुख्य कामर आपापले जाहागिरीवर गेले, परंतु देशांत दंगा बखेडा जाल्यावरून बारमाहीपेक्षां वसूल काहीं कमी आला व फौजेस पैसा नाहीं. ह्मणून तैनात मिळाली नाहीं तेणेकरून फार दुःख जालें.

बंडांतील लोक योग्य संधी पाहात होते ते जमले, आणि खानखानन अहंमदाबाद काळीजखां याचे स्वाधीन करून शत्रूवर नवरांगखां व, खोवाज निजामुदीन अहं-मदबक्षी याचे हाताखालींल फौज घेऊन चढाव करून गेला. पूर्वींच सय्यद काशीमखां हा पट्टण एथे पाठवून जेथे जेथे ठाणीं ठेवण्याची गरज होती तेथें ठेविलीं सुल-तान मुझाफीर मुरबी एथें आल्यानंतर त्याणे राधनपूर लुटलें, आणि जेथें जेंजें सांपडलें तेंतें घेत चालिला त्यादेशांतील जमीदाराचे साहायाकारितां वाट पाहत होते, इतक्यांत सरकारी फौज येऊन पोंचली, तेव्हां तो त्याचे पुढें पळून गेला, आणि खानखानन बारनगर देशांतील डोंगरीरानापर्यंत त्याची पाठलाग करीत गेला. यादे-शांतील जमीदारलोकानीं राजकृपासंपादन करण्याक-रितां आपले कारभारी पाठविले आणि ते पूर्वीं सुलतान मुझाफीरा बरोबर होते तरी त्यांस वाटलें, कीं अशी-

गोष्ट केल्यानें आपला बचाव होईल, त्याणीं याकरितां शरण जाउन गाऱ्हाणी सांगीतलीं. जुन्यागडावरील कारभारी अमीनखां घोरी याणे आपले मुलग्यास खानखानन याजबरोबर पाठविण्यास कबूल केलें, आणि जामराजाने पादशाहाचे राज्याविषयीं फार लक्ष ठेवितो असें दाखविण्याकरितां सांगून पाठविलें कीं सुलतान मुझाफीर अमके जाग्यांत आहे, आणि थोडीशीं फौज त्यास जलदीनें धरण्याकरितां पाठविली. तर तो सहज कैद केला जाईल खानखानन जातीने गेला, परंतु डोंगरीदेशांत सुलतान मुझाफिराचा काहीं ठावठिकाण नलागल्यामुळें त्याणें फौजेचा चार टोळ्या केल्या नंतर एकेटोळीवर आपण जातीनें आपला हुकूम ठेवून त्याणे नवरांगखां खोवाजाहां निझामुदीन अहंमदबक्षी, आणि दौलतखां लोधी यांस तीनटोळ्यांवर नेमून हुकूम दिला कीं देशांत शिरून पेरलेलें देश लुटावे

चहूंकडे हें प्रसिद्ध जालें कीं सुलतान मुझाफीर आपले मुलास जामाचे स्वाधीन करून अहंमदाबादेस गेला. या निराशेचा बातमीने खानखानन यास काहीं भय नवाटतां त्याणे जामास शिक्षा करण्याचा निश्चय केला. आणि यासमयीं रजपूतलोक फार मारले जाऊन सरकारी फौजेस पुष्कळ लूट सांपडली. सरकारी फौज नावानगरचे जवळ चार कोश आली, तेव्हां जामानें शरण

जाऊन पत्र पाठवून राईदुर्गा, व कल्याणराई, याजकडून रदबदली करून आपले मुलाबरोबर एक हत्ती व कांहीं अमौल्यपदार्थ देऊन त्याची खानखानन यास नजर पाठविली. खानखानन याणे जयी होऊन त्यानजरेचा स्वीकार करून त्यास ही परत दिली.

सुलतान मुझाफीर हा फार शौर्यानें, व साहसपणानें अहंमदाबादे कडे गेला होता, तो पुरांतीचे ठाण्याजवळ आल्यावर तेथील फौजेनें नाहारवाल्याचे फौजेसुद्धां त्यास हाकून देण्याचा निश्चय केला, याफौजेनें आपले बरोबरीचे फौजेशीं लढाई करून कित्तेक ठार मारली, खानखिलान यास आनंदाची बातमी रस्त्यांत कळतांच त्याजवर मोठी खैर केली ह्मणून त्याणे ईश्वराची स्तुती केली.

शाहाबुदीन अहंमदखां जो ब्रोचचे जिल्ह्यावर होता, त्यास माळव्याचे सुभ्यावर नेमिल्यावर तो हिजरी ९९३ व इसवी १५८५ या शकांत तेथे गेला. यावर्षीं खानखानन गुजराथ देशाचा पक्का बंदोबस्त करून पादशाहास भेटावयास गेला. तेथें त्याचा फार आदर सत्कार जाला, आणि थोडेदिवसांनंतर दिल्लीहून परत जाण्यास निरोप जाल्यावर तो गुजराथेंत परत आला.

हिजरी ९९४ व इसवी १५८६ याशकांत खान अजीज कोका जो दक्षिणेच्या सुभ्यावर होता त्याचे हाताखालीं जी फौज कुमकेस आणिली होती त्याजव-

रील कामगार लोकांचा द्वेष पडल्यामुळें त्यांस सोडून एकटाच अहंमदाबादेस आला. आणि जे लोक त्याचें शत्रुत्व करीत होते, त्याजवर चढून जाण्याकरितां खानखानन याचें सहाय मागीतलें, खानखानन त्याचा फार आदर सत्कार करून त्यास भेटावयास गेला, आणि त्याचे ह्मणण्याप्रमाणें करणार होता, परंतु त्याचे शत्रूंकडून कांहीं कानावर आल्यामुळें त्याणें हा बेत राहता केला. यावरून खान अजीजकोका त्याचा ह्मणण्याप्रमाणें नजाल्यामुळें माळव्याकडे गेला.

हिजरी ९९५ व इसवी १५८६·८७ याशकांत सुलतान मोराद याचा तेसमयीं विवाह होत होता, सबब लग्नाचे समारंभाकरितां येण्यास हुकूम आल्यावरून खानखानन हुजूर गेला, आणि कालीजखां यास आपले कामावर ठेविल्यावर त्याणेच अहंमदाबादेंत त्याचे काम चालविलें.

खानखानन याचें पहिलें नाव अबदूररहीम होतें, त्यास त्याचा बाप बैरामखां मृत्यू पावल्यावर गुजराथेतून हुजूर आणिलें. तेवेळेस या ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें त्याचे चारवर्षांचें वय होतें, पादशाहाचे कृपेनें व खबरदारीनें, याचा अभ्यास जाहल्यावर त्यास मूळ प्रथम मिरझाखां अशी पदवी देऊन हिजरी ९८३ व इसवी १५७५ याशकांत गुजराथेचे सुभ्यावर नेमिलें, थोडे

दिवसांनंतर त्यास हुजूर बोलावून त्याचे कामावर वजीरखानास पाठविलें, नंतर तो निझामतीचें काम करूं लागला. मिरझाखां यास दुसरे वेळीं गुजराथेचे सुभ्यावर नेमिल्यावर त्याणें सुलतान मुझाफिरास जिंकिलें, तेव्हां त्याचे बापाची खानखानन अशी पदवी त्यास मिळाली, तो फारच चांगला मनुष्य असे. आणि नेहेमी योग्य समागम करीत असे. व फार प्रख्यात मनुष्यें बारमाही आपले चाकरींत ठेवी. शिपायाचे कामांत, व शत्रूचा पराजय करण्यांत, तो इतका कुशल असे कीं त्याचे योग्यतेचें वर्णन पुस्तकांत लिहितां पुर्वत नाहीं. तो हातमताईपेक्षांही किमपी कीर्तिमान आणि दयाळू असे. आणि त्याचे जे अमोलिक गुण लोकांत प्रसिद्ध आहेत त्यांविषयीं पुस्तकांत वर्णन केलें असतां दुसरा ग्रंथकरणे प्राप्त आहे.

त्याचवर्षीं इलाही शक चालू करण्याविषयीं हुकूम आला. आणि सरकारी चाकर लोकानी हा शक चालू करावा ह्मणून सर्व हिंदुस्थानांतील परगण्यामध्यें कायद्यांचीं पुस्तकें पाठविलीं. यास्तव या दोन हुकुमांची एक प्रत या पुस्तकामध्यें बार करीतों.

इलाही शक चालू करण्याविषयीं सरकारी
हुकुम जाला त्याची प्रत.

पादशाहाचे राज्याची कारकीर्द तीस वर्षे जाल्यानं-

तर इलाही शक चालू करण्याविषयीं हुकूम जाला सर्व प्रांतांतील सुभेदारांस व सरकारी कारकुनांस त्यांचे निरनिराळे खात्यांत जाहीर व्हावें, कीं लाहान मोठे लोकांस सुखी करावें. व त्यांचें कल्याण करावें, याविषयीं सदा सार्वकाळ पादशाहाचा यत्न चालिला आहे. यास्तव सर्वांनीं अशे अमोल्यवेळीं जीं पुस्तकें ईश्वरास मान्य आहेत त्यांचें अध्ययन करावें, तेचसमयीं सर्वांनीं मनांत, आणावें कीं धर्म स्थापनकर्त्तें माहासिद्ध, व विवक्त सेवन करणारे जे होते, त्याणी धर्म चांगला कोणचा व वाईट, कोणचा याविषयीं विस्तारेकरून व्याख्या केली आहे, परंतु लोकानीं तत्वज्ञान्याप्रमाणें आचरण करून मार्गदाखविणाऱ्याखेरीज आपण गोष्टीचा कोणते ही विश्वास मानूंनये. अथवा पुर्ताविचार केल्याखेरीज एकादी गोष्ट लाहान मोठी करूनये. अंतःकरणशुद्धीनें व सन्मार्गानें वर्तावें, आणि सिद्धी प्राप्त व्हावी. अशी इछा असलीयास परमार्थज्ञान, व सूक्ष्म ज्ञान ईश्वराचे कृपेने आणि मदतीनें प्राप्त होई. व पुढें काय होईल व मागें काय जालें, हें समजे तोंपर्यंत त्याचें अवलोकन करावें.

यासमयीं पादशाहा हिंदूलोकांचीं पंचांगें जास हिंदू पत्र अशें ह्मणतात तें अवलोकन करीत होता. तेव्हां काळपत्राप्रमाणें त्यास समजून आलें, कीं अमावास्येपासून चांद्रमासाचा प्रारंभ होतो. अथवा जेव्हां काळो-

ह्याचें मान जास्ती होत जातें व ज्यास हिंदीभाषेंत कृष्ण पक्ष असें ह्मणतात, तेव्हांपासून होतो. परंतु हे लोक आज्ञानपणानें, व चालीप्रमाणें कृष्णपक्षापासून मास प्रारंभ होतो असें मानतात, परंतु शास्त्रांत असें लिहिलें नाहीं, यामुळें त्यांस हें समजून सांगणें प्राप्त आहे, या करितां जेव्हां त्याचें धर्मशास्त्र जाणतें याणीं पादशाहास असा क्रम आहे, असें सांगीतलें, व त्याणीं काहीं शास्त्राचे प्रमाणही काढिलें, त्यांत चांद्रमहिन्याचा प्रारंभ अंवसेचे चंद्रापासून अथवा ज्यास हिंदीभाषेंत शुक्लपक्ष असें ह्मणतात, त्यापासून होतो. तरी हा सुशिक्षीत क्रम घोटाळ्याचे कित्तेक कारणांपासून रद्द जाला आहे. परंतु हीगोष्ट फार चमत्कारीक आहे कीं शुक्ल पक्षापासून मास प्रारंभहोतो असें लोक मान्य करितात, तरी ते व्यवहारांत याप्रमाणे करीत नाहींत, याकरितां सर्व ज्योतिषी व जोशांस व सरकारी मोजबेदार कारकुनांस, असा हुकूम जाला आहे कीं त्याणीं पंचांगामध्यें शुक्लपक्षापासून मासप्रारंभ मोजावा, व ही गोष्ट प्रसिद्ध करण्याकरितां एक पंचांग मोठे काळजीनें व लक्षपूर्वक तयार करवून, त्याजवर सरकारी मोहोर करून, सर्व मनुष्यांनीं त्याप्रमाणे वर्तावें या करितां सर्व मनुष्यांस पंचांगें वांटून दिलीं.

यासमयीं सर्व बडेलोक बोलिले कीं काजकामांत,

आणि व्यापारसंमंधी कामांत, सुलभतेनें समजूत व्हावी ह्मणून पादशाहाची हा शक चालू करण्याची योजना आहे, यांत संशय नाहीं, व तेणेकरून एकादे खटल्यामध्यें तंटा पडूंनये (यास उदाहरण) एकादे ग्रहस्थाने मक्ता केला अथवा कौल दिला अथवा चारवर्षें आणि चारमहिन्यांचे मुदतींत कर्जाचा भरणा करावयास कबूल जाला, तर त्यामुदतीचा प्रारंभ कोठपासून हेंच जर ठरलें नाहीं तर ती मुदत बरोबर कोठून होईल.

पूर्वीचे शक सुरू जाल्यानंतर कित्तेक दिवसांनीं अमूक गोष्टी घडल्या, त्या सुलभतेनें समजाव्या याबुद्धीनें, नवे शक चालू केले. इतिहासकथनकर्त्यांस हें ठाऊक असेलच कीं पूर्वीचे मोठमोठाले राज्यांचा हाच क्रम चालिला आहे. नवेशकाचे स्थापन केल्यामुळें, व्यवहारीलोकांस संशय, व अडचण पडत होती, तीपडत नाहीं, लोक बोलिले, कीं हिजरीशकाचीं सुमारें हजार वर्षें लोटलीं, व शिकंदर, आणि यजडीजर, हे शक जरी पंचांगांमध्यें लिहितात, तरी हिंदुस्थानांतील लोकांस, ते बरोबर ठाऊक नाहींत, यामुळें नानातऱ्हेचे शक ह्मणजे बंगाल देशांत लक्ष्मणशिंगराजा राज्य करूं लागल्यापासून चालू जाला त्या शकाचें सांप्रत ४६५ वें वर्ष चालू आहे, व गुजराथेमध्यें शालीवाहनशक चालत आहे, त्याचें सांप्रत वर्ष १५०६ ह्मणजे इसवी १५८४ दिल्ली,

होता, व गुजराथेंतील, राजवंशांतील शेवटचा पुरूष होता. त्याचे राज्या विषयीं

हिजरी ९६८ व इसवी १५६१ या शकांत सुलतान अहंमद मारला गेल्यानंतर इतमतखां याणें मुझाफीर यास राज्यावर बसविलें. कितीएक ग्रंथकर्त्यांचे इतिहासां प्रमाणें इतमतखां याचे हातांत सर्व राज्य कारभार होता. तेव्हां सुलतानाचा कोणी समंधी राज्यावर बसविण्यास योग्य नव्हता ह्मणून त्याणे एक नातू या नामें करून मुलगा आणून भर कचेरी मध्यें उघडपणें शपथ घेतली, कीं सुलतान महंमद सेकंड* याचा हा पुत्र आहे. याचा वृत्तांत असा आहे, कीं या मुलाची आई गरोदर होती, तेव्हां तिचे पोटचे पाडण्या कारितां तिला माझे स्वाधीन केलें परंतु पांच महिनें जाल्यावर पोटचें पडेना. हा मुलगा उपजल्यावर मी या मुलास गुप्तपणें वाढविलें आणि राज्यास या खेरीज दुसरा वारसदार नाहीं. सर्वांनीं याप्रमाणें मत्त दिलें, आणि या मुलास मुझाफीर शाहा अशी पदवी देऊन इतमतखां याचे ह्मणण्या प्रमाणें गादीवर बसविलें.

कांहीं महिने लोटल्या नंतर इतमतखां याणें फातखां बलोची याचा सुड घेण्याकरितां मुझाखां आणि शीरखां फाउलादी यांजवर पट्टण येथें फौज नेली. सर्व बडेलो

* ह्मणजे दुसरा.

कांस ही गोष्ट पूर्वींच माहीत होती आणि सुलतान ठार मारला गेला असें कळल्यावर इतमतखानावर फार त्रासून तो त्याचे जीवाचा घात करील या भयानें मात्र ते त्याशीं उगीच लागून होते. प्रधान फौज घेऊन पट्टण शहराकडे येऊन पोंचला तेव्हां त्याची आणि मुसाखां व शिरखां यांची लढाई जाली, त्या लढाईंत इतमतखां जिंकला गेला. आणि सर्व बडेलोक लढाई नकरितां अहंमदाबादेस परत आले. सर्व बडेलोक यास प्रतिकूळ होते व आपापले जाहागिरीवर गेले होते, तरी इतमतखां याणें पुनः फौज जमवावी असा निश्चय करून अतिशय यत्न केला इतमतखाना जवळ जितकी फौज होती, तितकी घेऊन मुसाखां, शिरखां, यांजवर पुनः चढाव करून गेला. आणि पुनः जिंकला जाउन अहंमदाबादेस परत आला. ही लढाई हिजरी ९६९ व इसवी १५६१-६२ या शकांत जाली.

सरते शेवटीं सर्व बडे लोकांमध्यें एकमेकाशीं चुरसा लागल्या, व श्रेष्टत्वा करितां कज्या लागल्यामुळें इतमतखानानें शहर सोडल्या वरून ते जागीजखां याचे ताब्यांत आलें, तेव्हां तोही आबीसीन लोकां कडून ठार मारला गेला. या गोष्टी विषयींचा आणि राज्यामध्यें बेकैदजाली येविषयींचा सर्व मजकूर मिराठा शिकंदरी मध्यें वर्णिला आहे.

घालावा ह्मणून हाही पंचांगांत घालावा या पंचांगांत सूर्यवर्षे व चांद्रमहिने घालतात, ते याशकापासून महिनेही सौर घालावे. असा हुकूम करितों

सर्व निरनिराळे धर्मांतील महाविद्वानलोकांनीं वर्षांतील अमूक दिवस जे ईश्वरास व परमार्थास योग्य आहेत ते सर्व मनुष्यांचे महोत्साहाकरितां नेमून त्यांस सण असें नाव दिलें आहे कीं येणेकरून दानधर्म, व्हावा, व याखेरीज अशे उत्साहाचे दिवसांत प्रार्थना. उपासनेची योजना करून अशा समयीं सर्व मनुष्यांनी ईश्वराची उपासना व त्यांस मोठा सन्मान देऊन सर्व लाहानमोठे मनुष्यांनीं याप्रमाणें दान धर्म करून आनंदोत्साह करावा, असें ठराविलें आहे. यास्तव यानियमाप्रमाणे कित्तेक सण पूर्वीं चालत होते, ते बंद जाले होते तरी हजारवर्षांपासून पुढें चालू जाले, ते पुढें लिहितों. सर्व मनुष्यांनी भगीरथप्रयत्न करून पुढें लिहिलेले सण करावे ते. इलाहीशकांतील फरवारदीनमहिन्याचे एकोणिसावे तारिखेस आरदीबिहिस्तमहिन्याचे तिसरे, खरदाद महिन्याचे साहवे, शिरमहिन्याचे तेरावे, मिरादमाहिन्याचे सातवे, शारिवरमहिन्याचे चवथे, मेहरेमहिन्याचे सोळावे, आबनमहिन्याचे दाहावे, अझरमहिन्याचे नऊवे, दाईमहिन्याचे पंधरावे, आणि तेविसावे, वाहामनमहिन्याचे दुसरे, आणि इस्फेंदियरमहि-

न्याचे नऊवे तारिखेस हे सण पादशाहाचे हुकूमावरून लिहिले.

ईश्वरी उपासना धरावी, व सरकारी हुकुमाप्रमाणें आचरण करावें, याविषयीं सरकारी हुकूम जाला त्याची प्रत.

सर्व सरकारी चाकर बडेलोक, व दुसरे कामगार यांणी. शहरें, खेडीं, व गावांतील काजकारभारांमध्यें पुढील-हुकुमाप्रमाणे वर्तणूक करावी.

१ सर्व कामगारानीं जेंजें ते करतील त्यागोष्टींत मुख्यत्वेंकरून ईश्वरास राजी राखण्याकरितां परिश्रम करावा, आणि देवाजवळ बसून दीनवाणी प्रार्थना करितो आहें याप्रमाणे मनांत आणून आपणविषयीं आणि दुसऱ्याविषयीं पक्षपात न करावा.

२ कामगारानीं मंडळींतून एकीकडे दरवेषासारिखें राहूंनये अथवा सर्वांशीं स्नेह राखावा असेंही करूंनये, आणि बाजारीलोकांसारिखे सर्व दिवस प्रपंचाचेच कामांतही गुंतावें असेंही करूंनये परंतु साधारणरीतीनें व नियमीतपणाने राहावें आणि मंडळीमध्यें फारवेळ राहूंनये अथवा फार एकांतवासीही राहूंनये.

३ सर्वांनीं निराकारईश्वराकडे रात्रंदिवस लक्ष लावावें, आणि मोठे नेमाने प्रातःकाळीं, माध्यान्हकाळीं, सांयंकाळीं, व मध्यरात्रीं, त्याचें भजन करावें.

४ मनुष्य प्राण्याचीं कामकाजें करीत नाही त्या-वेळेस योग्यपुरुषानें केलेलीं जीं नीतिशास्त्रें, हींच परमार्थ होण्याजोगें औषध याचे व शास्त्रांतील मुख्यतत्वाचें अध्ययन करावें. त्या पुस्तकांपैकीं अखलाकी नासरी, अथवा नासीर याचा नीतिधर्म, मनाजीयत, महूलाकत, अहीया, किमया, व मुलारुमी याचा मासनवी इत्यादि ग्रंथांचें अध्ययन करावें, व ईश्वराची पूजाकरणें हा शुद्ध मार्ग आहे, व प्राण्यानीं माझी पूजा करावी असा ईश्वराचा हेतू आहे, असें भोंदूलोकानीं सांगीतलें असतां आपले मनामध्यें येणार नाहीं, व आपला विश्वास ढळणार नाहीं, असें होऊन धर्मांतील नानाप्रकारचे नियम माहीत होत तोंपर्यंत यापुस्तकाचें अध्ययन करावें. यास्तव हा शत्रू, व हा मित्र, व हा भाऊबंद आणि हा परकी असा भाव नधारितां निर्भयपणानें स्वेछ कारभार करावा.

५ आपले शक्तीनसार अतीताभ्यागतास, व दारिद्र्यास, व भिकाऱ्यास, व उघड्याबागड्यास, व जे संसार सोडून गोसावीं जाले आहेत, व तोंड पसरून लोकांस मागत नाहींत त्यांस धर्म करावा.

६ दंगेखोरलोकांस त्यांचे योग्यतेप्रमाणें काहींवेळ ममता, व काहींवेळ भय दाखऊन त्यांस शुद्धीवर आणावें आणि त्यांस बोध नव्हेईसें दिसलें तर त्यांचे पायांत

बिड्या घालाव्या, माराकुटी करावी अथवा नानातऱ्हेनें त्यांस ठार मारावें. देहांतशासन देणे जाल्यास पुर्ताविचार करून ही शिक्षा वारंवार देऊंनये. यास प्रमाण वाक्य आहे, कीं एकदां डोकें उडविलें असतां पुनः जडणेही फार अवघड गोष्ट आहे व जेव्हां ठार मारणे अवश्य आहे तेव्हां जास मृत्यू योग्य आहे. त्यास त्यांचे गुन्ह्यांचा मोकदमा बरोबर देऊन हुजूर पाठवावें, ह्मणजे ते पादशाहाचा हुकूम मान्य करितील, परंतु यादंगेखोरलोकांस हुजूर पाठविलें असतांही, त्याणीं फितूर केला तर त्यास ठार मारावें, तरी त्याचा प्राणघेतेवेळेस त्याचे हाल अगदी करूंनये.

७ जे धर्माविषयीं प्रख्यात आहेत, व जे ज्ञानी आहेत त्यांस बंदींतून सोडून त्यांचे वर्तणूकींत काहीं दोष आहे असें दिसून आल्यास युक्तीने त्यांचे कानास खडा-लावावा. उपदेशकरणारेही केव्हांकेव्हां चुकतात. यास्तव अशे मनुष्याची रागानें निर्भत्सना करूंनये. व रागानें बोललें असतां त्याचानें उत्तर देववत नाहीं, इश्वरकृपेने जे सत्य बोलतात, त्यांचा मोठा सत्कार करावा कीं, असे सत्यबोलणारे विरळे परंतु कित्तेक लोक असे दुष्ट आहेत, कीं खरें बोलणें त्यांचे गावीं-ही वसत नाहीं. परंतु दुर्दैवाने खोटें बोलावें असें वाटतें. योग्य मनुष्य जें जें बोलतात. तें ते सावधपणानें बोल-

तात, कारण कीं जो ग्रहस्थ ऐकत असतो, त्यास त्याचा त्रास आल्यावर यांस नड पडत्ये, यास्तव जे पुरूष दुसऱ्याकरितां आपले स्वार्थ बुडवावयास सिद्ध आहेत, ते परिसासारिखे आहेत असें मनांत आणावें.

८ खुशामतकरणारे जे लोक आहेत त्यांशीं स्नेह ठेवूंनये. कारण त्यांचे मसलतीनें काम नीट होत नाहीं जे जे खुशामतीचे रीतीनें बोलतात, त्यांशीं एकाएकीं रागें येउंनये. कारण कीं चाकरानीं लीनतेनें आणि सभ्य तेनें बोलावें, हा त्याचा धर्म होय.

९ न्यायाकरितां जे जे अर्ज करितात त्यांचे कामाची अनुक्रमानें आपण जातीनें चौकशी करावी कारण कीं जे पूर्वीं आले त्यांस वाट पाहावयास लाऊंनये. या-गोष्टीविषयीं मुख्यकारभाऱ्याचे हाताखालीं जे कामगार आहेत, त्याणीं त्याचे हुकुमाप्रमाणें करावें, आणि त्याणीं मुख्यास खटलें असें समजवावें, कीं तेणकरून अर्जदा-राची दाद लागावी.

१० जे आपले शेजाऱ्याची निंदा करितात त्याचें शासन करण्यास उतावळी नकरितां चौकशी करावी. दुसऱ्यास दोषठेवणारे पुष्कळ असतात. परंतु लोकांवि-षयीं चांगले बोलणारे असे क्वचित अशा गोष्टींमध्यें रागाने काय योग्य आहे. तें नविसरतां जें करणें आहे, तें विचारानें आणि स्थीरतेनें करा दुःखाचें अथवा रागाचे

वेळीं तुमचे जे योग्य मित्र अथवा चाकर जे मित्रत्वाविषयीं आणि शाहाणपणाविषयीं प्रख्यात आहेत त्यांस तुह्मास उपदेश करूंद्या अशा प्रसंगीं जे शाहाणें आहेत, ते शपथ घेत नाहींत.

११ शपथ घेण्याचा पाठ घालूंनये कांकीं जे अशा शपथा घेतात त्यांचे शपथांवरून ते खोटें बोलतात, असा मनुष्याचे मनांत संशय येतो. आणि जर एकादेवेळेस त्याणे शपथ घेतली तर लोक त्यास भ्रष्ट ह्मणतात.

१२ नीच मनुष्याप्रमाणे शिव्या देण्याचा शिरस्ता घालूंनये.

१३ शेताची लागवड वृद्धिंगत पावावी ह्मणून शेतकऱ्याशीं मिळवून घेऊन त्यास आगाऊ पैका द्यावा. कीं तेणेकरून प्रतिवर्षीं गांवें, खेडीं शहरें यांची वृद्धी होईल. जमीदारापासून चावडी घेणे ती जुलूम नकरितां घ्यावी, कीं तेणेकरून पडीझडींची लागवड होऊन मनुष्यवस्तीही जास्ती होईल. असें जाहल्यानंतर जमीनीमध्यें नानातऱ्हेचे किराण्यांचीं उत्पन्ने वाढवून जे निराळे नियम आहेत, त्याप्रमाणे त्याची व्यवस्था करावी. रयतेपासून वसूल घेणे तो थोडाथोडा घ्यावा, व करारापेक्षा जास्ती घेऊं नये.

१४ शिपाई अथवा दुसरे लोक यांस हुकुमाशिवाय दुसऱ्याचे घरांत नराहूंदेण्याविषयीं जपावें.

१५ सर्व गोष्टी आपलेच मतानें करूंनयेत व आपले पेक्षां जे शाहाणे आहेत, त्यांची मसलत घ्यावी, व जरी आपलेपेक्षां कोणी शाहाणा नसला तरी त्याची मसलत घ्यावी, कांकीं अशी ह्मण आहे कीं, अज्ञान जो आहे, तो एकादी गोष्ट खरी करितो, व असें आहे, कीं ज्ञातारा व शाहाणा मनुष्य नेहेमी कोणची गोष्ट बरोबर करितो असें होत नाहीं, परंतु लाहान व अज्ञान मूल एकादे- वेळेस बरोबर करितें, सर्वांचीच मसलत घ्यावी, असें नाहीं, तरी कामास जो हुशारपणा लागतो तो पुस्तकें वाचल्यानें अथवा वृद्ध जाल्यानें होतो असें नाहीं. परंतु तें ईश्वरी देणें होय. अज्ञान जो आहे तो द्वेषानें एकादी मसलत वाईट देईल ह्मणून त्याविषयीं संशय राखणे प्राप्त आहे, व कामकेलेले असे जे मनुष्य कचीत असतात त्यांस ठेवणे योग्य होय.

१६ जी एकादी गोष्ट चाकरानीं करावया जोगी आहे ती आपले मुलाकडून करवूंनये. आणि मुलानी येकादी गोष्ट करण्यास विश्वासुनये कारण कीं ते एकदां बिघडलें असतां नीट होण्यास कठीण आहे.

१७ मनुष्याचा सबबी लौकर ऐकून त्याणी जे अप राध केले असतील त्यांविषयीं डोळ्यांवर कातडें वोढावें कीं जो मनुष्य नेहेमी अपराध करितो, त्यास शिक्षा केल्यास तो फार निरडतो अथवा शिक्षेचा भयानें पळून

जातो. तात्पर्य कोणी एकानें एक अपराध केला तर त्यास शिक्षा द्यावी लागत्ये. आणि एकाद्यानें हजारों अपराध केले तरी त्यास माफी द्यावी लागत्ये. व जर शिक्षा देणे हें सरकारास जरूर आहे, तर विचारानें आणि बेतबातानें द्यावी.

१८ ईश्वरास भिऊन वागणारे असे जे लोक असतील त्यांस वाहतेरस्त्यावर पाहऱ्यास पाठवावें, व तेथें बरें वाईट होईल, त्याचा जाब त्यांजपासून घ्यावा, अशा गोष्टीविषयीं त्यांस ताकीद नीट द्यावी, कीं बरोबर ताकीद केल्याखेरीज पाहऱ्याची बरोबर व्यवस्था आणि अमल नीट बसणार नाहीं.

१९ मनुष्यास त्याचे जातीप्रमाणें शिक्षा करावी, व गर्विष्ठमनुष्यास ठार मारावें लागतें, तरी नीचस्वभावाचे मनुष्यास एक फटका मारून उपयोग नाहीं.

२० मनुष्यास ज्याचे त्याचे जातीविषयीं ईश्वरीविश्वासाविषयीं अथवा धर्माविषयीं दुःख देऊंनये कारण जो विचारवंत मनुष्य आहे तो, या नाशिवंतमृत्युलोकीं आपला नाश व्हावा अशी इछा करीत नाहीं. धर्मसबंधी प्रकरणांत जें त्यास ठाऊक आहे व जें तो ऐकतो, तेंच करील. मग त्याचा किंवा लोकाचा धर्म खरा असो. याकरितां द्वेष अथवा जुलूम त्याजवर करूंनये. आणि लोकाचा धर्म खरा असतांही, तो दुसरे मार्गानें जात

आहे, तर त्याजवर जुलूम नकरितां, व त्यास त्रास नदेतां असे दुर्दैव्यास सहाय व्हावें, व त्याजवर कृपा करावी. अशा कर्मांत जे पुण्यकर्माविषयीं अथवा उपकाराविषयीं प्रख्यात आहेत त्यांशीं मित्रत्वानें राहावें.

२१ निजणे अथवा खाणे बातबेतापेक्षां अथवा जितकें करणे प्राप्त आहे त्यापेक्षां जास्ती नसावें कीं तेणेकरून पशुपासून मनुष्य वोळखिलें जावें. रात्री जोपर्यंत जागवेल तोंपर्यंत जागावें, परंतु जें काम दिवसास करावयाचें तें रात्रीपर्यंत ठेऊनये.

२२ लोकांचे अपराधाचा किंवा गुन्ह्याचा विचार आपलेवरून करावा, नंतर त्याचे अपराधास जे पारिपत्य देणें, तें द्यावे, अशा गोष्टींत कोणाचे अपराधाविषयीं पारपत्य करावें, व कोणास त्याचे अपराधाविषयीं माफी द्यावी याचा विचार करावा. कित्तेक लाहानगुन्ह्यास मोठी शिक्षा द्यावी लागत्ये, व मोठालेगुन्ह्याविषयीं विचार करून थोडी शिक्षा द्यावी लागत्ये.

२३एकाद्याशीं मोठा द्वेष करणे, अथवा आपले मनांत त्याविषयींचा सूड उगवावा असें आणणेंही अयोग्य गोष्ट आहे यास्तव एकादे मनुष्यावर फार रागावलें, असतां सूड घेण्याविषयींच मनांत आणूनये, कीं सर्व गोष्टीकर्त्ता करविता ईश्वर हा अदृश्य आहे, यास्तव कज्या

तंट्याविषयीं जा गोष्टी असतील त्याचा निवाडा ईश्वरास ठेवावा.

२४ सर्व शिपाईलोकांचा नीट बंदोबस्त टेवावा व त्यांजवर फार विश्वास ठेऊंनये कारण कीं जास लोभ नाहीं, आणि फार विश्वासु असा विरळा. याकारितां प्रत्येक कामावर पुष्कळ शिपाई नेमून त्यांस अशारीतीने ठेवावें, कीं एकमेकाशीं एकमेकाची सलगी नसावी, याप्रमाणे निरनिराळे शिपाई काय ह्मणतात तें ऐकून घेऊन त्यास ताळा घालावा मनांत विचार करून आपणास जें काम करावयाचें तें करण्याकरितां जे शिपाई सर्वांस ठाऊक आहेत त्याशिपायांस शहरांत पाठवावें.

२५ दुष्टकर्मकरणारे लोकांशीं सहवास नसावा आणि जरी कामगारलोकांचे काम त्याशिवाय बारमाही होत नाहीं तरी त्यांजवर अगदी विश्वास नठेवितां त्यांचा संशय धरावा. नाहींपेक्षां स्नेहाचे नात्याने त्याचे मनांत येतें, कीं चांगलेमनुष्यास ठार मारावें आणि त्यास जें काम सांगतात, त्यास त्याचे दुष्ट कर्माचा शोध करण्यास वेळ नसतो.

२६ गोड बोलून फसविणारे जे लोक आहेत, त्यांचाशीं बाताबेताने राहावें, कारण ते मैत्रीचा भाव दाखवून द्वेष उत्पन्न करितात. नाहींतर जांमाणसांस उद्योग नाहीं त्यांजवर विश्वास ठेवण्यानें जें त्यास काम देतात,

त्यांस कामानें फावत नाहीं. यामुळें एकाएकीं फितूर होईल.

२७ साधूलोक अथवा बैरागी जे ईश्वराचा शोध करितात. त्यांचा समुदायासहित ईश्वराची प्रार्थना करावी.

२८ आपलें शेजारातून वर्तमान आणावें व फार सलगी न दाखवितां जर पादशाहीकचेरींत विदीत करण्याजोगें असेल तें विदीत करावें.

२९ विद्या लोकांत प्रसिद्ध करण्याकरितां व शिकण्याकरितां परिश्रम करावा. कीं हरएक जातीमध्यें कोणी बुद्धिमान असेल त्याचे शिकण्याची हयगय न व्हावी.

३० प्रत्येक शिपायाचे सामानाची, व हात्येराची चौकशी ठेवावी. कारण त्याचे सर्व सामान मरव्यानें होतें, व त्याणे आपले मिळकतीपेक्षां जास्ती खर्च करूंनये यास ह्मण आहे, कीं आपले आद्यापेक्षां जास्ती खर्च करितो, तो मूर्ख, व जो आद्याहून खर्च उणा करितो, तो मूर्ख असला तथापि शाहाणा होय

३१ त्यांस बारमाही एकाच ठाण्यांत नठेवितां हुजूर बदलि होईल अशा संशयांत ठेवावें

३२ एकाद्यास काहीं द्यावयास कबूल केलें असलें. तर त्यासं तें देण्यास उशीर लावूंनये खरें बोलावें, आणि वसुलीकारकुनानीं कोणास वचन दिलें असल्यास त्यास तें खरे करून दाखवावें.

३३ बाण, व गोळी, मारण्यांत जातीनें त्याणी नेहेमी अभ्यास करावा, कीं तेणेकरून ते अशाकामांत शिपाई लोकांत हुशार करूं शकतील.

३४ शिकारीचे कर्मणूकीचा शोक फार करूं देउं-नये,परंतु शिपायाचे धंद्यास जितकी गरज आहे, तितकी व यासंसारामध्यें विश्रांतीकरितां पाहिजे तितकी करावी.

३५ आपले घरांतील जुनेंपुराणें चाकरलोक असतील त्यांस शिकवावें परंतु, त्यांशीं वारंवार थट्टा करूंनये अथवा हांसूंनये.

३६ सूर्योदईं, व मध्यरात्री नगारा वाजवावा कारण मध्यरात्रीपासून दिवसास प्रारंभ होतो, असें ह्मणतात.

३७ संक्रांतीचे दिवशीं बंदुका व मोठाल्या तोफा, याणें सूर्यास सलामी द्यावी, व जेजेकार करावा, कींतेणें करून, सर्व माणसानी तो कृपा करितो ह्मणून, त्याची प्रार्थना करावी.

३८ चाकर. व इष्टमित्रलोक यांचा चौकशी करावी, काकीं ते आपले सलगीवरून जुलुम करितील

३९ अर्जाची सुनावणी करावयास आपण जातीने एक मनुष्य ठेवावा.

४० कोतवालाचे कायदे अथवा पोलीस माजिस्त्रेट याचे कायद्याप्रमाणे आचरण करावे, आणि जर एकादे

शहरांत कोतवाल नसला, तर पुढें लिहिलेले कायद्यां प्रमाणे काम करावें, आणि हें काम जितकें त्यांचानें होईल तितकें करावें, कोतवाल एकटाच त्याचे खात्याचें काम करूं शकत नाहीं. यामुळें चांगले मनुष्यास या कामावर ठेवावें. याविषयीं पुढें जितकीं खातीं लिहिलीं जातील तितक्यांतील प्रत्येकास अमुक काम नेमून द्यावें, यास्तव जास चांगलें समजतें त्यास हें काम द्यावें. व कामगारानी हें काम करणे योग्य नाहीं, असें मूर्खत्वानें मनांत न आणितां, समजावें कीं हें मोठे विश्वासाचें व मोजब्याचें काम आहे असें मनांत आणून पुढें लिहिलेले कायद्यांप्रमाणे काम करावें.

१ शहरें, गांवें, खेडीं, यांतील कोतवाल यार्णी सरकारीकारकूनाचे सल्यानें घरें, व इमारती, किती याची याद करून अमुक गांवांत इतकीं मनुष्यें, व अमक्यांचीं घरें, व घरांत राहाणारी मनुष्यें कुळंबी, वाणी बकाल शिपाई, व दुसरे किती जे असतील ते बुकांत बार करून ठेवावे. प्रत्येकघरवाल्यापासून जामीन घेऊन एकोपा करावा, आणि गांवें वाटून प्रत्येकावर एक चौकसनीस ठेवावा. कीं तेथें वाईट बरी गोष्ट होईल त्याचा त्यास जाब पुसावा. प्रत्येकगांवांत एक शिपाई ठेवावा कीं त्याणे तेथें जे होईल त्याची खबर कोतवालास देऊन जेव्हां चोरी होईल, अथवा आग अथवा दुसऱ्या अशा

गोष्टी होतील, तेव्हां शेजारील लोकानीं त्यास सहाय द्यावें, असा बंदोबस्त करावा. अशाप्रसंगीं शेजारील सर्व लोकानीं गांवांवरील जो चवकसनीस असेल, त्यास व पोलीसचे लोकांस मदत द्यावी. अशा नडीचा प्रसंगीं त्याणीं मदत नदिल्यास त्याजवर ठपका येईल. व त्याणीं अयोग्य कर्म केलें असें लिहिलें जाईल. एकादा ग्रहस्थ घरांतून निघून गेला असतां, तें घर शेजाऱ्याचे, अथवा त्यागांवांवर जो पोलीसखात्याचा कामगार असेल त्याचे स्वाधीन करावें. एकाद्याचे घरीं पाहुणा मित्र अथवा परकी आल्यास घरचे धण्यानें त्यागांवांवरील जो कामगार असेल, त्यास खबर द्यावी, ह्मणजे त्याचें नाव बारनिशींत लिहिलें जाईल. तात्पर्य प्रत्येकगांवांत एक अथवा काहीं जास्ती पाहारे कोण आले व गेले, व तेथें काय होईल. तें लिहावयास ठेवावे, एकटाच पाहुणा आला तर त्याजपासून ओळख घ्यावी. आणि ओळख-घेतल्या खेरीज त्यास गांवांत राहूं देऊंनये. जासजा-मीन मिळत नसतील त्या सर्वांस जेथे चवकसनीस, व पोलीसखात्यांतील कामगार असतो, तेथें प्रत्येक येणारे माणसाची, मिळकत किती, व खर्च किती, याची गुप्त-पणे चौकशी करण्याकरितां पाठवावे. जाग्रहस्थाची मिळकत थोडी व खर्च फार असा जो असेल, तो चोर असें समजावें. आणि याप्रमाणें त्याची चौकशी करावी

परंतु यागोष्टीत योग्य व पुण्यकारक जें असेल तें न विसरतां असें समजावें, कीं ही चौकशी लोकांचें वित्तहरण करण्याकरितां करितात, असें नाहीं परंतु चांगले कायद्याकरितां करितात.

२ कोतवालानें व्यापारासंमंधी नानातऱ्हेचीं कामें करण्याकरितां एक अथवा जास्ती दलाल त्याजपासून जामीन घेऊन त्यास बाजारामध्यें ठेवावें, कीं विकलेले अथवा विकत घेतलेले सर्व जिनसाची त्याणी खबर द्यावी. कोतवालाने हा कायदा करावा, कीं कोणीं काहीं विकणे अथवा विकत घेणे जाल्यास दलालाचे सल्याखेरीज विकल्यास तो गुन्ह्यात येईल. आणि नित्यविकणाराची व विकत घेणाराचीं नावें रोजकीर्दीवर मांडली जातील, याकारितां सर्व पदार्थ विकत घेणे जाल्यास, अथवा विकणे जाल्यास, त्याखात्यावर जो कामगार असेल, त्याचीं, आणि सरकारी पोलीसखात्याचीं माणसें असतील त्यांचे सल्याने घ्यावें.

३ कोतवालाने गांवाचा बचाव होण्याकारितां रात्रीं चोरवाटांवर आणि गांवाचे शेजारीं पाहारा ठेवावा.

४ कोतवालाने गांवांत अथवा आडवाटेने आणि बाजारांत परकी मनुष्य नयेऊंदेण्याविषयीं बंदोबस्त ठेवावा.

५ कोतवालानें उचले आणि चोर यांचे मदतीनें

चौकशी करून चोरास धरावें, आणि शेजारीं जेव्हां एका-
दा पदार्थ चोरीस गेला अथवा लुटला, गेला असतां, उच-
ल्यानें चोर धरून द्यावा, नाहींपेक्षां सरकारीमहसूल्यामध्यें
त्याचा नफा कापून घ्यावा.

६ कोतवालानें कोणी मेलें असतां त्याचे सर्व सामान
त्याचे आप्तसबंधी, व वारीसदार असतील, त्यांस द्यावें
आणि त्या जिनगीस जर कोणी वारीसदार नसला तर
ती अनामत ठेवावी. व सरकारांत तेचसमयीं यावि-
षयींच लिहून पाठवावें, कीं कोणी खरा वारिसदार अस-
ल्यास, ती जिनगी त्यास द्यावी. सारांश कोतवालानें
इमानानें आणि सद्धर्मानें या कामांत चाकरी करावी. नाहीं
पेक्षां जशी रूसीचे राज्याची गत जाली तशी होईल.

७ कोतवालानें त्याचे ताब्यांतील गांवांत दारू नयेऊं-
देण्याविषयींची चौकशी ठेवावी, व न्यायाधिशानें दारू
पीणारास, विकणारास, व करणारास, शिक्षा अशी
करावी, कीं लोकानीं याप्रमाणें करूंनये.

८ कोतवालानें बाजारांतील सर्व निरख स्वस्त ठेवावे,
आणि जो संपत्तीवान असेल, व जाजवळ व्यापाराचें
सामान पुष्कळ असेल त्यास माहाग विकूं देऊंनये.

९ कोतवालानें नवरोज ह्मणून मोठा सण होतो, तेव्हां
सर्व बंदोबस्त ठेवावा, या सणाचा जेव्हां सूर्य मेषलग्नीं
येतो तेव्हां, आणि फरवारदीनमहिन्याचें प्रारंभीं प्रारंभ

होतो. दुसरे सणांपैकीं एक वर लिहिलेले महिन्याचे एकोणिसावें तारखेस होतो त्यादिवशीं चांगलें आचरण करावें. दुसरा अर्दिबिहिस्तमाहिन्याचे तिसरे, व एक खरदाहामहिन्याचे साहावें, आबनमहिन्याचे दाहावे आझरमहिन्याचे नऊवे तारिखेस, व दाईदमहिन्यांत तीन निरनिराळे सण आहेत, त्यांचें निरनिराळें आचरण करावें, एक आठवेतारिखेस, व एक पंध्रावेतारिखेस, व एक तेवीसावे तारिखेस, बाहामनमहिन्याचे दुसरे तारिखेस एक सण आहे. इस्फेंदिअर महिन्याचे नऊवे तारिखेस एक दुसरा सण आहे याखेरीज लोकानीं बाकीचे सर्व सण करावे.

१० नऊ रोज सणाचे रात्रीस ज्याप्रमाणें आचरण करितात, त्याप्रमाणेंच बुरादसणास करावें, रात्रीस दिवे लावावे. व नगारे वाजवावे, कारण तेव्हांपासून सणास प्रारंभ होतो. नऊ रोज सणाचे दिवसास सर्व डोंगरावर मोठाल्या नौबती वाजवाव्या.

११ बायकानीं घोड्यावर बसल्याखेरीज परिणामच नाहीं अशा प्रसंगीं बसावें.

१२ जेथे लोक पाणी ओढितात, त्याजाग्याशिवाय नदीवर लोक स्नानास जातात, तेथे चौक्या बसवाव्या व बायका जेथे स्नान करितात तेथे निराळ्या बसवाव्या.

## प्रकरण ९

मिरझा अजीज कोका याचा पुनः गुजराथेंत अंमल जाला. व सर्व व्यापाराचे पदार्थावरील जकातीची माफी होण्याकरितां हुकूम जाला त्याची प्रत.

मिरझा अजीज कोका यास हिजरी ९९७ व इसवी १५८८-८९ याशकांत माळव्याचे सुभ्यावरून गुजराथेचे सुभ्यावर नेमिलें. तो सुभ्यावर आल्यानंतर पुढले वर्षीं सुभ्यांतील मोठीं कामें पाहूं लागला.

खानखानन यासमयीं जालोरचा शेजार सोडणार होता, इतक्यांत घाजनीखान जालोरी हा सुलतान मुझाफीर याचे बंडांत जाऊन मिळावें, याबेताने आला होता- तो बंडांत जाऊन मिळावयास शक्तिमान नव्हता, ह्मणून तेवेळेस त्याचे हातून कित्तेक मूर्खत्वाचा गोष्ठी घडल्या. खानखानन याणें हिजरी ९९८ व इसवी १५८९-९० याशकांत मोहोरमचे नऊवे तारिखेस घाजनीखानावर फौज पाठविली, परंतु आपण अडथळा करावयास शक्तिमान नाहीं, असा विचार करून तो सरकारास हुजूर शरण गेला पादशाहानें यासमयीं त्याजवर दया करून जालोरचे मिराशी वतन होतें, तें त्याचे चरितार्थाकरितां पुनः दिलें. हिजरी ९९९ व इसवी १५९०-९१ याशकांत हिंदुस्थानांतील सर्व देशांमध्यें रहदारी, जकात, माफ-होण्याविषयींचा हुकूम जाला त्याची नकल पुढें लिहितों.

रहदारीवरील जकात माफ होण्याविषयींचे हुकु- माची प्रत.

या सुबत्ता काळांत पादशाहा राज्य करूंलागल्या पासून दुसरे संवत्सराचीं सातवर्षें लोटलीं तेव्हां सर्व पदार्थांवरील जकात माफ होण्याविषयीं हुकूम होतो हा सर्व हिंदुस्थानांतील सरकारी कारकून, व कामगार, यांस आतां, व याउपर जाहीर होवो. देशांतील राज्य व शहरांतील अमल, न्यायीराजाचे हातून व्हावा. असें दयाळू, व कीर्तिमान, व ज्याचे राज्यांत लोकांस मुक्ती होण्याजोगें सन्मार्गाचें ज्ञान होतें. असा जो ईश्वर त्याचे इछेस आल्यावरून बाजारांत आणलेल्या पदार्थावर जकात बसविली, कीं या पैक्याचे उत्पन्नात फौज ठेवितां यावी. व सर्व देशाचा, व मनुष्यांचा बचाव होण्याक- रितां रखवालदार ठेवितां यावे, परंतु याजकातीचा वसूल जुलुमानें जाला ह्मणजे तें राज्यांत दंग्यास व बखेड्यास कारण होतें. ह्मणून ईश्वराचा आभार मानावा, कीं पाद- शाहाचें न्यायी, आणि गैरजुलमी राज्याचा प्रारंभ जाल्यापासून पादशाहाचें अंतः करण प्रजेस सुख व्हावें, व धैर्य यावें, ह्मणोन जकातीची माफी होऊन पुढील लिहिलेले सर्व पदार्थांची बारनिशी नहोण्याविषयीं हुकूम जाला. सर्व जातीचें धान्य, व खावयाचा अथवा औषधी, वनस्पती, तेल, साकर, गंधीसामान, रू, लोंक-

रीकपडे, कातडें कमावून केलेले पदार्थ, तांब्याचीं भांडीं, मंजिष्ट, बरू, गवत, आणि लोकांचे उपयोगाचे पदार्थ खेरीज करून, व हत्ती, घोडे, उंट, मेंढरें, शेळ्या, शिपाईलोकांचीं हत्यारें, रेशिमी कापड, या पदार्थांवर शेंकडा एक रुपया प्रमाणें, सरकारी हक्क ह्मणून धर्मकृत्याबद्दल जकात द्यावी.

सरकारी कामगार व दुसरे कामगार, यांस हुकूम होतो, कीं त्याणी हा कायदा प्रसिद्ध केला ह्मणजे मातबरलोकांनीं गरीबास छळूं नये., व जुलमीलोकांनी गरीब लोक जे त्यांस शरण आहेत, त्यांजवर जुलूम करूंनये. तेव्हां पादशाहाचा मोठेपणा, कृपा, व उदारत्व, यांविषयीं पादशाहास सन्मान द्यावा, असें सर्व लोकांचें मनांत आलें, व न्यायही बरोबर होऊं लागला यास्तव या सर्व गोष्टी कर्त्ताकरविता जो ईश्वर त्याचा आभार मानावा.

याजकरितां कामगार, सरदार, कुळकर्णी, सुभेदार, प्रधान, व जाहागीरदार लोक, काळीवरील कामगार जकातीचे खात्यांतील, कारकून जमीदारलोक याणीं, आणि सरकारी हुद्देदार याणीं याहुकुमाकडे लक्ष देऊन टाळाटाळ नकारितां, त्याप्रमाणें आचरण करावयास फार परिश्रम करावा.

सरतेशेवटीं मिरझा अजीज कोका याचे अमलांत

देसाई, मोकदम, व कित्तेक परगण्यातील लोकानी फिर्याद केली, कीं नाझीम याचे वकील, व जाहागीरदार-लोक हे सर्व वसूल खातात, आणि हा देश दिल्लीचे ताब्यांत जाण्याचे पूर्वीं रजपूत, कोळी, आणि मुसल-मानलोक जागावांत राहात होते, व जागावांची वहिवाट त्यांज कडे होती, त्याणी बंद केलें तेव्हां त्याचा वसूल सरकारची नाहवी, व प्रजेची तसनस करून. सर्व खर्चून टाकिला, यावरून सरकारी हुकूम जाला, कीं त्या सुभ्यावरील दिवाण याणें देसाई. मोकदम, आणि अमीन, यांचे खुषीनें सरकारी सर्व जमिनींपैकीं शेकडा अडीच रुपयेप्रमाणे कापून ठेवावे. आणि जाहागीरदारांचे जमीनीतून घेणे तो गावांतील मोकदमास दस्तुरीबद्दल कापून द्यावा व याबद्दल अडीचरुपयांपेक्षां जास्ती कापून घेऊंनये, हाही हुकूम जाला कीं कोळीलोकानीं त्याचे चांगले वर्तणूकेविषयीं लायक जामीन देऊन त्याचे जमीनींपैकीं चतुर्थांश वसुलासुद्धां घ्यावा, व सर्व गांवां तील जमीदारलोकानीं किरकोळ स्वांरांस, सरकारी खुणा द्याव्या, कीं प्रांतावरील सुभेदारास काहीं गरज लागेल, तेवेळेस त्याणीं मदत द्यावी. विकावयाजोग्या जमीनी जाणीं विकत घेतल्या असतील, त्यांजपासून नेहेमीचे वसुलांतून अर्धा वसूल घ्यावा, आणि वर लिहि

लेले कायद्याप्रमाणे सर्व प्रांतामध्यें कायदे सुरू होऊंला-गल्यावर तो प्रांत सुफलतेस पावला.

पूर्वीं लिहिलेल्याप्रमाणें कोळी, व रजपूत ह्या लोकांचे ताब्यांत देश होता, परंतु तो गुजराथेंतील राजानीं घेतला तेव्हां ते त्यास शिक्षा करून बलात्कारानें त्याजपासून खंडणीं घेऊं लागलें. सरते शेवटीं पूर्वीं जांकडे जमीनी होत्या, ते सरकारी चाकरी करून त्यांचे गावांतील मिराशीजमीनींपैकीं त्यांस चतुर्थांश दिल्यामुळें, जास वांटा असें ह्मणतात, त्याजबदल माल गुजारी देण्यास कबुल जाहले. बाकीचे तीन अंश सरकारी जमीनीचे ह्मणून असत, त्यांस ताळपत असें ह्मणत. मोठाले जमीदार लोक जांस कित्येक परगण्यांची जाहागीर दिली होती, त्यांजकडून असें ठरवून घेतलें, कीं लढाईचा प्रसंग आला असतां, त्यांचा जाहागिरी, व शक्तीप्रमाणे स्वांर व पायदळांसुद्धां सरकारास मदत देऊन चाकरी करावी सरते शेवटीं कोळी आणि रजपूत, जांस निरनिराळे गांवांचा वाटा होता, त्याणीं सरकारची चाकरी फौजे-सुद्धां केल्यामुळें वांटा आपलासा करून घेऊन सुगीचे दिवसांत जाहागीरदारलोकांस खुशीनें काहीं बक्षिशी देत.

रजपूत, आणि कोळी, फार माजले होते, त्याणीं दंगा बखेडा करून गांवांतून लोकांची बैल, गुरें, हाकून

नेऊन तेथील लोकांस सुगीचे दिवसांत ठार मारावें. याप्रमाणे त्याणी चालविलें. लोकांची दाद लागत नसे ह्मणून बंडाचे मुख्य जे असतील त्यांस प्रतिवर्षीं काहीं पैसा, किंवा आपले जमीनींपैकीं एकादें पेरावयाजोगें एक शेत, अथवा जास्ती वाहिवाटीस देऊन आपले जीवाची सुटका करून घेत. आणि सुटका करून घेण्या करितां पैका देत त्यास जकात, अथवा वतन, असें ह्मणत, ही जकात दिवसानुदिवस सुभ्यावरील सुभेदाराचे नामर्दीनें इतकी जास्ती वाढत गेली, कीं रजपूत, कोळी, आणि मुसलमानलोकांस एकादे प्रांतांत, हा कर, अथवा हक्क मिळत नसे असें क्वचित. हे लोक स्वभावेंकरून फार उन्मत्त वाटमारे चोर दंगा व फितूर खोर असत, व सुभ्यावरील सुभेदाराची थोडीशी ढिलाई पडली ह्मणजे ते बंड करीत.

याकरितां कित्तेक सुभेदार पूर्वीं, व आतां प्रांतांप्रांतांतील गांवा भोंताले गांवकुसवें घालून तेथें पाहारे ठेवीत, त्यास ठाणी असें ह्मणत, याठाण्यांस नेमणूक सरकारांतून होऊन त्यांस त्यांचे नेमणुकीबदल सरकारांतून अमूक जमीन तोडून देत, कीं तेणेकरून बंडकाहीं सुरू जाल्याखेरीज त्याणीं आपले ठाण्यांतील जागा सोडूंनये. आतां परगण्यांत काहींच बंदोवस्त नाहीं. यामुळें पूर्वीं लिहिलेले दंगेखोरजातीचे लोकानी पूर्वीं जीं

किल्ल्यांवर लाहान लाहान ठाणीं होतीं ते किले पाडले आणि आपण दुसरे किल्ल्यांत राहून ग्रास ह्मणजे जुलुमानें जो भाग घेणे तो न घेतां सरकारी टाळपट ह्मणून जो भाग येतो तो घेतात.

मोठाले जमीदार जांस जाहागिरी होत्या त्यांणीं औरंगजेब याचे राज्यापर्यंत सरकारी चाकरी केली. परंतु आतां सुभ्यावरील सुभेदार फौज जमाकरून वांटा घेणार जे लोक सरकारी वसूल घेतात, त्यांजपासून गांवअसेल त्याप्रमाणें खंडणीं जमा करितात. आणि आपले आमलदारलोकांपासून जामीन घेतात. परंतु मोठाले जाहागीरदारलोक खंडणी देण्यास नाकबूल करतात, तेव्हां त्यांजपासून जोराकरून खंडणी घेण्यास सुभ्यावरील सुभेदारास शक्ती कोठे आहे? आणि दंगेखोर इतके माजले आहेत कीं त्यांजपासून काहीं लोक घेतल्याखेरीज सुभेदारास एकादे वेशींतून जाऊं देत नाहींत.

सारांश मिरझा अजीज कोका याणे हिजरी ९९९ व इसवी १५९० दांत पादशाहास मोठाले हत्ती व चांगले पदार्थांचीं नजर केली.

---

## प्रकरण १०

सुलतान मुझाफीर जास नथू असें ह्मणतात, त्याणे

नावा नगरचा जमीदार यास बंड करावयास उत्तेजन दिले. तेव्हां जाम जिंकला जाऊन जुनागड घेतल्या विषयीं.

यावर्षी जाजा गोष्टी घडल्या, त्यापैकीं सुलतान मुझाफीरानें मोठा दंगा माजविला त्याविषयींचें पुढें थोडेंसें वर्णन लिहितों. मिरझा अजीज कोका गुजराथेंत येऊन पोंचला तेव्हां सोराथ परगण्यांतील जाम यानामेंकरून मोठा जमीदार आहे तो, बंड करून मोठी लढाई करावी, याबेताने योग्य संधीची अपेक्षा करीत होता, यासमयीं सुलतान मुझाफीर याणें आपलें दडलेलें स्थान सोडून बंडखोरलोकांचा जमाव जमविण्या करितां यत्न केला तंव अमीनखांघोरी याचा पुत्र दौलतखां, व कछचा जमीदार खंगर हे दोघेजण येऊन याजकडे मिळाले. मिरझा अजीज कोका तेसमयीं जे जे व्हावे होते, त्यांचा बंदोबस्त करून बंड मोडण्या करितां निघाला. कालीजखानाचे भाऊ हे इसमाल कालीजखां याचे पुत्र जांस सोराथपरगण्यांत जाहागीर होती ते त्याचे बरोबर गेले नाहींत अजीज कोका विरामगांव एथें येऊन पोंचल्या नंतर अमीनखां घोरी याचा मुलगा फातखां, व हालवडचा जमीदार चंद्रसेन, व मुरबीचा जमीदार कर्ण परमाल, याची भेट जाली, आणि सय्यद काशीम, आणि खोवाजाहा सुलेमानबक्षी, याजबरोबर फौज देऊन पुढें

पाठविलें. ही फौज शत्रूपासून पंचवीसकोशांवर मुरबी एथें जाऊन पोंचली, व तेथें तळ पडला, तेसमयीं सरकारी फौजेवरील कामगार यांजकडून शत्रूंशीं कांहीं तह होण्याविषयीं सूचना जाली. सरकारी फौजेने तह करण्याचा बेत केल्यावरून शत्रूंस फारच फुरण चढलें. आणि ते लढाई करण्याविषयीं निश्चय करून पुढें आले. मिरझा अजीज कोका यास यागोष्टीचा फार राग येऊन त्याणे त्याशीं लढाई करावयास तयारी केली, आणि शत्रूची फौज तीसहजार, व याचे स्वांर दाहाहजार होते, तथापि त्याचा विचार करावयासही थांबला नाहीं. मुझाफीर पुढें आला, त्याजबरोबर गुजराथी, आणि रजपूत लोक फार होते.

अशा प्रसंगीं पाउसाची मोठी संततधार लागून याप्रमाणें दोनदिवस आणि दोनरात्री एकसारखी झड लागली, शत्रूचा उंच मैदानांत तळ पडला व सरकारी फौज एके खळग्यांत होती आणि असा जबर पाऊस पडला, कीं सरकारी फौजेमध्यें अन्न येण्यांची बंदी होऊन फौज अन्नावांचून मरूं लागली. खान अजीज कोका यास लढाई करणें हें ठीक दिसलें नाहीं, ह्मणून नावानगराकडे फौजेस अन्नबेगमी सहज मिळेल, आणि त्यावेळेस शत्रूचे फौजेंत कज्या उत्पन्न होईल, असें त्यास वाटून तो तिकडे गेला. सरकारी फौज एके मोठे

वसातीचे जाग्यापासून चारकोशांवर उतरली, तेथे त्यांस दाण्याची आणि दुसरे पदार्थांची पुष्कळ लूट सांपडली, व शत्रूचा फौजेपैकीं कित्तेक आपापले घरी गेले.

मुझाफीर नदीचे तिरीं उतरला होता, ती नदी दोन्ही दळांचे मधून गेली होती, आणि थोडेदिवसांनंतर एके-दिवशीं दोन्ही दळांची लढाई होऊन दोन्ही दळें जय यावया करितां मोठे धैर्यानें जुळलीं. रजपूतलोकानीं घोड्यावरून उतरून एकसारिखी तर्फ बांधिली, आणि हातांत सुऱ्या, जंबिये घेऊन पुढें सरसाउन आले, परंतु उजवेहाताकडील सरकारी फौजेने शत्रूचे डावेहातचे फौजेस माघारें हाकून देऊन त्यांस घोळांत घातले. आणि खान अजीज कोका हा काहीं निवडक मनुष्यें बरोबर घेऊन संधी सांपडावी, याकरितां वाट पाहात होता. त्याणे यासमयीं फार त्वरेनें पुढें जाऊन शत्रूची फौज उभी राहिली होती, तिची दाणादाण केली. जासा बावा याचा भाऊ आणि दोन मुलगे पांचशें रजपूत लोकां सहीत यालढाईत मारले गेले. मुझाफीर आणि जाम, हे गलबलून पळून गेले, दवलतखां यास जखम लागून तो जून्यागडाकडे गेला. शत्रूचे फौजेपैकीं दोनहजार मनुष्यें मारलीं गेलीं, व जखमी जालीं, आणि सरकारी फौजेंतुन सातशेंच मात्र मारले गेले.

हा जय मिळाल्यानंतर मिरझा अजीज कोका हा

नावानगरास गेला, तेथे त्यास पुष्कळ लूट सांपडली, मुझाफीर, आणि जाम, हे डोंगरांत लपले होते, ह्मणून तो शेजारीं आसपास काहीं दिवस राहिला. नवरांगखां आणि सय्यद काशीम, यांजबरोबर फौज देऊन त्यांस जुनागड घेण्याकरितां पाठविलें. दवलतखां यास मागले लढाईत जखम लागली होती, यामुळें तो यासमयीं मेला. व किल्यांतील लोक त्यास शरण जाऊन किल्ला सोडावयास कबूल जाले. मुझाफीर थोडे दिवसानीं त्याजकडे आला, तेव्हां त्याणीं आपले बेत फिरविलें. यावरून मिरझा अजीज कोका जातीने किल्ला घ्यावयास गेला, आणि मुझाफीर यास तेथे राहाणें, हें गैरबचावाचें दिसलें, ह्मणून त्याणे तेथून निघून लोकांत कळविलें, कीं तो अहंमदाबादेंत, गेला. मिरझा अजीज कोका याणे आपले मुलाबरोबर काहीं फौज देऊन त्याची पाठलाग करावयास पाठविले, आणि आपण जातीने जुन्यागडास वेढा घातला. यावेळेस जाम सरकारी फौजेसमोरून आपले वतनदारीचे जाहागिरीवर जात आहे, असें मिरझा अजीज कोका यास कळलें त्यास धरण्याकीरतां पुष्कळ त्वरा करून त्याची पाठलाग केली, तरी तो अरण्यांतील श्वापदांप्रमाणें त्याचे पूढें पळून गेला.

फौजेस वाटेवर फार दिवस लागले, व ते ताहानभुकेने

मेले याजमुळें मिरझा अजीज कोका हा त्यावर्षी जूनागड न घेतां अहंमदाबादेस परत आला, ते वेळेस सर्व बडेलोकांस आपापले जाहागिरीवर स्वस्थ राहण्यास हुकूम दिला.

जुनागड घेतल्या विषयीं

हिजरी १००० व इसवी १५९१ यावर्षी मिरझा अजीज कोका दुसरी फौज तयार करून शत्रूस नशियद द्यावी, व जूनागड घ्यावा, यानिश्चयाने निघाला. त्यासमयीं जाम याचा मुलगा जलालखान हा व घाजीखान आणि मालीक हुसेन हे त्यास भेटावयास आले गोगर मंगलूर, आणि सोमनाथ, येथील व याखेरीज सोळा बंदरें तरवार न हालवितां ताब्यांत आलीं, आणि तेथून मिरझा अजीज कोका जुन्यागडाकडे गेला तेव्हां जुनागड अमीनखान घोरी याचे ताब्यांत होता. तो किल्ला घेण्याकरितां खंदक, मोर्चे, तयार केल्यानंतर त्याणें धान्य, व सर्व पदार्थ, जा रस्त्याने किल्यांत जात होते, तेथे नवरांखां यास पाठविलें. यासमयीं किल्यांत आग लागून आंत कोंडलेलें लोकांची अन्नबेगमी, व सर्व सामान सुमान, जळालें. याआगेचा डोंबाळ्यामध्यें शत्रूनीं किल्यांतील लोकांस बार मारले, तेव्हां किल्यांतील लोक शेजारील लाहानशे टेंकडीवर आले, आणि तेथे उराइतका भोंवताला कोट घालून त्याणीं तेथे तोफ आणिली.

याजाग्यावर किल्यांतील लोक आल्यानंतर आपला गोळा टप्यावर जाऊन पोंचेल, असें खालचे लोकांस वाटून त्याणीं किल्यांतील लोकांस फार छळिलें, तेव्हां सरते शेवटीं यालोकानीं संकटांत पडून तह करावयास आज्ञा मागीतली, व किल्याचा किल्या स्वाधीन केल्या अमीनखां, आणि दवलतखां, याचे मुलानीं बरोबर पांच मोठे लोक घेऊन, मिरझा अजीज कोका याची भेट घेतली, तेव्हां मिरझा अजीज कोका याणे सर्वांस त्यांचे योग्यतेंप्रमाणे घोडे, सन्मानाचे पोषाख; कामें आणि जाहागिरी दिल्या.

सोराथपरगण्यातील हा किल्ला सरकारचे हातांत आल्यामूळें, ग्रंथकर्त्ता सोराथ देशाविषयीं आणि जुनागड असे नाव पडण्याविषयीं जें लिहिणे प्राप्त आहे, तें लिहितो. यापरगण्याची दक्षिण, व पश्चिमेकडे समुद्रपर्यंत मर्यादा आहे. व पूर्वेकडे झालावार जिल्ह्यापर्यंत, व उत्तरेकडे थाथा परगण्याचे हद्दीपर्यंत मर्यादा आहे, तेथे टेकड्याची काळवट जमीन, आणि खडकी जमीन, थोडासा पाऊस पडला असतां, अशी दलदलीत होत्ये कीं, त्याजवरून चालण्याची मुष्कल पडत्ये. यापरगण्यांत फारशीं झांडें नाहींत तरी आंबा, खिरणी, चिंच, व बाबुळीचीं झाडें, डोंगरांत असतात. तेथील राहाणारे लोक कोळी, आणि रजपूत यांची मिसळलेली जात आहे.

ते बहूतकरून हात्यारबंद, व स्वार, असतात. आंगांत चिलखतें घालितात, व हातांत भाले असतात, ते चोरी करण्यास चटावलेले असतात. आणि सरकारी फौज येऊन जबरी केल्याखेरीज ते वसूल देत नाहींत. यादेशाचे पांच जिल्हे केले आहेत, त्यांचीं नावें. **हालर, काठेवाड, गोलवाड, बाब्रीवाड** आणि **जईतवाड,** यांत कित्तेक बंदरें, नद्या, किल्ले व हिंदुचीं माहाक्षेत्रें **द्वारका, सोमनाथ,** आणि शात्रीनंझां अशीं आहेत तेथे रबीचे पिकांपेक्षां, खरीपाचें पीक, फार मोठें होतें. आणि तेथील जमीनीचा असा गुण आहे, कीं पीक येण्यास खात घालावें लागत नाहीं. पावसाळा संपल्यानंतर गहूं, आणि नुखड पेरितात. त्यास पाटवणाचे पाण्याची गरज लागत नाहीं तरी, जमीनीचे आंगचे वोलानें, व दहिंवर, त्या देशांत फार पडतें त्याणे वाढतात. गव्हांची जाती जासकथ असें ह्मणतात, ते फार चांगले असतात. व यादेशांत उत्पन्न होतात. सोराथ परगण्यांतील सर्व वसूलाचे पोटांतच इस्लामनगरचा वसूल पोंचतो.

सुलतान अहंमद जाणे अहंमदाबाद शहर वसविले त्याणे दोनवेळ पुनः पुनः हा देश घेण्याकारितां यत्न केला, परंतु त्यास मिळाला नाहीं, सरते शेवटीं महंमद बिगारा याणे राजा राव मांडालीक यास पूर्वीं लिहि-

त्याप्रमाणें जिंकून एक तटासुद्धां शहर वसविलें आणि त्यास **मस्तफाबाद** असें नाव दिलें.

**जुनागड** असें नाव पडण्याचें कारण **सोराथ** परगण्यांतील लोक बोलतात, कीं त्यादेशांतील राजा जाचें नाव मांडालीक होतें. व तो महंमद बिगारा याचे बराबरीनें राज्य करीत होता आणि जावंशानें त्याजागयावर एकोणीसशें वर्षें राज्य केलें होतें त्यावंशांतील तो सरतेशेवटचा पुरूष होता. त्याचे वाडवडिलानीं तेंवेळेस एक मेल्यावर एकानें याप्रमाणें राज्य केलें, आणि त्याचे राज्याचें सिंहासन जुन्यागडा पासून पांचकोशांवर भांटुली ह्मणून शहर आहे, तेथे होतें. पूर्वीं याजाग्याभंवताली मनस्वीच झाडांची दाटी मनुष्यांचा रिगाव न होण्याजोगी होती, ती कापली नव्हती. एकेदिवशीं एक लांकूडतोड्या आंत शिरून किल्यापर्यंत गेला. आणि त्याणे जें काय पाहिलें होतें, तें राजास सांगीतलें. राजानें तीं सर्व झाडें तोडवून ती जागा जातीनें पाहावयास गेला आणि गिरनारकिल्याचे पश्चिमेस एक चमत्कारीक तट पाहिला, त्याचे भिंती भंवताला उतरता खडक होता, त्याजवर तट बांधून त्यास भोंकें ठेविलीं होतीं त्यास तीन दरवजे एक पूर्वेकडे आणि एक पश्चिमेकडे, परंतु पश्चिमेचे दरवाज्यामध्यें उत्तरेकडे तिसरा दरवाजा होता त्यांत पहिले दरवाजांतून गेल्याखेरीज त्यास वाट नव्हती

त्याकिल्यावर दोन लाहान, व दोन मोठ्या विहिरी होत्या त्याचें पाणी सर्व किल्यास पुरत असे. हा किल्ला पाहा-वयास गेला. त्यावेळेस राजा मांडालीक याणें आपले बरोबरचे लोकांस त्याचें नाव काय व तो केव्हां बांधिला, हे विचारिलें तेव्हां, बरोबरचे लोकानीं आह्मास ठाऊक नाहीं असें सांगीतलें. याकरितां त्याणीं त्यास जुनागड असें नाव दिलें. त्यादेशांतील भाषेप्रमाणें जुना ह्मणजे पुरातन गड ह्मणजे किल्ला असें होतें. यामुळें त्यावेळे-पासून त्यास जुनागड असें ह्मणतात.

---

## प्रकरण ११

सुलतान मुझाफीर यास धरिल्यानंतर त्याणें प्राण दिला. मिरझा अजीज कोका, मका, या महापुण्य-क्षेत्राची यात्रा करावयास गेला. सुलतान मोराद याणे सुरजशिंग हाताखालीं घेऊन अमल केला. व मिरझा अजीज कोका यात्रेहून परत आल्यानंतर सुलतान मोराद याचे कामावर आला, आणि अकबर मेला त्याविषयीं.

मिरझा अजीज कोका याणे जुनागड घेतल्यानंतर मुझाफीर याचा शोध लावण्याकरितां फारच यत्न केला. सरते शेवटीं असें वर्तमान कळलें, कीं हा दुर्दैवी मुझा-फीर द्वारकापरगण्यामध्यें हाराचे जमीदाराशीं आश्रय

करून होता, याकरितां त्याणे या गुन्हेगार मनुष्याचे शोधास पुष्कळ सैन्य पाठविलें. त्या फौजेचा नवरांखां यास मुख्य अधिकार देऊन त्याजबरोबर गुजारखां निझामुदीन अहंमद बक्षी आणि मिरझा अजीज कोका याचा पुत्र महंमद अनवार हे गेले. हे सर्व सरदार द्वारका एथें येऊन पोंचल्यानंतर त्याणीं द्वारका घेऊन तेथें एक मशीद बांधली तेथें कांहीं सैन्य ठेऊन मुझाफीर याचा शोध काढावयास गेले, परंतु त्या देशांतील जमीदारानें धरणें येतें असें समजतांच मुझाफीरास जाहाजांतून जा बेटास तट होता तेथें पाठविलें, आणि आपण त्याजबरोबर गेला. सरकारी फौज शत्रूची पाठलाग करीत चालिली, तों जेथें घोड्याचा रिगाव नहोई, अशे ठिकाणीं शत्रू उभा राहिला. परंतु सरकारी स्वांर खालीं उतरून शत्रूशीं लढाई करूं लागले. शत्रूचे फौजेपैकीं कित्तेक ठार मारले, गेले व जमीदार एक तीर लागून ठार मारला गेला. यामुळें मुझाफीर याची त्याणीं फार छळणूक करून त्यास त्रास दिला ह्मणून तो घाबरून कच्छचा बहारा ह्मणून जमीदार होता त्याजकडे पळून गेला.

मिरझा अजीज कोका यास जुनागड एथें हें वर्तमान येऊन पोंचल्यावर त्या देशांत दुसरी फौज पाठविली. त्या फौजेचा अबदुल्ला ह्मणोन त्याचा पुत्र होता त्यास मुख्य अधिकार दिला. जाम जमीदार याणे शरण जाऊन

चांगली इच्छा करितो असे दाखऊन रस्त्यावर अजीज कोका याची भेट घेतली. आणि सरकारी कृपा असावी असी इच्छा दाखवून तहनामा केला कछचा जमीदार याणे आपले कारभारीही पाठविले. त्याणीं असें कबूल केलें कीं जमीदाराचा मुलगा आपले फौजेंत पाठवून देतों. परंतु मिरझा अजीज कोका याचे विचारास ही गोष्ट न आल्यावरून त्याणे त्यास सांगीतलें, कीं जर सरकारी चाकरी करावी व सरकारी कृपा आपणावर व्हावी असें तुमचे विचारास खरोखर येतें तर, तुह्मी मुझाफीरास सरकारचे मनुष्यांचे स्वाधीन करून द्यावे. मिरझा अजीज कोका यास फसविण्याकरितां व ही गोष्ट लांबणीवर टाकण्याकरितां, त्याणे पुष्कळ यत्न केले, परंतु मिरझा अजीज कोका याणें जाम या जाहागीरदारास एक परगणा-जाहागिरीबदल दिला होता ह्मणून त्याणे मिरझा अजीज कोका यास या गोष्टींत मदत देण्याकरितां सैन्य पाठविलें परंतु कछचा जमीदार याणे पुढले परिणामा विषयीं भिऊन सांगून पाठविलें, कीं मुरबीचा परगणा जो पूर्वीं पासून माझे ताब्यांत होता तो माझे चाकरीबदल मजकडे दिला तर मी मुझाफिरास तुमचे स्वाधीन करून देतों. मिरझा अजीज कोका याणे आनंदाने मान्य करून मुझाफीर यास धरण्याकरितां जी टोळी पाठविली होती तिजबरोबर जाम गेला, आणि त्याणे जासुदाबरोबर

सांगून पाठविलें, कीं बहारा जमीदार आपणास भेटावयास येणार आहे. तेव्हां तो जमीदार त्यास भेटावयास आल्यानंतर मिरझास त्याचे टोळींतील मनुष्यानीं त्याचे भोंवती वेढा घालून त्यास कैद केलें.

ही टोळी जा कामाकरितां पाठविली होती तें काम सिद्धीस पावल्यानंतर परत निघाली आणि बरोबर कैदी घेऊन सारी रात्र वाट चालली. प्रातःकाळीं अरुणोदयीं फौज उतरली. तेव्हां काहीं निमित्त करून तो कैदी एके झाडाखालीं गेला. आणि एक वस्त्रा दडवून आपले खिशामध्यें घातला होता, त्याणे आपली मान कापिली. याप्रमाणे या सृष्टींतील खटखटीपासून त्याणे आपले जिवाची सोडवणूक केली. आणि अशा त्वरेनें हें काम याणें केलें, कीं मिरझा अजीज कोका यास तो मेला, असें समजलें नसतें, मिरझा अजीज कोका याणे त्याचें डोकें हुजूर निझामुदीन अहंमद बक्षी याजबरोबर पाठवून दिलें. ही गोष्ट मुरबीपासून पंध्रा कोशांवर धारोल एथें जाली.

मुझाफीर मेल्याचें आणि जुनागड घेतल्याचें वर्तमान अकबराचे कानावर आलें तेव्हां मिरझा अजीज कोका यास हुजूर येण्याकरितां प्रीतीने हुकूम जाला. मिरझा अजीज कोका याणे अशीं मोठालीं कामे केलीं होतीं तरी कित्तेक कारणांवरून संशयामुळें हुजूर येण्याचा

निश्चय त्याचानें करवेना. आणि पोर्टुगीज लोकांपासून दायूबंदर घेण्याचा मी निश्चय केला आहे, यामुळें माझें येणे होत नाहीं. असें त्याणें लिहून पाठविलें. मूळप्रथम गुजरखांन, नवरांगखां, आणि खोवाजाहां आश्राफ, व दुसरे बडेलोक यांस आपले जाहागिरीवर जावयास हुकूम देऊन तेचवेळेस समुद्रतीरचे सर्व बंदरावरील काम गारांस लिहिलें कीं दायूबंदरावर व्यापारी लोकांचा व्यापार बंद करावा, कीं याप्रमाणे पोर्टुगीज लोकांस नागवून मला तेथें जाण्याविषयीं मोकळीक करा. तेवेळेस त्याणे बहारा जमीदार आणि जाम यास सांगून पाठविलें कीं मी शिंदेवरून हुजूर येण्याचा बेत केला आहे. सोमनाथ एथें तो येऊन पोंचल्यानंतर त्याणे मीर अबदूर रिझाकबक्षी आणि सय्यदबया झिददिवाण यास कैद केलें. परंतु कोणत्ये कारणावरून व कशावरून कैद केलें हें ग्रंथकर्त्यास ठाऊक नाहीं. आणि तेचवेळेस बंदरावर जाण्याकरितां, पोर्टुगीजलोकांचें मोकळीकपत्र आलें, हिजरी १००१ व इसवी १५९२ याशकांत आपलें कुटुंब आणि शंभरमनुष्यांसहीत जाहाजांत बसून विलावल पट्टण एथून हिलाही ह्मणून नावाचें जाहाज होतें, ते मकाची यात्रा करण्याचे बेताने हाकारलें, जादिवशीं तो जाहाजांत बसला ते दिवशीं सर्व सैन्य एकटोळीनें उभें करून मोठाले तंबूर होते ते झाडले. तेव्हां मिरझा

अजीज कोका याणे आपले डोळ्यांस आश्रू आणून सर्वांस रामराम केला, तेचवेळेस कैद केलेले लोकांस कैदेंतून सोडवून त्यांजपाशीं क्षमा मागीतली. अकबरास हें समजतांच त्यास फार राग आला, परंतु मिरझाचा वडील लेंक हुजूर होता त्यास एक हजार घोड्यांवरील मुख्य अधिकार देऊन, व दुसऱ्यास पांचशें घोड्यांचें पतक देऊन, त्याणे गुजराथेचा सुभा प्रीनस सुलतान मोराद भक्त यास दिला.

या गोष्टी होण्याचे पूर्वीं प्रीनस मोराद यास दक्षिण सुभ्यावर नेमिलें होतें, तेव्हां माळव्यांत फौज जमा करण्याकरितां त्यास सुभ्यावर येण्यास उशीर लागल्यामुळें यासमयीं त्यास दक्षिण सुभ्याबदल गुजराथसुभा दिला त्याचसमयीं त्यास हुकूम आले, कीं माळवा सोडून अहंमदाबादेस जावें. तेथून दोन्ही परगण्यांतून फौज जमा करून दक्षिणेंत यावें. आणि तेथील राज्यकारभाराचा बंदोबस्त करावा.

हिजरी १००२ व इसवी १५९३-९४ याशकांत मिरझा अजीज कोका यात्रेहून परत आला, आणि गुजराथेवरून हुजूर गेला. आणि प्रीनस मोराद भक्त दुसरे वर्षीं दक्षिणेंत गेला. ह्मणून सुरतशिंग अहंमदाबादेस त्याचें काम चालविण्याकरितां आला.

सुलतान मुझाफीर मयत याचा पुत्र बाहादूर याणे

हिजरी १००३ व इसवी १५९४ व ९५ यांत त्या परगण्यांमध्यें बंड माजविलें तेव्हां तो जिंकला गेला. मुझाफिरास मरतेसमयीं कन्या दोन, व पुत्र दोन, होते, तीं सर्व लोहारींचा जमीदार पवार याजबरोबर राहिलीं, गुजराथेंतील जहागीरदार दाक्षिण घेतली तेवेळीं सहायास पाठविले होते. आणि त्या परगण्यामध्यें बंड करण्यास चांगली संधी आहे, असें पाहून मुझाफीर याचे वडील पुत्रानें बंडाचा अधिकार घेतला. आणि गांवें, खेडीं, लुटलीं. राजा सुरतशिंग काहीं फौज घेऊन त्याजवर गेला. आणि शत्रूची पाठलाग करून त्यास गांठिले आणि लढाई करण्याचा आव घालून पहिले सपाट्यासच पळून गेले. यानंतर बाहादूर परत गेला.

हिजरी १००७ व इसवी १५९८ त आशीरचा किल्ला जो सुलतान बाहादूर गुजराथी याचे राज्यापासून *याकुत सुलतान याचें पुत्र इख्तयरखां, अलाघखां, आणि मुरजान यांचे ताब्यांत होता. तो दिल्लीचे राज्याखालीं मेळविला.

हिजरी १००९ व इसवी १६०० याशकांत प्रीनस सुलतान मोराद हा दक्षिण देशांत मेला. आणि मिरझा अजीज कोका यास तिसऱ्याने गुजराथेच्या सुभ्यावर नेमिलें. त्याचेवर्षीं शामसुदीन हुसेन अहंमदाबादेचे सुभे-

* याकुत हे नावआहे.

दारास सहाय करण्याकरितां पाठविला. आणि त्याचे मुलांपैकीं एकास सोराथचा फौजदार केले.

या तालुक्याचा वसूल मिरझा अजीज कोका आणि त्याचे कुटुंबास नेमून दिला होता. तेव्हां हिजरी १०११ व इसवी १६०२ याशकांत मिरझा अजीज कोका याणे विनंती केल्यावरून पादशाहाने त्याचा मुलगा शादमन यास त्या प्रांताची गुमस्तगिरी दिली. आणि दुसरा पुत्र अबदुला यास जुन्यागडाची मामलत दिली. त्याच-वर्षीं एक लाख रुपये खंबायतेचे बंदराचा वसूल. प्रीनस सालीम यास वार्षीक देणगीबदल नेमून दिला.

हिजरी १०१४ व इसवी १६०५ यावर्षीं जुमादा-सनीमहिन्याचे बारावे तारिखेस बुधवारीं अकबर ईश्वरे-छेने नाशिवंत सृष्टीसोडून मुक्तीचे स्थानास जाता जाला.

समाप्त.